॥ श्री ॥

# पहिलें महायुद्ध

१९१४–१९१८

इ ६८

( भाग तिसरा )

लेखक

श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

मुद्रक व प्रकाशक

श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर

श्रीदत्तात्रय प्रिंटिंग प्रेस, १३ शेणवीवाडी मुंबई नं. ४

सन १९४०

किंमत १॥ रुपया

# प्रस्तावना

ती. काकासाहेब खाडिलकर यांनीं गेल्या महायुद्धाच्या वेळीं १९१६–१७ सालीं महायुद्धाच्या तिसऱ्या वर्षांत चित्रमय जगत् मासिकांत महिनेवारीनें लिहिलेले लेख ह्या भागांत जसेच्यातसें घेतलेलें असून लेख सुबोध व्हावेत म्हणून पूर्वीच्या भागाप्रमाणेंच ह्या भागांत प्रसंगोचित नकाशाहि घातला आहे.

ह्या पुढील उरलेलें दोन भाग लवकरच प्रसिद्ध होतील.

नवाकाळ ऑफीस
३–८–४० } प्रकाशक

॥ श्री ॥

# पहिलें महायुद्ध

(भाग ३ रा)

## महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा ऑगस्ट–सप्टेंबर महिना

जुलै महिन्याप्रमाणें आगस्ट महिनाहि दोस्त सरकाराच्या सरशीचा गेला; इतकेंच नव्हे तर आगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत रोमानिया दोस्त सरकारांना मिळाल्यामुळें दोस्त सरकारांच्या सैन्यांत सात आठ लाख सैन्याची मोठी भर पडली, व अखेरच्या जयाविषयींची शंका निर्मूल झाली. रोमानिया दोस्त सरकारांना कां व कसा सामील झाला आणि त्यामुळें प्रथम बाल्कन प्रदेशावर व नंतर एकंदर महायुद्धावर कोणचे परिणाम होणारे आहेत याचा विचार करण्यापूर्वी आगस्ट महिन्याच्या पहिल्या तीन आठवड्यांतील महायुद्धाच्या स्थितीचें अवलोकन करणें जरूर आहे. जुलै महिन्याप्रमाणें आगस्ट महिन्यांतहि फ्रान्सची रणभूमि व रशियाची रणभूमि पूर्णपणें जागृत होती; इटलीच्या रणभूमीलाहि चेव आलेला होता व तुर्कस्थान विशेष धडपड करूं लागलें होतें. निद्रित अवस्था काय ती मेसापोटेमियाच्या बाजूला दृष्टीस पडत होती. आगस्टच्या पूर्वी युफ्रेटीस व तैग्रीस नद्यांच्या संगमाजवळ उन्हाळा १२० डिग्रीहून अधिक असल्यामुळें इंग्रजी सेनेला विशेष हालचाल करतां येणें शक्य नव्हतें. तुर्कांनीं चढाई करावी म्हणावें तर तुर्कांच्यापाशीं त्या बाजूला तितकें बलच नाहीं. लहानसान आरबी टोळ्यांना फूस देऊन त्यांच्याकडून इंग्रजी सेनेची वाटमारी करण्याचा उद्योग तुर्कांनीं केला, पण त्याचा तादृश कांहींच उपयोग झाला नाहीं, हें सांगणें नलगे. लेकव्हॅन व आर्मिनिया प्रांतांत रशियाचें पाऊल पुढें पडलें; तथापि त्या बाजूला विशेष फेरबदल झाला नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. आगस्ट महिन्यांत तुर्कांनीं जी विशेष हालचाल

दाखविली ती सुवेज कॅनालाच्या बाजूला आगस्टच्या ७–८ तारखेच्या सुमारास वीस पंचवीस हजार तुर्की सैन्य काटिया प्रांतांच्या बाजूनें सुवेज कॅनालजवळ पंधरा सतरा मैलांवर येऊन धडकलें व तेथें दोन दिवस इंग्रजी सेनेची व तुर्की फौजेची मोठी लढाई झाली. तुर्कांनीं मोठ्या तोफा व जर्मन गोलंदाज आपल्याबरोबर आणले होते; तरी तुर्कांचा पुरा पराभव होऊन पंचवीस तीस मैल मागें हटावें लागलें. ह्या पीछेहाटींत तुर्कांना मोठ्या तोफा परत नेतां आल्या हे खरें, पण तीन चार हजार तुर्की सैन्य इंग्रजांच्या हातीं लागलें व सात आठ हजार सैन्याची खराबी झाली! तुर्कांचें हें जें मोठें नुकसान झालें त्याचें कारण पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तुर्कांना करतां आला नाहीं हें होय. हवापाण्याच्या दृष्टीनें सुवेजकॅनालावर हल्ला करण्यास आगस्ट महिना प्रतिकूल होता. अशा प्रतिकूल स्थितींत तुर्कांनीं कां हल्ला केला? इजिप्तच्या संरक्षणाकडे इंग्रजांचें मन वेधलें जाऊन पश्चिम रणभूमींतले इंग्रजांचे प्रयत्न ढिले पडावेत म्हणून. पण या हल्ल्यानें तुर्कांची निर्बल स्थिति तेवढी उघडी जाहली आणि सुवेजचा मार्ग निर्भय ठरला. रूमानिया महायुद्धांत सामील होण्या-पूर्वी सुवेज कॅनालजवळ तुर्कांचा हा पराभव झाला होता; आणि त्यामुळें तुर्कांच्या मनुष्यबलाविषयींच्या अफवा निराधार ठरल्या होत्या हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. आगस्ट महिन्यांत तुर्की रणभूमींत दोस्त सरकारचीच सरशी होती. इटा-लीच्या रणभूमीकडे पाहिलें तर हीच सरशी दृष्टीस पडल्यावांचून राहात नाहीं. आगस्टच्या दुसऱ्या आठवड्यांत इटालियन सैन्यानें इसांझो नदी कांठच्या आस्ट्रि-यन फळीवर एकदम मोठा हल्ला चढविला व इसांझो नदी ओलांडून पलीकडचे गारीजिआ शहर इटलीनें घेतलें. गेले आठ दहा महिने गारिजिआ शहराकरितां एकसारख्या झटापटी होत होत्या. व आस्ट्रियानें या ठिकाणचा बंदोबस्तहि फार चांगला केला होता; पण इटलीनें मोठ्या हिकमतीनें हें ठाणें सर केलें. दोन महिन्यापूर्वीच्या ट्रेंटिनो प्रांतांतील इटलीच्या पीछेहाटीनें इटालियन सेनेस जो कमीपणा आला होता तो गारिजिआ येथील पराक्रमानें धुतला गेला. गारिजिआ येथें इटलीला एवढा मोठा जय मिळाला कीं त्यावेळीं इटलीनें आट्रियाची फळी फोडली, असें सर्वांना वाटलें. पण आगस्टच्या तिसऱ्या चौथ्या आठवड्यांत गारिजिआच्या पूर्वेस इटलीची प्रगति न झाल्यामुळें फळी फुटली नाहीं असें म्हणणें भाग आहे. फळी जरी फुटली नाहीं तरी गारिजियाचा विजय महत्त्वाचा

होय. इटलीला एवढा मोठा विजय यापूर्वी मिळालेला नव्हता. शिवाय हा विजय ट्रेंटिनो प्रांतांतील आस्ट्रियाची स्वारी मागें लोटत असतांना इटालीनें मिळविलेला आहे. संकट ओढवलें असतांनाहि इटलीची सेना पुन्हां वर डोकें काढू शकते हें या विजयानें ठरलें. ट्रिस्टी प्रांत आस्ट्रियापासून घेण्याच्या इटलीच्या मनोरथाला पुन्हां नवा वेग प्राप्त झाला. इटली महायुद्धांत सामील होऊन पांच सात महिने झाल्यावर असें वाटूं लागलें कीं, हा महायुद्धांत पडला कशाला ? याला ट्रिस्टीप्रांत कसला मिळतो ? ट्रेंटिनो प्रांतांत आस्ट्रिया घुसला त्यावेळीं वाटलें कीं, इटलीची मदत दोस्त सरकारांना न होतां उलट इटलीला मदत करतां करतां इंग्रजांना पुरेवाट होते कीं काय ? पण नाहीं; स्वतः आणि स्वतःच्या पायावरच इटली सावरला इतकेंच नव्हे तर इसांझोच्या बाजूला वर उसळून आस्ट्रियाला चोप देऊन गारिजिआ शहर घेऊन ट्रिस्टीची आशा धरण्यास इटली लायक आहे असें सर्व जगास इटलीनें दाखविलें. ट्रिस्टी प्रांत आस्ट्रियापासून हिसकावून घेण्याच्या मार्गाला इटाली लागलेला आहे असें प्रत्यक्ष पाहिल्यावर ट्रॅन्ससिल्व्हानिया प्रांत आस्ट्रियापासून आपणासहि हिसकावून घेतां येईल असें रोमानियाला कां वाटूं नये ?

पश्चिम रणभूमींतील रणकथेनेंहि आगस्ट महिन्यांत रोमानियाला उत्तेजन दिलें. जुलई महिन्यामध्यें इंग्रजांचें पाऊल पुढें पडलें खरें, पण आगस्ट महिन्यांत इंग्रजांची गति फारच मंद झाली. जर्मनांनीं इंग्रजांवर बरेच उलट हल्ले केले पण त्यांत जर्मनांना मुळींच यश आलें नाहीं. आगस्ट महिन्यांत इंग्रजांच्या हातून थीपव्हाल गांव घेववलें नाहीं. तथापि सदर गांवाला पूर्वेकडून वळसा देण्याचा उद्योग सावधगिरीनें पण नेटानें इंग्रजांनीं चालविला आहे. पेरोनि गांवहि आगस्ट महिन्यांत फ्रेंच सेनेला घेतां आलें नाहीं तथापि इंग्रजांप्रमाणें फ्रेंचांनींहि आस्ते आस्ते पण जोरानें पुढें पाऊल टाकण्याचा क्रम सुरू केला आहे. जुलै आगस्ट या दोन महिन्यांतील इंग्रज–फ्रेंच चढाईकडे पहातां पहिल्या आठवडयांतील धडकीसरसें इंग्रज व फ्रेंच जे कांहीं तीनचार मैल पुढें सरकले ते जवळ जवळ तेवढेच मैल आगस्टअखेर संभाळून राहिले असें म्हणावें लागतें. प्रगति आहे, नाहीं असें नाहीं पण फळी फोडण्याचें स्वरूप त्या गतीला नाहीं. व्हर्डूनच्यापुढें जर्मन सेनेची जी स्थिति झाली जी स्थिति सोमनदीच्या कांठीं आगस्ट महिन्यांत ती इंग्रजांची व फ्रेंचांची होऊं लागली. इंग्रजांची चढाई स्तंभित झाली.

आणि सोम नदीच्या लढाईला किल्ल्याच्या सभोंवारच्या लढण्याचें स्वरूप प्राप्त झालें. इंग्रजांची व फ्रेंचांची ही मंदगति रोमानियाला उत्तेजन देणारी कशी होती ? इंग्रजांना व फ्रेंचांना वर्ष दीड वर्षाच्या तयारीनें जर जर्मनांची फळी मोडतां आली नाहीं तर त्यांच्या पराक्रमावर भिस्त ठेवून रोमानियासारखें तटस्थ राष्ट्र त्यांच्या वतीनें महायुद्धांत सामील कसें झालें ? आगस्ट महिन्यांत इंग्रजांना व फ्रेंचांना जर्मनीची फळी मोडतां आली नाहीं हें खरें; तथापि जर्मन सेनेशीं सतत लढत राहून जर्मनांचा नाश रोजच्या रोज करण्याची ताकद इंग्रजांनीं व फ्रेंचांनीं या दोन महिन्यांत प्रकट केली आहे, आणि या शक्तींत आणखी कित्येक महिने रतीभरहि कमीपणा येणार नाहीं अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. जुलै महिन्यांत व्हर्डूनवर जोरजोराचे हल्ले जर्मनी करीत होता. पण आगस्ट महिन्यांत ते मंदावले, इतकेंच नव्हे तर जर्मनांचें पाऊल पुढें पडण्याच्या ऐवजीं फ्रेंचांचेंच पाऊल व्हर्डूनच्या सभोवतीं पुढें पडूं लागलें ! सहा महिने व्हर्डूनवर हल्ला करून जर्मनांना यश मिळालें नाहीं. तोफांचे मोर्चावर मोर्चे रचण्याच्या कामांतील जर्मनांचें वर्चस्व व्हर्डूनपुढें नष्ट झालें. १९१५ सालीं रशियावर जर्मनीनें जे जय मिळविले त्याची गुरुकिल्ली त्या वर्चस्वांत ! हें वर्चस्व नष्ट होण्याबरोबर तटस्थ राष्ट्रांत जर्मनीची इज्जत कमी झाली. इज्जत कमी होण्याबरोबर आपला फायदा करून घेण्यास कोणची हरकत आहे, असले विचार रोमानियांत खेळूं लागले. हे लाभाचे विचार रोमानियाला गुंगवीत असतांना इंग्रजांच्या व फ्रेंचांच्या चढाईमुळें रोमानियाला असें वाटलें कीं, इंग्रज व फ्रेंच जरी जर्मनीची फळी फोडण्यास समर्थ नसले तरी जर्मनीचे मुख्य बल फ्रान्समध्येंच अडकवून ठेवण्यास व त्याला रोज रोज उगाळून झिजवून टाकण्यास समर्थ आहेत. जर्मन तोफांचें आक्राळविक्राळ स्वरूप व्हर्डूननें सौम्य केलें आणि जर्मन सेनेचा विस्तार इंग्रजांच्या व फ्रेंचांच्या चढाईनें मर्यादित केला. अर्थात जर्मनीचें भय रोमानियाला राहिलें नाहीं. भय उरलें नाहीं खरें, पण यश मिळेल अशी खात्री कशी पटली ? व्हर्डून येथील जर्मनीच्या अपयशानें ज्या कार्याचें बीज पेरलें, अँग्लो–फ्रेंचांच्या चढाईमुळें ज्या कार्याचे बीजास अंकूर फुटले, इटलीच्या विजयानें ज्या कार्याला पल्लवीत केलें, तें रोमानियाला सामील करून घेण्याचें कार्य रशियाच्या कार्पेथियनवरील स्वारीनें फळास आणलें. जून महिन्यांत रशियानें ऑस्ट्रियावर स्वारी करण्यास प्रारंभ केला. दोन अडीच महिन्यांत सर्व

ब्युकोव्हिनाप्रांत घेऊन रशिया कार्पेथियनवर चढला. आणि ब्युकोव्हिनाच्या उत्तरेकडील स्टॅनला प्रांत काबीज करून त्या बाजूचे कार्पेथियनचे घांटहि रशियानें व्यापिले; इतकेंच नव्हे तर उत्तर ग्यालिशियांत कोव्हेल व लेंबर्ग यांनाहि शह देऊन दोनतीन महिन्यांत सात आठ लाख आस्ट्रियन सैन्य रशियानें लोळविलें. जर्मनीला फ्रेंचांनीं व इंग्रजांनीं पश्चिम रणभूमींत पूर्णपणें वेधून धरलेलें, आणि पूर्व रणभूमींत आस्ट्रियाला रशिया एका मागून एक तडाखे देत असलेला! अशी स्थिति पाहिल्या-वर रोमानियाला स्वतःचा लाभकाल जवळ आला असें वाटल्यास नवल तें कोणचें! रशियाच्या स्वारीनें आस्ट्रियाचें व जर्मनीचें आसन डळमळीत केल्याचा हा चवथा प्रसंग होय. महायुद्धाच्या अगदीं प्रारंभीं जर्मनी बेल्जममध्यें व फ्रान्समध्यें जोरजोरानें घुसत असतां रशियानें पूर्व प्रशियावर जोराची स्वारी केली व सर्व जर्मनीला घाबरवून सोडलें. त्यावेळीं पूर्व प्रशियाच्या सरहद्दीवरील दलदलीच्या जाळ्यांत रशियाला पकडून सेनापति हिंडेनबुर्ग ह्यांनीं रशियाचें संकट टाळलें. पुढें यिप्रेसच्या लढाईंत जर्मन गुंतले असतांना दक्षिण व पश्चिम पोलंड आक्रमून जर्मनींत घुसण्याचा घाट रशियानें घातला. त्यावेळीं कॅलेची हाव सोडून जर्मनीला आपलें सैन्य रशियाच्या बाजूला न्यावें लागलें. या दुसऱ्या खेपेला सेनापति हिंडेनबुर्ग ह्यांनीं रशियाला वार्सापर्यंत मागें हटविलें, पण वार्साच्या सभोंवती रशियानें जर्मनीचें कांहीं चालू दिलें नाहीं. जर्मनीला वार्साजवळ थोपविल्यानंतर १९१५ सालच्या प्रारंभीं थंडी कमी झाल्यावर रशियानें पुन्हां उचल खाल्ली आणि प्रिझमिसलचा किल्ला घेऊन मार्च–एप्रिल महिन्यांत सर्व ग्यालिशिया व्यापून उत्तर कार्पेथियन ओलांडण्यास सुरवात केली. आस्ट्रो–जर्मनांचें आसन डळमळीत झाल्याचा हा तिसरा प्रसंग होय. त्या वेळीं इटली महायुद्धांत सामील झाला. सर्व हंगारी व्यापला जाऊन महायुद्धाची परिसमाप्ति रशियाच्या बाजूनें एक–दोन महिन्यांत होणार असें सर्वांना त्यावेळीं वाटलें; पण जर्मनीला एक गोष्ट अनुकूल ह्यावेळीं झाली. रशियाला मदत व्हावी म्हणून अँग्लो–फ्रेंचांनीं जर्मनीच्या फळीवर बरेच हल्ले केले, आणि त्या हल्ल्यांत जरी यश मिळविलें तरी इंग्रजांच्या बाजूला दारूगोळ्याचा पूर्ण तुटवडा आहे असें जर्मनांच्या दृष्टोत्पत्तीस आणलें. पाऊल पुढें पडलें, पण व्यंग बाहेर आलें. या व्यंगाचा फायदा घेऊन पश्चिम रणभूमींतील आपलें बरेंच सैन्य जर्मनीनें पर्वेकडे

नेलें आणि डुनाजी नदीच्या कांठीं रशियाचा पराभव करून रशियाच्या मोठ्या पीछेहाटीस सुरुवात केली. त्या पीछेहाटीनें गतत्राण न होतां पुन्हां मोठी सेना उभारून शस्त्रास्त्रांनीं ती सज्ज करून आगस्ट महिन्यांत रशियानें आस्ट्रो–जर्मनांचें आसन चवथ्यांदा डळमळीत केलें; व आगस्ट अखेरीस रोमानिया दोस्त सरकारांना सामील झाल्यामुळें हा डळमळणारा डोलारा या चवथ्या खेपेस खालीं पडल्यावांचून राहाणार नाहीं, अशी सर्वांची खात्री झाली आहे. पहिल्या तीन प्रसंगीं हा डोलारा स्थिर झाला, याचें कारण दारूगोळ्याच्या दृष्टीनें अँग्लो–फ्रेंच सेना त्यावेळीं कमकुवत होती. पण आतां ती स्थिति राहिलेली नाहीं. खुद्द जर्मनीची सामुग्री व्हडुन पुढें खर्च होऊन गेली आहे. तेव्हां सेनेच्या व दारूगोळ्याच्या दृष्टीनें जर्मनांपाशीं विशेषशीं शिल्लक राहिलेली नाहीं. जुलै व आगस्ट या दोन महिन्यांच्या चढाईनें अँग्लो–फ्रेंच जरी मंदगति झाले असले तरी दारूगोळ्याचा तुटवडा त्यांच्या बाजूला बिलकूल नाहीं. जून–जुलै महिन्यापेक्षां आगस्ट महिन्यांत रशिया जरी किंचित् थकलेला दिसला तरी रोमानियाच्या सात आठ लाख सैन्याच्या मदतीनें हंगेरियाची पुरी फजिती उडविण्यास रशिया समर्थ आहे. आगस्ट महिन्यांत रशिया किंचित् थकलेला दिसत होता खरा पण हा थकवा थोडक्याशा मदतीनें दूर होण्यासारखा अल्पस्वल्पच. रोमानियाच्या मदतीची जरुरी त्यावेळीं रशियास वाटत होती. आपल्या मदतीची जरुरी वाटत आहे आणि मदत करण्याबरोबर यश येण्यास कोणचीच हरकत नाहीं अशी संधि पाहून रोमानियानें आगस्टअखेर आस्ट्रियाविरुद्ध युद्ध सुरू केलें व लगेच जर्मनी, टर्की व बल्गेरिया यांनींहि रोमानियावर तरवार उपसली.

रोमानिया महायुद्धांत सामील झाल्यामुळें दोन्ही पक्षांच्या लष्करी धोरणांत फरक पडलेला आहे. गेले दोन तीन महिने दोस्त सरकारचें धोरण असें होतें कीं पश्चिम रणभूमींत व पूर्व रणभूमींत जर्मनीला एकसारखें चेंचीत रहावयाचें व जर्मनी थकला म्हणजे फळी फोडून आंत शिरून जर्मन सेनाशकटाचा चक्काचूर करावयाचा. पण रोमानिया सामील झाल्यानें ह्या धोरणास एक नवीन वळण लागलें आहे. जर्मनीला दमांत उखडण्याच्या क्रियेस यश मिळण्यास जर्मनीचा तुर्की साम्राज्याशीं असलेला आगगाडीचा संबंध तोडणें जरूर आहे. तुर्कांचें मनुष्यबल व तुर्कांचा दाणापाणी ह्या मदतीवर जर्मनीचा दम वाढण्याचा संभव आहे. नव्या

बलाचा तुर्की झरा जर बंद झाला तर जर्मनीचा दम लवकर सुटेल. रोमानिया सामील झाल्यानें तुर्कांचा व जर्मनांचा संबंध तोडणें हें दोस्त सरकारांच्या लष्करी धोरणाच्या आटोक्यांत आलें आहे आणि सप्टेंबर–आक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यांत म्हणजे थंडीचा मोसम सुरू होण्यापूर्वी जर हा संबंध तोडतां आला तर रोमानिया सामील झाल्याचें योग्य फळ मिळाल्यासारखें होईल. बर्फापूर्वी जर हा संबंध तोडतां आला नाहीं तर सात आठ लख सैन्याची नवी कुमक मिळूनहि दोस्त सरकारांना योग्य फळ न मिळाल्यामुळें आस्ट्रो–जर्मन व तुर्क उल्हसित होतील, आणि जितक्या लवकर महायुद्धाची परिसमाप्ति होईल, असें आज वाटत आहे तितक्या लवकर ती होणार नाहीं. ह्या दृष्टीनें विचार केला असतां पुढील तीन महिन्यांत तुर्कांचा व जर्मनांचा संबंध तोडणें दोस्त सरकारांना भाग आहे. हा संबंध कसा तुटणार ? हा संबंध तोडावयाचा म्हणजे बेलग्रेडपासून कान्स्टान्टिनोपलपर्यंत जाणाऱ्या आगगाडीवर कोठें तरी दोस्त सरकारांच्या लष्कराची सत्ता स्थापन करावयाची. बेलग्रेडपासून कान्स्टान्टिनोपलपर्यंत जाणारी आगगाडी तीन प्रांतांत मोडतां येते. पहिला टापू बेलग्रेड, नीश, व सोफिया हा होय. दुसरा सोफिया–फिलिपोपोलिस–ॲड्रियानोपल हा होय. आणि तिसरा ॲड्रियानोपल–कान्स्टान्टिनोपल हा होय. ह्या तीन टापूपैकीं कोणच्या तरी एका टापूंत दोस्त सरकारच्या लष्करनें आगगाडी गांठली पाहिजे. आगगाडी गांठण्याचें हें काम कसें होणार ? प्रथम आपण पहिल्या टापूचा विचार करूं. बेलग्रेड–नीश व सोफिया ह्या टापूवर कोणत्या कोणत्या राष्ट्राची सेना उतरूं शकते तें पाहूं. बेलग्रेडपासून नीशपर्यंतच्या टापूवर रोमानियाची सेना सर्वांत लवकर जाऊं शकते. अर्सोव्होपासून व्हिडीनपर्यंतचा डान्यूब नदीचा भाग रोमानियन सैन्यानें ओलांडला म्हणजे रोमानियाचें लष्कर सर्व्हियाच्या हद्दींत एकदम येतें, व तेथून बेलग्रेड–नीशचा आगगाडीचा फाटा ६०–७० मैलच दूर राहातो. हे ६०–७० मैल डोंगराळ आहेत ही गोष्ट खरी, पण तेथें सर्व्हियन लोकांची वस्ती असल्यामुळें रोमानियाला पुढील मार्ग सुलभ होणारा आहे. डान्यूब नदी ओलांडून रोमानिया जर सर्व्हियाच्या मुलुखांत ह्या जागीं आला तर सर्व सर्व्हियामध्यें आस्ट्रियाच्या विरुद्ध बंडें झाल्यावांचून राहणार नाहींत. देशत्याग करतांना सर्व्हियन लोकांनीं ठिकठिकाणीं पुरून ठेवलेल्या बंदुका व तोफा वर येतील, आणि सर्व्हियन मुलुख

संभाळता संभाळतां आस्ट्रियन सैन्याला पुरेवाट होईल. बेलग्रेड–नीश ह्या टापूवर रोमानियाची मोहीम सुरू होण्याबरोबर सॅलिनोका येथें बसलेलें अँग्लो–फ्रेंच सैन्य डोरेनच्या मार्गानें मासिडोनियामध्यें शिरून बर्दाद नदीच्या काठानें नीशच्या रोखानें उत्तरेस जाऊं लागेल. म्हणजे पहिल्या टापूवर ईशान्येकडून रोमानिया व दक्षिणेकडून अँग्लो–फ्रेंच चाल करणार हें निश्चित होय. ह्या दोन खोऱ्यांना मदत होण्याकरितां दक्षिण आल्बेनियामध्यें इटालियन सैन्य उतरलें असून तें युस्कपच्या रोखानें दक्षिण मासिडोनियांत घुसूं पाहात आहे. ह्या इटालियन सन्यास मदत व्हावी म्हणून सॅलिनोका येथें उतरलेलें एक लाख सर्व्हियन सैन्य मोनास्टिरच्या दक्षिण–पश्चिम बाजूवर चाल करून जात आहे. रोमानिया लढाईंत सामील होण्याबरोबर आगस्टच्या अखेरीस तिन्ही दिशांनीं बेलग्रेड–नीश टापूवर तिन्ही स्वाऱ्यांस सुरवात झाली आहे. दक्षिण आल्बेनियांत इटालियन सैन्य उतरलें असून समुद्र किनारा वर सोडून तीस मैल आंत हें सैन्य गेलें आहे. आल्बेनियाचा हा प्रांत व युस्कपपर्यंतचा हा मासिडोनियाचा प्रांत इतका डोंगराळ व बिन रस्त्यांचा आहे कीं, त्या बाजूनें होणाऱ्या स्वारीस कोणीहि लष्करी धोरण्याच्या दृष्टीनें फारशी किंमत देणार नाहीं. मग इटली असल्या स्वारींत कां पडला ? स्वतःच्या जिवावर ही स्वारी यशस्वी करण्याकरितां नव्हे, तर सॅलिनोका येथील लाख सर्व्हियन सैन्य मोनास्टिरच्या दक्षिण पश्चिम टापूंत जर आलें तर त्यास मदत करण्याकरितां होय. रोमानिया महायुद्धांत सामील होण्याच्या सुमारास मोनास्टिरच्या रोखानें सर्व्हियन सैन्य उत्तरेस जाऊं लागलें. ह्या सैन्यास दक्षिण आल्बेनियाच्या पूर्व सरहद्दीवर जाऊन इटालियन सैन्याशीं संलग्न होतां येऊं नये म्हणून मोनास्टिरच्या दक्षिणेस असलेल्या बल्गेरियन सैन्यानें ग्रीशन हद्दीतील व्हार्सोवा सरोवराचा टापू आपल्या कबजांत घेतला; आणि व्हार्सोवाच्या पश्चिमेकडील फ्लोरिना गांव व त्याच्या आसपासच्या टेकड्या येथें लष्करचा बंदोबस्त करून दक्षिण आल्बेनियाच्या पूर्व सरहद्दीकडे जाण्याचा सर्व्हियाचा मार्ग बंद केला. बल्गेरियाचा लष्करी डावपेच ह्या ठिकाणीं असा दिसतो कीं, सॅलिनोका येथील सैन्यानें बेलग्रेड–नीश ह्या टापूवर चाल करून जावयाचें असल्यास बर्दाद नदीला धरून नीशपर्यंत तोंडास तोंड देऊन, लढत लढतच उत्तरेस गेलें पाहिजे. बर्दाद नदीच्या दोन्ही बाजूला एकामागून एक डोंगरांच्या रांगा आहेत. डोंगराळ प्रदेशांतील शत्रूचे चर शेंदीडशें मैलपर्यंत तोंडाला तोंड देऊन काबीज करीत जाणें फार सायासाचें आहे. डोरेन येथें सप्टेंबर प्रारंभाला

अँग्लो–फ्रेंच सैन्यानें बल्गेरियन सैन्यावर हल्ले करण्यास सुरवात केली आहे. पण त्या हल्लयांना निकराच्या लढाईचें रूप अद्याप आलेलें नाहीं. सर्व्हियन सैन्य व इटालियन सैन्य ह्यांचा मिलाफ न झाल्यास डोरेनच्या बाजूवर अँग्लो–फ्रेंचांचे जोराचे हल्ले होणार नाहींत. आर्सोव्हो व व्हिडीन ह्या टापूंत डान्यूब नदी ओलांडल्याशिवाय बल्गेरियाला उत्तरेकडून तंबी बसणार नाहीं आणि बल्गेरियाला उत्तरेकडून तंबी बसल्याशिवाय सालिनोकाच्या बाजूला बल्गेरिया हलका होणार नाहीं. बल्गेरिया हलका झाल्याशिवाय मोनास्टिर प्रांतांत सर्व्हियाला शिरतां यावयाचें नाहीं. मोनास्टिर प्रांतांत सर्व्हिया शिरून तेथें इटालियन सैन्याशीं संलग्न होऊन अँग्लो–फ्रेंच सैन्याची डावी बगल निर्धास्त झाल्याशिवाय बर्दाद नदीच्या काठानें उत्तरेस तोंडास तोंड देऊन नीशपर्यंत लढत जाणें धोक्याचें होय. आर्सोव्हो व व्हिडीन ह्या प्रांतांत जर रोमानियाला आस्ट्रो–जर्मनांचा पराभव करतां आला नाहीं तर डोरेनपासून नीशपर्यंत जरी अँग्लो–फ्रेंच सैन्य बर्दाद नदीच्या कांठानें वर गेलें तरी लष्करी दृष्टीनें विशेषतः उपयोग न होतां सांपळयांत अडकून पडण्याचें संकट मात्र अँग्लो–फ्रेंचांवर ओढवण्याचा संभव आहे. रोमानिया पहिल्या धडकीसरशी डान्यूब नदीची फळी कोठें फोडतो ह्यावर सॅलिनोका येथील अँग्लो–फ्रेंच सैन्याची हालचाल अवलंबून आहे. आगस्टच्या शेवटच्या आठवडयांत व सप्टेंबर प्रारंभाला आर्सोव्हो व व्हिडीन ह्या टापूंत आस्ट्रो–जर्मनांचे व रोमानियाचें तुंबळ युद्ध चालू झालें असून तेथील लढायांचा निकाल सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयांतहि लागला नाहीं. ह्या लढायांत जर रोमानियाला जय मिळाला तर उत्तर सर्व्हिया व दक्षिण सर्व्हिया हे दोन टापू सप्टेंबर–आक्टोबर महिन्यांतील मुख्य रणभूमि होऊन बसतील पण आर्सोव्हो व व्हिडीन या टापूंत रोमानियाला जय न मिळतां बेलग्रेड–नीश हा आगगाडीचा फांटा मोडण्याचा नाद जर रोमानियाला सोडून द्यावा लागला तर सर्व्हियाच्याऐवजीं बल्गेरियाचा मुलुख सप्टेंबर आक्टोबरमधील प्रधान रणभूमि होईल. बल्गेरियाचा मुलुख प्रधान रणभूमि झाली असतां रोमानियाच्या सैन्याची कशी हालचाल होईल तें आतां आपण पाहूं या.

बेलग्रेड–नीश हा फाटा एका बाजूला ठेवला आणि दुसऱ्या भागावर म्हणजे सोफीया फिलिपोपोलीस–आड्रियानोपल या भागावर रोमानिया चाल करून

येत आहे अशी कल्पना केली तर रोमानियाला डान्यूब नदी व्हिडीन व रश्चक यांच्या मध्यावर म्हणजे निकोपोली येथें ओलांडून इस्कर नदीच्या खोऱ्यानें सोफियावर चाल करून गेलें पाहिजे, किंवा प्लेव्हनाचा रस्ता धरून फिलिपोपोलीसवर स्वारी केली पाहिजे. डान्यूब नदी ओलांडल्यावर सोफिया व फिलिपोपोलीस या दोन्हीच्या रोखानें रोमानियन सैन्य पुढें सरसावेल हें उघड आहे. पण डान्यूब नदी ओलांडून इस्कर नदीचें खोरें व प्लेव्हनाचा टापू हीं जरी रोमानियानें कब्जांत घेतलीं तरी सोफिया–फिलिपोपोलीस या आगगाडीच्या फाट्यांवर येण्यास बाल्कन पर्वतांचा वाटेंत मोठा अडथळा आहे. म्हणून बेलग्रेड–कॉन्स्टांटिनोपल ही आगगाडी मोडण्याच्या दृष्टीनें व्हिडीन–आर्सोव्हो या टापूंत आस्ट्रो–जर्मनांचा पराभव करण्यांत जेवढा फायदा आहे तेवढा फायदा व्हिडीन–रश्चक ह्या टापूंत डान्यूब ओलांडण्यांत नाहीं. तेव्हां रोमानियानें पहिल्या धडकीसरशी व्हिडीन आर्सोव्हो टापूंत आस्ट्रो–जर्मनांनीं जोरानें लढण्यास सुरवात केली हें यथायोग्यच केलें. निकोपोली येथें बल्गेरियनांचा बराच जमाव असून रोमानियाला दक्षिणेकडून तंबी देण्याकरितां आस्ट्रियाच्या मदतीनें डान्यूब नदी ओलांडण्याचा बल्गेरियाचा प्रयत्न सुरू आहे. सप्टेंबर महिन्यांत रशियाची चांगली कुमक रोमानियाला मिळेल आणि रशियन सैन्य डान्यूब नदी ओलांडून बल्गेरियावर स्वारी करूं लागेल. ह्या रशियन स्वारीचे मार्ग दोन आहेत.एक रोमानियाच्या मध्यावर येऊन सोफिया फिलिपोपोलिस प्रांतांत घुसणें, आणि दुसरा डान्यूब नदीच्या मुखाजवळील रोमानियाच्या डोब्रुजा प्रांतांत उतरून तेथून रश्चक व व्हार्नी या टापूंतून बल्गेरियांत शिरून काळ्या समुद्राच्या कांठाकांठानें तुर्कांच्या आड्रियानोपल व कान्स्टांटिनोपल प्रांतांत घुसणें हा होय. रोमानिया सामील झाल्यामुळें रोमानियांतून बल्गेरियांत व बल्गारियांतून इस्तंबल प्रांतांत अशारीतीनें काळ्या समुद्रास धरून रशियास तुर्कांवर जंगी स्वारी करण्यास सुलभ झालें आहे. आगस्ट अखेरीस या जंगी स्वारीच्या दृष्टीनें रशियन सैन्य रोमानियांत उतरलें असून दक्षिणेकडे कूच करूं लागलें आहे. या सैन्यास अडथळा करण्याकरितां रश्चक व व्हार्नी यांच्या दरम्यान रोमानियाची सरहद्द ओलांडून डोब्रुजा प्रांतांत आगस्टअखेरीस बल्गेरियन सैन्य घुसलें आहे. सप्टेंबरच्या प्रारंभाला रोमानियन सेनेनें सरहद्दीपासून थोडक्या अंतरावर बल्गेरियाला थोपवून धरलें असून रशियन सेनेचा लोंढा उत्तरेकडून दक्षिणेकडे वहात आल्यावर रोमानियांत घुसलेल्या

बल्गेरियन सैन्याला पळतां भुई थोडी होईल हें उघड आहे. रशियन सैन्य ज्या प्रमाणें रोमानियाच्या मदतीला जलदीनें येत आहे त्याप्रमाणें आस्ट्रो जर्मन सैन्यहि डान्यूब नदीच्या दक्षिण तीरावर फार त्वरेनें गोळा होऊं लागलें आहे. इंग्लंड, फ्रान्स, इटली व रशिया या चार राष्ट्रांशीं त्यांच्या त्यांच्या सरहद्दीवर जोराची झुंज चालू असतां व कांहीं ठिकाणीं रशियानें आस्ट्रियाची फजिती आरंभिली असतां डान्यूब नदीकडे पाठविण्याला आस्ट्रो–जर्मनांपाशीं शिल्लक सैन्य कोठून आलें ? रोमानिया लढाईंत सामील होण्याबरोबर जर्मनीहि घाबरून गेला, आणि गेल्या चार पांच महिन्यांतील लष्करी धोरण जर्मनीनें एकदम सोडून दिलें. गेले सहा महिने पश्चिम रणभूमींत फ्रान्सवर हल्ले करून फ्रेंचांचा मोठा पराजय करण्याचा लोभ जर्मनीनें धरला होता. या फाजील लोभास जर्मनी बळी पडल्यामुळें रशियास चांगलें फावलें, आस्ट्रियाची पीछेहाट झाली, आणि रोमानिया महायद्धांत सामील होऊन बाल्कन प्रदेशांत फटफजिती होण्याची वेळ आली. फ्रान्सच्या छातीवर बसून महायुद्धाची परिसमाप्ति करून घेऊं असें ह्मणणारा पक्ष जर्मन लष्करांत अधिकारारूढ असल्यामुळें गेले चार महिने जर्मनी अधोगतीस लागला; पण रोमानियाची ठेंच लागल्याबरोबर जर्मन बादशहाचे डोळे उघडले आणि लगेच रशियाच्या बाजूलाच महायुद्धाची परिसमाप्ति करून घेतली पाहिजे असें म्हणणाऱ्या पक्षाच्या हातांत जर्मन सेनेची सत्ता जाऊन सेनापति हिंडेनबुर्ग हे आस्ट्रो–जर्मन सेनेचे सर्वांत मुख्य अधिकारी झाले. पश्चिम रणभूमि, पूर्व रणभूमि व बाल्कन प्रदेश ऊर्फ दक्षिण या तिन्ही ठिकाणच्या आस्ट्रो–जर्मन सैन्यावर सेनापति हिंडेनबुर्ग यांची हुकमत सुरू झाली आहे. इंग्रजांच्या व फ्रेंचांच्या बाजूला आपली जागा संभाळून बसावयाचें व प्रसंगविशेषीं थोडें थोडें मागें हटावयाचें असें धोरण पश्चिम रणभूमींत सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं स्वीकारलें असल्यामुळें फ्रान्स बेल्जममधील बरेंच सैन्य रशियाच्या बाजूला सेनापति हिंडेनबुर्ग हे नेऊं लागले आहेत. रोमानिया सामील झाल्यामुळें रशियाला आपल्या बलाची शिकस्त पूर्व कार्पेथियन ओलांडण्यांत व रोमानियाच्या मार्फत बल्गेरियावर चालून जाण्यांत करून दाखविणें जरूर आहे. अर्थात पूर्व कार्पेथियन व रोमनियाची दक्षिण सरहद्द ह्या दोन ठिकाणींच रशियाचें मुख्य बल खिळून राहाणार हें उघड आहे. तेव्हां उत्तरेकडील रिगाचा टापू, भिन्स्कचा टापू व पिन्स्कचा टापू येथें रशिया विशेष सबल राहाणें शक्य नाहीं. रशियाच्या ह्या

उत्तर रणभूमींत रशिया तितका सबल न राहिल्यामुळें स्वतःची जागा संभाळून राहिल्यानें व प्रसंगविशेषीं थोडथोडें मागें हटल्यानेंहि जर्मनीचें विशेषसें नुकसान होण्याचा संभव नाहीं. म्हणून उत्तरेकडील बरेंच जर्मन सैन्य मध्यावर कोव्हेलच्या प्रांतांत व दक्षिणेस डान्यूब नदीच्या तटाकीं येऊं लागलें आहे. रशियास पूर्व कार्पेथियनमध्यें व रोमानियास त्रान्स्लाव्हेनियाच्या पश्चिम सरहद्दीवरील पर्वतांत थोपवून धरून कार्पेथियन पर्वताच्या ह्या मुख्य रणभूमीच्या उजव्या बगलेस म्हणजे कोव्हेल–लेंबर्ग प्रांतांत किंवा डाव्या बगलेस म्हणजे डान्यूब नदीच्या तटाकीं रशियाचा मोठा पराभव करण्याचा सेनापति हिंडेनबुर्ग ह्यांचा हेतु आहे. ह्या लष्करी धोरणाला अनुसरून रोमानियाला पहिल्या धडकीसरशी रोमानियन सरहद्दीवरील कार्पेथियनचे घाट ओलांडून त्रान्स्लाव्हेनियाचा दक्षिण व पूर्व भाग एका आठवड्यांत त्यांनीं व्यापून दिला. सप्टेंबर महिन्यांत सर्व त्रान्स्लाव्हेनिया रोमानिया व्यापून टाकील असा अंदाज आहे. म्हणजे ज्या फळाच्या आशेनें रोमानिया महायुद्धांत सामील झाला तें फळ सप्टेंबर महिन्यांतच रोमानियाच्या पदरांत पडून आस्ट्रियाची नाचक्की होणार. सेनापति हिंडेनबुर्ग हे आस्ट्रियाच्या नाचक्कीकडे दुर्लक्ष करून रोमानियाचें जितकें कमी सैन्य डान्यूब नदीकडे येईल तितकें बरें अशा धोरणानें डाव खेळत आहेत असें दिसतें. त्रान्सलाव्हेनियामध्यें जर रोमानियन सैन्याचा मुख्य भाग अटला गेला तर कार्पेथियनचे व त्रान्स्लाव्हेनियाचे पर्वत ओलांडून हंगेरियाच्या मैदानावर उतरण्याचें धोरण रशियाला जारीनें अमलांत आणावें लागेल, आणि तसें झाल्यास कार्पेथिएनमध्यें व त्रान्स्लाव्हेनियाच्या पश्चिम पर्वतामध्यें रशियाला व रोमानियाला थोपवून धरण्याचें काम कमी सैन्यानें साधण्याजोगें आहे. अर्थात त्रान्स्लाव्हिनिया व्यापण्याकडे रोमानियाचें बरेंच बल खर्च झाल्यास त्याला थोपवून धरण्यास मोठें लष्कर न लागतां डान्यूब नदीवर अधिक सैन्य पाठविण्याची सवड सेनापति हिंडेनबुर्ग ह्यांना मिळणारी आहे. रोमानियानें त्रान्स्लाव्हेनिया व्यापला तर रोमानियाचें कार्य झालें; आस्ट्रियाची नाचक्की झाली; पण महायुद्धांतील दोस्त सरकारांच्या पूर्वेकडील मुख्य लष्करी धोरणास मोठीशी मदत होणार नाहीं. हंगेरियाच्या मैदानावर उतरणें किंवा टर्कीशीं असलेला जर्मन आगगाडीचा संबंध तोडणें हें रशियाच्या बाजूचें मुख्य लष्करी धोरण आहे. त्रान्स्लाव्हेनिया व्यापण्यांत जर रोमानियाचें मुख्य बल आटलें गेलें तर जेवढ्या सैन्यानें आस्ट्रियानें रोमानियाला कार्पेथियन पर्वतांत थोपवून धरलें असतें त्याहून कमी सैन्यानें त्रान्स्लाव्हेनियाच्या पश्चिमेस रोमानियाला थोपवून

धरण्याची वेळ यावयाची आहे. आजच त्या गोष्टीची घाई नाहीं पण कार्पेथियन पर्वताचे घाट नुसते ताब्यांत घेऊन जर रोमानियानें आपलें मुख्य बल पहिल्या धडकीसरशीं बल्गेरियावर फेंकलें असतें तर त्रान्सलव्हेनियामध्यें आस्ट्रियाची जी नाचक्की झाली ती नाचक्की बल्गेरियाची डान्यूब नदीच्या कांठीं झाली असती आणि रशियन सैन्याचा लोंढा येण्याबरोबर सर्व बल्गेरिया धुवून जाऊन तुर्की सत्ता एकदम डळमळली असती. ह्या दृष्टीनें विचार केला असतां त्रान्सलव्हेनियामध्यें जोरानें घुसण्यांत रोमानियानें स्वतःच्या लाभाकडे अधिक लक्ष दिलें व महायुद्धाच्या एकंदर लष्करी धोरणाकडे थोडेसें दुर्लक्ष करण्याची चूक केली असें म्हणावें लागतें. पहिल्या धडकीसरशीं डान्यूब ओलांडली गेली नाहीं. असो. सप्टेंबर महिन्यांत आस्ट्रो–जर्मनांची व रशियाची डान्यूब नदीच्या कांठीं मोठी लढाई होईल व त्यावेळीं ही चूक रशिया पूर्णपणें दुरुस्त करील, ह्यांत संशय नाहीं. सप्टेंबर–आक्टो-बर महिन्यांत बल्गेरियावर रशियाची व रोमानियाची स्वारी होत असतांना सॅलिनोका येथील अँग्लों–फ्रेंच सैन्य स्ट्रूमा नदीच्या कांठी बल्गेरियावर हल्ला करून स्ट्रूमा नदीच्या खोऱ्यानें सोफियाकडे व स्ट्रूमानदी ओलांडून पूर्वेस आड्रियानोपलकडे-चाल करून जाईल. स्ट्रूमा नदीला धरून उत्तरेकडे जाण्यास ह्या सैन्यास अड-थळा व्हावा म्हणून स्ट्रूमा नदीच्या कांठाचे ग्रीसचे रूपेल व सिरेस हे किल्ले आपल्या ताब्यांत आगस्टच्या दुसऱ्या आठवडयांतच बल्गेरियानें घेतले व आगस्ट अखेरीस कावला बंदर घेऊन स्ट्रूमा नदीच्या पूर्वेकडील ग्रीसचा सर्व भाग बल्गे-रियानें आपल्या कबजांत घेतला. ह्या भागांत ग्रीसचे सतरा किल्ले असून सहा कोट रुपये ह्या किल्लयांवर खर्च झालेले आहेत. हे सर्व किल्ले तेथील दारूगोळा व तोफा ह्यांसकट ग्रीस सरकारनें बल्गेरियन सैन्याच्या हवालीं केले. ग्रीसच्या राजाचा ह्या चोरटया कारवाईमुळें सॅलिनोका येथील अँग्लो–फ्रेंच सैन्यास बल्गेरियावर चाल करून जाण्याच्या कामीं मोठा अडथळा उत्पन्न झाला आहे. असल्या चोरटया कारवाईचा राजा तक्तावरून दूर करून दोस्त सरकारांना अनुकूल असलेले प्रधान मंडळ ग्रीस देशामध्यें स्थापण्याचा उद्योग आगस्ट अखेरीस व सप्टेंबरच्या प्रारंभीं जारीनें सुरू झाला आहे. पण ग्रीसचें लष्कर अद्याप ग्रीसच्या राजाच्या लगामांतून पुरतें मोकळें झालें नसल्यामुळें बल्गेरियाचा एखाद दुसरा चांगला पराभव होईतों सदर उद्योगास प्रत्यक्ष फळ येईलसें वाटत नाहीं.

———

# तिसऱ्या वर्षाचा सप्टेंबर-आक्टोबर महिना

आगस्ट महिन्याप्रमाणेंच सप्टेंबर महिन्यांतहि पश्चिम रणभूमींत इंग्रजांचें व फ्रेंचांचें पाऊल जोरानें पुढें पडलें. थिपवाल व कोंब्लस हीं महत्त्वाची ठाणीं इंग्रजांच्या हातीं पडून जर्मनांना आपला पराजय स्वतःच्या मुखानें कबूल करावा लागला. कोंब्लसच्या जवळ तीन चार ठिकाणचे रस्ते मिळत असल्यामुळें जर्मन सैन्याच्या हालचाली करण्यास हें ठिकाण सोईचें झालें होतें. सबंध सप्टेंबर महिना खर्च करून इंग्रजांनीं व फ्रेंचांनीं कोंब्लसला चारी बाजूंनी प्रथम घेरींत आणलें आणि सप्टेंबर अखेरीस कोंब्लसवर निकराचा हल्ला करून इंग्रजांनीं जर्मनांना मानगुटीस धरून धक्के मारीत कोंब्लसमधून बाहेर पिटाळून लावलें! चरांच्या चक्रव्यूहांनीं कोंब्लस व थिपवाल हीं ठाणीं जर्मनांनीं इतकीं मजबूत केलीं होतीं कीं व्हर्डूनच्या किल्ल्याची मजबुतीहि तज्ज्ञांच्या दृष्टीनें ह्या ठाण्यांच्या पुढें कमी दर्जाची समजली गेली. पण असलीं हीं मजबूत ठिकाणें इंग्रजांच्या व फ्रेंचांच्या शौर्यानें सर केलीं. जर्मनांना व्हर्डून पुढें जें करतां आलें नाहीं तें इंग्रजांनीं व फ्रेंचांनी कोंब्लस येथें करून दाखविलें. तोफखान्याच्या बलांत व सैनिकांच्या मर्दुमकींत इंग्रज व फ्रेंच जर्मनांहून सरस ठरले. अँग्लो-फ्रेंचांस हें मोठें यश मिळालें खरें पण त्याबरोबरच दुसरी एक अनिष्ट गोष्ट दृग्गोचर झाली. व्हर्डूनचा किल्ला डोंगराळ प्रदेशांत एका टेकडीवर असून त्याच्या सभोंवती दहापंधरा मैलपर्यंत एकामागून एक लहान मोठ्या डोंगराच्या रांगा आहेत. हें टेकड्यांचें जाळें पूर्वीच्या तरवारींच्या लढाईच्यावेळीं ज्याप्रमाणें मजबूतीचें समजलें जात होतें त्याप्रमाणें हल्लींच्याहि मोठ्या तोफांच्या युद्धाच्यावेळीं नैसर्गिक मजबुतीचें समजलें जातें. ह्या टेकड्यांच्या समूहावर चरांचे अलंकार फ्रेंचांनीं कुशलतेनें खोदल्यामुळें व्हर्डून दुर्भेद्य ठरलें. व्हर्डूनला जी नैसर्गिक मजबुती आहे ती कोंब्लसला नाहीं असें असतांनाहि जर्मनांनीं खोल चरांच्या कृत्रिम उपायांनी कोंब्लस व्हर्डूनहून अधिक मजबूत केलें. नकाशाकडे जर पाहिलें तर असें दिसून येतें कीं, तीन महिन्यापूर्वीं कोंब्लसपासून पांच मैलांच्या आंत इंग्रजांचे चर होते म्हणजे तीन महिन्यांच्या चढाईनें सोमनदीच्या काठच्या लढाईंत वीस मैलांच्या तोंडावर सरसकट चारपांच मैल

अँग्लो–फ्रेंच सैन्य पुढें गेलें म्हणजे महिन्यास मैल दीड मैलाची चाल पडली. बर्फ पडून लढण्याचा मोसम मंदावण्यास आणखी दोन महिन्यांचा अवकाश आहे. ह्या दोन महिन्यांत म्हणजे आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत अँग्लो–फ्रेंच फार झालें तर आणखी चार पांच मैल पुढें जातील. म्हणजे पांच महिन्याच्या चढाईचें फळ दहा मैलांनीं मिळणार ! जिंकलेल्या भूमीच्या दृष्टीनें विचार केला असतां हें फळ फारच अल्प होय असें ह्मणावें लागतें. पण दुसऱ्या एका दृष्टीनें या फळाची किंमत मोठी ठरते. डिसेंबरांत बर्फ पडून युद्ध मंदावलें म्हणजे जर्मनी म्हणू लागेल कीं पांच सात महिने तुम्ही जोराची चढाई करून काय कमावलें ? स्वतःच्या घरांतलें सर्व सोनें जपान अमेरिकेला देऊन टाकून तेथील लोखंड व दारू गोळा जमा करून आमची फळी तुम्ही कोठें फोडली ? सोम नदीच्या काठीं आम्ही दहा मैलच मागें हटलों ना ! उत्तर फ्रान्सांतहि अद्याप कित्येक मैल आमच्या ताब्यांत असून बेल्जमची मगरमिठी आमची सुटलेली नाहीं. रशियाला रोमानिया मिळून काय झालें ? एक तृतीयांश त्रान्स अल्बेनिया व ब्युकोव्हिना हे प्रांत रशियानें व रोमानियानें घेतले तर अधिक महत्वाचे व अधिक सुपिक असें डोब्राजा व कॅव्हेला प्रांत आम्ही गिळंकृत केले. १९१६ सालच्या प्रारंभाला जी स्थिति होती तीच स्थिति १९१६ सालच्या अखेरीला कायम राहून सोम नदीच्या काठीं वीस मैलाच्या तोंडावर दहा मैल आंत जाण्यास तुम्हाला एक वर्षाची तपश्चर्या खर्च करावी लागली. रिगाचा प्रांत, पोलंड सर्व्हिया, माऊंटेनिग्रो, बेल्जम, उत्तर फ्रान्स, डोब्राज व कॅव्हेला येथून आम्हास नुसते हाकून लावण्यास तुम्हाला आणखी कितीतरी वर्षें लागतील. तेव्हां वृथा लढण्यांत शूर शिपायाचे प्राण खर्ची घालण्यापेक्षां ‘ त्वयार्ध मयार्थ ’ या धर्तीवर तह कां करीत नाहीं ? डिसेंबर महिन्यांतील जर्मनांच्या ह्या तहाच्या बोलण्याला सूतोवाच सप्टेंबरमध्येंच झालें आहे. अमेरिका, स्पेन येथें असल्या अर्धवट तहाची चळवळ सुरू झाली असून पोप महाराजांनीं या चळवळीस दुजोरा दिला आहे. आगस्ट अखेरीस ज्यावेळीं रोमानिया दोस्त सरकारांना मिळाला त्यावेळीं महायुद्धाचा रंग एकदम पालटेल असें सर्वांना वाटलें. पण सप्टेंबर अखेरीस असें निदर्शनास आलें कीं, जर्मनीनें आपला तोल सावरून धरला असून येत्या हिंवाळ्यांत पुन्हां जारीनें तयारी करून १९१७ सालच्या उत्तरार्धांत निकरानें लढल्याशिवाय जर्मनी कांहीं हार जात नाहीं. जर्मनीला कुस्तींत पाडूनच जर तह

व्हावयाचा असला तर १९१७ साल कदाचित् १९१८ सालहि–युरोप खंडभर महायुद्धाचा वणवा पेटत राहाणार अशीं चिन्हें सप्टेंबर अखेरीस दिसूं लागलीं आहेत. रोमानिया मिळाल्यानें दोन चार महिन्यांत जर्मनी लोळण घेईल व लवकरच तह होईल अशी वाटूं लागलेली आशा सप्टेंबर अखेरीस मृगजल ठरली. आशेची ही निराशा अशा रीतीनें झाल्यामुळें कनवाळू पोपसाहेबांना व अमेरिकेला स्पेन हॉलंडसारख्या चिमकुल्या राष्ट्रांची मदत घेऊन मध्यस्थी करण्याची स्फूर्ति उत्पन्न व्हावी हें साहजिक आहे. या मध्यस्थीला डिसेंबर–जानेवारी महिन्यांत उकळी फुटेल हें उघड आहे. त्यावेळीं प्रतिष्ठितपणानें जर्मनी म्हणणार, आम्ही किती मुलुख जिंकून ताब्यांत ठेवला आहे, हें नकाशा हातांत घेऊन पहा आणि मग तुम्ही शहाणेसुतें व कनवाळू मध्यस्थ काय काय सोडावें म्हणतां तें सांगा. बेल्जम सोडूं म्हणतां ? सोडतों. उत्तर फ्रान्स सोडूं म्हणतां ? सोडला. १८७० सालीं जिंकलेल्या आलसाक–लारेन प्रांतापैकीं कांहीं भाग सोडून फ्रान्सची जनी जखम भरून काढून फ्रान्सचा प्रेमाचा हात हातांत घेऊं म्हणतां ? आलसाक–लारेनपैकीं कांहीं भाग सोडून स्नेहाचा हात फ्रान्सपुढें हा केला. मध्यस्थांचें इतकें ऐकल्यावर जर्मनी हळूच. आपलें घोडें पुढें ढकलणार आणि म्हणणार रशियाचा कोरलंड प्रांत तेवढा आम्हाला असूं द्या. कारण तेथें जर्मन वस्ती बरीच आहे. रशिया–पोलंडला स्वराज्य देऊन चुकलाच आहे. तेव्हां पोलंडचें स्वतंत्र राज्य जर्मनीच्या कृपाछत्राखालीं स्थापल्यास रशियाचें कांहींच नुकसान नाहीं. आतां बाकी राहिला बाल्कन प्रदेश व टर्की. बाल्कन प्रदेशांत जिंकलेला जुना सर्व्हिया म्हणजे बाल्कन युद्धापूर्वीचा सर्व्हिया जर सर्व्हियाच्या राजाला पुन्हां दिला, माऊंटनिग्रोचें जुनें राज्य माऊंट निग्रोला दिलें, रोमानियाचें जुनें राज्य रोमानियाच्या ताब्यांत तसेंच ठेवलें, तर बाल्कन देशांनीं जर्मनीच्या ग्रहमालिकेंत प्रवेश करून जर्मन सूर्याभोंवतीं फिरत रहाण्यांत कां आनंद मानूं नये ? तुर्की साम्राज्य स्वतंत्र होऊन जर्मनांशी पाहिजे तसला तह तुर्कांनीं केला तर त्यांत कोणाचा मुलूख थोडकाच जातो येतो आहे ? रशियानें खुशाल इराणांत उतरून खालीं समुद्र गांठावा. जर्मनीची हरकत नाहीं. इतकेंच नव्हे तर उलट जर्मनी या कामीं मदतहि करील. रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति म्हणणाऱ्या मध्यस्थांना असल्या प्रकारचा तह पटणारा आहे; चिमकुल्या राष्ट्रांना सांप्रतच्या यमयातनेंतून सोडविणारा आहे; फ्रान्सला खुल्विणारा आहे; रशियाला पुरातन

महत्त्वाकांक्षेवर पाणी सोडावयास लागणारा खरा, पण तितका डवचणारा नाहीं. या अर्धवट तहानें तुर्की साम्राज्याच्यामार्फत मुसलमानी जग जर्मनीच्या तावडींत सांपडून इंग्लंडच्या इजिप्तला व हिंदुस्थानाला जर्मनीचा शह पोंचणारा आहे. असले तह नाकारणें इंग्लंडला जरूर आहे. आणि सप्टेंबर अखेरीस अमेरिकेंत व स्पेनमध्यें चाललेल्या तहाचे चळवळीस उत्तर देतांना मि. लाईड जॉर्ज यांनीं अर्धवट तहांचें लोढणें गळयांत बांधून घेण्याचें साफ नाकारलें आहे. नाकारण्याची ही शक्ति कोंबलसच्या विजयानें इंग्लंडला प्राप्त झाली आहे. डिसेंबरपर्यंत आणखी दोन महिन्यांत क्षेत्रफळानें मोटासा मुलूख जरी इंग्लंडनें जिंकला नाहीं तरी जर्मनीच्या युद्धकौशल्यानें निर्माण केलेलें व्हर्डूनहूनहि अधिक बळकटीचे चराच्या चक्रव्यूहाचे किल्ले इंग्लंडला सर करतां येतात हें इंग्लंडनें सप्टेंबर अखेरीस खुद्द रणांगणावर सिद्ध केलें आहे. १९१६ सालच्या प्रारंभीं कुस्तींत ज्या इंग्लंडला जमीन पकडून पडून राहून विरुद्ध मल्लास पाठीवर खेळत राहूं देणें भाग झालें होतें तेंच इंग्लंड सर्व प्रजाजनांना सैनिक बनवून सर्व कारखान्यांत दारूगोळा तयार करावयास लावून नेटानें उठून पाठीवरच्या जर्मनीला अंगाखालीं घालू शकलें आहे. इंग्लंडचा हात जर्मनीच्या मानेवर चढण्यास १९१७ साल लागेल व जर्मन चीत होण्यास १९१८ साल लागेल. आणखी दोन वर्षें लढावें लागलें म्हणून काय झालें ? आज समबल कुस्ती सोडून, तुर्कांच्या खुराकावर पांच सात वर्षें तयारी करण्यास जर्मनीला फुरसत देऊन, पांच सात वर्षांनीं इजिप्त व हिंदुस्तान हातचें गमावण्यापेक्षां आजच आणखी वर्ष दीड वर्ष लढण्याचे कष्ट सोसून जर्मनांचा कुस्तीचा नाद कायमचा नष्ट करणें काय वाईट ? वर्ष दोन वर्षांनी अशा प्रकारचा प्रचंड विजय इंग्लंडास खात्रीनें मिळणार हे सप्टेंबरमधील चढाईनें सशास्त्र सिद्ध केलें आहे. कोंबलसच्या विजयाचा उपयोग मुलुख मिळण्याच्या दृष्टीनें जरी फारसा नसला तरी शास्त्रदृष्टया वरचढपक्ष कोणाचा हें ठरविण्याच्या कामीं त्याचा फार उपयोग असून अर्धवट तहापासून हा विजय दोस्त सरकारांचा बचाव करणारा आहे.

## रोमानिया आणि रशिया

आगस्ट अखेरीला पहिल्या धडकीसरशीं रोमानियानें आपल्या सरहद्दीवरील कार्पेथियन पवताचे सर्व घाट एकदम कबजांत घेतले; आणि ऑस्ट्रियन सैन्याला मागें पिटाळून लावून ट्रान्स्लाव्हानियामध्यें जोरानें प्रवेश केला. सप्टेंबर प्रारंभाला

हार्मनस्टॅड, ब्रॉसो, आदिकरून दक्षिण व पूर्व ट्रान्स्लाव्हानियामधील महत्त्वाचीं गांवें रोमानियानें आपल्या कबजांत घेतलीं. सर्व ट्रान्स्लाव्हानिया व्यापण्यास रोमानियाला एखाददुसरा आठवडा लागेल, आणि सप्टेंबर अखेरीस किंवा आक्टोबर प्रारंभाला रोमानिया हंगारीचे मैदानांत उतरूं लागून रशियाची व रोमानियाची गांठ हंगारींतच पडेल असें त्यावेळीं तज्ज्ञाला वाटलें होतें. पण सप्टेंबर महिन्यामध्यें हे सर्व अंदाज चुकीचे ठरले. रोमानियानें पहिल्या आठवड्यांत जवळ जवळ एकतृतीयांश ट्रान्स्लाव्हानिया व्यापला. याचें कारण आस्ट्रियन सैन्याचा पराजय नसून रोमानियाचें बरेंच मोठें सैन्य ट्रान्स्लाव्हानियामध्यें आंत गुंतवून ठेवून नंतर मग रोमानियावरील उलट हल्ल्यास सुरुवात करावयाची असला डाव सेनापति हिंडेनबुर्ग खेळत होते हें होय. शत्रूला स्वतःच्या मुलुखांत घुसूं द्यावयाचें हा लष्करी डावपेंच कसला ? असल्या डावपेंचानें पहिल्या आठवड्यांतच आस्ट्रियाची नाचक्की झाली नाहीं काय ? रोमानिया आस्ट्रियाच्या मुलुखांत शिरला व आस्ट्रियाची नाचक्की झाली या गोष्टी खऱ्या; पण दोन संकटांपैकीं हलक्या संकटाला हार जाऊन मोठें संकट तात्पुरतें तरी सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं टाळलें. हें मोठें संकट कोणचें ? बल्गेरिया सॅलिनोकाच्या बाजूला त्यावेळीं चांगला गुंतला गेला होता, अशा समयीं कार्पेथियनचे घाट नुसते संभाळून जर रोमानियानें बल्गेरियावर एकदम जोराचा हल्ला केला असता तर सप्टेंबर महिन्यांत बल्गेरियाची बरीच पीछेहाट होऊन आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत वरून उतरणारें रोमानियाचें व रशियाचें सैन्य, आणि सॅलिनोका येथून खालून वर जाणारें अँग्लो–फ्रेंच सैन्य, यांची गांठ बल्गेरियामध्यें पडून तुर्की साम्राज्य जर्मनीपासून तुटलें गेलें असतें; आणि येत्या हिंवाळ्यांतच दोस्त सरकार सांगतील त्या अटीवर आस्ट्रो–जर्मनांना तह करणें भाग पडलें असतें. पण ट्रान्स्लाव्हानियाच्या लोभाला फाजील गुंतून रोमानियानें हातचा बाण व्यर्थ दवडला आणि जी गोष्ट हिंवाळ्यापूर्वींच घडून आली असती ती गोष्ट पुढील सालच्या वसंत काळानंतर घडवून आणण्याकरितां येत्या हिंवाळ्यांत नवी तपश्चर्या करून पुन्हां तयारी करणें रशियास भाग पडणार आहे. सप्टेंबरमध्यें रोमानियाच्या रणभूमींत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांकडे लक्ष दिलें असतां असें म्हणणें भाग पडतें कीं, आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत किंबहुना येत्या हिवाळ्यांत टर्कीचा व जर्मनीचा आगगाडीचा संबंध तुटला जाण्याचा रंग नाहीं, आणि हा संबंध तुटल्याशिवाय

आस्ट्रो–जर्मनांना चारीमुंडे चीत मारतां येणें शक्य नाहीं. सप्टेंबर प्रारंभाला रोमानियाचें मुख्य लष्कर, ट्रान्सिल्व्हानियामध्यें गुंतलें आहे असें पाहून रोमानियाच्या डोब्रुज प्रांतावर बल्गेरियाच्या व टर्कीच्या सैन्याची मदत घेऊन आस्ट्रो–जर्मनांनीं एकदम हल्ला केला. डोब्रुजा प्रांत म्हणजे डान्यूब नदी उत्तरवाहिनी होऊं लागल्या ठिकाणापासून डान्यूब नदी व काळा समुद्र यांमधील प्रदेश होय. हा डोब्रुजा प्रांत रशियाचें सैन्य काळया समुद्राच्या किनाऱ्यानें दक्षिणेस कान्स्टांटिनोपलवर चाल करून यावयाचें असल्यास त्या सैन्याचा राजरस्ता होय. पूर्वींहि रोमन बादशहाच्या वेळीं उत्तरेकडले लोक याच मार्गानें कान्स्टांटिनोपलवर चाल करून येत असतां त्यावेळीं या डोब्रुजा प्रांताच्या मध्यावर–म्हणजे जेथें डान्यूब नदी व काळा समुद्र यांच्यामध्यें अवघें २५–३० मैलांचें अंतर आहे, त्या ठिकाणीं–हल्लीं कान्स्टांटिनोपल बंदराची आगगाडी असलेल्या प्रांतांत–उत्तरेकडील सैन्याचा बंदोबस्त करण्याकरितां ३० मैल लांबीचा भलाभक्कम तट बांधण्यांत आला होता. सप्टेंबर प्रारंभाला या डोब्रुजा प्रांतावर आस्ट्रो–जर्मनांनीं दक्षिणेकडून हल्ला करून रोमानियन व रशियन लष्कराला पन्नास साठ मैल मागें हटविलें, व पंधरा सप्टेंबरच्या सुमारास आस्ट्रो–जर्मन सैन्य कान्स्टांजा रेल्वेच्या जवळ जाऊन थडकले. पंधरा सप्टेंबरपासून वीस सप्टेंबरपर्यंत कान्स्टांजा रेल्वेच्या प्रदेशांत तुंबळ युद्ध होऊन आस्ट्रो–जर्मनांची गति खुंटली. व वीस सप्टेंबरनंतर दोन्ही पक्ष चर खणून बसले. कान्स्टांजा रेल्वे रोमानियाच्या ताब्यांत राहिली खरी, पण तीस मैल लांबीच्या चरानींच आस्ट्रो–जर्मनांना स्वतःचें संरक्षण करतां येणें शक्य होऊन रोमानियाच्या मागें एक कायमचा भुंगा लागला. रोमानियानें एक तृतीयांश ट्रान्सिल्व्हानिया मिळविला तर अर्धा डोब्रुजा गमविला. वीस सप्टेंबरच्या सुमारास डोब्रुजांतील लढाई मंदावते न मंदावते तोंच आणखी दोन बाजूनीं रोमानियाला शह देण्याचा उपक्रम जर्मनीनें आरंभिला. बल्गेरिया व रोमानिया यांच्यामधील डान्यूब नदी ओलांडतां यावी म्हणून सर्व डान्यूबनदीवर सप्टेंबरच्या शेवटच्या आठवडयांत तोफांची सरबत्ती सुरू झाली, व प्लेव्हनाच्या उत्तरेस इस्कर नदी डान्यूबला ज्या ठिकाणीं मिळते त्या कोराबिया टापूंत आस्ट्रो–जर्मन रोमानियाच्या बाजूच्या किनाऱ्यावर उतरूंहि लागले, पण या कामीं त्यांस यश आलें नाहीं. दक्षिणेकडून डान्यूब नदी ओलांडून जाण्याचा उपक्रम करीत असतांना त्याच ठिकाणच्या थेट उत्तरेकडील म्हणजे पूर्व वाहिनी डान्यूब नदीस समांतर असलेलें

कार्पेथियन पर्वताच्या ऊर्फ ट्रान्स्लाव्हानिया आल्प्स पर्वताच्या घाटांतून रोमानियावर हल्ला करण्यास आस्ट्रो–जर्मनांनीं सुरुवात केली. रोमानियांतून दक्षिण ट्रान्स्लाव्हानियांत जाणारे तीन प्रमुख घाट आहेत. पहिला रोमानियाची राजधानी बुखारेस्ट शहर व त्याच्या थेट उत्तरेस असलेला टिमास घाट होय. या घाटानेंच वर जाऊन रोमानियन सैन्यानें ब्रासो शहर घेतलें. दुसरा व्हेरेस्टोरनी घाट. या घाटानें वर जाऊन रोमानियन सैन्यानें हार्मनस्टॅड शहर घेतलें. या दोन घाटांत आगगाडी असून तिसऱ्या घाटांत म्हणजे व्हल्कन घाटांत आगगाडी नाहीं. व्हल्कन घाटाच्या उत्तरेस आस्ट्रियाची आगगाडी आहे; पण दक्षिणेस रोमानियाची आगगाडी नाहीं. व्हल्कन घाट ओलांडून गेलेल्या रोमानियन सैन्यावर आस्ट्रो–जर्मनांनीं अवचित हल्ला करून व्हल्कन घाट एकदम ताब्यांत घेतला. व्हल्कन घाटांतून जर आस्ट्रो–जर्मन उतरूं लागले तर रोमानियाच्या पश्चिम कोपऱ्यांतील डान्यूब नदीचें संरक्षण करणाऱ्या असोव्हाच्या टापूमधील रोमानियन सैन्याची पिछाडी उघडी पडल्यावांचून रहाणार नाहीं. हें अरिष्ट ओळखून रोमानियानें व्हल्कन घाटाकडे मोठें सैन्य पाठविलें व खालीं उतरणाऱ्या आस्ट्रियन सैन्याला घेरण्याचा उद्योग आरंभिला. आपण घेरले जात आहों असें पाहून आस्ट्रो–जर्मन सैन्यानें व्हल्कन घाटांतून पाय मागें घेतले. आक्टोबर प्रारंभाला व्हल्कन घाटाच्या उत्तरेस आस्ट्रियाची व रोमानियाची मोठी लढाई सुरू झाली असून त्यांतील जयापजयावर दक्षिण ट्रान्स्लाव्हानियामधून रोमानियावर चाल करून येणाऱ्या हिंडेनबुर्गच्या डावपेंचाचें फळ बऱ्याच अंशी अवलंबून आहे. सेनापति हिंडेनबुर्ग ह्यांनीं प्रथम रोमानियाला चिरडून नंतर सॅलिनोका येथून अँग्लो–फ्रेंचांना हाकून देऊन रोमानियाच्या मार्गानें रशियाच्या डाव्या बगलेस वळसा देऊन काळ्या समुद्रावरील रशियाच्या ओडेसा बंदरापर्यंत रशियाला तंबी देण्याचा जंगी घाट घातला आहे असें म्हणतात. बाल्कन प्रदेशांतील रशियाच्या बाजूचें हें धोरण यशस्वी करण्याकरितां सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं पश्चिम रणभूमींत उत्तर फ्रान्स व बेल्जम सोडून देऊन ऱ्हाईन नदीपर्यंत मागें हटण्याचें ठरविलें असून पश्चिम रणभूमींतील बरेंच सैन्य पूर्वेकडे नेलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. पश्चिम रणभूमींतील सैन्य, बल्गेरियाचें सैन्य व तुर्की सैन्य मिळून दहा लाख नवें लष्कर ह्या कामगिरीकरितां गोळा केलें असून त्यांपैकीं

तीनचार लाख सैन्य कोव्हेलपासून ब्युकोव्हिनापर्यंतच्या रशियाच्या तोंडावर मदत म्हणून पाठविण्यांत आलें आहे. बाकीचे पांच सात लाख सैन्य रोमानियाच्या स्वारीवर नेमलें असून डान्यूब व डोब्राजाच्या बाजूला सेनापति मॅकेन्सन ह्यांची नेमणूक झाली आहे. आस्ट्रो–जर्मन तोफांचा व सैन्याचा मुख्य जमाव दक्षिण ट्रान्सलाव्हाजियामध्यें जमला असून व्हल्कन घाट व व्हेरेस्टोरोनी घाट ह्या दोन घाटानीं रोमानियावर स्वारी करण्याचा आस्ट्रो–जर्मनांचा विचार दिसतो; व्हल्कन घाटाकडे आपली डाळ चांगली शिजत नाहीं व रोमानियन सैन्य त्याच बाजूला झुकलें गेलें आहे असें पाहून आस्ट्रो–जर्मन सैन्य सप्टेंबर अखेरीला व्हेरेस्टोरोनी घाटाच्या उत्तरेकडील हार्मनस्टेड शहराकडे एकदम वळलें व तेथील रोमानियन सैन्याला त्यानें चारी बाजूनीं घेरलें. एक तऱ्हेच्या वेढ्यांत सांपडल्यावरहि तीन दिवस शिकस्तीनें लढून रोमानियन सैन्यानें वेढ्यांतून निसटून दक्षिणेस व्हेरे-स्टोरोनी घाटाकडे मोठ्या शिताफीनें पीछेहाट केली. दक्षिण ट्रान्स्लाव्हानिया, डान्यूब नदी व डोब्राजा प्रांत ह्या तीनहि ठिकाणीं आस्ट्रो–जर्मन सैन्य रोमा-नियाला दाबूं पहात आहे. ह्या दाबानें रोमानिया जर आक्टोबर महिन्यांत मोडला नाहीं किंवा वांकला नाहीं तर पश्चिम रणभूमींतील पीछेहाटीनें सेनापति हिंडेनबुर्ग ह्यांच्या डावपेचाची बरीच फजीति होईल. पण रोमानिया जर बराचसा वांकला किंवा मोडला तर बाल्कन प्रदेशांतील व रशियाच्या बाजूच्या संकटांतून कांहीं काल तरी चौथ्यांदा आस्ट्रो–जर्मनांना सोडविण्याचें श्रेय सेनापति हिंडेनबुर्ग ह्यांना मिळेल. रशियाच्या तोंडावर तीन चार लाख नवे सैन्य पाठविलें असतां ही प्रिपेट नदीपासून रोमानियापर्यंतच्या सर्व तोंडावर रशिया आस्ट्रो–जर्मनांशीं एकसारखी टक्कर देऊन लढत राहिला आहे. जुलै आगस्ट महिन्यांत रशियाचें पाऊल जसें पुढें पडलें तसें सप्टेंबर महिन्यांत पुढें पडलें नाहीं, किंबहुना आगस्ट अखेरला रशिया ज्या ठिकाणीं होता त्याच ठिकाणीं आक्टोबर प्रारंभालाहि दृष्टीस पडला ही गोष्ट खरी; पण कोव्हेलच्या टापूंत आस्ट्रो–जर्मन रशियावर एकसारखे हल्ले करीत असतांहि रशियानें त्यांना बिलकूल दाद दिली नाहीं. अधिक मुलूख काबीज करण्याचें काम जरी सप्टेंबर महिन्यांत बंद पडलें तरी पूर्वीच्या तीन महिन्यांत आठ लाख आस्ट्रो–जर्मन सैन्य रशियानें गारद केलें असल्यामुळें आस्ट्रो–जर्मन सेनाशकट विस्खळित झाला असून पुन्हां योग्य संधि येतांच रशिया आस्ट्रो–जर्मनांच्या

छातीवर बसल्यावांचून रहाणारा नाहीं, असें रशियन सैन्यातर्फे जाहीर करण्यांत आलें आहे. सप्टेंबर महिन्यांत रशियानें रोमानियाला चांगली कुमक पाठविली. आक्टोबर महिन्यांतहि रोमानियाला रशियाची चांगली मदत मिळून हिंडेनबुर्गचें दडपण रोमानिया पार झुगारून देईल यांत संशय नाहीं. हिंडेनबुर्गच्या तडाक्यांतून रोमानियाला वांचविण्याकरितां जर रशिया दक्षिणेकडून धांवून आला तर कोव्हेलचा टापू ढिला पडेल. तेव्हां रशियाची पीछेहाट आपण सुरूं करूं अशी घमेंड सेनापति हिंडेनबर्ग यांना वाटत असावी असें दिसतें; पण रशियानें गेल्या चार महिन्यांत विस्खळित केलेल्या आस्ट्रियाच्या डोलाऱ्यांत व पश्चिम रणभूमींत अँग्लो–फ्रेंचांनीं झोडपलेल्या जर्मनीच्या सेनाशकटांत सेनापति हिंडेनबुर्ग मुख्य सूत्रधार झाले तरी, दोन दोन तीन तीन ठिकाणीं जोराची चढाई करण्याचें सामर्थ्य कोठून असणार ? रशियाच्या बाजूला नव्या सैन्याची वाण बिलकूल नाहीं. लागेल तितके लढवय्ये रशियापाशीं आहेत. भीति काय ती दारूगोळ्याच्या व तोफांच्या पुरवठ्यासंबंधानें. पण इंग्लंडमध्यें नव्या तोफा व नवा दारूगोळा इतक्या झपाट्यानें तयार होत आहेत कीं असल्या भीतीचा संशय मनांत येण्याचे ते दिवस आतां उरले नाहींत. इंग्लंडांतील लोक इतका दीर्घोद्योग करीत आहेत असें पाहून इंग्लंडविषयींचा जर्मनीचा द्वेषाग्नि फारच भडकून गेला आहे. इंग्लंडला सतावण्याच्या बुद्धीनें जर्मनीच्या झेपेलिनें लंडन शहरावर व उत्तरेकडच्या जिल्ह्यावर सप्टेंबर महिन्यांत तीन वेळां स्वाऱ्या केल्या. पूर्वींहून अधिक मोठ्या प्रमाणावर या स्वाऱ्या होत्या खऱ्या, पण त्यामुळें इंग्लंडचें म्हणण्यासारखें कांहींच नुकसान न होतां जर्मनीचीं दोन तीन झेपेलिन विमानें मात्र इंग्लंडच्या तोफांना बळी पडली ! इंग्लंड रशियाला दारूगोळा पुरवीत आहे इतकेंच नव्हे तर इंग्लंडनें इटलीला जर्मनीविरुद्ध चिथविलें आणि ग्रीसच्या राजाची इच्छा नसतांहि ग्रीसमध्यें राज्य–क्रांति घडवून आणून जर्मनीविरुद्ध ग्रीसच्या सैन्याचा उपयोग करण्याचा डाव इंग्लंड खेळत आहे अशींहि बोटें इंग्लंडकडे पाहून जर्मनी मोडूं लागला आहे. जर्मनीचा हा जळफळाट पाहिला म्हणजे जर्मनी आंतून कमकुवत होत चालला आहे असें अनुमान काढणें भाग पडत नाहीं काय ? रोमानिया मिळाल्यामुळें सप्टेंबर प्रारंभाला जर्मनीची धांदल उडाली तर आक्टोबर प्रारंभाला ग्रीसचें नवें भय जर्मनीपुढें दत्त म्हणून उभें राहिलें आहे. रोमानिया मिळाला तरी ग्रीसच्या

नगर वाचनालय सातारा



राजानें सप्टेंबर महिन्यांत दोस्त सरकारांना मिळण्याच्या प्रश्नाची टाळाटाळीच आरंभिली. जर्मनीच्या बाजूचा राजाचा हा कल पाहून माजी मुख्य प्रधान मि. व्हेनिजुलास यांच्या पक्षानें क्रीट बेटांत जाऊन तेथे उघडपणें ग्रीसमधील राज्य–क्रांतीचा जाहीरनामा काढला. एम. व्हेनिजुलास हे स्वतः राज्यक्रांतीचे पुढारी झाले असून ग्रीसचीं सर्व बेटें व बरेंचसें आरमार त्यांना मिळालें आहे. राज्यक्रांति पक्षानें तीस चाळीस हजार सैन्य तयार केलें असून ग्रीसच्या लष्करांतील शेंकडों सन्मान्य अधिकारी व कांहीं प्रसिद्ध सेनानायकहि राज्यक्रांति पक्षाला मिळाले आहेत. एम. व्हेनिजुलास यांची ही राज्यक्रांतीची चळवळ जरी रोजच्यारोज झपाट्यानें वाढत आहे तरी ग्रीसच्या राजानें ग्रीसचें बरेंच मोठें सैन्य आपल्या मुठींत ठेवलें आहे. आक्टोबरमधील रोमानियाच्या व ऑस्ट्रो–जर्मनांच्या झटापटीचा काय परिणाम होतो तो पाहून नंतर तो दोस्त सरकारांना कदाचित् मिळाल्यास रडतराऊसारखा मिळेल असा सांप्रतचा रंग दिसत आहे. सप्टेंबर महिना ग्रीसच्या ह्या घोटाळ्यामध्यें खाऊन टाकल्यामुळें सालिनोकाच्या बाजूला अँग्लो–फ्रेंचांना विशेष हालचाल करतां आली नाहीं, हें सांगणें नकोच.

---

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा आक्टोबर--नोव्हें. महिना

## रुमानियाची रणभूमि

सप्टेंबर महिन्याचे अखेरीस रुमानियन युद्धाला प्राप्त झालेलें महत्त्व आक्टोबर महिन्यांत कायम टिकलें, इतकेंच नव्हे तर नोव्हेंबर व डिसेंबर हे दोन महिनेहि रुमानिया सर्वांचें लक्ष वेधून घेईल असें आक्टोबर अखेरीस स्पष्टपणें दिसून आलें. सेनापति हिंडेनबुर्ग यांच्या हातीं आस्ट्रो–जर्मन सैन्याची सर्व सूत्रें गेलीं त्यावेळीं त्यांच्या लष्करी धोरणाविषयीं तज्ज्ञांनीं जे अंदाज बांधले होते, ते अंदाज आक्टोबर महिन्यांत खरे ठरले. फ्रान्स व इंग्लंड यांच्या मुख्य सेनेवर चाल करून जाऊन तेथें मोठा विजय संपादन करून महायुद्धाची परिसमाप्ति करण्याची जर्मनीची हाव से. हिंडेनबुर्ग यांचे मतानें चुकीची होती. आपल्या मुख्य प्रतिस्पर्ध्याच्या डोक्यावर एक जोराचा घाव घालावयाचा व त्या घावासरशी तो उलथून पडल्यावर इतर किरकोळांना ऐते गिळून टाकायचें हें एक लष्करी धोरणाचें स्वरूप असतें. असलें लष्करी धोरण नेपोलियनला फार प्रिय असे. नेहमीं विजयश्रीनें नटलेल्या कर्त्या पण अहंकारी सेनापतीला हेंच धोरण आवडतें. दुसरें धोरण असें असतें कीं प्रथम वृक्षाच्या फांद्या तोडावयाच्या आणि वृक्ष निस्तेज झाल्यावर त्याच्या मुख्य बुंध्यावार घाव घालावयाचा. से. हिंडेनबुर्ग हे दुसऱ्या धोरणाचे पुरस्कर्ते दिसतात. नेपोलियनचे अनुयायी ते नव्हत. पहिलें धोरण ज्यांच्या अंगांत मस्ती मावत नाहीं त्यांनाच प्रियकर वाटतें. महायुद्धाच्या प्रारंभीं जर्मनीची मस्ती वीस वर्षांच्या तयारीनें अमर्यादित झाली होती. त्यामुळें पहिल्या धडकीसरशी पॅरिसचा चुराडा करून फ्रान्समध्येंच महायुद्ध संपविण्याची हाव जर्मनीनें धरली; पण ती रग मार्न नदीवर जनरल जाफ्रे यांनीं व यिप्रेस येथें इंग्रजांनीं जिरविली. हा मद खाली उतरल्यानंतर से. हिंडेनबुर्ग यांचे सल्ल्यानें रशियाचें संकट टाळण्याचे उद्योगाला जर्मनी लागला. रशियाचे मनुष्यबलाला सीमा नाहीं हें खरें; पण शास्त्रीय सामुग्री व शास्त्रीय ज्ञान यांत रशिया मागासलेला; अर्थात दोस्त सरकारांच्या वृक्षांत मुख्य स्तंभाची जागा रशियाची नसून मोठ्या फांदीचे स्थल रशियाचें आहे.

नगर वाचनालय इस्लामपूर



पहिले महायुद्ध खाडिलकर कृ. प्र.

ही रशियाची फांदी तोडून टाकण्याचा उद्योग १९१५ सालीं जर्मनीनें केला. ह्या कामीं से. हिंडेनबुर्ग व मॅकेनसन यांना चांगलें यश मिळालें. हें यश चांगलें तर खरेंच; पण त्या यशानें जर्मनीचा बुद्धिभ्रंश झाला. से. मॅकेनसन यांनीं रशियाचीं पानें फुलें तोडलीं, से. हिंडेनबुर्ग यांनीं रशियाचीं पिकलेलीं फळें खाल्लीं, आणि सर्व जर्मनीला भ्रम झाला कीं यशस्वी जर्मन सेनेनें रशियाची फांदीच मोडून टाकली! बुद्धिभ्रंश विनाशाचें मूळ आहे. १९१६ सालच्या प्रारंभाला ह्या बुद्धिभ्रंशामुळें १९१४ सालचा चढेलपणा पुन्हां चमकूं लागला आणि फ्रेंचांचा पराजय करण्याच्या खुमखुमीनें पुन्हां वर डोकें केलें. जर्मनीच्या उतरत्या कलेस येथूनच प्रारंभ झाला. व्हर्डूनवर जर्मनीनें पांच सहा महिने जोराचे हल्ले केले आणि फ्रेंचांपुढें स्वतः पुढें स्वतःच डोकें फोडून घेऊन महायुद्धास निराळें स्वरूप जर्मनीनें आपण होऊन दिलें! व्हर्डूनवरील हल्ल्यामुळें थकलेल्या जर्मनीवर योग्य संधि गाठून इंग्लंड व फ्रान्स यांनीं सोमनदीच्या कांठीं उलट हल्ला चढविला. अँग्लो–फ्रेंच सैन्याला पायाखालीं तुडवूं अशा दिमाखानें जर्मन सेना व्हर्डून पुढें आली असतां सोम नदीच्या कांठीं अँग्लो–फ्रेंचांच्या लाथा खात जर्मनीला मागें हटावें लागलें! फाजील गर्वाचा परिणाम हा असाच व्हायचा. याचवेळीं जर्मनीच्या असें अनुभवास आलें कीं रशियाची फांदी तुटलेली नसून नव्या पल्लवानें, नव्या फुलानें व नव्या फळानें ती पुन्हां भरगच्च झाली आहे. हा अनुभव येतो न येतो तोंच रुमानियाची नवी फांदी दोस्त सरकारांच्या महावृक्षाला फुटली तेव्हां जर्मनीचे डोळे उघडले. फ्रान्सच्या रणभूमीवर भलत्या महत्वाकांक्षेस बळी न पडतां जर जर्मनीनें सॅलिनोकाच्या व इटालीच्या मोहिमेवर आपलें सर्व बळ खर्च करून त्या दुय्यम फांद्यांना तोडून टाकलें असतें किंवा निदान फलपुष्प विरहित केलें असतें तर रुमानियाचें नवें संकट जर्मनीवर ओढवलें नसतें. धाकटा लाभ क्षुल्लक मानून मोठ्या लाभाच्या नादीं लागून बरोबरीच्या नात्यानें कुस्ती सुटण्याचें फळहि जर्मनीनें हातचें गमावलें. दोस्त सरकारचा अखेरीस पुरा जय होऊन खालीं मान घालूनच जर्मनीस तह करावा लागेल असा सिद्धांत तज्ज्ञांनीं स्थापित करण्याचें कारण झालें तरी जर्मनीच्या अहंकारानें से. हिंडेनबुर्ग यांच्या लष्करी धोरणांत केलेली ढवळा-ढवळ होय. रुमानियाचें अंजन डोळ्यांत घुसण्याबरोबर जर्मनीला पश्चात्ताप झाला,

व झालेली चूक दुरुस्त करण्याची कामगिरी से. हिंडेनबुर्ग यांना सांगितली. से. हिंडेनबुर्ग हुषार खरे, पण कालाची मर्यादा उल्लंघन केल्यानंतर हुषारीचा काय उपयोग होणार ? तज्ज्ञांचें असें मत आहे कीं, बिघडलेली घडी से. हिंडेनबुर्ग यांचे हातून सुधारणें शक्य नाहीं. वेळ निघून गेली, ती परत येत नाहीं. से. हिंडेन्बुर्ग फार झालें तर आजचें मरण उद्यांवर ढकलतील इतकेंच. १९१६ च्या पूर्वार्धात जें शक्य होतें तें १९१६ च्या उत्तरार्धात किंवा १९१७ सालांत जसेच्या तसेंच कसें शक्य राहील ? कालाच्या हेलकाव्याबरोबर जर आपण त्याच्या अनुरोधानें फिरत राहिलो नाहीं तर आपलें आसन डळमळीत केल्याशिवाय काळाची गति कशी स्वस्थ बसेल ? १९१६ सालच्या पूर्वार्धात दोस्त सरकारच्या धाकट्या फांद्या मोडण्याची जी कामगिरी जर्मनीनें उरकून टाकावयास पाहिजे होती त्या कामगिरीची सुरवात सप्टेंबर महिन्यांत उशिरानें से. हिंडेनबुर्ग यांनी केली. अर्थात काळ से. हिंडेनबुग यांच्या विरुद्ध आहे. तथापि त्यांच्या अंगच्या विलक्षण हुषारी· मुळें आणखी एक वर्षभर महायुद्धाचें आयुष्य वाढणार असें आक्टोबर महिन्यांत दृष्टोत्पत्तीस आलें. नव्या फांदीला–रुमानियाला–प्रथम तोडून टाकून नंतर सालिनोका व इटली यांचा समाचार घ्यावयाचा असा आस्ट्रो–जर्मनांचा सांप्रत हेतु दिसतो. या डावांत तात्पुरता थोडासा विजयहि से. हिंडेनबुर्ग यांना मिळण्याचीं चिन्हें आक्टोबर महिन्यांत दिसू लागलीं आहेत. आक्टोबर अखेरीस व नोव्हेंबरचे प्रारंभाला रुमानियाला आस्ट्रो–जर्मनांनीं कचाटींत पकडलें आहे. नोव्हेंबर प्रारंभाला रुमानियाचा सर्व डोब्रुजा प्रांत जाऊन ट्रान्सलाव्हानियांतून रुमानियाला बाहेर पडावें लागून सरहद्दी-वरील पर्वताचे सर्व घाट आस्ट्रो–जर्मनांचे हातीं जाऊन या घाटाखालीं रुमानियाच्या मुलखांत आस्ट्रो–जर्मन सैन्य दोनचार ठिकाणीं आंत घुसलें आहे. आक्टोबर अखेरीस रुमानिया फलपुष्पविरहित झाला हें खास. नोव्हेंबर–डिसेंबरांत जर रुमानियाची खांदी आस्ट्रो–जर्मनांना तोडतां आली तर तात्पुरतें यश हिंडेनबुर्ग यांना मिळाल्यासारखें होईल. तात्पुरतें म्हणण्याचें कारण असें कीं जरी रुमानिया मागें हटून रुमानियाची राजधानीं बुखारेस्ट शहर आस्ट्रो–जर्मनांच्या हातीं लागलें तरी व्हर्डूनच्या लढा-ईनंतर महायुद्धाच्या यशापयशाच्या प्रवाहाला जी दिशा लागली आहे ती दिशा कांहीं केल्या पालटणार नाहीं. रुमानियाला कैचींत धरणें किंवा चुरडणें म्हणजे कांहीं रशियाचा पराभव नव्हे. रुमानिया सामील झाला नव्हता त्यावेळीं आस्ट्रो–

जर्मन सैन्याचा धुव्वा रशियानें उडविला होता; रुमानियाला दावण्यांत आस्ट्रो–जर्मनांचें बरेंच बळ खर्ची पडल्यावर पुढील सालच्या वसंत काळांत रशियाच्या नव्या तयारीपुढें आस्ट्रो–जर्मनांची काय स्थिति होईल ? रुमानिया सामील झाला नव्हता त्यावेळीं अँग्लो–फ्रेंचांनीं जर्मनीच्या मानेवर आपला हात चढविला होता; तो हात तसाच जोरानें पुढे सरकत असून येत्या हिंवाळ्यांत जरी त्याची मंदगति झाली, तरी पुढील सालच्या वसंत काळांत जर्मनीस उलथून पाडल्याशिवाय कसा राहील ? रुमानिया सामील झाला नव्हता त्यावेळीं इटलीनें आस्ट्रियाचें संकट धडकावून देऊन गार्जियाचा विजय संपादन केला होता; इटलीच्या या जयाची मालिका पुढील सालीं अधिक लागण्यास कोणची हरकत आहे ? आपण अशी कल्पना करूं कीं, आगस्ट अखेरीस रुमानिया दोस्त सरकारांस मिळाला नसता तर काय झालें असतें ? सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यांत अँग्लो–फ्रेंचांचें जितकें पाऊल पुढें पडलें तितकें पुढें पडलें नसतें इतकेंच. पण महायुद्धाचा ओघ कांहीं बदलत नव्हता. अँग्लो–फ्रेंचांवर, इटालीवर किंवा रशियावर चढाई करून जाण्याचा मान व्हर्डूनच्या लढाईत जर्मनीनें जो गमावला तो गमावला! रुमानियाला हतवीर्य केल्यानें तो मान जर्मनीला थोडाच परत मिळणार आहे ? महायुद्धाच्या सांदी–कोपऱ्यांत मिळविलेल्या विजयावर हा मान अवलंबून नसून, मनुष्य बल, द्रव्यबल व ज्ञानबल या त्रिवेणीसंगमाच्या प्रवाहांतील जिवंत झऱ्यावर हा मान अवलंबून आहे. जर्मनीचे हे झरे आटत आहेत आणि दोस्त सरकारांचे झरे आतां कोठें जोरानें वाहूं लागले आहेत, त्याची साक्ष रशियाच्या व फ्रान्सच्या रणभूमींत रुमानियाला पटल्यानंतरच रुमानिया महायुद्धांत सामील झाला. दोस्त सरकारांची शक्ति यंदाच आस्ट्रो–जर्मनांना डोइजड झाली. ही वाढती शक्ति आहे याबद्दल वाद नाहीं. शक्ति जर वाढती आहे आणि आजच जर आस्ट्रो–जर्मनांच्या डोक्यावर बसली आहे, तर त्या शक्तीची आराधना करणारा रुमानिया नोव्हेंबर प्रारंभाला से. हिंडेनबुर्ग यांच्या चापांत कां सांपडावा ?

रुमानिया कैचींत सापडण्याचें कारण असें आहे कीं, रुमानियाची रणभूमि कोनाकोपऱ्याची रणभूमि असून रशियाच्या बेसारेबिया प्रांतांतील आगगाड्यांशिवाय इतर दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें रुमानियास इंग्लंड व फ्रान्स यांजकडून मदत पोंचण्यास मार्ग नाहीं. फ्रान्सच्या व इटलीच्या रणभूमींत जोंपर्यंत आस्ट्रो–

जर्मन सैन्य लढाईंत चढाईच्या नादांत गुन्तलें होतें तोंपर्यंत तोफांचें बलहि पश्चिमे-कडेस झुकलेलें होतें; पण पश्चिम रणभूमींत चढाईचा नाद सोडून थोडथोडी पीछेहाट होऊन जेव्हां जर्मन तोफा पूर्वेकडे वळल्या, तेव्हां रशियाची सरशी होण्याचें बंद पडून पूर्व रणभूमीवर आस्ट्रो–जर्मन सेना व रशियन सेना समबल ठरली. रणभूमीवरील या फेरफाराकडे पाहिलें म्हणजे एक गोष्ट चांगली नजरेस येते. ती ही कीं १९१५ सालापेक्षां १९१६ सालीं जर्मनीच्या तोफांच्या शक्तीला बराच कमीपणा येत चालला आहे. १९१५ सालीं जर्मनी एका दिशला समबल राहात असे व दुसऱ्या दिशेला वरचढ होत असे. १९१६ सालीं जर्मनी पश्चिमेस हतबल आहे व पूर्वेस समबल आहे. म्हणजे १९१५ सालचा नूर उतरला. १९१५ सालचा नूर उतरला खरा; तरी पूर्वेस रुमानिया महायुद्धांत सामील झाल्यावर सप्टेंबर व आक्टोबर दोन महिने ग्यालिशिया व उपोव्हिना प्रांतांत रशियाशीं झुंजतांना जर्मनी समबल ठरला ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

अर्थात् गेल्या हिंवाळ्यांत व वसंतकाळांत रशियास पोंचलेल्या दारूगोळ्यांची व तोफांची रेलचेल जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर महिन्यांतील प्रचंड लढायांनीं संपवून टाकली! आक्टोबर महिन्यांत रशियाचा वरचढपणा कमी होऊन, रशिया समबल झाला. रशिया समबल होत चालला आहे असें पहाण्याबरोबर आणि बर्फाचा हिंवाळा येण्यास एकदोन महिन्यांचीच अवधी आहे असें दृष्टीस पडल्याबरोबर, रीगाच्या बाजूची उत्तर रणभूमि, फ्रान्सची पश्चिम रणभूमि आणि इटलीची रणभूमि या तिन्ही ठिकाणच्या तोफा थोडथोडया कमी करून आक्टोबर प्रारंभाला ट्रान्सला-ल्व्हानियामध्यें दोनतीन लाख नवें सैन्य व बराच मोठा तोफांचा जमाव से. फॉलकेन-हेन यांचे हाताखालीं देऊन आस्ट्रो–जर्मनांनीं रुमानियावर चढाई सुरू केली. इतक्या तोफा व एवढें मोठें नवें सैन्य ट्रान्सलाल्व्हानियामध्यें आस्ट्रो–जर्मनांना गोळा करतां येईल असा रुमानियाचा अंदाज नव्हता. सप्टबरमध्यें एकतृतीयांशाहून अधिक ट्रान्सलाल्व्हानिया रुमानियानें व्यापला होता; आणि रुमानियाला असें वाटत होतें कीं, ट्रान्सलाल्व्हानिया सोडून देऊन ट्रान्सलाल्व्हानियाच्या पश्चिम सरहद्दीवर स्वतःचें संरक्षण करीत आस्ट्रो–जर्मन सैन्य बसेल आणि ट्रान्सलाल्व्हानियाच्या मोबदला डोब्रुजा प्रांत व्यापून टाकून तहाच्या वेळीं ट्रान्सलाल्व्हानिया पाहिजे असल्यास डोब्रुजा सोडा असें बोलणें जर्मनीकडून येईल. लढाईंत ट्रान्सलाल्व्हानियापेक्षां डोब्रुजा प्रांताची

किंमत जर्मनीला अधिक, कारण रुसो-रुमानियाची बल्गेरियावर स्वारी होऊन बल्गेरियाचा पराभव झाल्यावर तुर्कांचा आगगाडीचा संबंध तोडण्यास डोब्रुजाचाच मार्ग काय तो सुलभ. तुर्कांशीं संलग्न होणें हा जर्मनीचा महायुद्धांतील मुख्य हेतु. तो मुख्य हेतु विफल होऊं नये म्हणून डोब्रुजा प्रांताची जर्मनीच्या लष्करी धोरणास अत्यंत जरुरी. शिवाय सप्टेंबर महिन्यांत से. मॅकेनसन यांनीं मोठ्या त्वरेनें अर्धामुर्धा डोब्रुजा प्रांत व्यापला. अशा वेळीं रुमानियाला कां वाटूं नये कीं, दांत कोरून जमलेले आस्ट्रो-जर्मनांचें बल डोब्रुजा प्रांतांतच फेंकण्यांत आलें आहे म्हणून ? रुमानियाला तसें वाटणें साहजिक होतें. कारण एका बाबीकडे सर्व दोस्त सरकारांचें दुर्लक्ष झालें. ती बाब म्हणजे तुर्कांची नवी सेना होय. गेल्या डिसेंबरांत तुर्की साम्राज्य जर्मनीशीं संलग्न झाल्यावर इंग्लंडनें ज्याप्रमाणें सक्तीचा लष्करी कायदा अमलांत आणून नवें सैन्य उभारलें त्याप्रमाणें जर्मनीनेंहि तुर्कांना वेठीला धरून तुर्कांचें नवें सैन्य जर्मन अधिकाऱ्यांच्या नजरेखालीं तयार केलें. तीन महिन्यांपूर्वी रशियाच्या नव्या धडकीमुळें ज्यावेळीं पांच सात लाख आस्ट्रियन सैन्य निकामी झालें त्यावेळीं तुर्कांच्या मदतीनेंच आस्ट्रिया पुन्हां सावरला. सांप्रत रीगाच्या बाजूच्या उत्तर रणभूमींत तुर्कांचीच मदत जर्मनीला आहे; ग्यालिशियांत रशियाच्या क्रोधाग्नींत जळण्याकरितां तुर्कांनाच पुढें करण्यांत येत आहे; आणि सप्टेंबर महिन्यांत डोब्रुजावर जेव्हां से. मॅकेनसन यांची स्वारी सुरू झाली त्यावेळीं त्यांच्या हाताखालीं तुर्की सैन्याचाच भरणा मोठा होता. इंग्लंडच्या शक्तीचा अंदाज ज्या प्रमाणें जर्मनीला बरोबर करतां आला नाहीं त्याप्रमाणें तुर्की साम्राज्यांत किती धट्टे कट्टे प्राणी जर्मनीच्या वेसणींत गोंवले जातील याचाहि अंदाज दोस्त सरकारांना बरोबर करतां आला नाहीं. प्रमुखतः तुर्को-बल्गेरियन सैन्य से. मॅकेनसन यांच्या हाताखालीं असतांना रुमानियाला वाटलें कीं, आस्ट्रो-जर्मन तोफांचें बळ डोब्रूजाच्याच बाजूला फेकण्यांत आलें आहे. या बलाचा प्रतिकार करण्याकरितां रुमानियानें ट्रान्सिल्व्हानियांतील आपलें कांहीं सैन्य डोब्रुजा प्रांतांतील झर्नाव्होडा-कॉन्स्टांझा या आगगाडीचें संरक्षण करण्याकरितां पाठविलें आणि चौथ्या आठवड्यांत रुमानियानें से. मॅकेनसन यांच्या तडाक्यापासून झर्नाव्होडा-कान्स्टांझा रेल्वेचें संरक्षण केलें. संरक्षण केलें खरें पण ट्रान्सिल्व्हानियामध्यें सर्वच डाव आंगलट आला. कारण ह्याचवेळीं ट्रान्सिल्व्हानियामध्यें से. फॉलकेनहेन यांच्या हाताखालीं आस्ट्रो-जर्मनांचें

ओलि : २५ २२-८-७९



मोठें सैन्य जमलें होतें. सप्टेंबरच्या अखेरीस अलूटा नदीच्या रोथेथुरम घाटाच्या उत्तरेकडील हॅरमनस्टॅड गावांत रुमानियन सैन्याला आस्ट्रो–जर्मनांनीं घेरलें; आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत टर्सबर्ग घाटाच्या उत्तरेकडील फोगॅरस ठाणें रुमानियाला सोडावें लागलें; आणि आक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यांत म्हणजे ९।१० तारखेस प्रिडिअल घाटाच्या उत्तरेकडील ब्रासो शहराच्या टापूंत मोठी लढाई होऊन रुमानियन सैन्याचा मोड झाला. या पराभवानंतर म्हणजे आक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्याच्या अखेरीस रुमानियास कळून चुकलें कीं, से. फॉलकेनहेन यांचे हाताखालीं आस्ट्रो–जर्मनांच्या मुख्य तोफा गोळा झाल्या असून कार्पेथियन पर्वताच्या पलीकडील ट्रान्स्लाल्व्हानियांत घुसलेल्या रुमानियन सैन्यास जड तोफांची मदत वेळेवर पोंचणें शक्य नाहीं. ही स्थिति ध्यानांत येतांच लगेच रुमानियानें मोठ्या शिताफीनें आणि व्यवस्थितपणानें ट्रान्साल्व्हानियांत पीच्छेहाट करण्यास सुरवात केली, आणि एक तृतीयांश जिंकलेला ट्रान्साल्व्हानिया सोडून आक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यांत सर्व रुमानियन सैन्य स्वतःच्या सरहद्दीवर आलें. से. फॉलकेनहेन यांनीं जोराचा पाठलाग सुरू केला. व्हल्कन घाट, रोथेथुरम घाट, टर्सबर्ग घाट, प्रिडियल घाट, बूझा घाट, ऐटझा घाट, ग्यूमिस घाट, वेकार घाट आणि सर्वांत उत्तरेकडचा डोर्नव्हत्रा हे सर्व घाट ओलांडून आक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यांत आस्ट्रो–जर्मन सैन्य रुमानियांत उतरूं लागलें ! रुमानियाचे सामान्यतः तीन भाग करतां येतात. पहिला भाग पूर्व रुमानिया याला धाकटा वोलेव्हिया असें म्हणतात. याच्या उत्तरेस व्हल्कन घाट असून पूर्वेस अर्सोवा व आयर्न गेट हीं ठाणीं आहेत; दक्षिणेस डान्यूब नदी असून पश्चिमेस रोथेथुरम घाटांतून उतरणारी असूटा नदी आहे. हा धाकटा वोलेव्हिया. दुसरा भाग म्हणज थोरला बोलेव्हिया किंवा मध्य रुमानिया होय. या दुसऱ्या भागाच्या मध्यावर बुखारेस्ट राजधानी असून उत्तरेस प्रिडियल घाट आहे. तिसरा भाग म्हणजे नकाशांत उंच मानेसारखा दिसणारा मोल्डेव्हिया प्रांत होय. या मोल्डेव्हियाच्या मध्यांतून सिरेथ नदी कार्पेथियन पर्वतापासून पंचवीस तीस मैलांच्या अंतरावरून वहात असून सिरेथ नदीच्या पूर्वेस पंचवीस मैलांवर रुमानिया व रशिया यांच्या सरहद्दीवर प्रूथ नदी वहात आहे. रशियाच्या बेसारेबिया प्रांतांतील एक आगगाडी सिरेथ नदीच्या उजव्या कांठानें उत्तरेकडून दक्षिण रुमानियांत येते; व दुसरी आगगाडी प्रूथ नदी व सिरेथ नदी

ओलांडून फॉकचीनी स्टेशनाजवळ सिरेथाच्या आगगाडीला मिळते. उत्तरेकडच्या मानेला म्हणजे मोल्डेव्हियाला मोडून टाकावें या इराद्यानें से. फॉलकेनहेन यांनीं बेकास, गुईमज व ऐटझा या तीन घाटांनीं खालीं उतरून सिरेथ नदी गांठण्याचा उद्योग आक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यांत आरंभला. आइप्स व युव्हमज या घाटानें तर ते बरेच पुढें आले आणि रुमानियाची मान मुरगळली जाऊन रुमानियाचें धड रशियापासून अलग होतें कीं काय अशी भीति क्षणभर सर्वांना वाटली ! पण इतक्यांत वेळेवर रशियाची कुमक येऊन पोंचल्यामुळें मोल्डेव्हियांतील आस्ट्रो–जर्मनांच्या चढाईस आळा बसला. डोब्रुजा प्रांतांतील रुमानियन सैन्य मोल्डेव्हियामध्यें धावून आलें आणि रुमानियाच्या गळ्याभोंवती आस्ट्रो–जर्मनांनीं घातलेला फास ढिला पडला. मोडेव्हियांतील दाब कमी झाला खरा, पण आक्टोबरच्या चौथ्या आठवड्यांत डोब्रुजा प्रांतात से. मॅकेनसन यांनीं पुन्हां वर डोकें केलें; आणि झर्नाव्होडा–कान्स्टनझा रेल्वे एकदम ताब्यांत घेऊन डान्यूब नदीवरील झर्नाव्होडा गांव आणि काळ्या समुद्रावरील कान्स्टनझा बंदर हीं दोन्ही आस्ट्रो–जर्मनांच्या हातीं लागलीं. कान्स्टनझा बंदरांत गव्हाचा मोठा सांठा होता व तेथें पोळ्या खावयास मिळतील ह्या आशेनें जर्मन सैन्य धावून गेलें; पण जहाजांत बसून निघून जातांना रशियन सैन्यानें गव्हाच्या सांठ्याला आग लावून दिल्यामुळें जर्मनीची फार निराशा झाली. झर्नाव्होडा–कान्स्टनझा रेल्वे से. मॅकेनसन यांच्या हातीं लागण्याबरोबर त्यांनीं उत्तर डोब्रुजा प्रांत धडकीसरशी दोन चार दिवसांत घेतला; नोव्हेंबर प्रारंभाला डोब्रुजा प्रांताच्या ईशान्य कोंपऱ्यांत अवशिष्ट रूसो–रुमानियन सैन्य बळकट जागा पकडून से. मॅकेनसन यांच्याशीं जोरानें लढत राहिलें आहे. या सैन्यास मोठीशी कुमक येऊन पोंचणें संभवनीय नसल्यामुळें सर्व डोब्रुजा प्रांत से. मॅकेनसन यांचा झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. डोब्रुजा प्रांत मिळाल्यामुळें डान्युब नदीचा उजवा कांठ जर्मनीचा झाला; बल्गेरिया व टर्की रशियाच्या भीतींतून मुक्त झाले; आणि से. मॅकेनसन यांच्या हाताखालचें लाख दीड लाख सैन्य दुसऱ्या कामगिरीस मोकळें झालें. या विजयानंतर से. मॅकेनसन पुढें काय करणार ? कांहींचा अंदाज असा आहे कीं, ते सॅलिनोकाकडे वळणार; कांहींचें म्हणणें असें पडतें कीं एक दोन आठवड्यांत ते आर्सोव्हा येथें येऊन पश्चिमेकडून रुमानियावर स्वारी करणार; कांहींचा तर्क असा आहे कीं, जर्मनीच्या शास्त्रीय ज्ञानाने

डान्यूब नदी ओलांडण्याची तयारी यापूर्वीच बल्गेरियांत करून ठेविली असली पाहिजे; आणि त्या साधनांचा उपयोग करून चलाख से. मॅकेनसन कोठें तरी डान्यूब नदी अवचित ओलांडून रुमानियाच्या राजधानीला एकाएकीं भयाभीत करून सोडणार. यांपकीं कोणचा तर्क खरा हें नोव्हेंबर महिन्यांत दृग्गोचर होईल. मोल्डेवियामध्यें जोराचा अडथळा रुसो–रुमानियन सैन्य करीत आहे असें पाहून आस्ट्रो–जर्मन सैन्य वाल्कन घाटांतील जीऊल नदीच्या खोऱ्यानें, रोथेथुरम घाटांतील अलूटा नदीच्या खोऱ्यानें व प्रिडियल घाटाजवळच्या प्रॅपोवा नदीच्या खोऱ्यानें आक्टोबर अखेरीस जोरानें खालीं उतरूं लागलें. जीऊल नदीच्या खोऱ्यांत रुमानियन सैन्यानें त्यांना मागे हटवून पुन्हां व्हल्कन घाट दाखविला; पण अलूटा नदीच्या कांठीं, टर्सबर्ग घाटाच्या दक्षिणेकडील किंप्लागच्या जिल्ह्यांत व प्रिडियल घाटाच्या दक्षिण टापूंत आस्ट्रो–जर्मन सैन्याचें पाऊल आस्ते आस्ते पुढें पडून या तीन घाटांनीं खालीं उतरलेलें सैन्य नोव्हेंबरच्या प्रारंभाला एकमेकांशीं संलग्न झालें. ह्या ठिकाणीं जोराच्या लढाईला सुरुवात झाली असून त्या लढायांच्या निकालावर आणि से. मॅकेनसन यांच्या हालचालीवर नोव्हेंबर–डिसेंबरांतील रुमानियाचा सोक्षमोक्ष अवलंबून आहे. पश्चिम रणभूमींत, रशियाच्या बाजूच्या ग्यालिशियाच्या व ब्युकोव्हिनाच्या रणभूमींत, इटालीच्या रणभूमींत भयंकर लढाया सुरू झाल्या असून आस्ट्रो––जर्मनांना दोस्त सरकार तंबी देत आहे; व रुमानियाला रशियानें मदत करूं नये म्हणून रशियाला आस्ट्रो–जर्मन सैन्य तंबी देत आहे. रुमानियांतलें युद्ध कोनाकोपऱ्यांतलें खरें, महायुद्धाच्या एकन्दर प्रवाहावर त्याचा कायमचा परिणाम होण्यासारखें नाहीं हेंहि खरें; पण नोव्हेंबर डिसेंबरांत जर बुखारेस्ट शहर आस्ट्रो–जर्मनांच्या हातीं गेलें तर अभिमन्युवधाच्या वेळेप्रमाणें दोस्त सरकारांचे सर्व हितचिंतक शोकाकूल झाल्यावांचून राहाणार नाहींत; बहुजन समाजावर रुमानियाच्या पराभवाचा फार मोठा परिणाम होणार आहे; आणि त्या मुळेंच नोव्हेंबर प्रारंभाला इतर सर्व रणभूमींना मागें टाकून रुमानियाच्या चिमुकल्या रणभूमीला विलक्षण महत्व प्राप्त झालें आहे. नोव्हेंबर महिन्यांत वाचकांनीं रुमानियाच्या रणभूमीकडील बातम्यांकडे विशेष लक्ष पोचवावें हें सांगणें नकोच.

———

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा नोव्हेंबर–डिसेंबर महिना

## रुमानियाला वाईट महिना

नोव्हेंबर महिना रुमानियाला वाईट गेला; आणि डिसेंबर प्रारंभाला रुमानियाची राजधानी बुखारेस्ट शहर शत्रूच्या हातीं लागल्यासारखी होऊन नव्या वर्षाच्या प्रारंभीं म्हणजे आणखी एक महिन्यानें रुमानियाची वरची मान म्हणजे मोल्डेव्हिया तेवढा रुमानियन सरकारच्या ताब्यांत राहून खालचें सगळें धड जर्मनीच्या हातीं लागेल, असा सांप्रत अंदाज दिसत आहे. रुमानियावर हा जो दुःखाचा प्रसंग गुदरला त्याबद्दल सर्व दोस्त सरकारांना अत्यंत वाईट वाटत असून रुमानियाला पुन्हां स्वस्थळीं प्रस्थापित करण्याकरितां पुढील वसंतकाळीं दोस्त सरकारांकडून जिवापाड मेहनत करण्यांत येईल हें सांगणें नलगे. रुमानियाचा हा जो पराभव झाला त्याचें कारण दोस्त सरकारांपाशीं लढवय्या लोकांची संख्या कमी आहे असें नव्हे, किंवा दोस्त सरकारांजवळ दारूगोळा संपत आला आहे असेंहि नव्हे. दर महिन्याला दोस्त सरकारांचें नवें सैन्य संख्येनें अधिक वाढत आहे आणि दारूगोळयांचे पर्वतहि अधिक अधिक उंच होत चालले आहेत. मग रुमानियावर हा प्रसंग कां गुदरावा ? खुद्द रुमानियापाशीं मनुष्यबळ कमी होतें काय ? रुमानियाचें सैन्य सात आठ लाखांहून अधिक ! तेव्हां मनुष्यबळ कमी असें कसें ह्मणावें ? रुमानियन सैन्य शौर्यानें लढत नाहीं काय ? आपल्या घरादारांवर व बायकामुलांवर हा प्रसंग गुदरत आहे हें रुमानियाला माहीत असल्यामुळें राजापासून रंकापर्यंत सर्वांनीं लढण्याची शिकस्त केली. मग हा प्रसंग कां गुदरला ? या पराजयाचीं कारणें दोन आहेत. पहिलें कारण असें कीं रुमानिया कोनाकोपऱ्यांत पडला असून रशियाच्या एखाददुसऱ्या अगदीं कडेच्या–लांबवरच्या–अर्थात् कमकुवत असलेल्या आगगाडीच्या फांटयानें रुमानिया रशियाशीं संबद्ध झालेला आहे. रुमानियाचें रणक्षेत्र जर्मनी, आस्ट्रिया, बल्गेरिया व टर्की या चौघांनांहि अगदीं परसांतलें ! घरांतून बाहेर पडावयाचें तें रणभूमीवर उभें राहावयाचें ! चारी देशांतील आगगाडयांचे कित्येक फांटे रुमानियाच्या सरहद्दीला भिडलेले. यामुळें आस्ट्रो–जर्मनांना आपल्या मोठया तोफा रुमानियाच्या रणभूमींत फार सुलभतेनें वापरतां आल्या; आणि दारूगोळ्यांचा मुबलक पुरवठा पाहिजे त्या बिंदूवर पाहिजे त्यावेळीं पाहिजे तितका करतां आला. रुमानियावर जय तोफांनीं मिळविला, यंत्रांनीं मिळ-

विला, युद्धसामुग्रीनें मिळविला, माणसांनीं नव्हे. बिचारा रुमानिया ! त्याच्यापाशीं आस्ट्रो–जर्मनांच्या तोफांना तोंड देण्याइतक्या लायकीचा तोफखाना कोठून असणार ? चिमुकलें राष्ट्र; तोफखानाहि चिमुकला ! येऊन जाऊन रशियानें त्याला तोफांची मदत करावयाची; पण या महायुद्धांत तोफांच्या बाबतींत पहिल्यापासून रशिया गरजू व कर्जबाजारी. रशियानें आपली शिकस्त करून मदत केली खरी; पण ती मदत पुरेशी न झाल्यास नवल नाहीं व रशियाकडे दोषहि नाहीं. सांप्रतचें महायुद्ध हें यंत्रमय आहे. बोलायचें, चालायचें, खुणा करावयाच्या, इषारा द्यावयाचा, सर्व कांहीं यंत्रानें. खावयाचें–प्यावयाचें देखील यंत्रानें, अशांतली स्थिति झाली आहे. एखाद्या पलटणींतील लढणाऱ्या माणसाहून त्या पलटणीबरोबर असलेल्या यंत्रांचीच संख्या अधिक, त्या पलटणीवर हुकमत चालविणाऱ्या सेनानायकाहून वाकबगार इंजिनिअरांची संख्या अधिक, त्या पलटणीला खायला प्यायला देण्याची तरतूद करणाऱ्या खात्याहून यंत्रांच्या पोटांत टाकावयाच्या गोळ्यांची व पेट्रोलियमच्या पाण्याची व्यवस्था ठेवणारें खातें अधिक महत्वाचें, आजारी पडलेल्या किंवा जखमी झालेल्या सैनिकांची शुश्रूषा करण्याकरितां जमा झालेल्या वैद्यमंडळाहून मोटार वगैरे निरनिराळया यंत्रांची दुरुस्ती करण्याकरितां रणभूमीजवळ पसरलेल्या बाजाराचेंच अवडंबर मोठें ! या महायुद्धांतील एखाद्या रणभूमीचें जर देवदूताप्रमाणें आकाशांतून अवलोकन केलें, तर एखाद्या विस्तीर्ण यंत्रालयांत व यांत्रिक कारखान्यांत मौजेखातर कांहीं सैनिक इकडून तिकडे फिरत आहेत असें वाटतें. सैनिकांच्या बरोबर यंत्रे नसून, यंत्रांच्या जवळ कुतूहलानें लष्करी पोषाखांचे थोडेसे लोक उभे आहेत असा भास होतो. हा यंत्रांचा पसारा आहे, शूर पुरुषांचा जमाव नव्हे. असल्या यंत्रांच्या प्रदर्शनापुढें बिचाऱ्या रुमानियाचें काय चालणार ! रुमानियाच्या पराभवाचें मुख्य कारण रुमानियाच्या बाजूला असलेला यंत्रांचा तुटवडा होय. दुसरें कारण असें कीं, जर्मनीचा यंत्राचा बाजार आटपता आला आहे, अशा भ्रमानें रुमानियानें चुकीचें लष्करी धोरण प्रथमपासून स्वीकारिलें. रुमानिया लढाईला सुरुवात करण्याबरोबर एकदम ट्रान्साल्व्हानियामध्यें घुसला. हें लष्करी धोरण दोस्त सरकारांच्या सांगण्यावरून रुमानियानें स्वीकारलें नव्हतें. दोस्त सरकारांच्या लष्करी तज्ज्ञांनीं असा सल्ला दिलाच नसता. ट्रान्साल्व्हानिया कबजांत घेण्याकरितां आपण लढाईंत पडणार

आणि तो एकदम ताब्यांत घेण्याचेंच लष्करी धोरण आपण स्वीकारणार अशा अटीवरच रुमानिया लढाईंत पडला. बल्गेरिया व तुर्कस्थानाला सालिनोका येथील सैन्यानें तंबी द्यावी आणि रुमानियानें एकदम ट्रान्साल्व्हानिया व्यापावा असलें लष्करी धोरण रुमानियानें युद्धांत पडावयाचे वेळीं आखून ठेविलें. हें धोरण आंगलट कसें आलें तें पहा. ग्रीसचा राजा दगलबाज ठरला, आणि त्यामुळें सालिनोकाच्या सैन्याला मोठीशी हालचाल करतांच आली नाहीं. ग्रीसच्या राजाचा पायबंद तोडून सालिनोकाचे घोडे आज पुढें दवडूं शकत नाहींत, ही मनाशीं पक्की खूणगांठ घालून बल्गेरियन व टर्किश सैन्य हाताशीं घेऊन से. मॅकेनसन यांनीं डोब्रुजा प्रांतावर एकदम चढाई केली, आणि पहिल्या झटक्याला मोठा जय मिळवून झर्नोव्होडा–कान्स्टांझा आगगाडी गांठली ! से. मॅकेनसन यांच्या या विजयानें ट्रान्साल्व्हानियामध्यें रुमानियानें मिळविलेल्या यशावर विरजण घातलें; आणि डोब्रुजाच्या बाजूला ढासळूं लागलेली भिंत सावरण्याकरितां ट्रान्साल्व्हानियाकडे लागलेली रुमानियाची दृष्टि डोब्रुजाकडे वळली. ही संधि साधून आस्ट्रो–जर्मनांनीं ट्रान्साल्व्हानियामध्यें आपला यंत्रांचा मायावी बाजार एकदम उघडला. हा बाजार पाहून रुमानियन सैन्य अर्थात गांगरून गेलें; आणि रुमानियाच्या पीछेहाटीस सुरुवात झाली. ही पीछेहाट चालू असतांना आस्ट्रो–जर्मनांनीं इतकी लगट केली कीं, रुमानियाच्या संरक्षणाच्या मुख्य जागा जे कार्पेथियन पर्वतांतील अवघड घाट रुमानियाला सोडून द्यावे लागले आणि त्यावेळेपासूनच रुमानियाच्या खऱ्या संकटाला आरंभ झाला. कार्पेथियनाचे घाट मजबूत रींतीनें पकडून बसणें आणि बल्गेरियावर एकदम स्वारी करणें असलें लष्करी धोरण रुमानियानें प्रथमपासून स्वीकारलें पाहिजे होतें. त्या धोरणाच्या अगदीं उलट धोरण रुमानियानें स्वीकारिलें. बल्गेरियावर हल्ला न केल्यामुळें डोब्रुजाची भिंत ढासळली; त्या बरोबर ट्रान्साल्व्हानियामध्यें रुमानियाचा हात लटका पडून जर्मन यंत्रांत बोटें इतकीं सांपडलीं कीं कार्पेथियन पर्वताच्या खांद्यावरून जर्मनी खालीं उतरूं लागला. म्हणजे डोब्रुजाचीं पावलेंहि गेलीं आणि कार्पेथियन पर्वताचा खांदाहि गेला. कार्पेथियन पर्वताचे घाट उतरून जर्मनी खालीं उतरूं लागला असतां पायथ्या जवळच्या टेकडाळ मुलखांत जर्मनीला अडविण्याचा उद्योग आक्टोबर अखेरीस रुमानियानें सुरू केला. मग पुन्हां डोब्रजाकडे दुर्लक्ष होऊन कार्पेथियनकडे रुमानियाचे लक्ष अधिक वेधलें गेलें. असें होतांच से. मॅकेनसन यांनीं पुन्हां उचल

केली आणि डोब्रुजाची सगळीच भिंत ढासळून टाकली. डोब्रुजाची चांदई ढांसळण्याबरोबर डान्यूब नदी ओलांडून दक्षिण पूर्वेचें शत्रूचें लष्कर रुमानियांत घुसतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. एकीकडे सावरावें तर दुसरीकडे पडतें, तिकडे सावरावयाला जावें तर पहिलें अधिक कोसळतें; अशा तऱ्हेच्या पडक्या घराच्या धांदलींत रुमानिया सांपडला असतां मोल्डेव्हियावर म्हणजे रुमानियाच्या मानेवर जोराचे ाव घालण्यास आस्ट्रो–जर्मनांनीं सुरुवात केली. मोल्डेव्हिया गेला असता तर सर्व बाजूनीं रुमानिया वेढला जाऊन रशियाची व रुमानियाची ताटातूट झाली असती. तेव्हां कसेंहि करून मोल्डेव्हियांत रणांगण पकडून राहाणें रुमानियास भाग होतें. मोल्डेव्हियाच्या संरक्षणार्थ बरेंच सैन्य गुन्तलें गेलें. नंतर बुखारेस्टच्या थेट उत्तरेस असलेल्या प्रीडियल घाटाचे दक्षिणेस आस्ट्रो–जर्मनांनीं जोर केला. येथून शत्रूला खालीं येऊं देणें, म्हणजे प्राहोव्हा नदीच्या खोऱ्यांतील पेट्रोलियम, तांबें, वगैरेंच्या मोठमोठ्या खाणी शत्रूच्या हातीं देऊन राजधानींतच शत्रूला बोलावण्यासारखें होतें. तेव्हां प्रिडियलच्या बाजूला शत्रूला थोपवून धरणें भाग पडलें. तेथेंहि बरेंच सैन्य गुन्तलें; प्रीडियलच्या पश्चिमेस किंपोलंगच्या टापूत आस्ट्रो–जर्मनांनीं जोर करून दोन पावलें पुढें टाकलीं; व त्याच सुमारास व्हल्कन घाटामध्यें दोन पावलें मागें घेतलीं. आस्ट्रो–जर्मनांची ही हालचाल फसवेगिरीची होती व या फसव्या हालचालीनें रुमानिया फसला. रुमानियाला वाटलें, आस्ट्रो–जर्मनांच्या चढाईचें केंद्रस्थान प्रिडियल घाट असून पश्चिम व्हॉलेशियाचे बाजूला म्हणजे व्हल्कन घाटाचे बाजूला आस्ट्रो–जर्मनांची तितकी जोराची तयारी नाहीं. व्हल्कन घाटांत जर आस्ट्रो–जर्मन दोन पावलें मागें हटत आहेत तर मोठा बंदोबस्त या बाजूस कशास ठेवावा ? शिवाय आस्ट्रो–जर्मनांनीं व्हल्कनच्या बाजूला जर जोरच केला तर अवचित असें काय होणार आहे ? पश्चिम व्हॉलेशियाच्या पश्चिम टोंकापासून लहान लहान लचके आस्ट्रो–जर्मन तोडीत बसतील इतकेंच. कार्पेथियन पर्वतांत उगम पाऊन उत्तरेकडून दक्षिणेस डान्यूब नदीकडे येणाऱ्या कित्येक नद्या पश्चिम व्हॉलिशियामध्यें आहेत. एक नदी ओलांडून दुसरी नदी गांठण्यासच आस्ट्रो–जर्मनांना किती तरी वेळ लागेल आणि तेवढ्या अवधींत रशियाची मोठी कुमक येऊन पोंचण्यास हरकत पडणार नाहीं, अशा समजुतीनें व्हल्कन घाटाच्या दक्षिणेकडील बंदोबस्त ढिला पाडण्यांत आला. रुमानियाच्या रणभूमींत ढिलें स्थान कोणचें आहे याचें निरीक्षण से. हिंडे-

नव्रुर्ग करीतच होते. नोव्हेंबर प्रारंभाला व्हल्कन घाटाचा टापू ढिला आहे असें त्यांना समजतांच प्रिडियल घाट व किंपोलंगचा प्रदेश येथील सैन्यास निकरानें जिवापाड लढण्याचा हुकूम त्यांनीं सोडला. त्यामुळें आस्ट्रो जर्मनांच्या हल्ल्याचें केंद्रस्थान प्रिडियल घाटच आहे अशी रुमानियाची भूल कायम राहिली. त्याच वेळीं बुकोव्हिनाच्या दक्षिण टापूवरील रशियन सैन्यावरहि जोराचे हल्ले करण्यांत आले. त्यामुळें मोल्डेव्हिया पुन्हां मुख्य रणभूमि होतो कीं काय असाहि भास उत्पन्न झाला. अशा खोट्या भावनेंत रुमानिया गुंगला गेला असतांना व्हल्कन घाटाच्या टापूंत नोव्हेंबरचे पहिले दोन आठवडे तीन चार लाख सैन्य जमा करण्यांत शत्रूनें घालविले. मोठ्या लोंढ्याची सर्व तयारी पूर्णपणें झाल्यावर व्हल्कन घाटांतून आस्ट्रो-जर्मनांचा प्रचंड प्रवाह विलक्षण जोरानें एकदम खालीं उतरू लागला. पहिले चार पांच दिवस रुमानियाला वाटलें कीं आयत्या वेळीं थोडे अधिक लोक आपल्या अंगावर चाल करून येत आहेत, आणि आपण थोडे थोडे मागें रेटले जात आहोंत. चार पांच दिवसांनीं या लोंढ्याचें खरें स्वरूप त्यांच्या ध्यानांत आलें आणि उगीच आपण वेळ गमावला तर लोंढ्यांत वाहून जाऊं असें त्यांनीं ओळखलें. लगेच त्यांनीं मुख्य तोफा व त्या बाजूचें सैन्य जलदीनें मागें घेतलें आणि नोव्हेंबरच्या चवथ्या आठवड्यांत आल्ट नदीपर्यंतचा सर्व पश्चिम व्होलेशिया आस्ट्रो-जर्मनांना खालीं करून दिला. पश्चिम व्होलेशियांतील सैन्याचा मुख्य भाग बचावला गेला आणि तोफाहि शत्रूच्या हातीं गेल्या नाहींत. पण आल्ट नदीवरहि शत्रूला थोपवून धरतां आलें नाहीं. कारण त्याच सुमारास सिम्निझापासून टरक्यूकाईपर्यंत पन्नास पांऊणशें मैलांत डान्यूब नदी चार पांच ठिकाणीं ओलांडून व्हेडे नदी कांठचा अलेक्झांड्रियाचा प्रदेश, व ग्लॅयॅट्रिक नदी कांठचा कोमनचा भाग, ह्या जागा से. मॅकेनसन यांनीं गांठला. त्याचवेळीं आल्ट नदी ओलांडून आलेल्या आस्ट्रो-जर्मनांनीं पिटेस्टी जिल्हा व्यापून आर्निस नदीच्या खोऱ्यानें बुखारेस्टवर चाल केली. बुखारेस्ट शहर बाल्कन प्रदेशांतील पॅरीस समजलें जातें. इतकें श्रीमंत व सुन्दर शहर बाल्कन प्रदेशांत दुसरें नाहीं. ह्या शहरा सभोंवतीं लहान लहान किल्ल्यांचें परिवेष्टण असून कित्येक महिने झुंजविण्यास हें शहर समर्थ होतें, पण लढाईच्या प्रारंभीं राजधानीचें शहर झुंजविण्याचा प्रसंग आपणावर येईल असा अंदाज रुमानियन सरकारचा मुळींच

नसल्यामुळें सदर किल्लंयाच्या तटबंदीवरील तोफा इतर ठिकाणीं नेण्यांत आल्या होत्या. अर्थात् आस्ट्रो–जर्मन सैन्य बुखारेस्ट जवळ येण्याबरोबर राजधानी झंजविण्याचा विचार रुमानियाला सोडून द्यावा लागला, आणि डिसेंबर प्रारंभालाच लष्करी सामानसुमानाच्या दृष्टीनें राजधानीचें शहर रिकामें करण्यांत आलें. रुमानियन सरकार परराष्ट्रीय वकील, तिजोरी, जडजवाहीर व इतर महत्त्वाच्या सर्व वस्तु ह्यांसह रुमानियाच्या अगदीं उत्तरेकडील ईशान्य कोंपऱ्यांतील रशियाच्या सरहद्दीजवळील जासी गांवांत राहावयास गेलें, आणि डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत बुखारेस्ट शहर आस्ट्रो–जर्मनांच्या हातीं पडल्यासारखेंच झालें ! बुखारेस्ट शहर जर झुंजविलें नाहीं तर रणभूमीवर कोणत्या जागीं रुमानियन सैन्याला नेटानें उभें राहातां येईल ? बुखारेस्टच्या उत्तरेकडून जाणाऱ्या प्राहोव्हा नदीच्या पलीकडे रुमानियन सैन्याला चांगली आश्रयाची जागा मिळेल आणि प्राहोव्हा नदीच्या खोऱ्यांत भयंकर लढाया होतील असा अंदाज आहे. पण ह्या नद्यांच्या आश्रयांत जो मोठा दोष आहे, तो हा कीं, डान्यूब नदीमध्यें आश्रयाच्या नदीच्या तोंडापर्यंत आस्ट्रो–जर्मन जहाजांना पाहिजे तसा सुखसंचार करतां येतो; आणि या जहाजांच्या जोरावर रुमानियन सैन्याच्या डाव्या बगलेस वळसा घालतां येतो. असा वळसा पडला असतां त्या नदीचा आश्रय सोडणें भाग पडतें. अशा दृष्टीनें विचार केला असतां रुमानियन सैन्याची सांप्रत सुरू झालेली पीछेहाट प्राहोव्हा नदीपर्यंतच न थांबतां सिरेज व प्रुथ या नद्या ओलांडून रुमानियाचा सर्व मुलुख सोडून रशियाच्या सरहद्दीस बेसोरेबिया प्रांतापर्यंत पोंचण्याचा संभव आहे. रुमानियाला जिंकून रशियाच्या डाव्या बगलेला वळसा देऊं असा आपला बेत से. हिंडेनबर्ग यांनीं कांहीं दिवसांपूर्वी जाहीर केला होता. डान्यूब नदीच्या दोन्ही बाजू आपल्या ताब्यांत ठेवणें हें लष्करी धोरणाच्या दृष्टीनें आस्ट्रो–जर्मनांना इष्ट आहे. तेव्हां बेसारेबियाचा डान्यूबच्या उत्तरेकडील भाग स्वतःच्या कबजांत घेण्याकरितां ह्यावेळीं पूर्ण धडपड केल्याशिवाय आस्ट्रो–जर्मन राहाणार नाहींत; आणि डान्यूब नदीचे दोन्ही तट जेवढे जेवढे त्यांच्या ताब्यांत जातील तेवढ्या तेवढ्या भागापर्यंत दुहेरी किंवा तिहेरी आगगाडीसारखा सुलभ व जलदीचा पाण्याचा मार्ग त्यांच्या हातीं पडत जाणार; यामुळें डान्यूब नदीला धरून होणारी त्यांची गति अर्थातच वेगाची झाल्यावांचून राहाणार नाहीं. डान्यूब नदीचा उपयोग करून घेऊन सर्व डान्यूब नदी ताब्यांत

घेणें, हा सांप्रत आस्ट्रो–जर्मनांचा हेतु दिसतो. हें लष्करी धोरण सोडून वाटेंतच कोठेंतरी मुक्काम करणें आस्ट्रो–जर्मनांना भाग पडण्यास फ्रान्समध्यें, ग्यालिशियामध्यें इटलीच्या रणभूमींत, किंवा सालिनोकाच्या बाजूला आस्ट्रो–जर्मन भयाभीत होतील एवढा मोठा जय दोस्तांना मिळाला पाहिजे. आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत रशिया इंग्लंड, फ्रान्स, इटली व सर्व्हिया हे गप्प बसले नाहींत. रशियानें कार्पेथियन पर्वतांत चांगला हात दाखविला, व्हर्डूनच्या टापूंत फ्रान्सनें जर्मनीची बरीच तिरपीट उडविली; सोमनदीवर इंग्रजांनीं जमनीकडून शाबास म्हणवून घेतलें; इटलीनें आल्प्स पर्वतांततहि आस्ट्रियास मागें रेटलें; आणि सालिनोका येथील सैन्यानें मोनॅस्टिर घेऊन मासिडोनियाच्या त्या जुन्या राजधानींत स्थानभ्रष्ट झालेल्या सर्व्हियन लष्कराची पुन्हां प्राणप्रतिष्ठा केली. हे पराक्रम महत्त्वाचे तर खरेच; पण आस्ट्रो–जर्मन सैन्यांत गडबड उडून रुमानियावरील त्यांची स्वारी ढिली पाडण्याइतकें महत्त्वाचे नव्हत आणि आतां तर हिंवाळ्याचा मोसम पूर्ण सुरू झाल्यामुळें इतर रणभूमींतील विलक्षण फेरफारांच्या योगानें रुमानियन युद्ध मंद होण्याचा फारसा संभव नाहीं. डान्यूब नदी पूर्ण कब्जांत घेणें हें जसें आस्ट्रो–जर्मनांच्या लष्करी धोरणास इष्ट आहे तसेंच साधल्यास सालिनोकाचेंहि बंदर आपल्या ताब्यांत घेऊन तेथून दोस्त सरकारांच्या सैन्यास काढून टाकणें से. हिंडेनबुर्ग यांना जरुरीचें वाटणारें आहे. प्राहोव्हा नदीच्या उत्तरेस रुमानियन सैन्य गेलें म्हणजे खुद्द रशियाच्या युद्धांतच रुमानियन युद्धाचा अंतर्भाव झाला, असें मानण्यास हरकत नाहीं. तेव्हां रशियाचें या बाजूचें युद्ध थंडीच्या मोसमापर्यंत लांबणीवर टाकण्यास आणि अगोदर सालिनोकाकडे वळण्यास आस्ट्रो–जर्मन राजी होण्याचा संभव आहे. पण रुमानियन पीछेहाटीमुळें मिळालेला फायदा पूर्णपणें पदरांत घेण्यास पुढील वसंतकाळची वाट पहाणें हें एका दृष्टीनें सदोष आहे. कारण हिवाळयांत रशिया पुन्हां ताजातवाना होतो व सपाटून रट्टे देऊन आस्ट्रो–जर्मनांचीं हाडें मऊ करतो, असा गेल्या सालचा अनुभव आहे. तेव्हां रशिया ताजातवाना होण्यापूर्वी सर्व डान्यूब नदी गिळंकृत करतां आली तर आली. त्यानंतर नसती हांव धरणें फुकाचें होईल. तेव्हां सालिनोकाकडे न वळतां रुमानियाचाच पक्का पिच्छा पुढील दोन तीन महिन्यांत आस्ट्रो–जर्मन पुरवतील असें अनुमान निघतें. डान्यूब नदीचा लोभ सोडून सालिनोकाच्या बाजूला एकाच गोष्टीमुळें आस्ट्रो–जर्मन सैन्य वळण्याचा संभव आहे. ती

गोष्ट म्हणजे ग्रीसचा राजा कन्स्टांटिनाईन यावर दोस्त सरकारांचें सैन्यानें चाल करून जाणें ही होय. ग्रीसच्या राजानें चोरून जर्मनीला मदत कशी केली आहे, सालिनोका येथील सैन्याला, त्याच्या फसवेगिरीनें पायबंद कसा पडला आहे, वगैरे गोष्टी आतां पूर्णपणें उजेडांत आल्या असल्यामुळें या राजाच्या सैन्याचा विध्वंस करणें दोस्त सरकारांना भाग झालें आहे. आणि डिसेंबरमध्यें दोस्त सरकार व ग्रीसचा राजा यांमध्यें युद्ध सुरू झाल्यावांचून राहाणार नाहीं, असा कांहींचा अंदाज आहे. हें युद्ध जर सुरू झालें तर रुमानियाच्या बाजूचें बरेंच आस्ट्रो–जर्मन सैन्य खालीं दक्षिणेस सालिनोकाच्या बाजूला उतरेल. आस्ट्रो–जर्मन हिवाळ्यांत रुमानियाची पिच्छा पुरवीत असले काय किंवा सालिनोकाच्या बाजूला उतरले काय, दोन्ही रणभूमि दुय्यम दर्जाच्या असल्यामुळें महायुद्धाच्या पुढील सालच्या प्रवाहावर रुमानियांतील किंवा ग्रीसमधील घडामोडींचा फारसा परिणाम होणार नाहीं. नवे सैन्य तयार करणें, नवा दारूगोळा उत्पन्न करणें, या संबंधानें इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी व आस्ट्रिया, येथें जे सांप्रत जोराचे प्रयत्न चालले आहेत त्या प्रयत्नांचा परिणाम पुढील सालच्या महायद्धाच्या स्वरूपावर होणार आहे. रशियांत ड्यूमा सभेला अधिक हक्क मिळाले आहेत आणि ड्यूमा सभेचें महत्त्व कबूल करणारे मुत्सद्दी रशियाचे मुख्य प्रधान झाले आहेत. अर्थात् लढाई जोरानें चालविण्याच्या बाबतींत रशियांतील लोक सरकारशीं एकजीव झाले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. फ्रान्सनें तर महायुद्धांत यश मिळविण्याकरितां सर्व प्रकारचा स्वार्थत्याग करण्याचा विडाच उचलला आहे; रुमामियाच्या पीछेहाटीनें इंग्लंडमध्यें लढाईचें नवें वारें भरलें आहे, आणि आठवड्यांतून दोन दिवस मांसाशिवाय व मांसाशिवाय व्रतस्थ रीतीनें राहून रोजच्या दाणापाण्यांत शक्य ती काटकसर करून सर्व बाजूनीं व सर्व प्रकारांनीं महायुद्धाची तळी उचलण्याचा इंग्लंडनें निश्चयच केला आहे. हा निश्चय पार पाडण्यास एकजिनसी प्रधानमंडळ असावें म्हणून लिबरल व कॉन्झर्व्हेटिव्ह या दोन जिनसांचें प्रधानमण्डळ मोडून मुख्य प्रधान मि. अस्क्विथ यांनींहि आपल्या जागेचा राजीनामा डिसेंबर प्रारंभाला दिला. डिसेंबरांत युद्धाच्या आवेशाचें एकजिनसी व आटोपशीर प्रधानमण्डळ बनल्यावर त्यांतल्या त्यांत दोनतीन तडफदार मुत्सद्यांच्या हातीं महायद्धाचीं सर्व सूत्रें जातील. मग इंग्लंडचा जोर हल्लींहून दुप्पट होईल, हें सांगणें नकोच. इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांच्या नव्या नव्या प्रयत्नांना

उत्तरादाखल म्हणून जर्मनीनेंहि आपली शिकस्त करण्याचा निश्चय केलेला दिसतो. कामकाज करणाऱ्या मजुरांचा तुटवडा पडूं नये म्हणून जर्मनीनें बेल्जममध्यें विसाव्या शतकांत गुलामगिरी सुरू केली आहे, पोलंडचें स्वतंत्र राज्य निर्माण केल्याबद्दलचा जाहीरनामा काढून तेथील लोकांना लष्करी नोकरी करणें भाग पाडण्यांत आलें आहे; तुर्कांना वेठीस धरण्याचा तर सपाटा चालला आहे; आणि आतां रुमानियांतील धान्याचा कणनाकण लुटून नेण्यांत येईल हें उघड आहे. एवंच चिघळल्यामुळें हिडिस दिसणाऱ्या स्वरूपांतहि पुढील सालीं लढाई नेटानें चालविण्याचा जर्मनीचा इरादा दिसतो. इतर कोणत्याहि कारणामुळें नाहीं तरी निदान या हिडीस स्वरूपामुळें युरोपखंडाविषयीं अमेरिकेची दयार्द्र बुद्धि जागी होऊन तह घडवून आणण्याच्या कामीं हिंवाळ्यांत अमेरिकेकडून दीर्घोद्योग होण्याचा संभव आहे. तेव्हां पुढील दोन तीन महिन्यांत रुमानिया व सालिनोका येथील लढायांकडे लक्ष देतांना अमेरिकेंतील लोकमताकडेहि वाचकांनीं लक्ष पोंचवावें अशी सूचना आहे.

---

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा डिसेंबर--जानेवारी महिना

## रुमानियाची रणभूमि

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत रुमानियाची राजधानी बुखारेस्ट शहर जर्मनीच्या हातीं जाऊन उत्तरेस बूझू शहर व बूझू नदी यांच्या रोखानें रुसो–रुमानियन सैन्य मागें हटूं लागले. सर्व डिसेंबर महिना शत्रूशीं निकरानें लढत हें सैन्य मागें हटत होतें. वाटेंत बूझू गांवाजवळ आणि सरत–रिमनीच्या टापूंत मोठ्या लढाया झाल्या. सरत–रमनी येथील लढाई डिसेंबर अखेरीस पांच दिवस चालली होती. या लढाईत जर्मन सैन्याचा फार नाश झाला, पण अखेरीस रुसो रुमानियन सैन्याला मागें हटावें लागलें. जानेवारीचे प्रारंभाला फॉक्चनीच्या पूर्वेस सीरेद नदीचा टापू धरून सीरेद डॅन्यूबला मिळते तेथपर्यंत मोठ्या बंदोबस्तानें रुसो–रुमानियन सैन्य बसलें आहे. सीरेदपर्यंतचा दक्षिण मोल्डेव्हिया जर्मनीच्या ताब्यांत गेल्यासारखा असून सर्व मोल्डेव्हिया कबजांत घेऊन रशियाच्या बेसारेबिया प्रांतांत घुसण्याकरितां सर्व ेल्डेव्हियाभर उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत जर्मनीची एकसारखी खटपट सुरू आहे. मोल्डेव्हियांतल्या लढाया म्हणजे नुसत्या रुमानियन सैन्याबरोबर होत असलेल्या लढाया नसून दक्षिणेकडील रशियाच्या मुख्य सैन्याशींच ही झुंज आहे. तेव्हां जानेवारींत जर्मनीचें पाऊल फारसें पुढें पडणार नाहीं. मोल्डेव्हियांतील या लढाया एका बाजूस ठेवल्या तर डिसेंबर महिना प्रत्यक्ष लढण्याच्या दृष्टीनें मंदीचाच गेला. मोल्डेव्हियाकडे रशियाला मोठें सैन्य आणतां येऊं नये म्हणून कोव्हेलच्या टापूंत व गॅलेशियामध्यें जर्मनीनें थोडीशी उचल करण्याचा प्रयत्न केला; त्याप्रमाणें फ्रान्सच्या रणभूमींत व इटलीच्या रणभूमींतहि लहान सहान चकमकी झाल्या. पण एकंदरीनें डिसेंबर महिन्यांत चोहोंकडे सामसूमच होतें. बुखारेस्ट शहर पडल्यानंतर युद्धावार्तेंत जीवच नाहींसा झाला. लढण्यासंबंधाच्या बातम्या निर्जीव व मिळमिळीत येऊं लागल्या आणि खुद्द युद्धाशिवाय इतर गोष्टीला महत्व प्राप्त झालें.

रशियांतल्या मुख्य प्रधानांनीं राजीनामा देऊन नवें प्रधानमंडळ अस्तित्वांत आलें; फ्रान्समध्यें प्रधानमंडळांत फेरबदल झाला; आणि इंग्लंडांत मि. ॲस्क्विथ यांचें प्रधानमंडळ बदलून मि. लॉइड जॉर्ज हे मुख्य प्रधान झाले. मि. ॲस्क्विथ यांचे

कारकीर्दीत प्रधानमंडळ पंधरा वीस असामींचें होतें; पण महायुद्धासारख्या बिकट प्रसंगीं वीस पंचवीस असामींच्या घोळक्यानें राज्यशकट तडफेनें हाकला जाणें शक्य नसल्यानें मि. लॉइड जॉर्ज यानीं आपलें प्रधानमंडळ पांच इसमाचें केलें, आणि तीव्र नेटानें कामकाजाचा बंदोबस्त करण्याचा निश्चय केला. प्रधान–मंडळ पांच इसमाचें असलें तरी सांप्रत इंग्लंडांत खरी राज्यसत्ता तिघांच्याच हातांत आहे. मि. लॉईड जॉर्ज, मि. बोनॉर्लॉ, व मि. बालफर्ड या त्रीमूर्तींचेंच सांप्रत प्रधानमंडळ आहे, असें म्हटलें तरी हरकत नाहीं. मि. बोनॉर्लॉ यांची दृष्टि आर-मारावर आहे. मि. बालफर्ड यांचें तोंड परराष्ट्रांकडे वळलेलें आहे; व मि. लॉइड जॉर्ज यांनीं हातांत तलवार धरली आहे. अशा प्रकारचें त्या त्रिमूर्तींचें दर्शन आहे. आरमार खात्याचें व परराष्ट्रीय खात्याचें काम महत्वाचें खरें; पण सध्यां जमिनीवर कसा जय मिळवावा हा मुख्य प्रश्न असल्यामुळें मि. लॉइड जॉर्ज यांच्या हातां-तील तलवारीनें सर्वांचें लक्ष आकर्षण करून घेतलें आहे. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे एकट्या लॉइड जॉर्ज यांचे ठिकाणीं इंग्लंडची सर्व सत्ता एकवटली आहे. मि. लॉइड जॉर्ज म्हणजेच प्रधानमंडळ; मि. लॉइड जॉर्ज म्हणजेज इंग्लंडचें पार्ले-मेंट; मि. लॉइड जॉर्ज म्हणजे इंग्लंडची सर्व राज्यसत्ता ! महायुद्धाच्या बिकट प्रसंगां-तून पार पडून जाण्याकरतां इंग्लंडनें पार्लमेंटरी राज्यव्यवस्था एका बाजूला ठेवून एकमुखी राज्यव्यवस्था पुष्कळ पडद्यांच्या पांघरुणाखालीं स्वतःहि नकळत सुरू केली आहे, असें एका दृष्टीनें म्हणण्यास हरकत नाहीं. बिकट प्रसंगीं असेंच करावें लागतें, किंबहुना प्रसंगामुळेंच तसें घडून येतें. मनुष्याच्या बुद्धिमत्तेनें बहुमुखी राजसत्तेचा परिपोष करावा आणि महायुद्धासारख्या बिकट प्रसंगीं याच बहुमुखी राज्यव्यवस्थेंतून एकमुखी राज्यव्यवस्था उत्पन्न करावी, अशी ही जगाची घडामोड आहे. ग्रीसच्या व रोमच्या प्राचीन इतिहासांत असल्या घडामोडींचीं बरीच उदा-हरणें आहेत. देव करो आणि इंग्लंडचें सांप्रतचें वर्तन तसल्या घडामोडीच्या उदाहरणांच्या मालिकेंत गोवलें न जावो ! असो. मि. लॉइड जॉर्ज यांचें तीनमुखी किंवा पंचमुखी प्रधानमंडळ स्थापित होण्याला आणि बुखारेस्ट पडण्याला एकच गांठ पडली. बुखारेस्ट पडल्याबरोबर जर्मनीनें आपलें पार्लमेंट अव-चित बोलाविलें आणि जर्मनीच्या मुख्य प्रधानानें जाहीर केलें कीं, रणांगणावर होत असलेल्या युरोपच्या चुराड्याकडे जर्मन बादशहा रुमानियावर मिळविलेल्या विजयाच्या

प्रसंगीं दयार्द्र दृष्टीने पहात असून, ह्यापुढें लढाई चालू ठेवणें म्हणजे जनतेच्या दृष्टीनें व परमेश्वरी सिंहासनापुढें जर्मन राष्ट्र अपराधी ठरेल असें त्यांस वाटूं लागलें आहे.

## जर्मनीचा सलोख्याचा हात

तेव्हां जर्मनीच्या स्नेही राष्ट्रांचा सल्ला घेऊन जर्मनीनें सलोख्याचा हात अमेरिकेचे प्रे. डॉ. विलसन यांचेमार्फत पुढें केला आहे. नाटकामध्यें एखादा खटक्याचा प्रवेश अवचित प्रेक्षकांपुढें आल्यामुळें जसा अद्भूत रस उत्पन्न होतो, त्याप्रमाणें महायुद्धाचे पुढील तयारीकरितां सर्व राष्ट्रें आपापल्या कंबरा जोरजोरानें कसत असतांना जर्मनीनें एकाएकीं हा सलोख्याचा हात पुढें केल्यामुळें सर्वांना एकदम विस्मय वाटला, आणि लढाईच्या गोष्टी सोडून देऊन सर्व लोक तहाच्याच गोष्टी बोलूं लागले. तहाला आपण राजी असल्याबद्दलचा खलिता जर्मनीनें प्रे. विलसन यांजकडे पाठवून दिला, व प्रे. विलसन यांनीं तो दोस्त सरकारकडे पाठविला. जर्मनीच्या तहाची बातमी दोस्त सरकारचे राजधानींत पोंचतांच ठिकठिकाणच्या जबाबदार मुत्सद्यानीं त्या तहाचा निषेध केला. प्रथम आपला विजय पुकारून नंतर जयोत्साहाचे मदांत जर्मनीनें पुढें केलेला सलोख्याचा हात धरणें म्हणजे आपला पराभव कबूल करणें होय, तेव्हां असला अपमानास्पद तह कोण कबूल करतो, असा एकच ध्वनी रशिया, इटली, फ्रान्स व इंग्लंड या चारी देशांत एकसमयावच्छेदेंकरून एकूं येऊं लागला! स्वतःच्या देशांत शत्रू असेतों व रुमानिया आणि सर्व्हिया यांचें स्वातंत्र्य पूर्ववत मुक्रर ठरेतों आपण तह करणार नाहीं असें रशियानें जाहीर केलें; कोणच्याहि कारणानें आपण आपल्या दोस्तांना सोडणार नाहीं असें इटलीनें आश्वासन दिलें; फ्रान्समधून शत्रूला हाकलून देऊन बेल्जमला सुसंपन्न स्थितींत पुन्हां पाहिल्याशिवाय तरवार म्यानांत घालणार नाहीं असा निश्चय फ्रान्सनें केला; आणि इंग्लंडचे नवे मुख्यप्रधान मि. लाइड जॉर्ज यांनीं पार्लमेंटातील आपल्या पहिल्या भाषणांत असें ठासून सांगितलें कीं, जर्मनीला कृतकृत्याबद्दल पश्चात्ताप झाला पाहिजे, पुन्हां असा अपराध जर्मनीच्या हातून होणार नाहीं, अशी हमी जर्मनीनें पटविली पाहिजे तरच तह होईल ! लष्करी धंदा करणारें इंग्लंडचें जुनें सैन्य नष्ट झाल्यावर इंग्लंडनें बहुजन समजांतून नवें राष्ट्रीय सैन्य उभारलें, नव्या तोफा ओतल्या आणि नवा दारूगोळा निर्माण करून एकदां नव्हे, दोनदां नव्हे, तीनदां नव्हे, तर कित्येक आठवड्यांच्या आठवडे जर्मनीला एकसारखा चोप दिला ! आपल्या अंगच्या शक्तीचा असा अनुभव इंग्लंडला

येत असतांना ही शक्ति वर्ष दोन वर्षे आणखी एकसारखी वाढत जाणारें असतांना, आणि सर्व राष्ट्राचें मनुष्यबळ व द्रव्यबल लागेल तसें व लागेल तितकें खर्च करण्याची मुभा देऊन नवीन जोरकस प्रधानमंडळ इंग्लंडनें स्थानापन्न केलें असतांना, जर्मनीचा विजय कबूल करून आणि जर्मनीचें लष्करी यंत्र तोऱ्यांत ठेवून इंग्लंडनें तह कसा करावा ? लहान राष्ट्रांचा वाली आणि माणुसकीचा पोशिंदा या इंग्लंडच्या ख्यातीला असल्या तहानें काळिमा लागणार नाहीं काय ? मि. लाईड जॉर्ज, मि. ॲस्क्विथ, मि. बोनार्लॉ, लॉर्ड कर्झन आदि करून सर्व नव्या जुन्या मुत्सद्यांनीं जर्मनीच्या तहाची वरीलप्रमाणें संभावना केली.

## अमेरिकेची भूमिका

जर्मनीचें तहाचें बोलणें मानभावीपणाचें ठरून तहासंबंधाच्या कल्पना लोकांपुढें वावरण्याचें बंद पडतें कीं काय असें वाटूं लागणार इतक्यांत प्रे. विल्सन हे तहाचे पुरस्कर्ते म्हणून पुढें आले; आणि त्यांनीं दोन्ही पक्षांना तहासंबंधानें एक खलिता पाठविला. जगाचें कल्याण करावें, माणुसकीची जोपासना करावी, दुर्बलांचा आयुष्य-क्रम दुःखाचा होणार नाहीं अशारीतीनें सबलांनी वागून परमेश्वराचा दुवा संपादन करावा, आणि आपल्या राष्ट्राची योग्य वाढ करून मानवी प्राण्याचें हित साधण्याकड ठिकठिकाणच्या राज्यकर्त्यांनीं लक्ष पोंचवावें, हे नीतिमत्तेचे हेतु दोन्ही पक्ष सारख्या जोरानें वदत आले आहेत. तेव्हां प्रे. विल्सन विचारतात ' महायुद्धांतील उच्च ध्येयें जर दोघांची सारखींच तर तुम्ही लढतां तरी कशासाठीं ? ' इंग्लंड म्हणतें मी लहान राष्ट्रांचा वाली, जर्मनी म्हणतो मला लहान राष्ट्रांच्या वाटेस जावयाचें नाहीं. इंग्लंड युरोपच्या सुधारणेला पूज्य मानत आहे तर जर्मनी पावलोपावलीं ख्रिस्ती देवाला हाक मारीत आहे. आपलें साम्राज्य सांभाळण्यापलीकडे इंग्लंडला लोभ नाहीं, आणि जर्मनीला तर दुसऱ्याच्या काडीला हात न लावतां मोकळ्या पडलेल्या जागेपुरतीच आपली वाढ करून स्वतःच्या देशांत कुचमलेल्या स्वतःच्या शक्तीला हलकेपणाच्या यातनांतून सोडवावयाचें आहे. प्रे. विल्सन म्हणतात, दोघांचीहि ध्येयें जर एकमेकांच्या विरुद्ध नाहींत तर तुम्ही एकमेकांची डोकीं फोडतां तरी कशाला ? मूढपणानें तुम्ही एकमेकांची डोकीं फोडीत असलां तर त्यांत तिऱ्हाइतानें कां पडावें, असें जर कोणी म्हणेल त्याला प्रे. विल्सन असें उत्तर देतात कीं, युरोपच्या सुधारणेची चाड युरोपप्रमाणें अमेरिकेलाहि आहे, माणुसकीच्या जोपासनसाठीं परमेश्वरापुढें जाब युरोपप्रमाणें अमेरिकेलाहि दिला पाहिजे, आणि

लहान सहान राष्ट्रांचें संरक्षण योग्य रीतीनें होतें कीं नाहीं हे पाहाण्याचें काम नुसत्या युरोपवर सोपवून भागावयाचें नाहीं. दुर्बलांचा कैवार, माणुसकीची उभारणी आणि परमेश्वरी संतोष या तिन्ही गोष्टी महायुद्धांतील लढवय्यांना जितक्या प्रिय आहेत तितक्याच प्रिय अमेरिकलाहि आहेत. महायुद्ध पुढें चालू राहिल्यास जर उच्च ध्येयें खुरटी होऊं लागलीं तर अमेरिकेला इतर कारणासाठीं नाहीं तर निदान त्या ध्येयांच्या आस्तित्वाकरितां लढवय्यांच्यामध्यें मध्यस्थ म्हणून उभें राहाणें भाग आहे. उच्च ध्येयांची बाब एका बाजूस ठेवली तरी केवळ स्वार्थाकरतां सुद्धां हा तंटा मिटविण्याचा प्रयत्न करणें अमेरिकेस इष्ट आहे. ह्याचें कारण प्रे. विलसन असें सांगतात कीं, युरोपांतील महायुद्धाचा वणवा आतां असल्या तऱ्हेनें पेटला आहे कीं त्याच्या ठिणग्या अमेरिकेवर पडल्यावांचून राहावयाच्या नाहींत. अमेरिकेला आग लागण्यापूर्वीच स्वतःचें घर बचावण्याकरतां अमेरिकेनें युरोपांतील आग विझविली पाहिजे. वरील आशयाचा खलिता तयार करून प्रे. विलसन यांनीं कांहीं तडजोड निघते कीं नाही हें पहाण्याकरतां दोन्ही पक्षांचे वकील आपणांकडे पाठवून देण्याविषयीं लढाईंत गुंतलेल्या सर्व राष्ट्रांना विनंति केली. आज युरोपची अशी स्थिति आहे कीं, अमेरिकेच्या सयुक्तिक विनंतीचा अव्हेर करून कोणाचेंच चालावयाचें नाहीं. जर्मनीनें अमेरिकेशीं बेपर्वाईचें व उद्धटपणाचें वर्तन केलें तर केवळ व्यापारी दृष्टीनें नव्हे तर सरकारी दृष्टीनेंहि अमेरिकेची मदत दोस्त सरकारना होऊं लागेल. अमेरिका लढाईंत न पडतांहि जर सर्व द्रव्यबल व बुद्धिबल खर्च करून दोस्त सरकारांना मदत करूं लागली तर एखाद दुसऱ्या वर्षाहून अधिक आयुष्य जर्मनीचें उरलें नाहीं असें समजावें. बरें अमेरिकेच्या विवेकबुद्धीला जर दोस्त सरकारनीं दूर लोटलें तर द्रव्यबलानें व यंत्रबलानें दोस्त सरकारचें पारडें किंचित् हलकें ठरून अखेरच्या विजयाबद्दलची खात्री अंशतः तरी डळमळूं लागल्यावांचून राहाणार नाहीं. अमेरिकेची कृपादृष्टि ज्या पक्षाकडे वळेल तो पक्ष अखेरीस विजयी होणार, असली स्थिति अमेरिकेस सांप्रत प्राप्त झाली आहे. अमेरिकेच्या या महत्त्वामुळें आणि प्रे. विलसन यांच्या निःपक्षपाती सरलत्वामुळें तहासंबंधाची नुसती वाटाघाट करण्यास नाकबूल होण्याचें धाडस कोणीहि करूं शकणार नाहीं. जर्मनीनें आपल्या तहाच्या अटी प्रथम बोलण्यास सुरवात करावी म्हणजे वाटाघाटींच्या वेळीं हजर

राहाण्यास ठीक पडेल अशी टीका प्रे. विलसन यांच्या विनंति–पत्रावर होऊं लागली. आपल्या अटी प्रे. विल्सन यांस कळविण्यास जर्मनी तयार झाला असल्याचें जानेवारी प्रारंभाला प्रसिद्ध झालें आहे. मध्यस्थ या नात्यानें या अटी दोस्त सरकारां-पुढें मांडणें नुकसानीचें होणार नाहीं इतक्या बेताचेंच जर्मनीचें मागणें आहे असें जर प्रे. विलसन यांना वाटलें तर फेब्रुवारी महिन्यांत तहाच्या नुसत्या वाटाघाटीची सभा अमेरिकेंत भरेल आणि प्रे. विलसन यांच्या मध्यस्थीनें कांहीं तडजोड निघून एप्रिल मे महिन्याचे आंत तह होऊन महायुद्धाची परिसमाप्ति होईल. पण प्रे. विलसनसारख्याहि मध्यस्थाला मध्यस्थीची मखलाशी करतां येणार नाहीं अशा स्वरूपाच्या जर जर्मनीच्या अटी असतील तर जानेवारींतच जर्मनीचा सलो-ख्याचा हात नवीन तयारीच्या धुमःश्चक्रींत पुरला जाईल.

## सारासार विचार

प्रे. विल्सनसारख्या मध्यस्थाला मध्यस्थी करण्यास कांहीं हरकत नाहीं असें वाटण्या-जोग्या जर जर्मनीच्या अटी असतील तर जर्मनीचा पराभव करून जर्मनीचें लष्करी यंत्र मोडण्यापूर्वी दोस्त सरकार तहावर सह्या करतील काय ? ह्या प्रश्नाचा विचार दोन्ही दृष्टीनें केला पाहिजे, एक दृष्टि इभ्रतीची व दुसरी नफानुकसानीची. या दोन्ही दृष्टी जरी परस्पराशीं नेहमीं संलग्न असल्या तरी व्यवहारांत कांहीं अंतराग्वेत यांच्यातील भेद स्पष्ट दिसू लागतो. नफानुकसानीचे पोटींच इभ्रत जन्मास येते आणि इभ्रती-मुळेंच नफानुकसानीला टिकाऊ स्वरूप प्राप्त होतें, या गोष्टी खऱ्या आहेत. तथापि इभ्रत व नफानुकसान अशा दोन दिशांनीं विचार करण्यास हरकत नाहीं. प्रथम आपण नफानुकसानीच्या दृष्टीनें विचार करूं. नफानुकसानीचा विचार करतांना रशिया, इंग्लंड, फ्रान्स व इटली यांचा पृथक पृथक व सर्व संयुक्त असा विचार केला पाहिजे. आपण अशी कल्पना करूं कीं, फ्रान्स व जर्मनी या दोघांनाहि प्रे. विल्सन यांची मध्यस्थी कबूल झाली, तर प्रे. विलसन आज फ्रान्सला सामान्यतः काय सांगतील, व तें फ्रान्सला कितपत रुचेल ? लढाई सुरू झाल्यानंतर जर्मनीनें घेतलेला फ्रान्सचा मुलूख सोडून द्यावा, व बेल्जमची सर्व सत्ता पुन्हां बेल्जमच्या हवालीं करावी; ह्या अटीस जर्मनी जर कबूल झाला आणि प्रे. विलसन यांनीं निःपक्षपाती न्यायाधिशाचा छाप जर या अटीवर मारला, तर फ्रान्स काय म्हणेल ? लढाइतील नुकसानी दोन्ही पक्षानीं आपआपली संभाळावी असें ठरल्यावर फ्रान्सच्या भावी अभ्युदयाच्या दृष्टीनें पृथक स्थितींत विचार करतांना असल्या

तहावर सही करण्यास फ्रान्सला कोणतीच हरकत नाहीं. जर्मनीचें लष्करी यंत्र कायम ठेवल्यामुळें पुढें आपणास अधिक त्रास होईल अशीहि भीति फ्रान्सला बाळगण्याचे कारण नाहीं. १८७० सालच्या फ्रॉंको–जर्मन युद्धापेक्षां सांप्रतच्या महायुद्धांत फ्रान्सनें किती तरी पटीने अधिक मोठें लष्करी यश संपादन केलें आहे; व्हर्डूनच्या लढाईनें स्वसंरक्षणाचा आत्मविश्वास फ्रान्समध्यें उत्पन्न झाला आहे; आणि चरांच्या चक्रव्यूहांची योजना आतां इतक्या परिणत स्थितीस पोचली आहे कीं, रशिया व इंग्लंडसारख्या एखाद्या स्नेह्याचें पाठबळ मिळाल्यावर आस्ट्रो–जर्मनांना पुढील युद्धांत फ्रान्सच्या सरहद्दीबाहेर अडवून धरण्यास कोणतीच हरकत येणारी नाहीं. पूर्वी अल्पसंख्याक देशांचें संरक्षण किल्ले करीत असत, आतां यापुढें चरांचें चक्रव्यूह तें काम करणार. चरांच्या चक्रव्यूहांनीं राष्ट्रीय संरक्षणाचें काम पूर्वीहून अधिक सुलभ केलें आहे. ही पालटलेली स्थिति लक्षांत घेतां फ्रान्सला १८७० सालानंतर जर्मनीचा जो बाऊ वाटत होता तो बाऊ सांप्रतच्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर वाटणें शक्य नाहीं. जर्मनीचें लष्करी यंत्र मोडल्याशिवाय जर तह केला तर आजच्या सारखीच दांडगाई पुन्हां जर्मनीनें करूं नये ह्याची हमी कोण घेणार ? ह्या प्रश्नास उत्तर असें आहे कीं, ही हमी चरांच्या चकव्यूहानीं घेतली आहे, ही हमी व्हर्डूनच्या लढाईंत फ्रान्सनें दाखविलेल्या शौर्यानें घेतली आहे; ही हमी फ्रान्सच्या एकजुटीच्या स्वार्थत्यागानें घेतली आहे. हमीची शक्ति फ्रान्सच्या खाकेंतच असतांना हमी म्हणून जर्मनीच्या सभोंवती वळसे घालीत फिरण्यांत व्यर्थ कालक्षेप कोण करणार ? फ्रान्सच्या दृष्टीनें पृथक जर विचार केला तर प्रे. विलसनसारख्या शांत व विचारी त्रयस्थाच्या बोलण्यास संमति न देण्याचें कारण सामान्यतः फ्रान्सला रहात नाहीं. आतां रशिया संबंधाचा विचार करूं. रशियानें कोणच्या अटीवर तह करावा या संबंधाचें जर्मनीतर्फेंचें दिग्दर्शन सामान्यतः येणेप्रमाणें आहे.—पोलंडचें स्वतंत्र राज्य आपल्या पंखाखालीं जर्मनीनें निर्माण केलें आहे, तें रशियानें मान्य करावें. रशियाच्या मनांतून पोलंडचें स्वतंत्र राज्य निर्माण करावयाचें होतें, पण स्वतःच्या पंखाखालीं निर्माण करावयाचे होतें. तेव्हां या संबंधानें पंख कुणाचें म्हणून लढा पडणार. इतर अटींची जर तोंडमिळवणी करतां आली तर पोलंडमध्यें जर्मनीची व रशियाची दोन्ही पंखे कमी जास्ती प्रमाणानें प्रे. विल्सन यांना मिळवतां येतील.

तेव्हां ही बाब मध्यस्थांच्या आटोक्याबाहेर आहे, असें म्हणतां येत नाहीं. नंतर आला बाल्कन प्रदेश व टर्की या संबंधाचा प्रश्न. महायुद्धांतील मुख्य तंट्याची मेख येथेंच आहे. बाल्कन प्रदेशावर व टर्कीवर आपली छाप असावी अशी रशियाच्या राज्यकर्त्यांची दोनशें वर्षांची महत्वाकांक्षा आहे. ह्या महत्वाकांक्षेस तिलांजली देण्यास रशिया तयार होईल काय ? जर्मनी म्हणणार बाल्कन प्रदेश मीं माझ्या पंज्यांत धरला आहे, आणि तुर्कस्थानाशीं संलग्न झालों आहों. तेव्हां महायुद्धांतील हा 'अपरिहार्य अर्थ' म्हणून निष्कारण शोक न करतां रशियानें पुढल्या मार्गास कां लागूं नये ? रशियास आम्ही इराण देतो, तेथून त्यांनीं दक्षिण समुद्र गाठून आपल्या अंतस्थ उन्नतीचा मार्ग कां आक्रमूं नये ? इस्तंबूलच्या मार्गानें रशियाचा व्यापार पूर्वीप्रमाणें खुलाच रहाणार. मग रशियाचें कोठें नुकसान आहे ? रुमानिया, सर्व्हिया, माउंटनिग्रो वगैरे छोटेखानी राष्ट्रांचीं गेल्या दहापंधरा वर्षांत वाढलेली पंखें तेवढी उपटण्यांत येणार, पण तेथील जनता अंतस्थ स्वातंत्र्य उपभोगून स्वतःचें हित साधीत असतां तिच्या मार्गांत जर्मनी थोडाच आडवा पडणार आहे ? बाल्कन प्रदेशावर व तुर्कस्थानवर आपली छाया पसरण्याचा उद्योग रशियानें गेल्या शंभर वर्षांत दोन तीनदां केला नाहीं काय ? हा उद्योग रशियास दोन तीनदां सोडून द्यावा लागला ना ? हा उद्योग सोडून दिल्यानंतर रशियाची भरभराट झाली आहे ना ? आज तिसऱ्यांदा किंवा चवथ्यादां पुन्हां हा उद्योग सोडून द्यावा लागला म्हणून रशियाच्या भरभराटीस कोठें अडथळा येणार आहे ? रशियाची तुर्कस्थानासंबंधाची महत्वाकांक्षा हृदयीं बाळगणारे रशियांतील बरेच लोक ह्या महायुद्धांत अंशतः नालायक ठरले आहेत; आणि परराष्ट्रीय वैभवानें रशियाची खरी उन्नति होणार नसून अंतस्थ सुधारणेनें रशिया अत्यंत प्रबळ होणार आहे, असें मानणारा मध्यम वर्ग महायुद्धामुळें आस्ते आस्ते अधिकार संपन्न होऊं लागला आहे. या मध्यम वर्गाला फाजील वर चढवूं न देण्याकरितां राज्यकर्त्यांच्या वरच्या लोकांपैकीं एक पक्ष आपल्या हृदयांतील महत्वाकांक्षा हृदयांतच कोंडून ठेवण्यास राजी होण्याचा संभव आहे. महत्वाकांक्षेची इज्जत न समजणारा एक पक्ष रशियांत आहे, व या महत्वाकांक्षेकरितां आणखी दोन तीन वर्षेंहि महायुद्ध चालू ठेवण्याचा हट्ट धरणारा हा दुसरा प्रबळ पक्ष रशियांत आहे. ह्यावेळीं रशियन प्रधानमंडळांत एकसारखा फेरबदल होत राहिला आहे आणि

रुमानियाची पिछेहाट जर रशियाच्या डाव्या बगलेच्या पिच्छेहाटीस से. हिंडेनबुर्ग म्हणतात त्याप्रमाणें महिना दीड महिन्यांत कारणीभूत झाली तर रशियांतील महत्वाकांक्षी पक्ष वरचढ राहाणें शक्य नाहीं. रशियानें जर तुर्कस्थानसंबंधाची महत्वाकांक्षा सोडली तर प्रे. विलसन यांच्या मध्यस्थीस इंग्लंडला कबुली देण्यास कोणतीच मानहानि नाहीं. या महायुद्धांत इंग्लंडचा एक केसहि वाकडा होण्याचा संभव नाहीं. तुर्की साम्राज्य जर्मनीच्या छायेखालीं गेल्यामुळें इजिप्त व हिंदुस्तान येथील इंग्रजी सत्तेस जर्मनी मागें धक्का मारील, असला बागुलबोवा कांहींनीं उभा केला आहे. पण थोडासा विचार केला असतां ह्या भीतींतहि कांहीं तथ्यांश नाहीं, असें दिसून येईल. इग्लंड आतां पूर्वीप्रमाणें व्यापारी सुखवस्तूंचें राष्ट्र नसून लढवय्याचें साम्राज्य बनलें आहे, आणि ह्या साम्राज्याची लष्करी शक्ति जर्मनीच्या बरोबरीची किंबहुना कांकणभर ज्यास्तच आहे. इंग्लंडनें लष्करी यंत्र स्वतःचें बनवलें नव्हतें त्या वेळीं जर्मनीच्या लष्करी यंत्राचा बाऊ ! पण आतां काय ? 'डर तो पिछे रही'. जर्मनीनें पाहिजे तर इंग्लंडच्या लष्करी यंत्राला भ्यावें; इंग्लंडचे भिण्याचे दिवस मागें गेले. युरोपमध्यें व इजिप्तमध्यें इंग्लंड, फ्रान्स व रशिया ह्या त्रिकुटीला आस्ट्रो–जर्मनांना भिण्याचें कांहींच कारण नाहीं. चरांचे चक्रव्यूह आणि इंग्लंडची लष्करी नवी बनावट यांनीं महा-युद्धाच्या पूर्वीपेक्षां अधिक सुलभतेनें युरोपांतील राजकीय उलाढालींचें प्रश्न आज सोडवून टाकलेले आहेत. येऊन जाऊन भीति कायती जर्मनीच्या पंखाखालील तुर्कांचें लष्करी यंत्र इराणमार्फत हिंदुस्थानास त्रास देईल एवढीच. पण ह्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. कारण इराणांत रशियाचा बांध पडणारा असून जर्मनीला तेवढे तुर्कांचें लष्करी यंत्र बनवतां येतें आणि इंग्लंडला हिंदुस्थानचें लष्करी यंत्र बनवतां येत नाहीं, असें थोडेंच आहे ? जर्मनीनें तुर्की यंत्र बनवलें, तर इंग्लंड हिंदी यंत्र बनवील. ह्या ठिकाणीं असा प्रश्न उपस्थित होतो कीं, इंग्लंड फ्रान्स व रशिया या तीन साम्राज्यांची लष्करी शक्ति जर एवढी मोठी आहे तर जमनीच्या तोंडावरचाहि विजयाचा रंग उतरेपर्यंत यानीं तह कां करावा ? १९१७ सालीं जर्मनीच्या तोंडावरील विजयाचा तांबडा रंग काढून तेथें आपण काळा रंग फासूं असा इंग्लंडला आज पक्का भरंवसा वाटत आहे. मग यदा कदाचित् रशिया डळमळूं लागला तर त्यास सावरून धरून प्रसंग पडल्यास आणखी दोन तीन वर्षें

नगर वाचनालय, सातारा



इंग्लंडनें कां लढूं नये ? प्रे. विल्सन यांच्या मध्यस्थीस अशा स्थितींत कोठें वाव मिळणार आहे ? एका जागीं कायती मध्यस्थाला सवड आहे. ही सवड म्हणजे इंग्लंड फ्रान्स जर्मनी किंवा रशिया सर्व ठिकाणीं आतां लष्करी धंद्याचे व परंपरेचे पुढारी कमी कमी होत चालले असून राष्ट्रीय लष्कराचे राष्ट्रीय पुढारी पुढें येत चालले आहेत. असल्या लष्कराला स्वदेशावरील आपत्ति तेवढी समजते; पण महत्वाकांक्षेचे वळसे राष्ट्रीय लष्कराला बाधू शकत नाहींत. आणखी दोन तीन वर्षें जर महायुद्ध चालू राहिलें तर स्वकीयांना वेठीला धरणें, जरा दूर असलेल्यांच्या गळ्यांत गुलामगिरी बांधणें, स्वदेशांत परधर्माच्या व भिन्न रंगाच्या लोकांना कामकाजाकरतां राहूं देणें, तरुणांचा आपत्तींत नाश झाल्यामुळें बहुभार्यांची रूढी सुरू करणें, द्रव्यनाशामुळें पुढेंमागें अमेरिकेची व जपानची सावकारी डोक्यावर घेऊन उद्योगधंद्यांत त्यांची कुळें होऊन बसणें, वगैरे एकना दोन कित्येक आधिव्याधी युरोपच्या मागें लागणार आहेत. ह्या आधिव्याधी दोन तीन वर्षांनंतर मिळविलेल्या विजयासहि हीडिस स्वरूप देणाऱ्या असल्यामुळें रशिया जर थोडासा डळमळीत झाला तर प्रे. विल्सन यांच्या मध्यस्थीस बरीच वाव आजच मिळण्याचा संभव आहे. अशा स्थितींत जानेवारी–फेब्रुवारी महिन्यांत अमेरिकेंतील तहाच्या वाटाघाटीकडे व मोल्डेव्हियांतील लढायांकडे सर्वांचें लक्ष लागणार हें उघड आहे.

पहिले महायुद्ध
खाडिलकर कृ. प्र.

---

नगर वाचनालय सातारा
क्र. ९९८
८८५७०
इति. ६८
कि. १=५०

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा जानेवारी-फेब्रुवारी महिना

## जर्मन पाणबुडयांचा प्लेग

जानेवारी महिन्याचे अखेरीस व फेब्रुवारीचे प्रारंभी युरोप खंडांत फारच थंडी पडली, व त्यामुळें युद्धकथेस लिथिलता आली. जानेवारीच्या पहिल्या पंधरवडयांत जर्मनीनें बेला व फाक्सनी हीं गावें घेतलीं आणि सिरेत नदीचा चाळीस पन्नास मैल लांबीचा मुलूख कबजांत घेऊन, सीरेंतची तटबंदी म्हणून ज्याला म्हणतात तो मुलूख कबजांत घेऊन जर्मनीनें चर खणण्यास आरंभ केला. रशियाशीं युद्धप्रसंग आल्यास सीरेंतच्या तटबंदीच्या जागीं रशियास थोपवून धरतां यावें म्हणून जर्मनीच्या सल्लयानें व जर्मनीच्या मदतीनें वर्ष दोन वर्षांपूर्वी रुमानियानेंच हा प्रांत मजबुतीचा करून ठेवला होता. ही मजबुतीची पट्टी ताब्यांत येतांच सेनापति मॅकेनसन यांच्या सैन्यानें तेथेंच तळ दिला व मागें हटणाऱ्या रूसो-रुमानियन सैन्याचा पाठलाग करण्याचें सोडून दिलें. सर्व डोब्रुजा प्रांत ताब्यांत आला असतां, व डान्यूब नदीचीं मुखें अर्धवट मोकळीं झालीं असतां रशियाच्या बेसारेबिया प्रांतांत सैन्य उतरवून रूसो-रुमानियन सैन्याला गुंडाळून टाकण्याची सेनापति हिंडेनबर्ग यांची दर्पोक्ती खरी करून दाखविण्याचा प्रयत्न जर्मन सेनेनें कां सोडला? याच सुमारास जर्मनीच्या मदतीच्या आशेनें उद्दाम झालेला ग्रीसचा राजा दोस्त सरकारांपुढें कां लवला? जानेवारीच्या तिसऱ्या व चवथ्या आठवडयांत आस्ट्रो-जर्मन सैन्य रुमानियाची रणभूमि सोडून दुसरीकडे कोठेंतरी नेण्यांत येत आहे अशा बातम्या आल्या. स्वित्झर्लंडच्या व हॉलंडच्या सरहद्दीवर भलें मोठें ऑस्ट्रो-जर्मन सैन्य जमा होत असून हॉलंडची किंवा स्वित्झर्लंडची तटस्थवृत्ति जबरदस्तीनें मोडून तेथें धुमाकूळ घालून ते देश बेल्जमप्रमाणें पादाक्रांत करण्याचा मदोन्मत्त जर्मनीचा हेतु आहे असें कांहींनीं अनुमान काढलें. दुसऱ्यांनीं असा तर्क बांधला कीं, हॉलंड व स्वित्झर्लंड यांची तटस्थवृत्ती मोडण्याचा हा उद्योग नसून येत्या वसंत काळांत सोम नदीच्या कांठीं आपल्या परिणत झालेल्या जंगी हल्लयास ज्यावेळीं अँग्लो-फ्रेंच सेना सुरवात करतील, त्यावेळीं फ्रेंचांच्या उजव्या बगलेवर व इंग्रजांच्या डाव्या बगलेवर, दोन्ही टोकांवर अवचित हल्ले करतां यावे, म्हणून सेनापति हिंडेनबुर्ग यांची ही आगाऊ तरतूद होय. जानेवारीच्या अखेरीस रुमा-

नियन व बाल्कन युद्ध शिथिल पडलें; इतकेंच नव्हे तर पश्चिम रणभूमींत फ्रान्सच्या व बेल्जमच्या बाजूला आणि पूर्व रणभूमींत उत्तर व मध्य रशियाच्या बाजूला ठिकठिकाणीं लहानसहान हल्ले करून रशियाच्या सैन्याचा व अँग्लो–फ्रेंच सैन्याचा मोठा जमाव कोठें आहे याची चांचणी घेण्यास जर्मनीनें सुरवात केली. या सर्व चिन्हांवरून जानेवारी अखेरीस असें स्पष्ट झालें आहे कीं, मे–जून महिन्यांत दोस्त–सरकारांची पूर्ण तयारी होऊन त्यांचा वाफेचा रूळ फिरूं लागण्यापूर्वी दोस्त सरकारांच्या बेतांची घडी बिघडून टाकण्याकरितां जर्मनी आपण होऊन मार्च एप्रिल महिन्यांतच अँग्लो–फ्रेंचांवर कोठें तरी गेल्या सालच्या व्हर्डूनच्या स्वारीप्रमाणें दोन तीन महिने निकराचे हल्ले करण्याच्या तयारींत असला पाहिजे.

फेब्रुवारीच्या प्रारंभीं जर्मनीनें जी एक अत्यंत निर्दयपणाची गोष्ट जाहीर केली तिजवरूनहि वरीलच अनुमानास पुष्टि मिळाली. फेब्रुवारीचे प्रारंभीं जर्मनीनें अमेरिका, हालंड, स्पेन आदि करून सर्व तटस्थ राष्ट्रांना कळविलें कीं, फेब्रुवारीचे दुसऱ्या आठवड्यापासून इंग्लंडचा किनारा, फ्रान्सचा किनारा व इटलीचा किनारा यांच्या आसपास असलेल्या समुद्राच्या टापूत कोणच्याही राष्ट्राचें कोणच्याहि मालाचें व कोणच्याहि स्वरूपाचें जें जें गलबत दृष्टीस पडेल तें तें गलबत उतारूंच्या किंवा खलाशांच्या प्राणाचा बचाव करण्याची बिलकूल तरतूद न करतां सरसकट समुद्रांत बुडविण्याची आज्ञा जर्मनीनें आपल्या पाणबुड्या बोटींना दिली आहे. तेव्हां तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांनीं इंग्लंड, फ्रान्स व इटली यांच्याजवळचा हा मृत्युमय समुद्र अजिबात टाळावा. इतक्या दिवस पाणबुड्यांचा सुळसुळाट चालूच होता, पण अमेरिकेचें निशाण असलें म्हणजे निष्कारण प्राणहानि करण्यांत येऊं नये अशी जर्मनीची आज्ञा पाणबुड्यांना होती; पण ती आज्ञा रद्द करण्यांत येऊन भूमध्य समुद्रांत व इंग्लंडच्या आसपासच्या समुद्रांत दोस्त सरकारांशीं दळणवळण ठेवणाऱ्या सर्व जहाजांना सरसकट अमानुष क्रूरपणें जलसमाधी देण्याची अनियंत्रित अखत्यारी जर्मनीनें जानेवारी अखेरीस दिली. रुमानियाच्या विजयाचा पूर्ण फायदा पदरांत पडला असतांना जर्मनीनें 'यमस्य करुणा नास्ति' अशा धर्तीचें अक्राळविक्राळ व अमानुष स्वरूप कां धारण केलें ? रक्ताची चटक लागली म्हणून हा हिंस्र पशू अधिक क्रूर बनला, हें एक कारण तर खरेंच; पण त्यापेक्षां लष्करी परिस्थितींत व लष्करी धोर-

णांत या भयानक वर्तनाचें मूळ कोठें तरी पाहिलें पाहिजे. जर्मनीच्या सर्व अत्याचाराच्या मागें लष्करी धोरण नेहमीं असतें. लष्करी धोरण सफल करण्याकरितां जर्मनी न्यायनीति पहात नाहीं; धर्माला जुमानीत नाहीं; माणुसकीची चाड धरीत नाहीं आणि राष्ट्राराष्ट्रांमधील करारमदार पायाखालीं तुडविण्यास मागें पुढें पहात नाहीं. जर्मनीचें हें वर्तन निंद्य व गर्हणीय असून मनुष्यमात्राला लाजविणारें आहे. जर्मनीच्या या अमानुष वर्तनाचा तिटकारा आतां सर्व तटस्थ राष्ट्रांना आला आहे. अमेरिकेचें राष्ट्रहि जर्मनीशीं युद्ध करण्यास सज्ज होऊं लागलें आहे. असला हा तैमूरलंगी क्रूरपणा जर्मनीनें कां दाखवावा ? रानटी लोकांहून अधिक माणुसकी जर्मनींत कां दृष्टीस पडूं नये ? एकदां पापाचरण खपलें म्हणजे पाप पचनीं पडून पिंडच पापमय बनू लागतो. जर्मनीची तशीच स्थिति होऊं लागली हें खरें; पण पापाच्या प्रत्येक गोळ्यासभोंवतीं लष्करी घोरणाचें अवगुंठन जर्मनीच्या आतांपर्यंतच्या पापी कृतींत दिसून आलें आहे.

अनियंत्रित जलसमाधीच्या पापाच्या मागें जर्मनीचें लष्करी धोरण कोणचें आहे तें आतां पाहूं या. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत सेनापति मॅकेनसन यांनीं सीरेत नदीवर मुक्काम केला. त्यावेळीं पूर्व पश्चिम दोन्ही रणभूमि संभाळून रुसो–रुमानियाची पीछेहाट करण्याइतकें फालतुक सैन्य आस्ट्रो–जर्मनांपाशीं होतें. हें अधिक सैन्य आता मोकळें झालें. डिसेंबर महिन्यांत बुखारेस्ट घेण्याबरोबर विजयी पक्ष असा डौल मारून जर्मनीनें प्रेसिडेंट विल्सन यांच्या मार्फत तहाचें बोलणें सुरू केलें. इंग्लंड, फ्रान्स, रशिया व इटली या चारहि राष्ट्रानीं पराभूत पक्ष या नात्याचा तह करण्याचें नाकारलें. प्रथम रणभूमीवर विजय संपादन करूं आणि नंतर तह करूं, अशी प्रतिज्ञा या चारहि राष्ट्रांनीं केली. प्रेसिडेंट विल्सन यांनीं मध्यस्थी जोरानें चालविली. जित कोणींच नाहीं, विजयहीन तह करण्यास हरकत नाहीं अशा धोरणानें प्रेसिडेंट विल्सन यांनीं जानेवारींत पुन्हां तहाचीं भाषणें बोलण्यास सुरवात केली. प्रे विल्सन यांची री ऑस्ट्रिया हंगेरीनें ओढली. पण इंग्लंड कांहींच हालचाल दाखवीना. तेव्हां विजय संपादन करून जर्मनीच्या पापाचें प्रायश्चित्त जर्मनीच्या पदरांत टाकूनच नंतर मग तह करण्याचा इंग्लंडचा निश्चय जर्मनीला कळून चुकला. इंग्लंडनें तरी असा निश्चय कां करावा ? नुसती मनाची हौस म्हणून इंग्लंडनें असा निश्चय केला काय ? नाहीं. इंग्लंडला हें पुण्यकर्म वाटतें म्हणून इंग्लंडनें तसा निश्चय केला. नुसतें पुण्यकर्म वाटून काय उपयोग?

पुण्यमार्ग म्हणून केवळ नव्हे तर तो पुण्यमार्ग आचरण्याची धमक इंग्लंडच्या मनगटांत आहे, असें मुख्यप्रधान मि. लाईड जॉर्ज यांच्या बुद्धीला निश्चयानें वाटतें म्हणून इंग्लंड वसंतकाळीं व वसंतकाळानंतर पांच सात महिने निकरानें लढण्यास सज्ज झालें. तहाचें बोलणें संपलें. पुढील नोव्हेंबर डिसेंबरपर्यंत घनघोर युद्ध चालणार, ही गोष्ट निर्विवाद ठरली. या अवधींत आपण विजय संपादन करणार, अशी इंग्लंडची पूर्ण खात्री ! कोणच्या जोरावर विजय संपादन करणार ? गेल्या वसंतकाळीं तयारी पूर्णत्वास गेली नसतांहि सोम नदीच्या कांठीं कित्येक आठवडे इंग्लंडनें जर्मनीची एकसारखी पीछेहाट केली, त्यावेळीं इंग्लंडचें सैन्य नवें होते. येत्या वसंतकाळीं तेंच सैन्य लढून लढून मुरलेलें होणार ! शिवाय सवाई दीढीनें वाढणार. सक्तीनें सर्वांना मजुरीहि करावयास लावणारा कायदा मि. लाईड जॉर्ज त्यांच्या हातांत असून, पाहिजे त्याच्या खिशांतील पैसे सक्तीनें काढून घेण्याची अखत्यारीहि मि. लॉईड जॉर्ज यांना देण्यास इंग्लंड तयार झालें आहे. म्हणजे येत्या मे–जून महिन्यांत जर्मनीचा पराभव करण्यास लागणारें जरूर तितकें सैन्य मुबलक दारूगोळ्यानिशीं पश्चिम रणभूमिवर उभें ठाकून पांचसहा महिने एकसारखी प्राणांतिक झुंज झुजण्यास सुरवात करणार. इटली व रशिया हीं दोन्ही राष्ट्रें त्याचवेळीं आपल्या बलाची पराकाष्ठा करण्यास चुकणार नाहींत, हें उघड आहे. एवंच १९१७ सालीं इंग्लंडच्या अंदाजानें जर्मनीचा पराभव निश्चित ठरला. हा पराभव टाळण्याकरितां रुमानियाची राजधानी बुखारेस्ट शहर घेतल्यानंतर जर्मनीनें तहाचें बोलणें लावलें. पण स्वतःच्या बलाविषयींच्या आत्मविश्वासामुळें इंग्रजांनीं हें बोलणें टाळलें.

रुमानिया घेतल्यानें जर्मनी दुष्काळाच्या तडक्यांतून सुटला, पण इंग्रज आरमाराच्या कोंडमाऱ्यामुळें उत्पन्न झालेल्या हालअपेष्टांतून जर्मनीची सुटका होणें शक्य नाहीं. ऑस्ट्रिया, जर्मनी, व टर्की येथील प्रजाजनांच्या हालअपेष्टा रोजच्या रोज वाढत आहेत आणि फार झालें तर १९१७ अखेर या हालआपेष्ठा तेथील लोक सोसूं शकतील. म्हणजे हालअपेष्टा सोसण्याच्या दृष्टीनें १९१७ साल हें जर्मनीचें पराकाष्ठेचें साल होय. दोस्त सरकारांच्याकडे पाहिलें तर आतां कोठें प्रजाजनांज्या थोडयाशा हालअपेष्टा होऊं लागल्या आहेत. गेलीं दोन वर्षे सर्व लोक पूर्ववत् चैनींत होते; जणुं काय महायुद्ध चाललेंच नव्हतें ! हालअपेष्टांच्या दृष्टीनें जर्मनी व इंग्लंड यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. इंग्लंडच्या बलाढ्य आरमाराचा हा प्रताप होय. सैनिकांच्या संख्येच्या दृष्टीनें पाहिलें तर १९१७ साल हें जर्मनीच्या पराकाष्ठेचें साल समजलें पाहिजे; कारण १९१७ सालच्या अखेरीस

तुर्कांना वेठीला धरून लढविण्याचा मार्गहि तुर्की जवान संपत आल्यामुळें खुंटल्यावांचून राहाणार नाहीं. दोस्त सरकारांच्याकडे पाहिलें तर फ्रान्स व इटाली यांना १९१७ साल पराकाष्ठेचें हें खरें; पण इंग्लंडचें सैन्य यावेळीं ज्वानींत प्रथम येणार व उतारकाळास इंग्लंडास चारपांच वर्षांचा अवधी राहाणार. नव्या सैन्याचा झरा रशियांत नेहमींच अव्याहत वाहत असल्यामुळें सैनिकांच्या संख्येच्या दृष्टीनें आणखी दहापांच वर्षें महायुद्ध चालविण्यास रशियास कोणचीच हरकत नाहीं. प्रजाजनांच्या हालअपेष्टांच्या व सैनिकांच्या संख्येच्या तफावतीच्या या संकटांतून कसें पार पडावयाचें, हा जर्मनीपुढें मोठा प्रश्न उभा राहिला आहे. इंग्रजांच्या आरमारापुढें कांहीं चालत नाहीं, अर्थात आपल्या हालअपेष्टा कांहीं चुकत नाहींत. आपण जर दुःखांत राहाणार तर इंग्रजांना तरी सुखांत कां म्हणून राहूं द्यावें ? सरळ मार्गानें जर इंग्रजांच्या हालअपेष्टा वाढवितां येत नाहींत तर पापी मार्गानें तरी इंग्रजांना दुःखांत कां लोटूं नये ? असा विचार करून इंग्रजांच्या किनाऱ्या सभोंवतीं जर्मनीनें आपल्या पाणबुडया बोटींच्या प्लेगास अनियंत्रितपणें संचार करण्यास परवानगी दिली. अलीकडे दोन तीन महिने या प्लेगास रोज तीन चार जहाजें बळी पडत असत. पण फेब्रुवारींत या प्लेगाचा संचार चहूंकडे झाल्यावर या प्लेगाची रोजची मृत्युसंख्या पंधरा विसापर्यंत जाईल, असा जर्मनीचा अंदाज आहे. इतकेंच नव्हे तर इंग्रजांच्या किनाऱ्याला आम्ही एकहि जहाज पोचूं देणार नाहीं अशा तऱ्हेची या प्लेगची वहावा अमेरिकेंतील जर्मन लोक करीत आहेत. फेब्रुवारी प्रारंभाला जर्मनीच्या मुख्य प्रधानानें असें जाहीर केलें आहे कीं एक वर्षापूर्वीपासून नव्या तऱ्हेच्या मोठया पाणबुडया बोटी जर्मनीनें बांधल्या असून या बोटींच्या प्लेगापासून इंग्रजी समुद्रास चांगली बाधा होऊन इंग्लंडचा कोंडमारा करण्यास जर्मनी समर्थ झाला आहे. ह्या कोंडमाऱ्यानें इंग्रजांच्या प्रजाजनांच्या हालआपेष्टा असह्य होतील; दारूगोळयास लागणाऱ्या सामानाचा इंग्लंडांत तुटवडा पडेल; आणि फ्रान्स व इटली येथें दगडी कोळशाचा दुष्काळ पडून ते देश डबघाईला येतील. म्हणजे जर्मनीचें म्हणणें असें कीं, पाणबुडया बोटींच्या सांथीमुळें हालआपेष्टा सोसण्याच्या कामीं जर्मनीच्या पंक्तीला इंग्लंड, फ्रान्स व इटली हे देश १९१७ सालींच येऊन बसतील. सैनिकांची संख्या अधिक या मुद्याला जर्मनीचें असें उत्तर दिसतें कीं; पाणबुडया बोटींनीं जर दारूगोळयाला लागणारें सामान समुद्रांत नेऊन बुडविलें तर नुसती अधिक संख्या घेऊन काय करावयाचें ? पाणबुडया बोटींचा प्लेग

जर चार पांच महिने चांगला वाढत गेला तर जुलै–आगस्ट महिन्यांत इंग्रजांची अफाट सेना दारूगोळयाच्या तुटवडयामुळें शक्तिहीन ठरेल; आणि इंग्लंडच्या सेनेकडे दुर्लक्ष करून रशियाचा किंवा इटलीचा पिच्छा पुरविण्यास आस्ट्रो–जर्मनांना संधि मिळेल. १९१६ सालच्या अखेरीस जर्मनीच्या चेहेऱ्यावर विजयाचा जो रंग चमकत होता तो १९१७ सालच्या अखेरीसहि कायम रहावा म्हणून पापापुण्याचा वसलाहि विचार न करतां सरसकट सर्वांना बुडविण्याचा अधिकार वरील विचारसरणीस अनुसरून, आपल्या पाणबुडया बोटीला जर्मनीनें फेब्रुवारी प्रारंभापासून दिला आहे. तटस्थांच्या हक्कांची पायमल्ली होऊन तटस्थ राष्ट्रें दोस्त सरकारांना मिळालीं तर कसें ? सेनापति हिंडेनबुर्ग यासंबंधानें बेफिकीर आहेत. कोणचेंहि नवें राष्ट्र लढाईंत पडो; त्याचें कांहीं न चालू देण्यास जर्मन सेना समर्थ आहे; अशी फुशारकी सेनापति हिंडेनबुर्ग मारीत आहेत. जर्मनीच्या या नव्या प्लेगानें आपल्या हक्कांची पायमल्ली होते, असें अमेरिकेनें जर्मनीला स्पष्ट कळविलें असून जर्मनीशीं बोलणें चालणेंहि अमेरिकेनें बंद केलें आहे. अमेरिकन जहाजांना जर जर्मन प्लेगाची बाधा झाली तर अमेरिका जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारील असा अंदाज आहे. पण अमेरिकेपाशीं अवघें ८०।९० हजारच सैन्य आजमितीस असल्यामुळें, महायुद्धांत अमेरिका सामील झाल्यानें १९१७ सालीं युरोपांतील लष्करी परिस्थितींत विशेषसा फरक पडणें शक्य नाहीं. हॉलंड, डेन्मार्क व स्वित्झर्लंड यांच्या सरहद्दीवर जर्मन सेनेचा मोठा तळ पडला असल्यामुळें व रुमानियाचें उदाहरण या चिमुकल्या राष्ट्रांपुढें ताजें असल्यामुळें, इंग्रजी समुद्रांतील जर्मनीच्या या अत्याचारानें हीं राष्ट्रें रागावली तरी दोस्त सरकारांना सामील होण्याचा संभव नाहीं. स्वीडनचा कल जर्मनीच्या बाजूचा असल्यामुळें नॉर्वे इंग्रजांच्या बाजूस असून नसल्यासारखा आहे. म्हणजे युरोपांतील लहान लहान तटस्थ राष्ट्रांना जर्मनीच्या दडपशाहीविरुद्ध तक्रार करून आपलीं जहाजें इंग्रजी व्यापारांतून काढून घेण्याशिवाय गत्यंतर नाहीं; आणि फेब्रुवारीच्या प्रारंभीं कांहीं राष्ट्रांनीं तसें केले. वसंतकाळापूर्वीचे दोनतीन महिने लढाईच्या दृष्टीनें मंदीचे असल्यामुळें पाणबुडया बोटींचा प्लेग इंग्लंडास कितपत बाधा देतो व या बाधेपासून स्वतःचें संरक्षण इंग्लंड कसें करून घेतें, ही गोष्टच पुढील दोन तीन महिन्यांत प्रमुखपदास चढणार, हें उघड आहे.

———

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा फेब्रुवारी–मार्च महिना

फेब्रुवारी महिन्यांत मेसापोटेमियामधील इंग्रजी व हिंदी सेनेनें तुर्कांपासून कुतुल–आमारचें ठाणें परत घेऊन गेल्या सालच्या अपजयाचा कलंक धुवून टाकला. गेल्या सालीं जनरल टाऊनशेंड हे कुतुल–आमारा येथें वेढले जाऊन जेव्हां तुर्की सैन्याच्या हवालीं झाले तेव्हां युफ्रेतीस व तैग्रीस नदीच्या कांठीं दक्षिण इराणांत इंग्रजी सेनेच्या इज्जतीस बराच धक्का बसला; दक्षिण इराणांत बंडखोरांचा सुळसुळाट झाला; व त्याचे वाईट परिणाम बलुचिस्थानांतील उपद्व्यापी पठाणांवर होऊन हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर शांततेचा भंग बऱ्याच अंशीं झाला. जनरल टाऊनशेंड कुतुल–आमारा येथें तुर्कांच्या हातीं लागण्यापूर्वी इराणच्या वायव्य कोंपऱ्याजवळ तुर्कांच्या आर्मिनियन प्रांतांत रशियन फौजेनें तुर्कांचा चांगला पराभव केला होता; व त्यामुळें दक्षिण इराणांतील गडबडीच्या आगीच्या ज्वाळा उत्तर इराणास लागल्या नाहींत. दक्षिणेच्या या ज्वाळा जर उत्तरेस पसरल्या असत्या तर तेहरान येथील इराणी सरकार तुर्कांच्या जाळ्यांत सांपडून अफगाणिस्थानच्या अमीरावरहि तुर्को–जर्मनांची छाप बसली असती. आर्मिनियामध्यें रशियानें एक वर्षापूर्वी जो विजय मिळविला त्यामुळें इराणी सरकार व अफगाणिस्थानचे अमीर यांना रशियाची दहशत पूर्वीइतकीच पुन्हां वाटूं लागली; आणि तेहरान व काबूल येथें तुर्को जर्मनांच्या चळवळी मंडळ्यांची वर्षभर स्थापना झाली असतांहि आपली तटस्थवृत्ति सोडण्यास अफगाणिस्थानचे अमीर प्रवृत्त झाले नाहींत. आर्मिनियांतील रशियाच्या विजयाचा हा मोठा उपयोग झाला, पण त्या विजयामुळें उत्पन्न झालेली सुरक्षिततेची परिस्थिति दक्षिणेस बसऱ्याच्या बाजूनें पोखरली जाते कीं काय अशी भीति वाटूं लागली होती. या भीतीचें निवारण करण्यासाठीं गेल्या सालीं बसऱ्याच्या बाजूला बरेंच मोठें नवें सैन्य पाठविण्यांत आलें. बसऱ्यापासून उत्तरेस नवी आगगाडी बांधण्यांत आली व फेब्रुवारीचे अखेरीस कुतुल–आमाराचें ठाणें तुर्कांना सोडावयास भाग पाडून तुर्कांच्या बळाहून इंग्रजांचें बळ वरचढ आहे, असें दक्षिण इराणांतील मुसलमानांचे निदर्शनास सेनापति मॉड यांनीं आणलें. जानेवारी फेब्रुवारी महिन्यांत पांच सात हजार तुर्की सैन्य इंग्रजांनीं कैद केलें; व वीस पंचवीस

हजार तुर्की सैन्याची खराबी केली. तुर्की सैन्य आस्ते आस्ते मागें हटत आहे व जनरल माड हे व्यवस्थेनें पाठलाग करीत आहेत. तथापि कुतुल-आमारा येथें तुर्कांचा झालेला पराभव बगदादला शह पोंचण्याइतक्या मोठ्या स्वरूपाचा नाहीं. इंग्रजांच्या तरवारीची इज्जत पुन्हां प्रस्थापित होऊन दक्षिण इराणांतील गडबड मर्यादित करण्याइतक्या स्वरूपाचा जनरल माड यांचा विजय आहे यांत शंका नाहीं. बगदाद इंग्रजांच्या हातीं लागेतों इराण तुर्कांच्या शहांतून मुक्त व्हावयाचें नाहीं. पण सांप्रत जर्मनांचे व तुर्कांचें लक्ष युरोपखंडांत स्वतःचा बचाव करण्याकडे लागलेलें असल्यामुळें एप्रिल–मे महिन्यांत सुरू होणाऱ्या युरोपांतील धुमश्चक्रीचा निकाल लागत असतांना इराणांत अधिक गडबड होण्याची धास्ती जनरल माड यांच्या विजयानें दूर केलेली आहे.

युफ्रेतीस व तैग्रीस नदीच्या कांठीं ज्याप्रमाणें इंग्रजांचें पाऊल फेब्रुवारी महिन्यांत पुढें पडलें, त्याप्रमाणें फ्रान्सच्या रणभूमींतहि सोम नदीच्या उत्तरेस अँकर नदीच्या कांठीं दहाबारा मैल रुंदीच्या पट्ट्यावर इंग्रजी सेना एकदोन मैल आंत घुसली व जर्मनांच्या ताब्यांत असलेलीं दहा पंधरा गांवें इंग्रजांनीं व्यापून टाकिलीं. हा भाग ताब्यांत घेण्याकरितां इंग्रजांना विशेषसें लढावें लागलें नाहीं, सामान्य फाटाफूट होऊनच हीं गांवें इंग्रजांच्या हातीं आलीं ! यासंबंधानें जर्मनीचें म्हणणें असें प्रसिद्ध झालें आहे कीं, नवीन तयार केलेल्या बंदोबस्ताच्या जागा व्यापण्याकरितां आम्ही आमचें सैन्य केव्हां मागें हटविलें हें इंग्रजांच्या ध्यानांतच आलें नाहीं. तें कसेंहि असो; येवढी मात्र गोष्ट खरी कीं, पश्चिम रणभूमींत जोरानें लढून अँग्लो–फ्रेंच सैन्याला शक्य तेवढी मोठी किंमत द्यावयास लावल्याशिवाय आपल्या पायाखालची जमीन जर्मनांनीं सोडण्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. यावरून एक गोष्ट सिद्ध होते; ती ही कीं, इंग्रजांवर तुटून पडून इंग्रजी सेनेची खोड मोडण्याची जर्मनांनीं जंगी तयारी चालविली आहे म्हणून जें प्रसिद्ध झालें होतें, त्यांत कांहीं तथ्यांश नाहीं. इंग्रजांवर तुटून पडून कॅले गांठण्याचा जर जर्मनीचा सांप्रत इरादा असता तर भरपूर लढल्याशिवाय एक इंचहि जमीन जर्मनीनें सोडली नसती. अर्थात् पश्चिम रणभूमींत एप्रिल–मे महिन्यांत सुरू होणाऱ्या धुमश्चक्रीच्यावेळीं स्वसंरक्षण करण्यापलीकडे जर्मनी विशेष कांहीं करणार नाहीं, असें अनुमान निघतें. १९१७ सालीं पश्चिम रणभूमींत जर्मनांवर मोठा विजय संपादणें इंग्रजांना भाग आहे. आम्ही तसें करून दाखवूं

असें आश्वासन इंग्रजांनीं आपल्या दोस्तांना दिलें आहे. किंबहुना इंग्रजांच्या या आश्वासनावर विसंबून राहून फ्रान्स, इटली व रशिया यांनीं तहाच्या वाटाघाटींत पडण्याचें नाकारलें असें म्हणण्यासहि हरकत नाहीं. या दृष्टीनें पश्चिम रणभूमीचा विचार केला असतां जय मिळविण्याचा बोजा इंग्रजांवर पडतो; आणि इंग्रजांना जर जय मिळाला नाहीं तर तेवढयानेंच, म्हणजे इंग्रजांचा उलट पराभव न करतांहि, जर्मन मुत्सद्यांचें बरेचसें कार्य साधतें. आपला चराचा चक्रव्यूह मोडूं द्यावयाचा नाहीं, प्रसंगविशेषीं थोडीशी पीछेहाट झाली तरी पत्करली, पण इंग्रजी सैनेला आंत घुसूं द्यावयाचें नाहीं, अशा धोरणानें जर्मन सेना पश्चिम रणभूमींत मुख्य धुमश्चक्रीच्यावेळीं वागणार आणि इंग्रज अत्यंत निकरानें जर्मनांवर तुटून पडून महायुद्धाचा सोक्षमोक्ष वसंतकाळीं करून घेणार, असें फेब्रुवारींतील हालचालीं-वरून अनुमान निघतें.

पश्चिम रणभूमींत जर्मनी पराभव टाळण्यापलीकडे जर दुसरें तिसरें कांहीं करणार नाहीं तर जर्मनीनें गेले तीन चार महिने नवें सैन्य उभारण्याची येवढी खटपट केली ती कशाकरितां ? बेल्जममधील लोकांना गुलामाप्रमाणें राबावयास जर्मनीनें लाविलें. इतकेंच नव्हे, तर खुद्द जर्मनींत सक्तीच्या लष्करच्या कायद्याप्रमाणें सक्तीच्या कामकऱ्यांचा कायदा पास केला. ही सक्तीची गुलामगिरी सुरू करून लढण्यालायक जे लोक इतर धंद्यांत गुंतले होते ते सर्व जर्मनीनें लष्करी कामासाठीं मोकळे केले,अशारीतीनें दांत कोरून जर्मनीनें वसंतकाळासाठी नवें सैन्य उभारलें. या ताकतीचा उपयोग जर्मनी कोठें करणार ? तज्ज्ञाचें असें मत प्रसिद्ध झालें आहे कीं, एप्रिल मे महिन्याच्या सुमारास बर्फ वितळल्यावर रिगाच्या बाजूला म्हणजे रशियन रणभूमीच्या उत्तर भागांत कोठेंतरी रशियाची फळी फोडण्याचा उद्योग जर्मनी केल्यावांचून राहाणार नाहीं. उत्तर भागांतच कशावरून हा उद्योग दृष्टीस पडेल ? याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, १९१८ सालीं महायुद्ध सुरू ठेवण्याची ताकद प्रजाजनांच्या उपासमारीच्या दृष्टीनें जर्मनींत राहिलेली नाहीं. तेव्हां १९१७ सालींच रशियावर जर्मनीला येवढा मोठा जय मिळविला पाहिजे कीं, तह करण्यावांचून रशियास गत्यंतर राहाणार नाहीं. रशियाची कितीहि पीछेहाट झाली तरी रशिया तह करणार नाहीं. राजधानीचें पेट्रोग्राड शहर गेलें तरच रशियास तह करणें भाग पडेल. पेट्रोग्राडवर चाल करून जावयाचें म्हणजे रिगाच्या बाजूची फळी जर्मनीनें फोडली पाहिजे. रिगाच्या बाजूची फळी फोडीत असतांना

जर्मनीला आपल्या आरमाराचाहि उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे. हा विचार जर्मनीच्या दृष्टीनें ठीक झाला. पण रशियानें रिगाच्या बाजूची आपली फळी वर्ष दीड वर्ष चांगली मजबूत करून ठेविली आहे, त्याची काय वाट ? रिगाची बाज ढिली करून रशिया इतर ठिकाणीं आपलें सैन्य नेईल, हें संभवत नाहीं. चरांचा चक्रव्यूह फोडणें फार कठीण पडतें; गेल्या अडीच वर्षांत सेनापति मॅकेनसन यांना तोफखान्याच्या जोरावर चरांचे चक्रव्यूह फोडून आंत घुसण्याची संधी डुनाजी नदीच्या कांठीं एकदां काय ती मिळाली. रोमानियाची पीछेहाट झाली ती चरांच्या चक्रव्यूहांच्या लढाईतील पराभवामुळें नव्हे, तर खड्या लढाईतील पराभवामुळें होय. शिवाय रोमानियन युद्ध जानेवारी अखेरीस थंडावलें ह्याचें कारण चरांच्या चक्रव्यूहांचा अडथळा सुरू झाला हें नसून ऐन कडाक्याच्या थंडीच्या वेळीं रुमानियास रशियाची मोठी कुमक येऊन मिळाली हें होय. ब्युकोव्हिना व रुमानिया येथील रणभूमि अद्याप चरांच्या चक्रव्यूहांनीं पूर्णपणें व्याप्त झालेल्या नाहींत. रिगाच्या बाजूच्या रणभूमीची तशी स्थिति नाहीं. रिगाच्या बाजूला समुद्रावरून कांहीं काम करण्यास जर सवड आहे तर रुमानियन रणभूमीच्या बाजूला डान्यूब, सीरेथ व प्रुथ या नद्यांच्या मुखांचाहि उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे. म्हणजे जर सेनापति हिंडेनबुर्ग यांजपाशीं फालतुक सैन्य जरूर तितकें असेल तर रशियावर जय मिळविण्यास रिगाच्या रणभूमीपेक्षां रुमानियाची रणभूमि अधिक सोइस्कर होणारी आहे. रुमानियाची रणभूमि सोडून सेनापति हिंडेनबुर्ग रिगाच्याच बाजूला अधिक लक्ष पुरवील, असें मानणारा पक्ष पेट्रोग्राड घेतल्याशिवाय रशिया तहाला तयार होणार नाहीं या मुद्यावर अधिक भिस्त ठेवतो. पण रशियांतील राजकीय स्थितीच्या दृष्टीनें विचार केला असतां पेट्रोग्राडवर मोहीम न करण्यांतच जर्मनीचें अधिक हित आहे, असें मानणारा दुसरा एक पक्ष आहे. रशियांत सांप्रत राजमंडळ व डयूमा सभा यांमध्यें बरीच लठालठी सुरू झाली असून अंतस्थ भांडणें चांगलीं विकोपास गेलीं आहेत; त्या तंटयापासून जर्मनीचा आपोआप मोठा फायदा होण्याचा संभव आहे. पण जर्मनी जर पेट्रोग्राडवर चाल करून जाऊं लागला तर भयंकर अरिष्टामुळें अंतस्थ कलह आपोआप नष्ट होईल व रशियांतील सर्व दर्जाच्या लोकांची जूट होऊन जर्मनीस आज जो रशिया थोडासा मऊ पडलेला दिसत आहे तोच रशिया उग्र स्वरूप धारण केल्यावांचून राहाणार

नाहीं. तेव्हां पेट्रोग्राडवर चाल करून जावयाचें म्हणजे रशियांतील अंतस्थ कलहा-मुळें मिळणारा फायदा निष्कारण गमवावयाचा. रशियास अंतस्थ कलहांत निमग्न ठेवून त्याच्या वाटेस १९१७ सालीं न जाण्यांतच जर्मनीचा अधिक फायदा आहे असें या पक्षाचें मत आहे. मग जर्मनी करणार तरी काय ? रुमानियाचा अवशिष्ट राहिलेला भाग घेण्याची थोडीशी खटपट मार्च एप्रिलांत जर्मनीकडून होईल, पण आस्ट्रो–जर्मनांची खरी धाड यंदा इटालीवर पडेल असें या पक्षाचें ह्मणणें आहे. गेल्या सालीं इटलीच्यामागें आस्ट्रिया लागला असतांना रशिया अवचित उठला व ग्यालिशियांतील रशियाच्या विजयानें सर्वच पारडें फिरून गेलें. पण यंदा रशियाची तशी भीति राहिली नाहीं. अंतस्थ कलह व पाणबुडया बोटींचा व्याप या दोन कारणांमुळें गेल्या सालाइतका दारूगोळ्याचा व तोफांचा मुबलक पुरवठा यंदा रशियास होणें संभवनीय नाहीं. तेव्हां अंतस्थ कलहानेंच रशियास पीडित ठेवून इटलीवर सूड उगविण्याचा विचार जर्मनीला अधिक प्रिय वाटणें संभवनीय आहे.

## पाणबुडया बोटींचा प्लेग

पश्चिम रणभूमींत एप्रिल–मे महिन्यापासून मोठी धुमश्चक्री सुरू होणार यांत शंका नाहीं. फ्रान्सच्या बाजूला जर्मनीची लढण्याची इच्छा असो वा नसो, जर्मनीच्या इच्छेवर ही धुमश्चक्री अवलंबून नाहीं. इंग्लंड व फ्रान्स या दोन राष्ट्रांना पुढील चार पांच महिन्यांत जर्मनीशीं निकरानें लढून जर्मन सेनेला पायाखालीं तुडविणें भाग आहे. कारण, जर १९१७ सालीं तसें केलें नाहीं तर १९१८ सालीं पाणबडया बोटींच्या प्लेगामुळें इंग्लंडच्या शक्तीची वाढ खुंटण्याचा संभव आहे. फेब्रुवारीचे प्रारंभापासून इंग्लंड, फ्रान्स व इटली यांच्या सभोंवारच्या समुद्रांना घेरून सरास सर्व जहाजांना, इस्पितळाच्या जहाजांनासुद्धां, जलसमाधी देण्याचा जर्मनीनें आपला निश्चय जाहीर केला. फेब्रुवारी महिन्यांत डिसेंबर किंवा जानेवारी महिन्याहून अधिक जहाजें जर्मनांना बुडवितां आलीं नाहींत. डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी या तीन महिन्यांचा हिशेब पाहिला तर दररोज दहा हजार टनांची जहाजे जर्मनीस बुडवितां आलीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. जर्मनांनीं बांधलेल्या मोठया पाणबुडया बोटी आणि समुद्राखालीं बुडून मार्ग आक्रमीत असतां शत्रूच्या जाळ्यांत न सापडावें म्हणून जाळें कातरण्याची केलेली व्यवस्था, याकडे पाहिलें असतां या जर्मन प्लेगच्या रोजच्या मृत्युसंख्येचें प्रमाण गेल्या तीन

महिन्याच्या सरासरीप्रमाणें १९१७ सालभर पडेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. रोजची दहा हजार टनांची सरासरी म्हणजे विशेष भयप्रद नव्हे. इंग्लंडचीं व्यापारी जहाजें इतकीं पुष्कळ आहेत कीं, आणि नवीन जहाजें बांधण्याचें इंग्लंडचें सामर्थ्य एवढें मोठें आहें कीं, वरील नुकसान इष्ट हेतूपासून इंग्लंडला ढळविण्यास बिलकूल पुरेसें नाहीं. तथापि १९१७ सालभर हा जर्मन प्लेग जर सांप्रतच्या जोरानें चालू राहिला तर १९१८ सालीं इंग्लंडच्या राजकारस्थानावर व इंग्लंडच्या शक्तीवर त्याचा बराच परिणाम झाल्यावांचून राहाणार नाहीं. इंग्लंडच्या व्यापारी जहाजांना इंग्लंडला अन्नसामग्री व युद्ध सामग्री पुरविण्याचें तेवढें काम करावें लागत नसून हिंदुस्थान, पूर्व आफ्रिका, मेसापोटेमिया, इजिप्त, सलिनोका, इटली व फ्रान्स येथील रणभूम्यांकडे सैन्याची नेआण करण्याचें काम करावें लागतें; रशिया, फ्रान्स व इटली या तीन राष्ट्रांना युद्धसामग्री पोंचवावी लागते आणि फ्रान्स, इटली या दोन देशांना कोळशाचा पुरवठा करावा लागतो. शिवाय स्वतःच्या देशांत युद्धसामग्री तयार करण्यास लागणारा कच्चा माल परदेशांतून आणावा लागतो. म्हणजे युद्धविषयक बाबीशिवाय इतर गोष्टीकरितां लागणारे जिन्नस परदेशाहून इंग्लंडांत आणण्यास व इंग्लंडच्या कारखान्यांतून तयार होणारे युद्धोपयोगी नव्हे तर संसारोपयोगी जिन्नस परदेशास पोंचवून इंग्लंडची व्यापारी श्रीमंती खालावूं न देण्यास लागणारी व्यापारी जहाजें इंग्लंडपाशीं पुरेशीं नाहींत. इतक्या दिवस नॉर्वे, डेन्मार्क, हालंड, स्पेन व अमेरिका या देशांच्या व्यापारी जहाजांचा इंग्लंडास बराच उपयोग होत होता. पण फेब्रुवारीमध्यें जर्मनीच्या प्लेगाला भिऊन वरील देशांतील व्यापारी जहाजांनीं इंग्लंडशीं व्यापारी दळणवळण ठेवण्याचें बऱ्याच अंशीं नाकारिलें आहे. जर्मनीशीं युद्ध पुकारण्याचा विचार अद्याप अमेरिकेचा चालूच आहे, व आणखी एक दोन महिने या विचाराचें घोंगडें तसेंच भिजत पडेल असा अंदाज आहे. म्हणजे जर्मन प्लेगचा प्रत्यक्ष परिणाम जरी इंग्रजी व्यापारी जहाजांच्या संख्येवर विशेषसा होण्याचा संभव नाहीं, तरी अप्रत्यक्ष रीतीनें म्हणजे तटस्थ राष्ट्रांशीं असलेला व्यापारी संबंध तुटत चालल्यामुळें हा प्लेग इंग्लंडास जाचक होऊं पहात आहे. हें संकट मि. लाईड जॉर्ज यांच्या प्रधानमंडळानें पूर्णपणें ओळखलें असून त्याचा प्रतिकार करण्याच्या सर्व योजनांची सुरवात फेब्रुवारी महिन्यापासूनच करण्यांत

आली आहे. सर्व व्यापारी जहाजांवर तोफा ठेवून लष्करी शक्तीनें त्यांना इनॉक्युलेट करण्यांत येणार आहे. संसाराला अत्यंत आवश्यक तेवढयाच वस्तू इंग्लंडांत येऊं द्यावयाच्या व बाकीच्या अनवश्यक वस्तूंची ने आणच व्यापारी जहाजांनीं करावयाची नाहीं असें ठरविण्यांत आलें आहे. शिवाय इंग्लंडमध्यें अधिक धान्य पिकविण्याची व्यवस्था घालण्यांत आली असून प्रत्येक मनुष्यानें किती अन्न रोज खावें याचेहि निर्बंध करण्यांत येत आहेत. म्हणजे जर्मनींतील लोकांप्रमाणें इंग्लंडांतीलहि लोकांचा संसार अंशतः तरी कष्टाचा होऊं पहात आहे. ह्या हालअपेष्टेच्या स्थितीनें इंग्लंड, फ्रान्स व इटली या तीन राष्ट्रांनाच तेवढें घेरलें आहे असें नव्हे, तर खुद्द रशियांत धान्याची समृद्धि शेतांतून व खेडयापाडयांतून दृष्टीस पडत असतांहि आगगाडयांना लष्करी कामाला वाहून नेणें भाग पडल्यामुळें शहरांतून फार महागाई झाली आहे. हॉलंड, स्पेनसारख्या तटस्थ देशांतहि महागाईनें उग्र स्वरूप धारण केलें असून महायुद्धांत न पडतांहि तेथील लोकांचा संसार कष्टाचा झाला आहे. इंग्रजी आरमारानें जर्मन राष्ट्राचा केलेला कोंडमारा आणि जर्मनीनें पाणबुडया बोटींचा केलेला अनियंत्रित फैलाव, या दोन कारणामुळें सर्व युरोपखंडभर मित्रामित्र व तटस्थ सर्व लोकांचे संसार दुःखाचे झाले आहेत. या दुःखी संसारांतील बायकामुलांच्या शिव्याशापांचें ओझें डोक्यावर घेऊन १९१८ सालींहि महायुद्ध तसेंच जोरानें चालू ठेवण्यास कोणताहि मुत्सद्दी धजणार नाहीं. अर्थात् १९१७ सालींच महायुद्धाचा निकाल लावून घेणें सर्व युरोपखंडाला भाग आहे. या दृष्टीनें विचार केला असतां, एप्रिल, मे महिन्यापासून इंग्लंड, फ्रान्स व इटली हे तीन देश आस्ट्रो–जर्मनांवर तुटून पडण्याची शिकस्त करूं लागतील आणि यांच्या या पहिल्या धडकींतून निभावल्यानंतर जर्मनी-फालतुक सैन्य उरल्यास इटलीकडे किंवा रशियाकडे मोर्चा फिरवील असें अनुमान काढणें भाग पडतें.

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा मार्च–एप्रिल महिना

## रशियांतील राज्यक्रांति

मार्च महिन्यांतील सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे रशियांतील राज्यक्रांति होय. मार्चचे पहिल्या आठवड्यांत रशियाची राजधानी पेट्रोग्राड येथें मोठी महागाई झाली व अन्नाकरितां लोक रस्त्यांतून फिरून लुटालुटीस प्रारंभ झाला. उपाशी मरणाऱ्या लोकांच्या थव्यावर सरकारनें पोलिस सोडले; निर्घृण पोलिसनें लोकांवर बंदुका झाडल्या; व शेंकडों लोक मृत्युमुखीं पडले. घरीं खायला कांहीं नाहीं, घरीं परत जावें तर उपाशी मरण्याची पाळी, तेव्हां उपासमारीच्या मृत्यूपेक्षां गोळी-बाराचा मृत्यु बरा असें लोकांना साहजिक वाटलें. लोकांनीं सर्व रस्ते आडवून धरले. पोलिसच्या गोळीबारानें रस्त्यांतील दंगेधोपे कमी होईनात. याच सुमारास रशियाची ड्यूमासभा पेट्रोग्राड येथें भरावयाची होती. ड्यूमासभेकरितां जमलेल्या प्रतिनिधींनीं खवळलेल्या लोकांचें नायकत्व आपल्याकडे घेतलें, व राजधानी स्वतःच्या ताब्यांत घेण्याची पद्धतशीर खटपट सुरू झाली. झारसाहेबांनीं ड्यूमासभा भरूं न देण्याचा हुकूम सोडला. या हुकमास धाब्यावर बसवून ड्यूमासभा भरली व ड्यूमासभेनें सर्व सत्ता आपल्या हातीं आल्याचें जाहीर केलें. पोलिसचे अत्याचार सुरूच होते; पण रशियांतील लोकांच्या सुदैवानें प्रत्येक पोलीसच्या जवळ असलेली काडतुसांची संख्या अगदीं थोडी असल्यामुळें पोलीसला लोकांचे खून फारसे करतां आले नाहींत. याप्रसंगीं अमानुष निर्दयतेच्या व निर्लज्ज अत्याचारांच्या कसोटीस पोलीस उतरले खरे; पण अखेरीस निर्बल ठरले. लोकांनीं पोलीसला खरपूस मार दिला; त्यांच्या कचेऱ्या, त्यांचे कागदपत्र, व त्यांचीं घरेंदारें जाळलीं; व सर्व कैद-खाने खुले करून राजकीय कैद्यांना एकदम मोकळे केले. अशाप्रकारें पेट्रोग्राड शहरावर ड्यूमा सभेची सत्ता बसत चालली आहे असें पाहून झारसाहेबांनीं आपल्या विश्वासांतलें निवडक वीस हजार सैन्य पेट्रोग्राड शहरावर पाठविलें. हें सैन्य पेट्रोग्राड शहरांत येण्याबरोबर लोकांनीं त्यांच्यापुढें गुडघे टेकले, आणि विनंति केली कीं, 'देशोद्धार करूं पाहणाऱ्या देशबांधवांना तुम्ही पाहिजे तर तारा किंवा पाहिजे तर मारा.' लष्करी लोक सामान्यतः उदार मनाचे असतात. पोलीसनीं स्वीकारलेल्या हलकट वृत्तीचा मार्ग त्यानीं स्वीकारला नाहीं. झारच्या विश्वासांतल्या

सदर लष्करनें लोकांना अभिवचन दिलें व लगेच डयूमासभेकडे जाऊन डयूमासभेची सत्ता कबूल केली. डयूमा सभेच्या आज्ञेनें राजवाडयावरील बादशाही निशाण खालीं पाडण्यांत आलें व पेट्रोग्राड शहरभर चोहोंकडे डयूमासभेचें निशाण फडकूं लागलें ! पूर्वीचें प्रधानमंडळ डयूमा सभेनें कैद केलें व डयूमा सभेंतील पुढाऱ्यांच्या नव्या प्रधानमंडळाची नेमणूक करण्यांत आली. ठिकठिकाणच्या प्रमुख सेनापतीनीं व रशियांतील मोठमोठया शहरांनीं या राजक्रांतीस आपली संमति असल्याचें कळविलें. इतक्या थराला गोष्ट गेल्यावर झारसाहेबांनीं आपला बादशाही हक्क सोडून दिल्याचा लेख डयूमासभेस लिहून दिला. सांप्रत रशियाची राजसत्ता डयूमासभेच्या प्रधानमंडळाच्या हातीं आहे. या प्रधानमंडळानें असें जाहीर केलें आहे कीं, परराष्ट्राशीं पूर्वीच्या सरकारनें केलेले सर्व करारमदार नव्या रशियाकडून एकनिष्ठपणें पाळण्यांत येतील व सांप्रतच्या महायुद्धांत यश संपादण्याकरितां लढण्याच्या कामीं कोणाचीहि कसूर नव्या रशियाकडून होणार नाहीं. महायुद्धांत यश संपादन करण्याचा हा निश्चय प्रसिद्ध केल्यानंतर नव्या रशियाचा कार्यक्रम म्हणून खालील गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत. ( १ ) रशियांतील प्रत्येक मनुष्यास मत देण्याचा अधिकार असला पाहिजे ह्या तत्त्वास अनुसरून डयुमासभा लवकरच मोठी लोकसभा बोलावणार असून, रशियांतील राज्यसत्तेचें स्वरूप ह्या लोकसभेकडून ठरविण्यांत येणार आहे. असें जरी असलें तरी रशियांत रिपब्लीकच स्थापण्यांत येईल असें ठरल्यासारखेंच आहे. ह्या ठरावास अनुसरून रशियांतील पूर्वीच्या राजघराण्यांतील सर्व संबंधी स्त्रीपुरुषांना नजरकैदेंत ठेवण्याचा क्रम सुरू झाला आहे. ( २ ) अमीरउमराव, सरदार, तैनातदार व इनामदार वगैरे पूर्वीच्या सर्व हक्कदारांचे जमीन जुमले काढून घेऊन सामान्य लोकांना ते वाटून देण्यांत येणार आहेत. ( ३ ) रशियांतील धार्मिक व इतर निर्बंध काढून टाकण्यांत येऊन स्त्रियांनाहि मुख्य प्रधान होण्यापर्यंतचे पुरुषांचे सर्व हक्क पूर्णत्वानें देण्यांत येणार आहेत. रशियांतील ही राज्यक्रांति फारच अल्पकाळांत, फार थोडें मानवी रक्त सांडलें जाऊन, व अतिशय शांततेनें घडून आली. या विलक्षण राज्यक्रांतीचे परिणाम सर्व देशांतील व सर्व स्थितींतील लोकांच्या आचारविचारांवर फारच विलक्षण झाल्यावांचून रहाणार नाहींत हें उघड आहे. रशियन राज्यक्रांतीचें हें व्यापक स्वरूप एका बाजूस ठेवून महायुद्धांतील दोस्त सरकारांच्या व जर्मन संघाच्या

लष्करी धोरणावर व लष्करी डावपेंचावर ह्या राज्यक्रांतीचे कोणते परिणाम होतील याचा आपण विचार करूं.

युरोपांतील लष्करी परिस्थितीचा विचार करतांना रशियांतील राज्यक्रांतीमुळें रशियाचें लष्करी सामर्थ्य वाढलें किंवा कसें, या मुद्याचा प्रथम विचार केला पाहिजे. रशियन लोकांमध्यें नव्या रशियन सरकारची इभ्रत जुन्या सरकाराहून अधिक वाढली आहे यांत संशय नाहीं. नवें सरकार म्हणजे सामान्य जनसमूहाचा आत्माच होय. अर्थात ह्या आत्म्याच्या इच्छेप्रमाणें जनसमूह पाहिजे तसा डोलणार, हलणार, व लढणार हें उघड आहे. म्हणजे सैनिकांच्या संख्येच्या दृष्टीनें विचार केला असतां नवें सरकार अधिक सामर्थ्यवान ठरतें. पण सैन्याची संख्या म्हणजे लष्करी सामर्थ्य नव्हे. मोठया संख्येचें सैन्य लष्करी दृष्टया समर्थ व्हावयाला त्या सैन्याला दारूगोळयांचा व तोफांचा मुबलक पुरवठा पाहिजे; तरबेज सेनानायकांचें धुरीणत्व पाहिजे; व शत्रूशीं निकरानें झुंझण्यास लागणारी मनाची हौस पाहिजे. या तीन गोष्टींवर राज्यक्रांतीचा कसकसा परिणाम होईल, याचा आपण आतां विचार करूं. नवीन सरकारास दारूगोळयांचा व तोफांचा मुबलक पुरवठा करतां येईल काय ? पूर्वीच्या सरकारच्या कृतीशीं तुलना केली असतां नवें सरकार आणखी चार सहा महिने तरी थोडेसें कमकुवत रहाणार अशीं चिन्हें दिसत आहेत. याचें कारण जुन्या सरकारच्या अखेरच्या महिन्या दोन महिन्यांत रशियांतील आगगाडयांच्या कारभारांत पुरा गोंधळ उडून गेला होता, हें होय. रुमानियाच्या पराभवामुळें रशियाचें दक्षिण लष्कर सेनापति हिंडेनबुर्ग गुण्डाळून फेंकून देतात कीं काय अशी भीति त्यावेळीं वाटू लागली होती. त्या भीतीचें निराकरण करण्याकरितां रशियन सरकारनें ऐन थंडीचे दिवसांत फार तांतडीनें सामानसुमान व सैन्य रुमानियाच्या बाजूला ढकलत नेलें होतें. रशियाच्या आगगाडयांचें बल या कामीं इतकें खर्च झालें कीं, त्याच्यांतील व्यवस्थितपणा अगदीं नष्ट झाला. रुमानियन पराभवामुळें आगगाडयाच तेवढया दमांत उखडल्या असें नव्हे, तर राजमंडळाच्या कर्तृत्वावरील लष्कराचा विश्वास उडाला व राजमंडळहि महायुद्ध चालविण्यासंबंधानें डळमळीत विचाराचें दिसूं लागलें. आपल्या सेनेचा दोनदां मोठा पराभव झाला, यापुढें युद्ध चालविण्यांत हित नाहीं, असें म्हणणारा राजमंडळांतील पक्ष जोरावला व हलके हलके बादशहा तहास अनुकूल होऊं लागले. राजमंडळाच्या ह्या मानसिक स्थितीमुळें

नवीन तक्रारींकडे दुर्लक्ष झालें; अव्यवस्थेची व्यवस्था लावण्याकडे कोणी लक्ष देईना; इतकेंच नव्हे, तर अव्यवस्थेमुळें लोकांनीं दंगेधोपे केल्यास त्या दंग्या-धोप्याचें निमित्त करून, आम्ही दमांत उखडलों आहोंत. आतां तह करण्याशिवाय आम्हांस गत्यंतर नाहीं, असें उजळ माथ्यानें इंग्लंडला कळविण्याची संधि केव्हां मिळते म्हणून जुनें रशियन राजमंडळ वाट पहात बसलें ! डिसेंबर–जानेवारीमध्यें जर्मनीनें सुरू केलेलें तहाचें बोलणें झारच्या राजमंडळानें आनंदानें मान्य केलें असतें; पण इंग्लंडचे नवे मुख्य प्रधान मि. लाईड जॉर्ज यांच्या निश्चयी व करारी तडफेनें केलेली इंग्लंडची प्रचंड तयारी पाहून आम्ही दमांत उखडलों म्हणून कबूल करण्याची झारच्या राजमंडळाला लाजच वाटली ! लोकांच्या दंग्याधोप्याच्या निमि-त्ताची ते वाटच पहात होते. ही संधि त्यांना मिळाली; पण रशियाच्या सुदैवानें झारच्या निघृण पोलिसला हा दंगा मोडतां न येऊन दंग्याधोप्यामुळें महायुद्धाची परिसमाप्ति न होतां झारच्या बादशाही अंमलाचीच परिसमाप्ति झाली ! नवें रशियन सरकार अस्तित्वांत आलें त्यावेळीं जुनें रशियन सरकार दमांत उखडलें होतें, आणि एकदाचा तह झाला म्हणजे सुटलों असें प्रसिद्ध कर-णारे शब्द त्या सरकारच्या जिभेच्या शेंड्यावर आले होते.

झारचें राजमंडळ दमांत उखडलें म्हणजे काय? आस्ट्रो–जर्मनांबद्दल त्यांच्या मनांत स्नेह उत्पन्न झाला होता, असा त्याचा अर्थ नाहीं; आस्ट्रो–जर्मनांविषयींचा द्वेष कमी झाला नव्हता; कान्स्टान्टिनोपल घेण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा कमी झाली नव्हती; आणि युरोपांतील आपल्या महतीच्या आड आस्ट्रो–जर्मन्स येत आहेत हें त्यांच्या मनांतील शल्य पूर्वीच्या इतकेंच त्यांच्या मनाला टोंचत होतें. अँग्लो–फ्रेंचांनीं भलताच आपल्या मनाचा ग्रह करून दिला व त्यामुळें आम्ही फसलों, अशी वृत्ति झारच्या राजमंड-ळांत उत्पन्न झालेली नव्हती. दोस्त–सरकाराच्या ध्येयांतील सत्यतेवर त्यांचा पूर्ण भरंवसा होता. मग ते दमांत उखडले होते म्हणजे काय ? आपला सत्पक्ष असला तरी तो निर्बल आहे, असें त्यांच्या अनुभवास येऊं लागलें होतें. जबरदस्तापुढें सत्पक्षासहि वारंवार मान वांकवावी लागते, अशांतलाच हा प्रसंग दोस्त सरकारवर येऊं पहात आहे, तेव्हां 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' या न्यायानें कसला बसला तह करण्याच्या विचारांत ते होते. स्वतःचा सत्पक्ष आहे अशी त्यांच्या मनाची पूर्ण खात्री असल्यामुळेंच भिडू जर जोरानें लढतो म्हणतो आहे

तर आपण नको कसें म्हणावें असें त्यांना वाटत होतें. आपल्या पक्षाच्या सत्यते-विषयींचा मनाचा जोर 'तह करा' हे शब्द उच्चारूं देत नव्हता, तर निर्बलतेचा येत चाललेला अनुभव वरील अपमानास्पद शब्द उच्चारण्यास जिभेची उठावणी करीत होता. म्हणजे पूर्वीच्या राजमंडळाच्या विचारानें रशियावर निर्बलतेचा छाप मारलेला होता. हें लांछन धुवून टाकण्यास नवें सरकार कितपत समर्थ आहे? झारचें राजमंडळ घाणेरड्या विलासांत व पूर्ण अनीतीच्या चैनींत लोळणारें असल्यामुळें रोमानियाच्या पराभवाबरोबर तें दमांत उखडलें. अनीतींत पुरे बुडलेले लोक अधिकारावरून दूर झाले. दुर्जनांच्या हातची सत्ता सज्जनांच्या हातीं गेली. अर्थात दोनचार चपराकीसरशी उत्पन्न झालेली मनाची दुर्बलता नष्ट झाली. नवीन सज्जन मनानें खंबीर खरे; पण जुन्या घाणीचे ते शत्रू असल्यामुळें लष्करी सामर्थ्य उत्पन्न करण्याबरोबरच जुनी घाण उपसून नष्ट करण्याचा बोजा त्यांच्या शिरावर पडलेला आहे. हें दुष्पट काम त्यांच्यानें कितपत रेटतें याविषयीं त्यांची मित्रमंडळीहि साशंक राहाणें अनुचित नव्हे. जुनी घाण रशियांत कोठकोठें दडून बसली असेल याचा पत्ता नाहीं. असली घाण उपसून काढून देश स्वच्छ करावयाला एक दोन पिढ्या सहज लागतात. ही घाण जाचक व रोगोत्पादक न होण्याइतकी कमी करण्यास निदान दोन तीन वर्षें सहज पाहिजेत. रशियांतील मोठमोठे लष्करी अंमलदार ह्या घाणीच्या अंमलानें धुंद झालेल्या वातावरणांत वाढलेले, ह्या सर्वांना दूर करून त्यांच्या जागीं नवीन लष्करी अधिकारी निर्माण करण्यास दोन चार महिने तरी सहज लागणार. लष्करचा अधिकारी वर्ग बिनजुटीचा; लष्करावर पूर्वीच्या सरकारनें दमांत उखडल्याचा छाप मारलेला; नव्या सरकारला लष्करच्या सुधारणेबरोबरच अंतस्थ स्वच्छतेकडे लक्ष देणें भाग पडलेलें; ही परिस्थिति लक्षांत घेतां रणांगणावरील लढण्याच्या दृष्टीनें नवें सरकार जुन्या सरकाराहून १९१७ सालीं अधिक सुदृढ होईल असें म्हणतां येत नाहीं. शिवाय सज्जनपणा व देशाभिमान यामुळें उत्पन्न होणाऱ्या बलाला नव्या रशियानें एक प्रकारचा आळा घालून घेतला आहे. नव्या रशियानें असें जाहीर केलें आहे कीं, स्वतःच्या देशाबाहेरच्या भूमीचा अभिलाष नव्या रशियास बिलकूल नाहीं. पोलंडची जशी इच्छा असेल तशा पद्धतीचें पूर्ण स्वातंत्र्य पोलंडला देण्याचाहि नव्या रशियाचा इरादा आहे. रशियाला जर तुर्कांची भूमि नको, जर तुर्कांच्या कान्स्टांटिनोपलवर रशियाचा

डोळा नाहीं, तुर्कांचा आर्मिनिया प्रांत खिशांत टाकून उत्तर इराणवर सत्ता चालविण्याची जर महत्त्वाकांक्षा रशियाला नाहीं, आणि पोलंडचें स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाल्यानें जर नव्या रशियास आनंद वाटणार आहे, तर रशियानें लढावयाचें तरी कशासाठीं ? रशियाच्या अंतिम ध्येयासंबंधाच्या सदर पत्रकानें लढण्यांतील हेतूच नष्ट झाला आहे. रशियानें यापुढें लढावयाचें म्हणजे स्वतःच्या फायद्यासाठीं नव्हे ! गेलीं दोनशें वर्षें रशियानें तुर्कांच्या कान्स्टांटिनोपलवर डोळा ठेवला; या महायुद्धांत रशियास कान्स्टांटिनोपल घेऊन देऊं असें अभिवचन इंग्लंडनें रशियास दिलें. असा पूर्व इतिहास असतांहि नव्या रशियानें जुन्या रशियाच्या महत्त्वाकांक्षेचें ध्येय एक जाहीरनामा काढून फेंकून दिलें ! अर्थात् नव्या रशियाची लढण्याची हौस तितकी जाज्वल्य नाहीं, असेंच एक तऱ्हेनें सर्व जगाला कळविण्यांत आलें. मोठमोठ्या जमीनदारांच्या इस्टेटी व जमिनी सामान्य जनसमूहांत वाटून द्यावयाच्या असाहि एक भाग नव्या रशियाच्या कार्यक्रमांत आहे. आपल्या सरकाराला शत्रूचा मुलूख घ्यावयाचा नाहीं; आणि स्वतःच्या देशांत जमिनींची व इस्टेटींची नवीन वाटणी व्हावयाची आहे, इतकें कळल्यावर रणांगणावरील कोणचा सामान्य सैनिक शेताभाताच्या वाटणीच्या वेळीं स्वतःच्या घरीं हजर राहाण्यास आतुर होणार नाहीं ? रशियांतील नव्या सरकारचा कार्यक्रम सामान्य सैनिकांची लढण्याची हौस मारणारा आहे. एकाच गोष्टीसाठीं ते उत्सुकतेनें लढतील ती गोष्ट म्हणजे नव्या सरकारची स्थिरस्थापना होय. नव्या सरकारास अडथळा करणारा शत्रू आहे, असें त्यांच्या मनानें घेतल्यास रशियांतील सैनिक जिवावर उदार होऊन लढतील. नव्या रशियाच्या लष्करी मनाची ही स्थिति ओळखून कावेबाज आस्ट्रो-जर्मन सरकारनें मार्च महिन्याच्या अखेरीस नव्या रशियाबद्दल फार प्रेम व्यक्त केलें, आणि झारची बादशाही सत्ता रशियांत पुन्हां प्रस्थापित करण्याची खटपट आस्ट्रो-जर्मनांकडून होणार नाहीं, असें नव्या रशियास त्यानें अभिवचन दिलें. रशियाचें आम्हास कांहीं द्यावयाचें नाहीं व रशियास आमचें कांहीं द्यावयाचें नाहीं; तेव्हां दोघांमध्यें लढण्यास कांहीं कारणच उरलें नाहीं, अशा स्थितींत इतर देशाचीहि मानहानि न होईल असला तह करण्यास आपण तयार आहों; असें आस्ट्रो-जर्मन सरकारनें जाहीर करून ह्या पुढची तहाची भाषा बोलण्यास रशियानें पुढें यावें असें सुचविलें आहे. इंग्लंड व फ्रान्स यांच्या संमतिशिवाय तहाची भाषा बोलण्यास नवा रशिया

पुढें येईल काय ? नव्या रशियास अंतस्थ शत्रू आणखी कितीएक वर्षें फार रहाणार हें उघड आहे. तेव्हां इंग्लंड व फ्रान्स यांना धोक्यांत घालून केवळ स्वतःच्या स्वास्थ्याकरितां नव्या रशियानें तह केला, ही बदनामी नव्या रशियाच्या टिकाऊपणास कमीपणा आणणारी झाल्यावांचून रहाणार नाहीं. म्हणजे सगळयांचा मिळून तह झाल्यास नवा रशिया तहास तयार होईल, आणि जर्मनीच्या तहाच्या अटी इंग्रजांना व फ्रेंचांना मान्य न झाल्यास एकटयाचा स्वतंत्र तह नवा रशिया आस्ट्रो–जर्मनांशीं करणार नाहीं. स्वतःस लढण्याची मोठीशी हौस नाहीं आणि शस्त्र खालीं ठेवणें स्नेह्यांना अपायकारक, अशी लष्करी स्थिति सांप्रत नव्या रशियांत दृष्टीस पडते. म्हणजे १९१७ सालीं बऱ्याच मोठया प्रमाणावर आस्ट्रो–जर्मनांवर चाल करून जाण्याचें बल रशियाच्या अंगीं दिसणार नाहीं, पण आस्ट्रो–जर्मनांनीं जर पेट्रोग्राडवरच चाल केली, किंवा बादशाही सत्ता रशियांत स्थापूं पाहणाऱ्या रशियांतील देशद्रोह्यांना मदत होईल,असली जर लष्करी हालचाल आस्ट्रो–जर्मनांनीं केली, तर सर्व रशियन राष्ट्र जिवावर उदार होऊन आस्ट्रो–जर्मनांची खोड मोडल्यावांचून राहाणार नाहीं. वरील प्रसंगाशिवाय इतर प्रसंगीं नवें रशियन सरकार, रशियाचे सैनिक, व सामान्य जनसमूह लढण्यापेक्षां अंतस्थ नव्या रचनेकडे अधिक लक्ष देणार हें उघड आहे.

## अमेरिकेचा युद्धांत प्रवेश

महायुद्धांतील लष्करी हालचालींच्या दृष्टीनें रशियांतील राज्यक्रांतीच्याइतकीच महत्त्वाची दुसरी एक गोष्ट एप्रिलच्या पहिल्या आठवडयांत घडून आली आहे. ती गोष्ट म्हणजे अमेरिकेनें एप्रिल ता. ५ रोजीं जर्मनीशीं लढाई पुकारिली ही होय. ही लढाई कां केली पाहिजे, यासंबंधानें प्रेसिडेंट विल्सन यानीं अमेरिकेच्या काँग्रेसला कळविलेला संदेश फार महत्त्वाचा आहे. फाजील विजयेच्छेनें अमेरिका लढाईंत पडली नाहीं, कोणाच्या भूमीचा अपहार करण्याची बुद्धि अमेरिकेला शिवली नाहीं, आणि महायुद्धांत जय मिळविल्यानंतरहि लढाईच्या खर्चाकरितां म्हणून किंवा इतर कारणाकरितां म्हणून जर्मनीपासून खंडणी उकळण्याचा लोभ अमेरिकेला बिलकूल नाहीं. जर्मनी निघृणतेनें व अन्यायानें शांतताप्रिय लोकांचे हक्क पायाखालीं तुडवीत आहे आणि व्यापारी जहाजें बुडविण्याची चांचेगिरी जर्मनीनें सुरू केली आहे. असल्या कुमार्गापासून जर्मनीला परावृत्त करण्याच्या सोवळ्या व सात्विक इच्छेनें अमेरिकेनें हातांत तरवार धरली आहे.

गुप्त बेत करून कुमार्गाच्या मार्गानें अवचित जाऊन सज्जनांना खड्ड्यांत पाडण्याचीं दुष्ट कारस्थानें एकमुखी राजसत्तेला सफल करतां येतात व त्यामुळें मानव जातीवर आजपर्यंत भयंकर संकटपरंपरा ओढवली आहे. असली एकमुखी राजसत्ता संपुष्टांत आणून विमल अंतःकरणानें व सात्त्विक बुद्धीनें उजेडांत बसून राज्यकारभार पाहणारा लोकांचा खुला दरबार अरेरावी राजांच्या सिंहासनांच्या जागीं स्थापिल्याशिवाय सामान्य जनतेस सुखशांति मिळणार नाहीं, असें प्रेसिडेंट विल्सन यांचें मत आहे. ही उच्च ध्येयें अमलांत आणण्याकरितां त्या ध्येयाची जोपासना करणाऱ्या इंग्लंड—फ्रान्स व रशिया येथील बहुजन समाजांनीं चालविलेल्या महायुद्धांत पूर्णपणें पडून सत्पक्षास निर्लोभपणें अमेरिकेनें उचलून धरलें पाहिजे, असें कॉंग्रेसला त्यांनीं कळविलें; आणि लढाई पुकारण्याची व लढाईकरितां दहा लाख नवें सैन्य उभारून हरएक प्रकारें दोस्त सरकारांना मदत करण्याची परवानगी प्रेसिडेंट विल्सन यांनीं कॉंग्रेसपाशीं मागितली. ही परवानगी ता. ५ एप्रिल रोजीं कॉंग्रेसनें दिली. लगेच अमेरिकेनें जर्मनीशीं युद्ध पुकारलें. दोस्त सरकारांचा उज्वल माथा प्रे. विल्सन यांनीं अधिक देदीप्यमान केला व त्यामुळें दोस्त सरकारांच्या सर्व प्रजाजनांत आनंदोत्सव झाला. फ्रान्सचे प्रेसिडेंट, इंग्लंडचे सांप्रतचे व माजी मुख्य प्रधान या सर्वांनी प्रे. विल्सन यांच्या भाषणाचे धन्यवाद गाऊन अमेरिकेचें अभिनंदन केलें. इंग्लंड, फ्रान्स व रशिया येथील वतमानपत्रांनीं प्रे. विल्सन यांचें भाषण म्हणजे युरोपांतील बहुजनसमाजास नवी मिळालेली स्वातंत्र्याची सनदच होय, असे आनंदोद्गार काढले; व आस्ट्रिया आणि जर्मनी येथील बादशाही तक्तें लयाला जाऊन आस्ट्रो—जर्मनांना राष्ट्रमुखी सत्तेची सुखें चाखावयास मिळण्यांतच सांप्रतच्या महायद्धाचें पर्यवसान होणार अशीं गोड भविष्यें वर्तविलीं. रशियांतील राज्यक्रांतीस अमेरिकेनें स्वतःच्या कृतीनें दुजोरा दिला असून सांप्रतचें महायुद्ध म्हणजे एकमुखी राजसत्ता व राष्ट्रमुखी राजसत्ता यांमधील झगडाच होय असें सर्व जगाच्या निदर्शनास आतां आलें आहे. अमेरिका लढाईंत सामील झाल्यानें इंग्लंड, फ्रान्स, इटली व रशिया या चारहि राष्ट्रांत नवीन जोम उत्पन्न झाला आहे. महायुद्धांत आपलें कसें काय होतें या विचारानें अंतःकरणावर पडलेलें दडपण आतां दूर झालें असून सर्वांच्या मनाला हलकें वाटू लागलें आहे. ह्या सुस्थितीचा परिणाम रणभूमीवरील लष्करी हालचालींवर कसा होण्याचा संभव आहे याचा आतां आपण विचार करूं.

अमेरिका दहा लाखांचें नवें सैन्य उभारणार आहे हें खरें, पण आज अमेरिकेशीं सैन्य नाहीं. महिना दोन महिन्यांत दहा वीस हजारच काय तें सैन्य फ्रान्समध्यें पाठवून अमेरिका आपलें निशाण युरोपच्या रणभूमीवर फडकवणार आहे. युरोपांतील सर्व रणभूम्यांची सांप्रतची स्थिति अशी आहे कीं, दहा वीस हजार सैन्य म्हणजे 'शाकाय वा लवणाय वा' असेंच मानलें जाईल. प्रत्यक्ष रणभूमीवर या मिठाचा उपयोग १९१७ सालीं अगदीं अल्प होणारा असला तरी अमेरिकेचें मीठ इंग्लंड व फ्रान्स यांच्या लष्करांतील अळणी-पणा दूर करण्यास पुरेसें झाल्यावांचून रहाणार नाहीं. इंग्लंड व फ्रान्स यांची अडचण आतां दूर झाली. अमेरिकेची अवाढव्य संपत्ति दोस्त सरकारांच्या सेवेस दासी म्हणून हजर रहाणार; अमेरिकेंतील प्रचंड कारखाने दोस्त सरकारांना दारू गोळ्याचा पुरवठा अव्याहत करणार; आणि अमेरिकेची व्यापारी जहाजें अमेरिकेच्या आरमाराच्या संरक्षणानें जर्मन पाणबुड्या बोटींच्या प्लेगाला हरताळ फासणार. पाणबुड्या बोटींच्या प्लेगामुळें १९१७ सालापुढें महायुद्ध सुरू ठेवणें इंग्लंडला कठीण गेलें असतें; पण आतां १९१८–१९ सालीं काय पण १९२० सालींहि महायुद्ध सुरू राहिलें तरी मुख्य प्रधान मि. लाईड जार्ज यांच्या रोजच्या झोपेंत युद्धाच्या काळजीनें यत्किंचितहि बिघाड होण्याचा संभव नाहीं. अमेरिका जर लढाईंत पडली नसती तर १९१७ सालींच फ्रान्सच्या रणभूमींत मोठा विजय संपादून महायुद्धाची परिसमाप्ति करून घेणें इंग्लंडास भाग होतें. कायद्याच्या कोर्टांत खटला लढण्याकरितां दोन पक्ष न्यायाधिशापुढें उभे राहिले असतांना कायद्याप्रमाणें कोणत्या तरी एका पक्षावर पुराव्याचा बोजा पडत असतो. ज्या पक्षावर हा बोजा पडतो त्या पक्षानें पुरावा देऊन आपली बाजू जर सिद्ध केली नाहीं तर विरुद्धपक्षास कांहींएक न करितां आपोआप जय मिळतो. हाच न्याय रणभूमीलाहि लागू आहे. रणभूमीवर एकमेकासमोर दोन दलें लढण्याकरितां उभीं ठाकलीं असतांना सभों-वारची परिस्थिति अशी बनते कीं, दोन पक्षांपैकीं एका पक्षावर दुसऱ्याच्या अंगावर चाल करून जाण्याचा बोजा पडतो. परिस्थितीनें हा बोजा ज्या पक्षावर टाकला असेल त्या पक्षानें विरुद्ध पक्षाचीं हाडें जर मऊ केलीं नाहीं तर विरुद्ध पक्षाच्या गळ्यांत विजयश्री माळ घालते. रशियांतील राज्यक्रांतीमुळें रशिया एक प्रकारानें दमांत उखडलेला, सर्व्हिया व रुमानिया यांना गिळंकृत करून आस्ट्रो–जर्मन

खाडिलकर कृ.प्र.

कृतकार्य झालेले, आणि पाणबुडयांचा प्लेग सुरू करून १९१८–१९ सालचा इंग्लंडचा जोम आंतून पोखरण्यास सुरुवात झालेली, या परिस्थितीनें १९१७ सालीं फ्रान्सच्या रणभूमींत आस्ट्रो जर्मनांवर चाल करून जाऊन त्यांचीं हाडें मोडण्याचा बोजा अँग्लो–फ्रेंचावर टाकला होता; पण अमेरिका महायुद्धांत सामील झाल्यानें १९१७ सालींच जर्मनीचीं हाडें फ्रान्सच्या रणभूमींत मोडलीं पाहिजेत नाहीं तर दोस्त सरकारांना अपजय येईल, अशी परिस्थिति आतां उरलेली नाहीं. अमेरिकेनें रशियाचा लुलेपणा कमी केला आहे; पाणबुडया बोटींच्या प्लेगाची भीति आणखी तीन चार वर्षे बाळगण्याचें कारण उरलें नाहीं; आणि १९१८–१९ सालीं दहा पंधरा लाख नव्या रक्ताच्या व नव्या जोमाच्या जवानांची मदत अमेरिकेहून होणार आहे. ही मदत येऊन पोहोंचण्यापूर्वी खात्रीनें जय मिळणार असें पक्कें वाटल्याशिवाय इंग्लंडनें तरी १९१७ सालींच सोक्षमोक्षाची लढाई कां लढावी ? १९१८ सालच्या वसंतकाळापर्यंत वाट बघण्यास आतां इंग्लंडास हरकत नाहीं. म्हणजे अंगावर चाल करून जाऊन लढण्याचा बोजा अमेरिकेनें इंग्लंडच्या डोक्यावरून उचलून जर्मनीच्या डोक्यावर ठेवला आहे.

## रणांगणावरील हालचाली

सबंध मार्च महिना अँग्लो–फ्रेंच सेनेपुढें पश्चिम रणभूमींत आरासपासून ऐन नदीपर्यंत जर्मनी मागें हटत होता. कोठें पांच मैल, कोठें सात मैल तर कोठें १२ मैल अशा प्रमाणानें जर्मनी मागें हटला. मागें हटतांना जर्मनीनें सर्व देश उध्वस्त केला. झाडें मोडलीं, घरादारांचें मैदान केलें, व सर्व पट्टयावर तृणाची काडीहि ठेविली नाहीं; तरुण स्त्री–पुरुषांना धरून नेलें, आणि म्हातारे कोतारे व लहान मुलें यांच्याजवळ पांच–सात दिवसांची अन्नसामग्री ठेवून दहा पांच खेडयांचीं माणसें एका खेडयांत कोंडून मागें सोडण्यांत आलीं ! ठिकठिकाणचे पूल व रस्ते यांचा विध्वंस करण्यांत आला. अशा रीतीनें जाळपोळ करीत जर्मनीनें सदर मुलूख सोडला. मार्च अखेरीस व एप्रिलच्या प्रारंभीं जर्मनीचें मागें हटणें मंदावलें असून सेंट क्वेंटिनच्या आसपास मोठया निकराची लढाई सुरू झाली आहे. एप्रिलच्या दुसऱ्या आठवडयांत सेंट क्वेंटिन अँग्लो–फ्रेंचांच्या हातीं लागेल असा अंदाज आहे. जर्मनीची ही पीछेहाट कां ? दहा बारा मैल मागें हटलेल्या जागीं नव्या चरांचे चक्रव्यूह जर्मनीनें तयार केले असून ती जागा पूर्वीहून अधिक बिकट

ग्रं. ११८ ८८५४० ज्ञाति. ६८ कि. १=५०

आहे असें म्हणतात. शिवाय सोडून दिलेली जागा साफ मैदान बनली असल्यामुळें अँग्लो–फ्रेंचांचें तोफखानें जर्मनीच्या तोफखान्याच्या माऱ्याखालीं चांगले सांपडले जाण्याचा संभव आहे. सोडून दिलेली जागा जर्मनीच्या रांगेस पोंक आल्यासारखी असल्यामुळें सदर शें–सवाशें मैलांच्या पट्टयांत जर्मनीची रांग आतां सरळ रेषेची झाली आहे. तेव्हां या नव्या जागेचें संरक्षण करण्यास पूर्वींहून कमी लोक पुरणारे आहेत. सनिकांची ही काटकसर कां ? पश्चिम रणभूमींत काटकसर करून शिल्लक टाकलेलें हें सैन्य अँग्लो-फ्रेंचांच्या जंगी हल्ल्याच्या वेळीं ठिकठिकाणीं येणारा तुटवडा भरून काढण्यास पुरेसें होईल, असा जर्मनीचा अंदाज आहे. ह्याशिवाय गेल्या हिंवाळयांत बेल्जम, फ्रान्स, पोलंड व रुमानिया येथील जिंकलेल्या लोकांना वेठीला धरून जर्मनींतील निरनिराळया कारखान्यांत त्यांना कामाला लावून उद्योग-धंद्यांतील लोकांचें नवें दहा लाखांचें लष्कर सेनापति हिंडेनबुर्ग यांच्या हवालीं करण्यांत आलें आहे. कोणच्या तरी रणभूमींतील सेनाशकटाचा चुराडा करण्याचें काम एप्रिल–मे महिन्यापासून सेनापति हिंडेनबुर्ग सुरू करणार आहेत, असें प्रसिद्ध झालें आहे. या नव्या दहा लाख सैन्याची गदा कोणावर फेंकण्यांत येणार ? कोणी म्हणतात पेट्रोगाड शहरावर सेनापति हिंडेनबुर्ग चाल करून जाणार; कोणी म्हणतात, ओडेसा व कीव्ह प्रांतावरच त्यांचा डोळा आहे; तर कोणी ह्मणतात, इटलीच्या डोक्यावर ही गदा आदळण्यांत येईल. इटलीवरच स्वारी होईल असें ह्मणणारांची भिस्त इटलीची रणभूमि फ्रेंच रण-भूमीच्या जवळ असल्यामुळें एकीकडचें सैन्य दुसरीकडे जलदीनें नेतां येईल, या मुद्यावर विशेष आहे. इटलीवर स्वारी करीत असतांना अँग्लो–फ्रेंचांनीं जर विशेष लगट केली तर चटदिशी इटलीच्या बाजूचें सैन्य पश्चिम रणभूमीकडे वळवितां येईल हें खरें; पण त्या बरोबर दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, इटलीची थोडीशी पीछेहाट होऊन एकटया इटलीच्या हातून निभत नाहीं असें ठरतांच अँग्लो–फ्रेंच सैन्य फ्रान्समधून इटलीच्या मदतीला सहज धावून जाईल. इंग्लंड फ्रान्स व इटली या तिघांचें सैन्य व तिघांचा तोफखाना त्या बाजूच्या आस्ट्रो–जर्मन सैन्याहून व सेनापति हिंडेनबुर्ग यांच्या नव्या दहा लाख सैन्याहून अधिक आहे, हें विसरतां कामा नये. म्हणजे पहिल्या एक दोन आठवडयांतच फळी फोडून एकदम आंत घुसतां आलें तर बरें. नाहीं तर इटलीवरील स्वारी म्हणजे गेल्या

सालच्या व्हर्डूनच्या स्वारीची सुधारून वाढविलेली मोठी आवृत्ति होईल इतकेंच. शिवाय अमेरिका महायुद्धांत सामील झाल्यामुळें १९१७ सालींच अँग्लो–फ्रेंचांनीं फ्रान्समधील जर्मनीची फळी फोडली पाहिजे अशांतलाहि भाग उरलेला नाहीं. इटलीच्या व सॅलिनोकाच्या बाजूची आपली फळी भक्कम करून नंतरच फ्रान्समधील मोठ्या चढाईस प्रारंभ होईल. पश्चिम रणभूमींतील लष्करी हालचालींची ही अशी परिस्थिति असल्यामुळें सेनापति हिंडेनबुर्ग यांना पश्चिमेपेक्षां पूर्वच अधिक श्रेयस्कर वाटण्याचा संभव आहे. रशियन राज्यक्रांतीमुळें रशियन सेनाशकटाचा जमाव बराच विस्खळित झाला असला पाहिजे. रशियांतील राज्यसत्ता आतां राष्ट्रमुखी झाली असल्यामुळें रशियाचा एखादा दुसरा पराभव झाला असतां, सर्व राष्ट्र एकदम खवळून उठेल व भलतेंच संकट अंगावर ओढून घेऊन जर्मनींतहि राष्ट्रमुखी सत्ता प्रस्थापित करण्याच्या उद्योगाला लोक लागतील अशी भीति जर्मनींतील राज्यकर्त्यांना व सेनानायकांना एप्रिल–मे महिन्यांत रशियावर चाल करून जात असतां वाटण्याचा संभव आहे. पण अमेरिका महायुद्धांत सामील झाल्यानें यासंबंधाची ' डर तो पीछे रही ' असें जर्मनीस झालें असलें पाहिजे. राष्ट्रमुखी सत्ता जर्मनींतहि स्थापिली गेली पाहिजे असली आरोळी पूर्वेपेक्षां पश्चिमेच्या बाजूनें जर्मनीस अधिक जोरानें ऐकू येत असली पाहिजे. राष्ट्रमुखी सत्ता व अरेरावी सत्ता यांमधील हा झगडा आहे, हें जर्मन लोकांपासून जर्मनीचे राज्यकर्ते कसे लपवून ठेवणार ? सेनापति हिंडेनबुर्ग रशियावर तुटून पडले काय किंवा फ्रान्सवर तुटून पडले काय,सदर मुद्दा लोकांच्या दृष्टीआड करतां येणें शक्य नाहीं. अमेरिका महायुद्धांत पडल्यामुळें, व रशियांत विलक्षण राज्यक्रांति झाल्यामुळें जर्मन राज्यकर्त्यांची स्थिति आतां फार नाजूक झाली आहे. कोठेंना कोठेंतरी मोठा विजय संपादन करून राष्ट्रमुखी सत्ता लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनें पंगू असते असें रणभूमीवर प्रत्यक्ष ठरल्याशिवाय त्यांना गत्यंतर नाहीं. या दृष्टीनें विचार केला असतां असा तर्क निघतो कीं, पश्चिम रणभूमि, इटाली व सॅलिनोका येथें अँग्लो–फ्रेंच व इटालियन सैन्य यांजकडेच चढाई करण्याचें काम सोंपवून सेनापति हिंडेनबुर्ग रशियाच्या बाजूला वळतील, व रशियाच्या बाजूला ओडेसा व कीव्ह या टापूच्या रोखानें चढाइ होईल. पेट्रोग्राडच्या बाजूला नव्या रशियन सरकारास विशेष पाठिंबा आहे; रशियाच्या दक्षिण लष्करांत बादशाही अमलांचे पुरस्कर्ते अधिक आहेत; शिवाय

ओडेसा व कीव्ह हे प्रांत काबीज केल्यानें काळा समुद्र आस्ट्रो–जर्मनांच्या अधिक ताब्यांत जाऊन तुर्कस्थानास पर्यायानें मदत होणारी आहे. मार्च महिन्यांत इंग्रजांनीं बगदाद शहर घेऊन इराणच्या पश्चिम सरहद्दीवर उत्तरेकडून खालीं उतरलेल्या रशियन सैन्याचा इंग्रजी सेनेशीं मिलाफ झाला; इजिप्तच्या बाजूला सुवेज कॅनॉलावरील इंग्रजी सेनेनें तुर्कांच्या पॅलेस्टाईन प्रांतावर हल्ला करून वीस हजार तुर्की सेनेचा पुरा मोड केला. अशा स्थितींत पेट्रोग्राडवरील स्वारीपेक्षां तुर्कांना पर्यायानें मदत करणारी ओडेसावरीलच स्वारी सेनापति हिंडेनबुर्ग यांना अधिक इष्ट वाटण्याचा संभव आहे.

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा एप्रिल--मे महिना

एप्रिल महिन्यांत महायुद्धासंबंधानें तीन गोष्टी महत्त्वाच्या घडून आल्या. रशियन राज्यक्रांतीचें स्वरूप या महिन्यांत पूर्णपणें प्रकट झालें; लढाईचा फैलाव करण्यापेक्षां लढाई मिटविण्याकडे रशियन राज्यक्रांतीचा ओढा अधिक आहे, असें या महिन्यांत दिसून आलें. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व एप्रिल महिनाभर फ्रान्सच्या रणभूमींत चाललेली अँग्लो–फ्रेंचांची जंगी चढाई होय. तिसरी महत्त्वाची गोष्ट अशी झाली कीं, जर्मन पाणबुडया बोटींचा धमाकूळ अंदाजाबाहेर झाला व त्यामुळें इंग्लंडांत एकप्रकारची काळजी उत्पन्न झाली. पाणबुडया बोटींनी जे बळी मार्च महिन्यांत घेतले त्यांचे आंकडे पाहिले असतां रोजची सरासरी तीन चार जहाजांची पडते. पण एप्रिलच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवडयांत दर आठवडयास पन्नास साठ याप्रमाणें एकटया इंग्लंडचीं जहाजें बुडविण्यांत आलीं. याशिवाय दर आठ-वडयास फ्रेंचांचीं दहावीस, इटलीची दहा पांच व नॉर्वेचीं दहा पांच अशीं जहाजें बुडविण्यांत आलीं. इंग्लंडांत नवीन जहाजें बांधण्याचें काम झपाटयानें सुरू झालें आहे; शिवाय अमेरिकेंतहि नवीन जहाजें निर्माण करणारे कारखाने जोरजोरानें काम करीत आहेत. तथापि इंग्लंड व अमेरिका या दोन्ही राष्ट्रांनीं आपली परा-काष्ठा करून दर आठवडयास जितकीं नवीन जहाजें बांधावीं त्याहून अधिक जहाजें जर्मनीच्या पाणबुडया बोटी बुडवून टाकतात, अशी स्थिति आहे. यामुळें इंग्लंडांतील अन्नसामग्री दिवसानुदिवस कमी होत चालली आहे. जर्मनींतील तज्ज्ञांचें असें मत आहे कीं, ये या हिंवाळयाच्या आधीं इंग्लंडांतील शेतीचें नवें धान्य इंग्लं-डांतील लोकांना मिळण्यापूर्वीच इंग्लंडांत धान्याची इतकी महर्गता होईल कीं, त्यामुळें इंग्लंडच्या मुत्सद्यांना तह करणें भाग पडेल. याच हेतूनें जर्मनीनें पाणबुडया बोटींच्या अनियन्त्रित यमपुरीचें प्रदर्शन निर्दयपणें उघडलें. जर्मनीचा हा हेतु साध्य होणें शक्य आहे काय ? जर्मनीचा हा हेतु साधणें म्हणजे समुद्रावरील इंग्लंडचें वर्चस्व जर्मनीच्या पाणबुडया बोटींनीं गिळंकृत करणें होय. पाणबुडया बोटींना नवीन महत्त्व एप्रील महिन्यांत प्राप्त झालें ह्यांत संशय नाहीं पण इंग्लंडचें समुद्रावरील वर्चस्व

डळमळीत करण्याइतकें मोठें हें महत्त्व आहे काय ? जर्मनीची पहिली पाणबुडी बोट जर्मन किनारा सोडून गेल्या सालीं जेव्हां अमेरिकेला जाऊन परत आली त्यावेळेला पाणबुड्या बोटींचें महत्व शास्त्रीय दृष्ट्या प्रस्थापित झालें; व ड्रेड नॉटांच्या मोठ्या आरमाराला निरर्थक करणारा शत्रु जन्मास आला असें भविष्य तज्ज्ञांनीं त्यावेळीं वर्तविलें. पण सांप्रतच्या महायुद्धांत पाणबुड्या बोटींवर विसंबून राहून इंग्लंडांतील अन्नसामग्री आकुंचित करण्याचा उद्योग जर्मनी करील असें कोणासहि वाटलें नव्हतें. एप्रिल महिन्यांत जर्मनीच्या नव्या पाणबुड्या बोटी समुद्रांत फार दूरवर प्रवास करूं शकतात; महिनानमहिना पुन्हां बंदराला परत नाहीं आलें तरी चालेल एवढी हरएक प्रकारची सामग्री त्यांच्यावर राहूं शकते, शिवाय दोनचार तोफा या पाणबुड्यांवर असून त्या व्यापारी जहाजांवर तोफांचे गोळेहि टाकूं शकतात. अशाप्रकारच्या या नव्या शत्रूला हाणून पाडण्याकरितां कांहींतरी युक्ति काढावी म्हणून इंग्लंडांतील कुशाग्र बुद्धीच्या लोकांची एक कमिटी आज दोनतीन महिने एकसारखें काम करीत आहे, पण अद्याप योग्य इलाज सांपडलेला नाहीं.

या पाणबुड्या बोटींचें भय इंग्लंडांत सर्वांनाच वाटूं लागलें आहे. तथापि लार्ड कर्झन, लाइड जॉर्ज आदिकरून इंग्रजी प्रमुख मुत्सद्यांचें असें ठाम मत आहे कीं, अन्नपाण्यासंबंधानें इंग्लंडांतील लोकांना पूर्वीच्या समृद्धीच्या व चैनीच्या दृष्टीनें बरेच हाल सोसावे लागले तरी महायुद्धाच्या शेवटच्या निकालासंबंधानें जर्मन पाणबुड्यांना मुळींच किंमत नाहीं. जर्मन पाणबुड्या बोटींचें भय अंदाजाहून मोठें ठरलें खरें पण तह करण्याइतकी इंग्लंडची उपासमार होणार नाहीं. रोजचीं दहा जहाजें बुडालीं तरी इंग्लंडवर तसलें संकट ओढवणार नाहीं. कारण इंग्लंडनें रोजच्या शिध्यांत काटकसर करण्यास सुरवात केली असून अनावश्यक व चैनीच्या वस्तूंना आस्ते आस्ते बहिष्कारहि घातला आहे. खुद्द बादशाह साहेबांनींहि स्वतःच्या प्रपंचांतील माणसांचा रोजचा शेर योग्य प्रमाणानें तोडला असून सर्व प्रजाजनांनींहि तसेंच करावें, अशी त्यांची आज्ञा जाहीर करण्यांत आली आहे. शिवाय या बाबतींत मे महिन्यांत कायदाहि होण्याचा रंग आहे. मग जर्मन पाणबुड्यांनीं येऊन जाऊन काय केलें ? इंग्लंडचा रोजचा शेर तोडला. शेर तोडला म्हणजे उपासमार नव्हे; चैन नाहींशीं झाली इतकेंच. आठवड्यांतून कांहीं दिवस मांस खावयास मिळावयाचें

नाहीं, कांहीं दिवस बटाटे मिळावयाचे नाहींत, आणि गव्हाच्या रोटीऐवजीं कांहीं दिवस मका वगैरे इतर धान्याच्या भाकरीवर काढावे लागतील इतकेंच. इंग्लंडच्या लोकांचे थोडे हाल होतील ही गोष्ट खरी; पण जर्मनीच्या हालाच्या मानानें इंग्लंडचे हाल कांहींच नव्हत. तेव्हां महायुद्धांतील यशापयशाच्या दृष्टीनें विचार केला असतां इंग्लंडचें नुकसान जर्मन पाणबुड्यांनीं कांहींच केलें नाहीं असें म्हणावें लागतें. दोन तीन बाबतींत मात्र अप्रत्यक्ष नुकसान झालें आहे. चालू वसंतकाळापासून पडीत जमिनीपैकीं दहा लाख एकरांची नवी जमीन इंग्लंडनें लागवडीस आणली आहे. या नव्या लागवडीकरितां लढण्याच्या कामाला उपयोगी पडणारे कांहीं लोक गुंतवून ठेवणें भाग पडलें. लढण्याच्या दृष्टीनें हें एक लहानसें नुकसान झालें तसेंच व्यापारी जहाजें बांधण्याकडेहि पूर्वींहून अधिक लोक गुंतवावे लागले. शिवाय दारूगोळ्याच्या कारखान्यांत लागणारा परदेशचा कच्चा माल पूर्वींइतका मुबलक मिळत नसल्यामुळें थोडीशी हानि झाली. अन्नपाण्यासंबंधानें लोकांना सोसावे लागणारे हाल व वरील किरकोळ बाबतींतील नुकसान येवढें जर्मन पाणबुड्या बोटींनीं मिळविलें; पण गमावलें काय ? सर्व अमेरिका जर्मनीनें गमावली. या बाबतींत इंग्लंडच्या नफानुकसानीचा विचार करितांना अमेरिकेचें कलम इंग्लंडच्या नफ्याच्या बाजूला मांडलें पाहिजे. दारूगोळ्यासंबंधानें, अन्नपाण्यासंबंधानें अमेरिकेचें येवढें मोठें घबाड इंग्लंडला लाभलें आहे कीं, जर्मन पाणबुड्या बोटींनीं अपकार न करतां इंलंडवर उपकारच केले आहेत, तथापि जर्मन पाणबुड्या बोटीसंबंधानें इंग्लंडास काळजी वाटत आहे. ही काळजी या महायुद्धांत आपलें कसें होईल याबद्दलचीं नसून पाणबुड्यांच्या चांचेगिरीवर लागू पडणाऱ्या मात्रेचा शोध अद्याप लागला नाहीं याबद्दलची आहे. जर्मनापाशीं सांप्रत दोनतीनशेंच पाणबुड्या बोटी आहेत असें म्हणतात. या जर पांचसातशें बोटी असत्या तर कसें झालें असतें ? रोज दहा व्यापारी जहाजें बुडतात, त्याऐवजीं वीसपंचवीस जहाजें बुडालीं असतीं; आणि पंचवीसतीस लाख लोक इंग्लंडकरितां जिवावर उदार होऊन लढत असतांहि आणि जगांत अत्यंत बलाढ्य मानलें गेलेलें आरमार मोठ्या तोऱ्यानें समुद्रावर फिरत असतांहि अन्नान्नगत होऊन मानी इंग्लंडला शत्रूपाशीं तहाची याचना करावी लागली असती ! पाणबुड्या बोटीचें सांप्रतचें संकट येवढ्या मोठ्या स्वरूपाचें नाहीं. अन्नपाण्यासंबंधानें थोडेसे हाल सोसले म्हणजे तेवढ्यावरच हें भागणारें

नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

आहे. ड्रेडनॉट जहाजांसारख्या आरमारी किल्ल्यांचे दिवस संपून छोट्या पाण-बुडयांचा मनु सुरू झाला कीं काय अशी शास्त्रीय शंका याठिकाणीं उद्‌भवण्याचा संभव आहे, पण शंकेचा संबंध चालू महायुद्धाशीं सांप्रत येत नसून महायुद्धानंतरच्या शास्त्रीय शोधांशीं विशेष येत असल्यामुळें इंग्लंडच्या समुद्रावरील वर्चस्वास जर्मनीनें आजच पोखरून फोल केलें असें कोणासहि म्हणतां यावयाचें नाहीं. रोजचीं जवळ जवळ दहा जहाजें जर्मन पाणबुडया बोटी बुडवूं लागल्या आहेत, ही गोष्ट खरी; पण ही त्यांच्या कर्तबगारीची पराकाष्ठा आहे; प्रारंभ किंवा मध्य नव्हे. अर्थात् इंग्लंडच्या समुद्रावरील वर्चस्वाचा प्रश्न येवढयानें उपस्थितच होऊं शकत नाहीं. मे–जून महिन्यांत हा आंकडा पंधरावीसापर्यंत गेला तर मात्र गोष्ट निराळी.

एप्रिल महिन्यांत फ्रान्सच्या रणभूमींत लढाईस अगदीं ऊत आला. मार्च महिन्यांत सोम व ऐन नद्यांच्या कांठीं जर्मनीच्या पीछेहाटीस सुरुवात झाली. ती पीछेहाट एप्रिलच्या दुसऱ्या आठवडयापर्यंत एकसारखी सुरूच होती. या पीछेहाटीसंबंधानें जर्मनीचें म्हणणें असें पडतें कीं, इंग्रजांची व फ्रेंचाची तयारी फार मोठी म्हणून अधिक मजबुतीची व प्रसंगीं मागें हटण्यास अधिक सोईची अशी जागा पाहून तेथें लढाईस तोंड देणें इष्ट असल्यामुळें ही पीछेहाट लष्करी धोरणाला अनुसरून करावी लागली. या बाबीसंबंधानें अँग्लो–फ्रेंचांचें म्हणणें असें कीं, सदरहू पीछेहाट केवळ लष्करी धोरणानें आगाऊ आंखून ठेवलेल्या कलमांपैकीं कलम नसून अँग्लो–फ्रेंच सैन्याचें वजन असह्य होऊं लागल्यामुळें जर्मनांनी केलेली ही थारेपालट होय. सोम आणि अँकर नद्यांच्या कांठची जागा नदीनाल्याच्या वळणांनीं पूर्ण व्यापलेली असल्यामुळें प्रसंगीं मैल दोन मैल मागें हटण्यास फार धोक्याची आहे. सामनेवाला जर विशेष जबर असेल तर असल्या जागीं उभें राहून लढणें हें अव्यवस्थितपणाचें लक्षण होय. अशा दृष्टीनें विचार केला असतां जर्मनांचें कृत्य एका अंशीं बरोबर दिसतें, पण जागा गैरसोईची येवढयानें या पीछेहाटीचा चांगलासा खुलासा होत नाहीं. जागा गेल्या सालीं गैरसोईची नव्हती काय? १९१६ सालीं याच ठिकाणीं भयंकर रणकंदन माजून राहिलें होतें. त्यावेळीं जर्मन याच ठिकाणीं मागें हटले; पण त्यांची फळी फुटली नाहीं. मग यंदा ती जागा अधिक धोक्याची कां वाटावी? याठिकाणींच फळी फुटण्याचा कदाचित्

संभव, तेव्हां आगाऊ पीछेहाट करून अधिक मजबुतीच्या जागीं जाऊन बसावें अशी भीति यंदा जर्मनांना कां वाटावी ? नदीनाल्यांच्या स्थानिक दोषामुळें जर्मनांनीं ही पीछेहाट केली हें म्हणणें युक्तिजुक्तीस पटत नाहीं. मग अँग्लो-फ्रेंच सैन्यानें त्यांना मागें रेटलें असें म्हणावें काय ? तेंहि जुळत नाहीं. कारण या पीछेहाटीच्या वेळीं सर्व सामानसुमान घेऊन जर्मन मागें हटले इतकेंच नव्हे, तर सर्व खेडींपाडीं व शेतीभाती त्यांनीं पाळामुळासकट उध्वस्त केली ! अर्थात् जर्मनांची मार्च महिन्यांतील पीछेहाट हें पूर्व संकेताचें फळ होय. रेटारेटींतील अवचित कृत्य नव्हे. हा पूर्व संकेत कशाकरितां ? स्थानदोषाची सबब हा बाहेरचा बाणा होय. याहून अधिक सबळ लष्करी कारण या पीछेहाटीच्या मागें असलें पाहिजे. तें कोणतें ? सेनापति हिंडेनबुर्ग ह्यानीं सोम नदीवरील आपलें ठाणें अशारीतीनें मागें कां आणावें ? जर्मनीची उपासमार चालली आहे; तेव्हां १९१७ सालींच महायुद्धाची परिसमाप्ति करण्याचा बोजा जर्मनीनें सेनापति हिंडेनबुर्ग ह्यांच्यावर लादणें अगदीं साहजिक आहे. १९१७ सालीं सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं जर्मनीला कोठें व कसा जय मिळवून द्यावयाचा ? फ्रान्समध्यें जय मिळवून देऊं या आशेनें त्यांनीं आपले बातबेत ठरविले असले पाहिजेत, ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. १९१७ सालच्या वसंतकाळांत फ्रान्समधील अँग्लो-फ्रेंचांची तयारी मोठी पराकाष्ठेची होणार हें जर्मनीला ठाऊक. गेल्यासालीं व्हर्डूनचे हल्ले विफल झालेले व सोम नदीवरहि मार खाल्लेला हेंहि जर्मनीला ठाऊक. अशा स्थितींत १९१७ सालीं फ्रान्समध्येंचअँग्लो-फ्रेंचांची फळी फोडून महायुद्धाची परिसमाप्ति करून घेऊं, असा बेत करणें शहाणपणाचें कसें ठरणार ? सेनापति हिंडेनबुर्ग हे रशियाच्याच बाजूला विजय मिळविण्याच्या दृष्टीनें पहात असणार. अर्थात् फ्रान्सकडील त्याची दृष्टि बचावाची. आपली फळी फोडूं न देतां मोठा पराभव फ्रान्समध्यें टाळून पूर्वेस मोठा जय कसा मिळवितां येईल, ही सेनापति हिंडेनबुर्ग यांची विवंचना. अँग्लो-फ्रेंचांच्या तयारीच्या मानानें जितके कमी लोक व कमी तोफा फ्रान्समध्यें त्यांना राखणें भाग होईल तितकेच कमी लोक व तितक्याच कमी तोफा फ्रान्समध्यें ठेवून बाकी सर्व लोक व सर्व तोफा पूर्वेस हाकून नेणें त्यांना इष्ट आहे. रशियाकडील कामगिरीकरितां अधिक तोफा व अधिक लोक कसे मिळवावयाचे ? अँग्लो-फ्रेंचांनीं जर कित्येक लाखांनीं आपलें सैन्य वाढविलें तर पराभव टाळण्याकरितां जर्मनांनींहि

सैन्य वाढविलें पाहिजे. हजारो नव्या तोफा जर अँग्लो–फ्रेंचांनीं फ्रान्सच्या रणभूमींत डागल्या तर जर्मनानींहि पराभव टाळण्याकरितां आपल्या तोफांची संख्या थोडीबहुत वाढविली पाहिजे. फ्रान्समध्यें जर सैन्य वाढवावयाचें आणि तोफाहि वाढवावयाच्या तर पूर्वेच्या बाजूला जय मिळविण्यास सैन्य व तोफा शिल्लक कोठे राहातात ? नवीन तोफा निर्माण करणें व नवें सैन्य उभारणें या दोन्ही कामांत इंग्लंड जर्मनीच्या पुढें फार गेलेलें आहे, आणि तोफांची संख्या व सैन्याची संख्या येवढींच लक्षणें पाहून जर युद्धाचा निर्णय द्यावयाचा असेल तर जर्मनी पराभूत झाला असें आज जाहीर करण्यास कोणचीच हरकत नाहीं. पण नुसत्या संख्येवर यशापयश अवलंबून नसतें. सैन्य वापरण्याची हिकमत लागते. संख्या जेव्हां फारच अधिक मोठी होते तेव्हां हिकमतीचेंहि कांहीं चालत नाहीं. अँग्लो–फ्रेंचांची संख्या सध्यां जर्मनीहून अधिक मोठी आहे; पण हिकमतीलाहि धाब्यावर बसविण्याएवढी मोठी नाहीं. तसलें भयंकर स्वरूप या संख्येस प्राप्त होऊं नये म्हणून जर्मनांनीं पाणबुडयांच्या अनियंत्रित संचारास आपली संमति दिली आहे. १९१७ सालीं ही संख्या बरीच मोठी असली तरी हिकमतीच्या जोरावर आपण अँग्लो–फ्रेंचांचें कार्य विफल करूं व रशियास मेटाकुटीस आणू असें सेनापति हिंडेनबुर्ग ह्यांना वाटत आहे. ही हिकमत कोणती ? फ्रान्समध्यें अँग्लो–फ्रेंचांच्या सैन्याच्या व तोफांच्या मानानें होईल तितकें कमी जर्मन सैन्य अडकवून ठेवणें हें या हिकमतीचें सार आहे. थोडया लोकांवर अधिक कामगिरी करून घ्यावयाची या दृष्टीनें विचार केला असतां मार्च महिन्यांतील जर्मनीची पीच्छेहाट व एप्रिल महिन्यांतील घनघोर रणसंग्राम यांची सांगड ठीक पडते किंवा कसें तें आतां पाहूं या. नकाशाकडे जर पाहिलें तर असें दिसून येईल कीं, सोम व अँकर नद्यांच्या कांठीं जर्मन चक्रव्यूहाचें जें पोट पुढें आलें होतें तें पोट मार्च महिन्यांत मागें ओढून घेण्यांत आलें. या योगानें चक्रव्यूहाची लांबी कमी झाली, अर्थात् चक्रव्यूहाचें संरक्षण करण्याकरितां लागणाऱ्या लोकांची संख्या कमी झाली. एवढयानेंच भागत नाहीं. तर पुढें आलेल्या पोटाचा विध्वंस करण्याकरितां अँग्लो–फ्रेंचांनीं जो तोफांचा मोठा जमाव योग्य जागीं मोर्चे बांधून उभा केला होता तो जमाव विफल झाला. जर्मनांनीं मागें हटतांना सर्व प्रदेश उध्वस्त करून झाडझुडूपहि मैदानांवर ठेवलें नाहीं. यामुळें नवीन जागांवर मोर्चे बांधून नव्या चक्रव्यूहावर रोख धरून तोफा पुन्हां

उभ्या करण्याचें काम कठीण झालें. तोफांचे मोर्चे तयार होण्यास अशा स्थितींत दोन तीन महिने तरी लागणार. पूर्वीच्या मोर्चांच्या माऱ्याबाहेर शत्रू गेला. नवीन मोर्चे मोकळ्या मैदानावर शत्रूच्या दृष्टीसमोर व शत्रूच्या तोफखान्यांच्या माऱ्याखालीं बांधावयाचे. या अडचणीमुळें सोमनदीच्या कांठी गोळा झालेल्या तोफा दोनतीन महिने असून नसल्यासारख्या झाल्या.

फ्रान्स व बेल्जममधील रणभूमीचे सामान्यतः तीन भाग करतां येतात. पहिला भाग बेल्जमच्या किनाऱ्यापासून आरासपर्यंत, दुसरा म्हणजे पोट वाढलेला आरासपासून ऱ्हीम्सपर्यंतचा भाग, आणि तिसरा ऱ्हीम्सपासून स्वित्झर्लंडच्या हद्दीपर्यंतचा भाग. या तीन भागांपैकीं ऱ्हीम्सपासून स्वित्झर्लंडच्या हद्दीपर्यंतच्या भागांत गेल्यासालीं व्हर्डूनच्या मोठ्या लढाईकरितां जर्मनीच्या व फ्रान्सच्या तोफा जमा झाल्या होत्या. यंदाहि त्या तेथेंच असल्या पाहिजेत. शिवाय गतवर्षीपेक्षां यंदा फ्रान्सचें मनुष्यबळ वाढलेलें नाहीं. फ्रान्सच्या मनुष्यबळाची पराकाष्ठा गेल्यासालीं झाली. विलक्षण रीतीनें मनुष्यबळ यंदा वाढलें तें इंग्रजांचें, फ्रान्सचें नव्हे. विलक्षण वाढ यंदा तोफांची झाली ती इंग्रजांची; फ्रान्सची नव्हे. अर्थात् जर्मनांची डोकीं फोडावयाचीं तीं इंग्रजी सेना व इंग्रजी तोफखाने यांनीं; फ्रान्सच्या सेनेनें किंवा फ्रान्सच्या तोफखान्यानें नव्हे. मुख्य काम इंग्रजांकडे, फ्रान्स मदतीस. गेल्यासालीं सोमनदीच्या कांठच्या लढायांच्यावेळीं इंग्रजांनीं मुख्य बोजा उचलला व फ्रान्सनें सोमनदीला लागून असलेल्या त्यांच्या भागांत चांगली मदत केली फ्रान्स इंग्लंडच्या शेजारींच जोरानें लढत होतें; त्यामुळें इंग्लंडचें एक पाऊल पुढें पडण्याबरोबर त्याच जागीं, त्याचवेळीं, ताबडतोब फ्रान्सचें पाऊल पुढें पडण्यास इंग्रजांच्या पावलांची मदत झाली. फ्रान्सचें पाऊल पुढें पडे, तत्काळ इंग्रजांच्या भोंवतालचा पेंच ढिला होई व लगेच इंग्रज उशीसरसे चार पावलांची एकदम उडी मारीत! गेल्यासालची सोमनदीच्या कांठची लढाई अशा रीतीनें अन्योन्याश्रयाची झाली. हातांत हात घालून, खांद्याला खांदा भिडवून इंग्रज व फ्रान्स यावेळीं पुढें सरसावले; पण यंदा सोमनदीच्या कांठचें पोट सेनापति हिंडेबुर्ग यांनीं स्वतःच्या पाठीस मिळविल्यामुळें आणि सोम व अँकर नद्यांच्या कांठची रणभूमि दोनतीन महिने घनघोर लढाईस नालायक केल्यामुळें इंग्रज व फ्रेंच यांच्यामधील अन्योन्याश्रयाची सांखळी तुटली. एकाच्या हाताचा उपयोग

दुसऱ्याच्या हातास तत्काळ होण्याचें बंद पडलें. एकाचा पुढें जाण्याचा वेग दुसऱ्यासहि पुढें ओढून नेण्यास सहजरीत्या उपयोगांत आणणें अशक्य झालें. प्रत्यक्ष संबंधानें आपोआप मिळणारे फायदे नष्ट झाले. अशा रीतीनें फ्रान्सची सेना इंग्रजी सेनेपासून सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं अलग केली. सोमनदीकांठचा इंग्रजांचा मोठा तोफखाना कांहीं काळपर्यंत विफल झाला, व अँग्लो–फ्रेंचांची साखळी तुटली, येवढे दोनच फायदे सोमनदीवरील पोंगाच्या पीच्छेहाटीनें जर्मनीला मिळाले असें नव्हे, तर तिसराहि फायदा जर्मनीला मिळाला. तो असाः—बेल्जमच्या किनाऱ्यापासून सोमनदीपर्यंतच्या भागांपैकीं आरासपासून सोमनदीपर्यंत खरी लढाई न चालतां आरासच्या आसपास चाळीस पन्नांस मैलपर्यंतच कायतें घनघोर रणक्षेत्र एप्रिलांतील इंग्रजांच्या चढाईच्या वेळीं होणार, हें जर्मनीला मार्चमध्येंच निश्चित करितां आलें. बेल्जमांतील रणक्षेत्रांपैकीं बराच भाग म्हणजे यिप्रेसपासून किनाऱ्यापर्यंतचा भाग समुद्राचे बांध फोडून पाण्यांत बुडविला गेला आहे. दोन्ही पक्ष तेथें पाण्याच्या तटबंदीच्या आंत उभे आहेत. तेव्हां तो टापू तोफांच्या जंगी चढाईला नालायक. अर्थात् बाकी राहिलेला यिप्रेसपासून आरासपर्यंतचाच भाग काय तो इंग्रजांच्या चढाईला लायक.

याच टापूंत एप्रिल महिन्यांत इंग्रजांच्या जंगी चढाईस सुरुवात झाली. आरासच्या उत्तरेस चाळीस पन्नास मैलांच्या तोंडावर ता. ६ एप्रिल रोजीं तोफांच्या जंगी सरबत्तीस प्रारंभ होऊन पुढें चार पांच दिवसांनीं इंग्रजी सेनेनें हल्ले चढविण्यास सुरुवात केली. सर्व एप्रिल महिनाभर सर्व तोफा एकसारख्या उडत होत्या; व इंग्रजी सैन्य जिवावर उदार होऊन पराकाष्ठेनें लढत होतें. एक महिनाभर इतकें तुंबळ युद्ध माजून राहिलें कीं, त्या लढाईनें व्हर्डूनच्या लढाईस मागें टाकलें. याच सुमारास ऱ्हीम्सच्या वायव्येस व कॉंपेन प्रांतांत फ्रेंचांनींहि जर्मनीवर तुटून पडण्याची पराकाष्ठा केली. अँग्लो–फ्रेंचांची मिळून शंभर मैलांच्या तोंडावर ‘ न भूतो न भविष्यति ’ अशीच प्रचंड लढाई झाली. ही लढाई तीन आठवडे एकसारखी चालली. महायुद्धाच्या पावणेतीन वर्षांच्या इतिहासांत एवढा मोठा तोफांचा समुदाय इतक्या जोरानें एकसारखा उडत राहिल्याचें आणि इतके लाखो लोक शत्रूशीं इतक्या निकरानें लढत राहिल्याचें, दुसरें उदाहरण नाहीं. एप्रिल महिन्यांतील ही लढाई म्हणजे जगाच्या इतिहासांतील अत्यंत

भयंकर लढाई होय, अशीं वर्णनें या लढाईचीं प्रसिद्ध झालीं आहेत. मे प्रारंभाला ही लढाई थोडी थंडावली असून तिनें पुन्हां मेच्या दुसऱ्या आठवड्यांत उचल केली आहे. मे महिन्यांत ही लढाई अशीच चालू राहील हें खरें; पण तिचा जोराचा बहार एप्रिलांत संपून गेला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एप्रिलच्या लढाईत इंग्रजांनीं वीस हजार जर्मन कैद केले व तीनशें तोफा काबीज केल्या. शिवाय इंग्रज व फ्रेंच सरासरीनें चारपांच मैलपर्यंत पुढें सरकले. अँग्लो-फ्रेंच सेना तोफांच्या जिवावर पुढें सरकत राहिल्यामुळें अँग्लो-फ्रेंचांच्या नुकसानीपेक्षां जर्मन सेनेची अधिक नुकसानी झाली. एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यापासून ह्या लढाईत उलट हल्ले करण्यास जर्मनांनीं सुरवात केली असून जर्मन प्रेतानीं सर्व रणभूमि व्यापून टाकली आहे. एप्रिलच्या लढाईत अँग्लो-फ्रेंचांचा एकंदरीनें विजय झाला; पण जर्मनीची फळी फुटली नाहीं. जर्मनीची फळी फोडून जर्मनीला स्वतःच्या सरहद्दीकडे पिटाळून लावण्याकरितां जी जंगी तयारी अँग्लो-फ्रेंचांनीं कित्येक महिने केली, तिचा पहिला बहार फळी न फुटतां जर्मन सैन्याची चांगली खराबी करण्यांत खर्च झाला. तथापि या लढाईत तोफा काबीज करण्याच्या कामांत व जर्मन चें नांवाजलेलें सैन्य चिरडण्याच्या कामांत इंग्रजांना जें यश मिळालें त्या यशाकडे पाहिलें असतां मे-जून महिन्यांतील या चढाईचा दुसरा बहार अधिक संतोषकारक होईल असा भरंवसा सर्वांना वाटत आहे.

याठिकाणीं असा प्रश्न उद्भवतो कीं, मार्च महिन्यांत सोमनदीवर जर्मनांनीं केलेल्या पीच्छेहाटीनंतर आरासपासून व्हीम्रुपर्यंतच्या टापूंत अँग्लो-फ्रेंच तोफा जर्मन चक्रव्यूहाशीं लगट करीपर्यंत महिना दोन महिने ही लढाई लांबणीवर कां टाकण्यांत आली नाहीं ? एका मोठ्या टापूंतील तोफा गप्प बसल्या, फ्रेंच हाताशेजारीं नाहींत, व आरासच्या बाजूलाच लढणें भाग, अशा सदोष स्थळीं व काळीं जंगी चढाईचा पहिला बहार कां खर्च करण्यांत यावा ? अर्जुनाकरितां राखून ठेविलेली शक्ति घटोत्कचावर कां सोडली जावी ? सोम नदीकांठच्या तोफा पुढें सरकून योग्य जागीं उभ्या राहीतों दोन महिने ही घनघोर लढाई पुढें ढकलण्यास कोणची हरकत होती ? इंग्रज सैनिकांनीं व सेनापतीनीं या लढाईत शाबास म्हणवून घेतलें खरें; पण मॅकेन्सनच्या डुनाजीच्या वळणावरहि लढाई न जातां व्हर्डूनच्या वळणावर ही लढाई गेली. कारण

हिंडेबुर्गनें केलेल्या पीछेहाटीमुळें उत्पन्न झालेल्या दोषांचें परिमार्जन होण्यापूर्वी जंगी तयारीचा पहिला बहार खर्च करण्यांत आला. ही लढाई अकालीं झाली; हें असें कां व्हावें ? ही चूक लष्कराची नसून राजकीय परिस्थितीने उत्पन्न केलेल्या प्रसंगामुळें जर्मनांची फळी फोडण्यापेक्षां जर्मन सेना पश्चिम रणांगणांत गुंतवून ठेवून तेथें त्याचा रोज खरपूस समाचार घेण्याची जी जरुरी इंग्रजांना भासूं लागली आहे त्या जरुरीचें हें फळ आहे. आपलें लष्करी धोरण सुव्यवस्थितपणें अंमलांत आणण्यास सध्यां इंग्रजांना सवडच नाहीं. लष्करी धोरण एका बाजूस ठेवून रोज हजारों जर्मन मारून जर्मनांना पश्चिम रणभूमींत डांबून ठेवणें अत्यंत जरूर झालें आहे. या जरुरीच्या दृष्टीनें पाहिलें असतां इंग्रजी सेना आपली कामगिरी फार संतोषकारक रीतीनें पार पाडीत आहे, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं. पण ही जरुरी कोणी कोणावर व कशी लादली ? रशियांतील राज्यक्रांतीनें ही जरुरी उत्पन्न केली. रशियांतील राज्यक्रांति पेट्रोग्राड येथें असलेल्या सैनिकांच्या व कामकऱ्यांच्या संघानें घडवून आणली. सैनिकांच्या आणि ह्या कामकऱ्यांच्या पुढाऱ्यांचें असें मत मार्च महिन्यांतच जाहीर झालें कीं, रशियानें दुसऱ्या कोणत्याहि मुलखाचा अभिलाष धरतां कामा नये. हें मत जाहीर होण्याबरोबर आस्ट्रो—जर्मनांनीं रशियास असें उलट कळविलें कीं, तुम्ही आमच्या मुलखाचा अभिलाष धरूं नयेत आम्ही तुमच्या मुलखाचा अभिलाष धरूं नये हें तत्त्व आम्हांस मान्य आहे. याच सुमारास आस्ट्रियाच्या बादशहानें असें कळविलें कीं, कोणालाच अपमानास्पद होणार नाहीं असला तह करण्यास आम्ही राजी आहोंत. यानंतर अर्थातच द्राविडी प्राणायामच्या दृष्टीनें एप्रिल प्रारंभापासून तहाच्या वाटाघाटीस लांबून लांबून सुरुवात झाली. डिसेंबरमधील तहाची वाटाघाट ज्याप्रमाणें इंग्लंडनें बसल्याजागींच धुडकावून लाविली त्याप्रमाणें आतां करणें योग्य नव्हे; कारण आतां रशिया लढण्याच्या कामीं अगदीं निरुत्साह झालेला आहे, आणि दोस्तांना खड्ड्यांत पाडण्याचें पातक लागूं नये येवढ्याच करितां रशियन सैन्य रणांगणावर उभें आहे. पेट्रोग्राड येथें कामकऱ्यांच्या व सैनिकांच्या संघाचें वर्चस्व विशेष आहे. या संघाच्या पाठबळाशिवाय रशियांतील नवें सरकार अल्पायु होण्याचा संभव आहे, आणि या संघाच्या पुढाऱ्यांचें व जर्मन सोशियालिस्टांचें संगनमत झालें असून

तसाच प्रसंग आल्यास रशियानें एकट्यानें जर्मनीशीं तह करून या महायुद्धाच्या कटकटींतून मुक्त व्हावें असें उघडपणें म्हणण्यापर्यंत या संघाची मजल आलेली आहे. नवें रशियन सरकार या कार्गी आपल्या अनुयायांची समजूत घालण्यांत गुंतलें असून तें काम सुलभ व्हावें म्हणून जर्मनीचा नक्षा उतरण्याकरितां एप्रिल महिन्यांत आपल्या जंगी तयारीचा पहिला बहार इंग्रजांना खर्च करावा लागला. मे जून महिन्यांतहि ही लढाई जरी जर्मनांची फळी फुटली नाहीं तरी, अँग्लो–फ्रेंचांना जोरानें चालू ठेवावी लागेल. कारण हे दोन महिने आणीबाणीचे आहेत. लढाई संबंधानें आणीबाणीचे नव्हेत, तहाच्या वाटाघाटीसंबंधानें आणीबाणीचे आहेत. पश्चिम रणभूमीशिवाय युरोपांत इतर सर्व रणभूमीवर चोहोंकडे सांप्रत सामसूम आहे. बगदादच्यापुढें समारापर्यंत जनरल मॉंड यांचें ठाणें गेलें असून इजिप्शियन सैन्यानें पालिस्तैनमधील गाझाला शह दिला आहे. या सर्व इंग्रजी सेनेच्या यशस्वी हालचाली होत; पण इंग्रजांशिवाय इतर सर्व ठिकाणीं महायुद्ध गारठलेलें आहे. एप्रिल मे महिन्यांत हें युद्ध बर्फामुळें गारठलेलें नसून रशिया एकटा स्वतंत्र तह करतो कीं काय ह्या धास्तीनें गारठलेलें आहे. रशियास एकट्यास स्वतंत्र तह करूं न देतां रशियाचें मन खंबीर करण्यासाठीं व तसें करणें कठीण दिसल्यास सर्वांचा मिळून तह करण्यासाठीं कांहीं तरी बोलणें चालणें अमेरिकेंत सुरू झालें आहे. इंग्लंडचे परराष्ट्रीय प्रधान मि. बाल्फर, फ्रान्सचे माजी मुख्य प्रधान मि. विव्हॅनी व सेनाध्यक्ष मि. जोफ्रे व इटलीचे कांहीं मुत्सद्दी एप्रिलच्या तिसऱ्या चौथ्या आठवड्यांत अमेरिकेंत गेले. ते ह्या तहाच्या वाटाघाटीसंबंधानें गेले असावेत, असा अंदाज आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटची गुप्त सभा ता. १० मेला व्हावयाची असून त्याच्या आधीं जर्मनीच्या तहाच्या अटी स्वित्झर्लंडच्या वकिलामार्फत अमेरिकेचे प्रेसिडेंट विल्सन यांना कळविण्यांत येणार आहेत, असें म्हणतात. या तहाच्या वाटाघाटीच्यावेळीं म्हणजे मे व जून या दोन महिन्यांत रशियानें धीर सोडूं नये व जर्मनीनेंहि शेफारून जाऊं नये म्हणून इंग्रजी सेनेनें लष्करी धोरणाची विशेष पर्वा न करतां जर्मन सेनेचा रोज संहार करीत राहणें भाग आहे. एप्रिल महिन्यांत इंग्रजी सेनेनें हा संहार चांगला केला. मे–जून महिन्यांत तहाच्या वाटाघाटीला अनुसरून संहाराचेंहि काम तसेंच पुढें चालू राहील, हें सांगणें नलगे.

———

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा मे-जून महिना

एप्रिल महिन्याप्रमाणेंच मे महिन्यांतहि फ्रान्सच्या रणभूमींत भयंकर लढाया झाल्या. अँग्लो-फ्रेंच सैन्याचें पाऊल या लढयांत थोडेसें पुढें सरकलें; पण एप्रिलच्या मानानें पुढें सरकण्याची ही गति बरीच मंदावली आहे असें दृष्टीस पडलें. एप्रिल अखेर जर्मनांचे उलट हल्ले सुरू झाले; व मे महिन्यांत अँग्लो-फ्रेंचांच्या इतकेच हल्ले जर्मनांनीं करून शांपेन प्रांतांत फ्रेंचांवरच उलट चढाई करण्याचा रंग जर्मन हालचालींत दिसूं लागला. जर्मनांची ही हालचाल मे महिन्यांत कदाचित् विशेष बळावली असती, पण इटलीनें याच सुमारास आपल्या पूर्व सरहद्दीवर उत्तरेच्या टोंकापासून खालीं ट्रिस्टीपर्यंत जोराचे हल्ले आस्ट्रियावर करून ट्रिस्टीच्या बाजूला आस्ट्रियास कांहीं मैल मागें रेटल्यामुळें फ्रान्समधील जर्मनीचा जोर कमी झाला. आणि सर्वांचें लक्ष इटालियन रणभूमीनें आपणांकडे ओढून घेतलें. पहिल्या धडकीच्या हल्लयांत इटलीला चांगला जय मिळाला; व इटलीची ट्रिस्टीच्या बाजूची मोहीम यशाच्या मार्गाला लागलीसें भासलें. ह्या कामीं इंग्रजी तोफांनीं इटलीस चांगली मदत केली ही समाधानाची गोष्ट होय. इटलीजवळ जरूर तितकें मनुष्यबल आहे. पण गेल्यासालीं तोफांची उणीव फार होती व त्यामुळें ट्रेन्टिनो प्रांतांत इटलीला माघार खावी लागली होती, पण यंदा ही तोफांची उणीव इंग्रजांच्या दीर्घोद्योगामुळें भरून निघाली असून गेल्या सालपेक्षां इटली आज अधिक समर्थ आहे. हें नवें सामर्थ्य इटलीनें मे महिन्यांत बरेंच प्रकट केलें. पण रशियाच्या बाजूला सर्व ठिकाणीं सामसूमच असल्यामुळें आस्ट्रियाला सैन्याची व तोफांची कुमक इटलीच्या बाजूला पाठवितां आली. एक दोन आठवडयांतच ट्रिस्टी घेण्याचा इटलीचा आवेश इटलीस आवरून धरावा लागला. सर्व मे महिनाभर फ्रान्सच्या रणभूमीची जी स्थिति होती तीच स्थिति मे अखेरीस व जूनच्या प्रारंभीं इटलींतहि रणभूमीची झाली. जूनच्या आरंभीं अँग्लो-फ्रेंच व इटालियन सैन्य ऑस्ट्रो-जर्मनांना मगरमिठी घालून रोज जोरजोरानें लढत आहे. दोन्ही पक्ष एकमेकांवर सारखेच जोराचे हल्ले करीत आहेत. अँग्लो-फ्रेंचांनीं व इटालियनांनीं तेवढे हल्ले करावेत व जर्मनांनीं नुसत्या बचावाच्या उद्योगांत निमग्न असावें अशी स्थिति उरलेली नाहीं. उलट हल्ले करण्याचें काम ऑस्ट्रो-जर्मनांनींहि केलेलें आहे.

आणि अँग्लो-फ्रेंच व इटालियन सैन्याला विसावा द्यावयाचा नाहीं असा जर्मनीचा संकल्प दृष्टीस पडूं लागला आहे. एप्रिल व मे या दोन महिन्यांत फ्रान्सच्या व इटलीच्या रणभूमींत जवळ जवळ एक लाख जर्मन सैन्य कैद करण्यांत आलें. व लहान मोठया तीनचारशें तोफा हिसकावून घेण्यांत आल्या ! असें असतांहि जूनच्या प्रारंभीं नव्या तोफा आणून जर्मनी हट्टानें जोराचे उलट हल्ले करण्यास किमपीहि शिथिलता दाखवूं लागलेला नाहीं. इंग्रजांनींहि नव्या चढाईची तयारी मे अखेरीस जोराची केली असून जूनच्या प्रारंभाला तोफांच्या भयंकर सरबत्तीस सुरुवात केली आहे. या सर्व चिन्हांवरून असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, जून व जुलई महिन्यांत रणकन्दनाचें मुख्य काम फ्रान्सच्या रणभूमींतच चालून इटलीची रणभूमीहि चांगली जागी राहील. मार्च, एप्रिल व मे असे तीन महिने ज्या लढाया जोरजोरानें फ्रान्समध्यें चाललेल्या आहेत त्या लढाया आणखी दोन तीन महिने तितक्याच जोरानें चालल्यावांचून राहाणार नाहींत. सहा महिने एकसारखे चालणाऱ्या ह्या रणकंदनाचा मध्य जून महिन्यांत येत असल्यामुळें जून महिना कदाचित् एप्रिल महिन्यावरहि संहाराच्या दृष्टीने ताण करील असें ह्मणावें लागतें. दोन्ही बाजूंचा हट्ट जून-जुलई महिन्यांत विकोपास जाईल. सोक्षमोक्ष करून घेण्याच्या इराद्यानें व कितीएक प्रसंगीं लष्करी धोरण एका बाजूस ठेऊन व नफानुकसान मनीं न आणून संहाराचा खून अंगीं चढण्याच्या आवेशानें व बेपर्वाईनें लढाया माजून राहून रक्ताच्या नद्या फ्रान्सच्या व इटलीच्या रणभूमींत वाहूं लागतील. कारण जून व जुलई हे दोन महिने देखील एप्रिल व मे या महिन्याप्रमाणें महायुद्धाच्या इतिहासांत आणीबाणीचे गणले जातील. एप्रिल व मे या दोन महिन्यांत निकालाच्या दृष्टीनें जरी नसल्या तरी संहाराच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीच्या ठरल्या जातील असल्या लढाया फ्रान्समध्यें झाल्या. एक दोन महिन्यांत येवढा मोठा संहार झाला. असलीं उदाहरणें इतर युद्धांतहि क्वचित्च ठिकाणीं नमूद केलेलीं दृष्टीस पडतील, जवळ जवळ एक लाख जर्मन सैन्य कैद करण्यांत आलें. अर्थात् मेले व जखमी झालेले यांची संख्या चार पांच लाखांहून अधिक असली पाहिजे. या दोन महिन्यांत अंगावर चाल करून जाण्याचे काम अँग्लो-फ्रेंचांकडे होतें. चराच्या युद्धांत चढाई करणारांचें नुकसान विरुद्ध पक्षाच्यापेक्षां तिप्पट चौपट होत असतें. या नियमाला अनुसरून हिशेब केला असतां अँग्लो-फ्रेंचांचें नुकसान दहा पंधरा लाखाहून अधिक असलें पाहिजे

असें अनुमान निघतें. पण वस्तुतः तसें नुकसान झालेलें नाहीं. हल्लीं इंग्रजांच्या तोफखान्याची तयारी फारच मोठी झालेली आहे. तोफांच्या माऱ्याखालीं शत्रूकडील चरांची इतकी धुळदाण उडविण्यांत येते कीं, पायदळ ज्यावेळीं चरांच्या जवळ जाऊन पोंचतें त्यावेळीं शत्रूकडील लोक चरामध्यें फारसे जिवंतच रहात नाहींत. तोफखान्यांची अशी जंगी तयारी असल्यामुळें जर्मनांहून अधिक नुकसान इंग्रजांचें झालें नाहीं म्हणतात. दुसऱ्या बाजूनें असें प्रसिद्ध झालें आहे कीं, इंग्रजांच्या तोफांची जंगी तयारी जर्मन लोक ओळखून असल्य पुळें त्यांनीं हल्लीं फ्रान्समध्यें चरांची व्यवस्था फार निराळ्या प्रकारची केलेली आहे. तोंडाला लढणाऱ्या चरांच्या मागें दूरवर तिरप्या जाणाऱ्या चरांच्या रांगा तयार करून ठेविलेल्या असतात. आणि तोफखान्यांचा भडिमार सुरू झाला म्हणजे तोंडावरच्या चरांतील लोक मागें जाऊन दडून बसतात. व शत्रूकडील पायदळ हालूं लागलें म्हणजे इषारत पोंचतांच तोंडावरच्या चरांत शत्रू पोंचण्याच्या आधीं जाऊन बसतात. म्हणजे दोन दोन तीन तीन दिवस होणारा तोफांच्या गोळ्यांचा वर्षाव सामान्यतः रिकाम्या चरावरच होत असतो. तोफांच्या लढाईच्या वेळीं चर रिकामे ठेवावयाचे व पायदळ हातघाईवर आलें म्हणजे चर भरून काढावयाचे, अशा प्रकारची योजना केल्यामुळें जर्मनीचें नेहमींहून फार कमी नुकसान झालें व इंग्रजी तोफांचे गोळे वायां गेले असें जर्मनीचें ह्मणणें आहे. कसेंहि असो, एप्रिल–मे महिन्यांत मोठें तुम्बळ युद्ध झालें व कांहींच निर्णय लागला नाहीं, येवढी गोष्ट मात्र खरी. दोन महिने भयंकर संहार होऊन जर रणदेवता निकाल देत नाहीं तर त्याच त्याच ठिकाणीं त्याच त्याच मुद्यावर रणभूमीला कौल लावण्यांत तरी पुरुषार्थ कोणता? जून–जुलई महिन्यांत इंग्रजांनीं तरी जर्मनांवर चढाई करून कां जावें ! बरें, इंग्रजांचे हल्ले मदावले तर जर्मनीनें तरी उलट हल्ले कां चढवावे ? फ्रान्सच्या रणभूमींत यासालीं निकाल लागू शकत नाहीं एवढें निदान गेल्या तीन महिन्यांच्या लढायांनीं ठरविलें आहे. पुढील सालच्या वसंतकाळांत हा निकाल लागल असें तज्ज्ञांची वाचा बोलू लागली आहे. एप्रिल–मे महिन्यांतील लढाया फ्रान्सला समाधानकारक झाल्या नाहींत असें फ्रान्सचें लोकमत बनत चाललें असून क्षुब्ध झालेल्या लोकमताला शांत करण्याकरितां फ्रेंच सरकारला मुख्य सेनापति बदलावा लागला. पुढील सालीं अमेरिकेचें पांच सहा लाख सैन्याचें बल फ्रान्समध्यें येऊन पोंचल्यावर अँग्लो–

फ्रेंचांना अनुकूल परिस्थिति उत्पन्न होईल, असें आश्वासन देण्यांत येत आहे. इंग्लंडांतून हिंदुस्थानांत नुकतेच परत आलेले ना. सिंह यांनीं कलकत्त्यास जूनच्या प्रारंभीं असे उद्गार काढले आहेत कीं, या महायुद्धांत अखेरीस इंग्लंड विजयी होणार याविषयीं इंग्लंडांत कोणास शंका नसली तरी आणखी वर्ष दोन वर्षें हें महायुद्ध चालणार असा इंग्लंडांतील वरच्या लोकांचा अंदाज आहे. म्हणजे अडीच तीन वर्षांच्या ऐवजीं पांचसहा वर्षांची आयुर्मर्यादा महायुद्धास देण्याकडे तज्ज्ञांचा कल पडूं लागला आहे. यासालीं जर फ्रान्सच्या रणभूमींत अनुकूल परिस्थिति नाहीं व पुढील सालीं जर ती अनुकूलता प्राप्त व्हावयाची आहे तर जून, जुलई महिन्यांत फ्रान्सच्या रणभूमींत भयंकर संहाराच्या लढाया होतील असा अंदाज कां ? हा संहार करण्यास इंग्लंडनें काय, फ्रान्सनें काय, जर्मनीनें काय, किंवा इटलीनें काय कां प्रवृत्त व्हावें ? निकाल होईलसें कोणासच वाटत नाहीं मग संहाराकडे प्रवृत्ति कां ? या प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां आपणांस आतां रणभूमि सोडून रशियन राज्यक्रांतीनें उत्पन्न केलेल्या नव्या परिस्थितींतील विलक्षण गुंतागुंतीकडे वळलें पाहिजे.

रशियाची अंतस्थ स्थिति थोडथोडी निवळत चालली आहे. रशियांतील राज्यक्रांति घडवून आणण्याला ड्यूमा सभेची बुद्धिमत्ता जशी कारणीभूत झाली त्याप्रमाणें कामकरी व सैनिक यांच्या प्रतिनिधींची पेट्रोग्राड येथील कमिटीहि कारणी-भूत झाली. राज्यक्रांति करणारें शरीरबल या कमिटीनें उत्पन्न केलें. सेनापति अलेक्झीपसारख्या प्रमुख सेनानायकांची ही सहानुभूति या राज्यक्रांतीस मिळाल्या-मुळें झारच्या हातांतील शरीरबलहि झारला निरुपयोगी ठरलें इतकेंच नव्हे, तर उलट क्रांतिवाल्यांना मिळालें. कामकऱ्यांच्या कमिटीचें शरीरबल, ड्यूमा सभेची म्हणजे रशियांतील मध्यमवर्गाची बुद्धिमत्ता व सेनानायकांची सहानुभूति या त्रिवेणी संगमाने रशियन राज्यक्रांति घडवून आणिली. राज्यक्रांति घडल्यानंतर या तीन शक्तींचा पूर्ण मिलाफ न होतां सदर तीन नद्या पुन्हां विभक्त होऊन वाहूं लागल्या. कामकऱ्यांच्या कमिटीचें म्हणणें पडलें कीं, आमच्या हातापायांनीं ही राज्यक्रांति घडवून आणिली तेव्हां आम्ही ठरवूं त्याच दिशेनें रशियाचा राज्यकारभार यापुढें हाकलला गेला पाहिजे. सांप्रतचें महायुद्ध हें बड्या बड्या सरदारांच्या व कोट्याधीशांच्या स्वार्थाकरितां, महतीकरितां व इज्जतीकरितां चाललेलें आहे.

यांत सामान्य जनसमूहाचें कांहींच हित नाहीं. वैभव वाढावयाचें वरच्या थोडक्या लोकांचें; आणि मरणाची पाळी यावयाची खालच्या बहुजनसमाजावर ही स्थिति आम्हांस बिलकूल मान्य नाहीं. कोणत्याहि राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राचा मुलूख स्वतःच्या राज्यास जोडूं नये किंवा शेजाऱ्यापाजाऱ्यापासून खंडणीहि घेऊं नये. प्रत्येक राष्ट्रास तेथील बहुजनसमाजास पसंत पडेल अशी राज्यव्यवस्था अमलांत आणून आपल्या देशाच्या सुखशांतीची स्वेच्छेला येईल तशी वाढ करून घेण्याची पूर्ण अखत्यारी असावी व इतरांनीं त्यांच्या कारभारांत किमपीहि ढवळाढवळ करूं नये. वरील प्रकारच्या मतांनीं प्रेरित होऊन कामकऱ्यांच्या कमिटीनें नानाप्रकारचे हुकूम रशियन सैन्यास व रशियन लोकांस एकसारखे सोडण्याचा सपाटा चालविला. रशियन सैन्यास या कमिटीनें कळविलें कीं, झारच्या वेळीं नेमल्या गेलेल्या अधिकाऱ्यांना तुम्ही मुजरा करण्याचें कांहींच कारण नाहीं. तुमचे तुम्ही अधिकारी निवडा आणि जर्मनी जर कोणी कोणाचा मुलूख घ्यावयाचा नाहीं या तत्त्वावर तह करण्यास तयार असेल तर तुमचा तुम्हींच तहहि घडवून आणा. वरील प्रकारचे कामकऱ्यांच्या कमिटीचे हुकूम रशियन सैन्यांत वाचले गेल्यानंतर सैन्याचे अधिकारी व सैन्य या दोहोंमध्यें एकदम दुफळी झाली. सैन्याच्या अधिकाऱ्यांचा ओढा ड्यूमा सभेंतील बुद्धिमान पुढाऱ्यांच्या बाजूला वळला आणि सैनिकांची वृत्ति कमिटीच्या बाजूची झाली. लढाई करून करून सैनिक दोन तीन वर्षें थकलेले; राज्यक्रांतीमुळें आपल्या घरादारांची सांपत्तिक स्थिति सुधारेल या आशेनें तहाची वाट पहात ते बसलेले; अशा स्थितींत कामकऱ्यांच्या कमिटीच्या हुकमांचा त्यांच्या मनावर भलताच परिणाम झाला. युद्धावरचें त्यांचें मन उडालें; लढण्याची हौस मावळून गेली; व अधिकाऱ्यांचे हुकूम धाब्यावर बसविण्यांत येऊं लागले; कांहीं लोक सैन्य सोडून घराकडे निघून गेले; व बाकी राहिलेल्यांनीं आपलें नवेंच अधिकारी मंडळ उत्पन्न केलें. सैन्याची शिस्त बिघडली इतकेंच नव्हे, तर निरनिराळ्या टापूंतील सैन्यानें समोरच्या शत्रूशीं म्हणजे जर्मनांशीं दळणवळण सुरू करून वैरभावाच्या ऐवजीं तात्पुरत्या स्नेहभावानेंहि वागण्यास सुरुवात केली. आस्ट्रो–जर्मनांनींहि या संधीचा चांगला फायदा घेतला. मुलूख नको व खंडणी नको हीं दोन्ही तत्त्वें जर्मनीस मान्य असून या तत्त्वानुसार रशियाशीं स्वतंत्र तह करण्यास जर्मनी एका पायावर तयार

असून इंग्लंडच्या फायद्याकरितां तुम्ही फुकाचें कां मरता? असें नानातऱ्हेनें रशियन सैन्याला व रशियन सोशालिस्टांना विचारण्याचा जर्मनीनें धूमधडाका चालविला. जर्मनीचा कावा ड्यूमा सभेच्या पुढाऱ्यांनीं ओळखिला. आज रशियाशीं स्वतंत्र तह करून फ्रान्सच्या सैन्याचा पक्का चुराडा करावयाचा आणि नंतर रशियासहि अंकित करण्यास तयार व्हावयाचें अशांतलें हें बोलणें होतें. त्यांतलें विष ड्यूमासभेच्या तेव्हांच ध्यानांत आलें व ड्यूमासभेनें नेमलेल्या नव्या सरकारनें स्वतंत्र तह करण्याचें नाकारलें. स्वतंत्र तह करण्याचें नाकारलें खरें; पण सैन्याची घडी बिघडली त्याची वाट काय? नव्या सरकारनें हुकूम सोडावे व सैन्यानें अमान्य करावे अशी स्थिति झाली. या स्थितीचें वर्णन रशियन मुख्य प्रधानांनीं फार चांगल्या रीतीनें केलें आहे. नव्या रशियाचा नांवलौकिक राखण्याची जबाबदारी तेवढी आमच्यावर, आणि राष्ट्रांत हुकूम चालतो कामकऱ्यांच्या कमिटीचा. हुकूम करण्याचा अधिकार या कमिटीच्या हातीं, पण असकें तमकें घडवून आणलेंच पाहिजे अशी जबाबदारी या कमिटीवर कांहींच नाहीं. घोड्यावर बसावयाचें एकानें, लगाम दुसऱ्याच्या हातीं, अशांतला हा प्रकार. ही स्थिति पालटण्याकरितां मे महिन्यांत नव्या रशियन सरकारची पुनर्घटना करण्यांत आली. जर्मनीचा नक्षा उतरविलाच पाहिजे असें ठासून सांगणाऱ्या दोन तीन प्रमुख प्रधानांना त्यांच्या जागेवरून काढून टाकण्यांत आलें आणि कमिटीच्यातर्फेचे चार पांच पुढारी प्रधान-मंडळांत सामील करून घेण्यांत आले. सोशियालिस्ट परराष्ट्रीय प्रधान झाले व सोशियालिस्टच लढाईखात्याचे प्रधान झाले. या नव्या प्रधान-मंडळानें असें ठरविलें कीं, मुलूख व खंडणी नको या तत्त्वावरच तह करावयाचा; पण तो तह एकट्या रशियापुरता न करितां सर्वांचा मिळून. या तत्त्वाला अनुसरून तह घडवून आणावयाचा आणि तसा तह घडवून येईतों लढण्याच्या कामीं दोस्त सरकारांना शक्य ती मदत करावयाची. बऱ्याच मारामाऱ्या व झटापटी होऊन ड्यूमासभा व कामकऱ्यांची कमिटी यांच्यामध्यें एकमत झालें. आणि मे अखेरीला रशियन सैन्य व जर्मन सैन्य यांच्यामध्यें जें स्नेहभावाचें दळणवळण चाललें होतें—म्हणजे रणभूमीवरच जो एक स्वतंत्र तह होऊन राहिला होता त्या तहाचें—तें दळणवळण बंद पाडण्यांत आलें. पण दुसरी एक कटकट मे महिन्यांतच उत्पन्न झाली. मुलूख नको व खंडणी नको या तत्त्वावर सर्वांचा मिळून तह घडवून आणण्याविषयींचा रशियन कामकरीपक्षाचा

हट्ट विशेष वाढूं लागला; आणि मुलूख नको व खंडणी नको या शब्दांच्या अर्थाची ओढाताण सर्व युरोपखंडभर सुरू झाली. आस्ट्रो–जर्मनांनीं वरील मंत्र कबूल केला. पण अर्थाच्या वेळीं त्या मंत्राला भलतीच दिशा दाखविली. पोलंडचें स्वतंत्र राज्य निर्माण करण्यास जर्मनीची हरकत नाहीं, पण या स्वतंत्र राज्याचें वेडेंवाकडें पाऊल पडूं नये म्हणून जर्मनीनें आपली कृपादृष्टि त्यावर ठेवण्यास कोणती हरकत ? सर्व्हिय व रोमानिया यानीं बाल्कन युद्धाच्या वेळीं मिळविलेले मुलूख सोडणें म्हणजे 'मुलूख नको' या तत्त्वाप्रमाणें वागणें नव्हे काय ? शिवाय सर्व्हियानें आस्ट्रियाचा पुन्हां उपमर्द करूं नये अशी कांहीं तरी तजवीज या तहांत झाल्याशिवाय आस्ट्रियाच्या मनाला स्वस्थता तरी कशी प्राप्त होईल ? असे एक ना दोन कित्येक प्रश्न अर्थाच्यावेळीं उपस्थित करून जर्मनीनें सरळ कबूली देण्याचें नाकारलें, पण कामकरीपक्षाशीं आपलें असलेलें सूत मात्र तोडलें नाहीं. रशियावरील संकटाचा फायदा घेऊन जर्मनी त्यांतल्यात्यांत आपलें घोडें पुढें ढकलतो आहे असें पाहून इंग्लंड, फ्रान्स व इटली यांनीं 'ना मुलूख ना खंडणी' या रशियन मंत्राचे चार चार पांच पांच अर्थ करण्यास सुरुवात केली. आल्सास लारेन्स हा फ्रान्सचा पूर्वीचा मुलूख जर्मनीनें इ. स. १८७० सालीं घेतला. तो जर फ्रान्सनें परत मागितला, तर फ्रान्सनें तो मुलूख या युद्धांत राज्यास जोडला असें कसें म्हणावें ? बेल्जम व फ्रान्स येथील घरादारांची नासाडी जर्मनीनें केली, हें नुकसान मागणें म्हणजे खंडणी घेणें नव्हे. माऊंटनिग्रो, सर्व्हिया, रोमानिया या देशांचा एक स्वतंत्र पट्टा आस्ट्रिया–जर्मनी व तुर्की–साम्राज्य यांच्यामध्यें निर्माण करून जर्मनीचा बगदादवरील डोळा निष्पाप करण्यांत मुलूख जोडण्याचें पाप कोणास लागणार आहे ? आर्मेनियन लोकांना व आरबांना तुर्कांच्या सत्तेखालून सोडविणें हें पुण्य नव्हे काय ? शिवाय आफ्रिकेंतील जर्मनीच्या वसाहतीमधील आफ्रिकन मूळ रहिवाश्यांना जर्मनीची सत्ता जर नकोशी असली तर त्या वसाहती तरी जर्मनीला कशा परत द्याव्या ? अशारीतीनें 'ना मुलूख ना खंडणी' या रशियन सूत्रवाक्यावर लांबलचक वर्तिकें सुरू होऊन अर्थाचा अनर्थ होऊं लागला. तेव्हां सांप्रत तहाची वाटाघाट सोडून देऊन एकदां चांगलें लढावयाचें, जर्मनांचा चांगला पुरता समाचार घ्यावयाचा आणि मग तहाची वाटाघाट करावयाची असें दोस्त सरकाराप्रमाणें रशियाच्या नव्या सरकारानें ठरविलें, आणि जर्मनीवर चाल करून जाण्यास रशियन लष्कर समर्थ होईल अशा प्रकारची नवी

तयारी आरंभिली. पण रशियांतील सोशियालिस्ट पक्षाला प्रथम लढाईत जय मिळवावयाचा आणि मग तहाचें बोलणें बोलावयाचें, हा कार्यक्रम आवडला नाहीं. आणि रशियांतील कामकरी व सोशियालिस्ट पक्षानें स्वीडन देशांत स्टॉकहोम येथें तहाची वाटाघाट करण्याकरितां सर्व राष्ट्रांतील सोशियालिस्ट प्रतिनिधींची कान्फरन्स बोलाविली. या कान्फरन्सला जर्मनींतून नऊ प्रतिनिधी जून प्रारंभालाच गेले असून इंग्लंडांतूनहि कांहीं प्रतिनिधी जाणार आहेत. इंग्लंडांतील प्रतिनिधि हे सरकारतर्फे किंवा सर्व राष्ट्राच्या तर्फे जाणार नसून जुलैमधील कान्फरन्सच्या बैठकीलाहि हजर राहणार नाहींत. रशियांतील कामकरी पक्षाला इंग्लंडांतील कामकरी पक्षाचें म्हणणें समजून सांगण्यास ते जाणार असून वाटेंत स्टॉकहोम येथें कांहीं लोकांच्या गांठीं ते घेणार आहेत इतकेंच. फ्रान्समधील सोशियालिस्ट पक्षानें आपले प्रतिनिधि निवडले; पण फ्रेंच सरकारनें त्यांना फ्रान्समधून बाहेर जाण्याची परवानगी देण्याचें नाकारलें. एवंच जुलै महिन्यामध्यें भरणारी कान्फरन्स ही जर्मनी व रशिया या दोन राष्ट्रांतील सोशालिस्ट पक्षांचीच तेवढी होय. या कान्फरन्सच्या ठरावाप्रमाणें जर्मनी थोडाच वागणार आहे ? कारण जर्मनींतील सोशालिस्ट पक्ष म्हणजे जर्मन सरकार नव्हे. सांप्रत स्टोकहोम येथें जमलेले व जुलै महिन्यांत जमणारे रशियन सोशालिस्ट झाले तरी नव्या रशियन सरकारनें नेमलेले प्रतिनिधि नव्हे. ते उपटसुंभ व स्वयंभु प्रतिनिधि दिसतात. यांना पेट्रोग्राड येथील नव्या सरकारचा पाठिंबा दिसत नाहीं. पेट्रोग्राड येथील कामकरी व सैनिक यांच्या कमिटींत आपापसांतच या स्टॉकहोमच्या कान्फरन्ससंबंधानें बराच मतभेद झाला असून कामकरी पक्षांत दुही झाली आहे. या दुहींतील एक पक्ष लवकर तह झाला पाहिजे व प्रसंग पडल्यास स्वतंत्रहि तह करण्यास हरकत नाहीं असें प्रतिपादन करणारा असून दुसरा पक्ष दोस्त सरकारांच्या तंत्रानें वागण्याच्या कामी रशियन नव्या प्रधानमंडळाला मदत करणारा आहे. तहवाले व लढवय्ये असे दोन तट सांप्रत रशियांत झाले आहेत. तहवाल्यांचें केंद्रस्थान सांप्रत पेट्रोग्राड शहरीं नसून फिनलंडच्या आखातांतील रशियाच्या आरमाराचें मुख्य ठिकाण जें क्रूनस्टँड बंदर त्या जागीं आहे. क्रून स्टँडचा सर्व जिल्हा तहवाल्यांच्या वतीचा झाला असून बाल्टिक समुद्रांतील रशियाचें आरमारहि तहवाल्यांना मिळाल्यासारखें झालें आहे. या तहवाल्यांनी जूनच्या प्रारंभीं पेट्रोग्राड येथील सरकारला अशी धमकी दिली आहे कीं, जर तुम्ही आमच्या कार्यक्रमाला संमति दिली नाहीं तर आमचे खलाशी पेट्रोग्राड शहराजवळ उतरून पेट्रोग्राड शहर हस्तगत करून घेण्यास चुकणार नाहींत. या धमकावणीला

पेट्रोग्राडचें प्रधानमंडळ भीक घालीत नसून धीमेपणानें व पोक्तपणानें वागण्याचा निश्चय पेट्रोग्राडच्या सरकारनें केला आहे. या क्रूनस्टँडच्या बंडाळीचा अनिष्ट परिणाम रशियाच्या लष्करावरहि होत असून लष्करची बिघडलेली घडी पुन्हां बसविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नाहीं असें वाटून सेनापति आलेक्झिप यांनीहि जून प्रारंभीं आपल्या जागेचा राजीनामा दिला. सेनापति ब्रुसिलाफ हे मुख्य सेनानायक झाले असून त्यांच्या नेतृत्वाखालीं रशियन लष्कर जर्मनीशी टक्कर देण्यास समर्थ होईल असा भरंवसा उत्पन्न झाला आहे. कसेंहि असो; आणखी दोन तीन महिने तरी रशिया जर्मनीवर स्वारी करण्यास लायक होऊं शकत नाहीं. तेवढ्या अवधींत रशियांतील तहवाल्यांची आरडाओरड जर बंद झाली तरी देखील दोस्त सरकारांचें मोठें काम होईल. रशियानें जर्मनीवर उलट स्वारी करून जर्मनांचा पक्का पराभव करावा अशा प्रकारच्या रशियन मदतीची अपेक्षा दोस्त सरकारांना नाहीं. रशियानें तसें केलें तर चांगलेंच; पण त्यामुळें दोस्त सरकारांचा शेवटचा विजय नडला आहे अशांतला भाग मुळींच नाहीं. रशियानें स्वतंत्र तह न करतां रशियाच्या रणभूमींत सांप्रत ऑस्ट्रो–जर्मन सैन्य जेवढें आहे तेवढें तरी आणखी वर्ष दोन वर्षें गुन्तवून ठेविलें तरी पुढील वसंतकाळीं अमेरिकेच्या पांच दहा लाख लोकांच्या सहाय्यानें जर्मनीस मेटाकुटीस आणल्यांवाचून दोस्त सरकार राहणार नाहीं. एप्रिल महिन्याच्या अखेरीस जर्मनीच्या पाणबुड्या बोटींचें भय जितकें वाटत होतें तितकें मे महिन्याच्या अखेरीस राहिलें नाहीं. मे महिन्यांत एप्रिलच्या निम्यानें व्यापारी जहाजांचा संहार जर्मन पाणबुड्या बोटींनीं केला. व हें प्रमाण उत्तरोत्तर कमी होत जाईल असें म्हणतात. पाणबुड्या बोटींच्या चांचेगिरीमुळें इंग्लंडला फार हाल सोसावे लागत आहेत आणि अन्नोदकासंबंधानें विशेष काटकसर करावी लागत आहे हें खरें; पण त्यामुळें उपासमार होऊन जर्मनीच्या तहाच्या अटी इंग्लंडला कबूल कराव्या लागतील हे मात्र खोटें. रशियन राज्यक्रांतीमुळें जर्मनीचा यंदाचा पराभव जरी टळला तरी पुढील सालीं तो टळणें शक्य नाहीं. मात्र रशियांतील तहाची आरडाओरड बंद पडली पाहिजे. आणि त्या आरडाओरडीच्या दृष्टीनें जून–जुलै हे दोन महिने विशेष भानगडीचे व आणीबाणीचे दिसतात. या वेळीं रशियांतील तहवाल्यांची छाप रशियन लष्करावर फाजील पडूं नये म्हणून अँग्लो–फ्रेंच व इटालियन सैन्य ऑस्ट्रो–जर्मनांवर एकसारखें तुटून पडणार हें उघड आहे.



———

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा जून-जुलई महिना

बेल्जम-फ्रान्स व इटली या टापूंतील जून महिन्यांतील लढाया एप्रिल व मे महिन्यांतील लढायांप्रमाणें रक्तपाताच्या दृष्टीनें जरी फार भयंकर झाल्या नाहींत तरी राजकीय वातावरणाच्या दृष्टीनें बऱ्याच महत्त्वाच्या झाल्या. एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांतील लढायांनीं पश्चिम रणभूमीसंबंधानें म्हणजे फ्रान्स व इटली या टापूसंबंधानें आतां असें सिद्ध केलें आहे कीं यंदाच्या सालीं तरी लष्करी धोरणाच्या दृष्टीनें तेथें मोटीशी कामगिरी कोणत्याहि पक्षाच्या हातून होण्याचीं चिन्हें दिसावयाचीं नाहींत. इंग्लंडनें जून महिन्याच्या प्रारंभाला यिप्रेसच्या दक्षिणेला मेसीनी येथें मोठा विजय संपादन केला. मेसीनीच्या टेंकड्यांवर उभा राहून जर्मनीला यिप्रेसच्या बाजूच्या इंग्रजी लष्कराच्या हालचालीवर डोळा ठेवतां येत होता. यिप्रेस व आर्मेंटरीज या दोन ठिकाणच्या लष्करांमध्यें मेसीनीची पाचर जर्मनीच्या हातांत होती. हें पाचराचें व टेहेळणीचें ठिकाण जर्मनीपासून हिसकावून घेतल्याशिवाय फ्लँडर्सच्या बाजूच्या इंग्रजी लष्कराला चैन पडणें शक्य नव्हतें. हें ठिकाण हातीं लागावें म्हणून इंग्रजांनीं गेल्या वर्षापासून तयारी चालविली होती. मेसीनीच्या टेकडीच्या खालीं प्रचंड सुरुंग तयार करून ठेवलेले होते. हे सर्व सुरुंग एकदम उडविण्यांत आले, व त्याच वेळीं शेकडों तोफांनीं रात्रंदिवस मेसीनीवर एवढा भयकर भडिमार केला कीं पृथ्वीच्या पोटांतून बाहेर निघणाऱ्या व आकाशांतून खालीं पडणाऱ्या विलक्षण आगीच्या लोळांचें हातघाईचें युद्धच भूपृष्ठावर होत आहे कीं काय, असा भयानक देखावा दोहों बाजूंच्या दलांना दिसूं लागला ! या आगीच्या लोळांनीं पृथ्वी अकस्मात घुसळली गेली, टेकड्यांचीं मैदानें झालीं व मैदानांचे तलाव झाले. ओढे, नाले व पुरातन वृक्ष हे तर बेपत्ता झाले ! त्या ठिकाणच्या पृथ्वीचा शेंदोनशें वर्षांचा आकार एका दिवसांत बदलला. असलें हें भयानक पृथ्वीमंथन चालू झाल्यावर इंग्रजी सैनिकांनीं हां हां म्हणतां मेसीनीचें ठाणें कबजांत घेतलें. सात आठ हजार जर्मन कैदी व कित्येक तोफा इंग्रजांना मिळाल्या व इंग्रजांच्या शक्तीची चांगली दहशत जर्मनांना बसली. मेसीनीचा विजय मोठा तर खराच, पण तो अखेरीस स्थानिक स्वरूपाचा ठरला. कारण,

नगर वाचनालय, सातारा.



मेसीनीच्या पूर्वेस या विजयानंतर दोन चार दिवस लढूनहि जर्मनीची फळी इंग्रजांना फोडतां आली नाहीं. मेसीनीच्या या विजयावर विरजण घालण्याकरितां जर्मनानीं यिप्रेसपासून बेल्जमच्या किनाऱ्यापर्यंत बरीच हालचाल केली. लांब पल्लयाच्या तोफांनीं डंकर्कच्या बंदरावर गोळे टाकले; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. बेल्जम व फ्रान्स यांच्या किनाऱ्याजवळचा पश्चिम रणक्षेत्राचा भाग फ्रान्सनें इतक्या दिवस आपल्या हातीं ठेविला होता. स्वतःच्या किनाऱ्यावर परराष्ट्राच्या लष्कराचा अंमल नको, या भावनेनें फ्रान्सनें तसें केलें होतें, पण तीहि भावना सोडून देऊन फ्रान्सनें अलिकडे तो टापू इंग्रजांच्या हवालीं केला. या स्थित्यंतरामुळें अधु दुव्यांवर घाव मारावयास सांपडेल या आशेनें जर्मनीनें त्या बाजूवर हल्ले चढविले, पण ते सर्व निष्फळ झाले. मेसीनीच्या प्रचंड उद्योगानंतर यंदाच्या सालीं जर्मनीची फळी फोडण्याचा हिय्या धरण्यापेक्षां पुढच्या वसंतकाळीं अमेरिकेची पांच सात लाखांची पूर्ण मदत येऊन पोंचल्यावर त्या साहसाला प्रवृत्त होणें योग्य होय, असें लष्करी तज्ज्ञांचें मत पडलें. तथापि जूनच्या उत्तरार्धांत इंग्रजी लष्कर स्वस्थ बसलें नाहीं. जर्मन लष्कराला रोज उगाळून उगाळून झिजविण्याचा क्रम सेनाध्यक्ष हेगसाहेब यांनीं अव्याहत चाल ठेवला. लेन्स शहराच्या उत्तरेस व दक्षिणेस इंग्रजांनीं जर्मनांना थोडथोडें मागें हटविलें आणि पश्चिम व दक्षिण या तिन्ही बाजूनीं लेन्स शहराला वेढा दिला. उत्तर फ्रान्सांतील मौल्यवान खाणींच्या प्रदेशास लेन्सपासून प्रारंभ होत असून त्यासंबंधाच्या कित्येक उद्योगधंद्यांचें केन्द्रस्थान लेन्स शहर आहे. या शहरांतील मौल्यवान चीज वस्तु जर्मनांनीं लांबविली असून लष्करी दृष्टयाहि अवजड सामानसुमान जर्मनीनें तेथें ठेवलें नाहीं. प्रसंग पडल्यास पलायन करण्याची सर्व तयारी जर्मनीची झालेली आहे. तेव्हां हें पिकलेलें फळ लवकरच इंग्रजांच्या हातीं गळून पडेल असा तज्ज्ञांचा अन्दाज आहे. तथापि या शहरांतील रस्त्यांत चर खणून आणि मोठमोठया इमारतींना किल्लयांचें स्वरूप देऊन प्रत्येक आळी प्रत्येक पेठ लढवून नंतर लेन्स शहर इंग्रजांच्या हवालीं करावयाचें, असा दृढनिश्चय जर्मनीचा दिसतो. मतलब हा कीं, इंग्रजांच्या तोफांनीं फ्रेंचांच्या सुंदर हवेल्या व प्रचंड कारखाने जमीनदोस्त होऊन क्रोडो रुपयांच्या फ्रेंचांच्या मालमत्तेवरून इंग्रजांनीं गाढवांचे नांगर फिरविले अशी बोंब ठोकावयास सांपडावी. लेन्स शहर चिकाटीनें धरून बसण्याबरोबरच जर्मन वर्तमानपत्रांतून

 खाडिलकर कृ. प्र.

वरील प्रकारच्या चोरांच्या उलटया बोंबा सुरू झाल्या आहेत. या हाकाटीस इंग्रज किंवा फ्रेंच भीक घालणारे नसल्यामुळें लेन्स घेण्याचे इंग्रजांचे प्रयत्न जुलै महिन्यांत शिथिल पडणार नाहींत हें उघड आहे. जून महिन्यांत इंग्रजांच्या बाजूला जसल्या लढाया चालल्या होत्या तसल्या लढाया फ्रेंचांच्याहि बाजूला सुरूच होत्या. फ्रेंचांच्या हल्ल्यापेक्षां जर्मनांनीं या बाजूला अधिक हल्ले केले. किंबहुना व्हर्डूनच्या हल्ल्याची पुनरावृत्ति करण्याचें धाडस या बाजूस करण्याच्या उद्योगांत जर्मन आहेत कीं काय असेंहि जून अखेरीस वाटूं लागलें. सांप्रत फ्रेंचांचें सबंध राष्ट्राच्याराष्ट्र रणभूमीवर उभें आहे लढाई करण्यास लायक असा एकहि पुरुष मागें उरलेला नाहीं. अशा स्थितींत फ्रेंचांवर असह्य भार टाकून फ्रान्सांतील सामान्य जनसमुहालाहि लढाईची कटकट नको असें भासावयास लावणारा उद्योग जर्मनांनीं करावा ह्यांत कांहीं नवल नाहीं. एप्रिल मे महिन्यांत फ्रेंचांनीं जी जंगी चढाई सुरू केली त्याचा परिणाम फ्रान्सच्या अटकळीप्रमाणें झाला नाहीं. सामान्य जनसमूह थोडासा संतुष्ट झाला व फ्रेंच पार्लमेंटमध्यें सेनापतींच्या कर्तबगारीवर कडक टीका करण्यांत आली. या टीकेस उत्तर देतांना फ्रेंच प्रधानमंडळानें असें सांगितलें कीं, लोकांनीं निष्कारण भलत्याच आकांक्षा मनांत उद्भवूं दिल्या व त्यामुळें वाईट वाटून घेण्याचा हा प्रसंग गुदरला. तथापि फ्रान्सच्या मुख्य सेनापतीमध्यें अदलाबदल करण्यांत आली व क्षुब्ध झालेलें लोकमत शांत झालें. लोकमताची ही क्षुब्धता कायम रहावी व फ्रान्सनें फ्रेंच प्रधानमंडळाइतकें तहास नाखुष राहूं नये, ह्मणून फ्रेंच लष्करावरच जर्मनीनें जून महिन्यांत आपला मुख्य मारा सुरू केला. ऱ्हीम्सच्या टापूंत व व्हर्डूनच्या टापूंतील म्यूजनदीच्या डावीकडील भागांत जर्मनांनीं कांहीं ठिकाणीं अवचित हल्ले करून किरकोळ जय मिळविला. हा जय क्षुल्लक व स्थानिक स्वरूपाचा ठरून जर्मन शवानीं रणमैदान तेवढें आच्छादून गेलें. जर्मनांना मोठासा विजय मिळाला नाहीं किंवा फ्रेंचांची फळी फुटली नाहीं. तथापि एवढी गोष्ट मात्र खरी कीं, जून अखेरीस फ्रेंचांना बराच ताण बसला. जून महिन्यांत फ्रेंच रणभूमीप्रमाणें इटलीचे रणभूमीसहि आस्ट्रो-जर्मनांनीं बराच त्रास दिला. मे अखेरीस इटलीनें ट्रिस्टीच्या रोखानें मोठा जय मिळवून ट्रिस्टीबंदर दोन चार आठवडयांत इटलीच्या हातीं खास लागणार असें वाटूं लागलें. पण जून महिन्यांत ही स्थिति पालटून आस्ट्रियाचा दाब धैर्यानें सोसण्याची पाळी इटलीवर आली. कार्सोच्या मैदानावर क्षुल्लक व

ग्रं. ११८
[illegible] ग्रंथालय
क्रांति [illegible]
कि. १०-५-०१ [illegible]



स्थानिक स्वरूपाचे खरे, पण इटलीला थोडेसें मागें हटविणारे असले जय आस्ट्रियाला मिळूं लागले. आणि ट्रेंटिनोच्या टापूंत गेल्या सालच्या रणभूमीमध्यें एक दोन घाटांतून आपले बिनीचे लोक इटलीला मागें घ्यावे लागले. गेल्यासालइतकें दडपण जून महिन्यांत इटलीवर पडलें नाहीं हें खरें पण इटलीला चटदिशी धावून येऊन मदत करणाऱ्या फ्रान्सच्या लष्कराला एकसारखें त्रस्त स्थितींत ठेवून इटलीवरचें दडपण जोरजोरानें वाढवीत जावयाचें; असला लष्करी डाव आस्ट्रो–जर्मन्स खेळत आहेत कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. रशियाप्रमाणें इटलीलाहि तहासंबंधानें उत्सुक करावयाचें व तसें करूनहि जुलै महिन्यांतील तहाची वाटाघाट जर्मनीला अनुकूल अशी न झाल्यास इटलीवरील दडपण एकदम विलक्षण जोरानें वाढवून हिंवाळ्यापूर्वी दोस्त सरकारांचा एक पाय लंगडा करून ठेवावयाचा, असलें लष्करी धोरण जून महिन्यांतील फ्रान्स–इटलीच्या बाजूच्या आस्ट्रो–जर्मनांच्या हालचालीवरून दृग्गोचर होऊं लागलें. फ्रान्सप्रमाणें इटलीचेहि सामान्य प्रजाजन जून महिन्यांत अस्वस्थ होऊं लागले. जून अखेरीस इटलीच्या पार्लमेंटची गुप्त बैठक आठ दिवस चालून तहाच्या वाटाघाटीसंबंधानें व लष्करी धोरणासंबंधानें बरीच चर्चा झाली. प्रधानमंडळानें केलेला खुलासा इटलीचे पार्लमेंटास पटला व प्रधानमंडळावर विश्वास ठेवण्याची सूचना पार्लमेंटमध्यें उघडपणें पास झाली; तथापि जून अखेरीस आस्ट्रो–जर्मनांच्या दडपणामुळें इटली थोडासा चिंताक्रांत झाला. गेल्या सालासारखी काळजी करण्याइतकें हें दडपण जून महिन्यांत जोराचें नव्हतें तरी रशियांतील घोटाळा माजत जाऊन रशिया सर्व सालभर निश्चितपणें स्वस्थच राहाणार असें सिद्ध झाल्यास रशियाच्या बाजूचें आपल्या सैन्याचें वजन काढून घेऊन फ्रान्सला नेहमीं त्रस्त स्थितींत ठेवून इटलीला तुडविण्याचा बेत अंमलांत आणण्याकरितां दीर्घोद्योग केल्यावांचून सेनापति हिंडेनबुर्ग हिंवाळा पाहणार नाहींत, अशी भीति इटलीला वाटूं लागली. गेल्या सालीं रशियन सेनापति ब्रुसेलॉफ यांनीं इटलीच्या अशा संकट समयीं गॅलिशियामध्यें एकदम जोराची चढाई सुरू केली व आस्ट्रियाचा मोठा पराभव करून इटलीच्या रणभूमीचें स्वरूप एकदम पालटून टाकलें. यंदा रशियाच्या असल्या कुमकेची बिलकूल आशा नव्हती. रशियाकडून लष्करी मदत होणार नाहीं असें वाटत होतें, इतकेंच नव्हे तर रशियांतील बजबजपुरी वाढून रशियाचें तहाचें बोलणें

रशिया दोस्त सरकारांच्या घशांत कोंबतो कीं काय अशीहि भीति वाटूं लागली होती. पण जून अखेरीस व जुलईच्या प्रारंभीं रशियाच्या गॅलिशियांतील सैन्यानें टार्नपूलच्या पश्चिमेस पुन्हां उचल केली. आस्ट्रियाच्या व टर्कीच्या सैन्यास पळवयास लावून कित्येक तोफांसह पंधरा–वीस हजार सैन्य कैद केलें. गॅलिशियांत रशियन सेनापति ब्रुसेलॉफ यांनीं तीन चार लाखांची नवीन सेना गोळा केली असून या सेनेस रशियन राज्यक्रांतीच्या पूर्वीच्या दिवसाहून अधिक भरभक्कम मदत नव्या तोफांनीं व दारूगोळयांनी केलेली आहे. प्रिपेट नदीपासून ब्युकोव्हिनापर्यंत सर्व रशियन रणभूमि जागी झाली असून जुलै प्रारंभाला टार्नपूलच्या पश्चिमेस असलेल्या ब्रेझनीच्या महत्त्वाचे ठाण्यास उत्तर व दक्षिण या तीन बाजूंनीं रशियाने वेढा दिला आहे. या चढाईच्या पहिल्या बातम्यांवरून गेल्या सालच्या रशियाच्या विजया-प्रमाणें यंदाहि सेनापति ब्रुसेलॉफ मोठा विजय संपादन करणार अशी सुखमय आशा वाटूं लागली होती; पण जुलईच्या पहिल्या आठवडयांत आलेल्या बातम्या तितक्या उत्साहजनक नसून ब्रेझनीच्या पूर्वेस व प्रिपेट नदीच्या उत्तरेस पिन्स्कच्या टापूंत आस्ट्रो–जर्मनांनीं रशियावर उलट हल्ले करण्यास सुरवात केली आहे, असें प्रसिद्ध झालें आहे. रशियानें मिळविलेला विजय गेल्या सालाइतका मोठा नसला तरी दक्षिणेच्या बाजूची रशियाची सेना पुन्हां उठली असून आस्ट्रो–जर्मनांना थोडथोडी मागें रेटूं लागली आहे ही गोष्टच रशियाच्या सांप्रतच्या स्थितींत अत्यंत महत्त्वाची आहे. रशिया पुन्हां लढूं लागला आहे हें ऐकून दोस्त सरकारांना फार आनंद झाला. आणि रशिया झोपी जाऊन सर्वांच्या गळ्यांत भलत्याच तहाचें लोढणें बांधतो कीं काय ही भीति विलयाला जाऊं लागली. रशियाच्या ह्या हाल-चालीनें फ्रान्स व इटली यांवरील दडपण हलकें होईल, इतकेंच नव्हे तर रशियांतील बजबजपुरीस आळा पडून राज्यक्रांतीनंतरचें नवें सरकार लष्करी दृष्टया अधिक कार्यक्षम होईल. रशियाच्या या नव्या चढाईचे परिणाम महायुद्धाच्या लष्करी धोरणावरच तेवढे व्हावयाचे नसून रशियन राज्यक्रांतीनें उत्पन्न केलेल्या राजकीय परिस्थितीवरहि व्हावयाचे आहेत. तेव्हां आतां या राजकीय परिस्थितीच्या विवेचनाकडे वळणें उचित होय.

रशियांत राज्यक्रांति झाल्यानंतर जरी नवें प्रधानमंडळ नेमलें गेलें व त्या प्रधानमंडळास रशियाचें नवें सरकार अशी संज्ञा प्राप्त झाली तरी खरी सत्ता

म्हणजे मनुष्यबळाची सत्ता सैनिक व कामकरी या कमिटीच्या हातींच राहिली. अर्थात् नव्या सरकारच्या हुकमांची अंमलबजावणी होईना. इतकेंच नव्हे तर; कमिटीनें काढलेले जाहीरनामे सैन्यांतील शिस्तीस विघातक होऊन लढण्याच्या कामांत रशियन सेना नालायक होऊं लागली. कमिटी, ड्यूमासभा, आणि नवें सरकार या तिघांचा परस्परांशीं मेळ बसेना, तेव्हां कमिटींतील प्रमुख लोकांना प्रधानमंडळांतील सहा जागा देण्यांत आल्या व प्रधानमंडळाची व कमिटीची एक तऱ्हेची तोंडमिळवणी करण्यांत आली. लढाईचें खातें व परराष्ट्रीय खातें हीं सोशियालिस्ट पक्षाच्या हातीं गेल्यावर सैन्यांत पुन्हां शिस्त उत्पन्न करण्याच्या कामास सुरवात झाली. सोशियालिस्ट पक्षाचे लोक प्रधानमंडळांत शिरले त्यावेळीं त्यांच्या बऱ्याच अटी नव्या सरकारकडून मान्य करण्यांत आल्या. या नव्या अटींत दोन तीन अटी प्रमुख आहेत. ' ना मुलूख ना खंडणी ' या तत्त्वाला धरून सर्व राष्ट्रांचा मिळून तह घडवून आणण्यास रशियन सरकारनें उघडपणें झटलें पाहिजे अशी एक अट सदर करारनाम्यांत आहे. शिवाय सर्व लष्कर व आरमार बड्या लोकांच्या अंमलाखालीं न राहतां सैनिकांनीं व खलाशांनीं निवडलेल्या अंमलदारांच्या अंमलाखालींच राहिलें पाहिजे, अशी दुसरी अट असून रशियाची राजसत्ता कोणत्या स्वरूपाची असली पाहिजे हें मुक्रर ठरविण्याकरितां रशियाचें नवें मोठें पार्लमेंट लवकरच बोलाविलें पाहिजे अशी तिसरी अट आहे. म्हणजे तह, सैन्याची रचना व राजसत्तेचें स्वरूप या बाबीसंबंधानें करारमदार करून सोशियालिस्ट पक्षाचे लोक प्रधानमंडळांत शिरले. हे करारमदार झाले व सोशियालिस्ट पक्षाचे हातांत बरीच सत्ता गेली तरी रशियांतील बजबजपुरी जून महिन्यांत कमी झाली नाहीं. रशियाची राजधानी पेट्रोग्राड या शहराजवळील क्रुनस्टॅड बंदरांतील कमिटीनें आपल्या प्रांताचा कारभार स्वतंत्रपणें हाकण्यास सुरवात केली व जून महिन्यांत फिनलंडच्या आखातावरील प्रमुख बंदरांनीं क्रूनस्टॅडचाच कित्ता गिरविला. फिनलंडच्या कॉंग्रेसनें फिनलंडचें स्वतंत्र रिपब्लीक असावें, असें ठरविलें. उत्तरेकडील म्हणजे रिगाच्या बाजूचें लष्कर आणि मध्यावरील म्हणजे पोलंडच्या बाजूचें लष्कर यांनीं आपापले अंमलदार निवडण्यास सुरवात करून सैन्यांत घोटाळा उत्पन्न केला. कोसाक जातीच्या सैनिकांच्या कॉंग्रेसनें जर्मनांना रशियांतून हांकून देईतों लढलें पाहिजे असा ठराव पास केला तर सोशियालिस्ट पक्षानें पूर्वीची झारची सत्ता

पुन्हां प्रस्थापित करण्यास कांहीं लष्करी लोक झटत आहेत अशी हाकाटी केली. शेतकऱ्यांची काँग्रेस, दक्षिणेकडील प्रांताची काँग्रेस, सैनिकांची काँग्रेस अशा प्रकारें कितीएक सभा मे–जून महिन्यांत रशियांत भरल्या. प्रत्येक सभेनें कांहीं तरी एक नवें तत्त्व पुढें आणावयाचें, अशी स्थिति या सभांतून दृष्टीस पडली. रशियन भाषा म्हणून जिला म्हणतात ती भाषा राजदरबारची भाषा असली तरी इतर कित्येक भाषा रशियांत चालू आहेत. धर्माच्या बाबतींतहि एकी नसून एकाच खिश्चानिटीचे कित्येक धर्मपंथ होऊन धर्मबंधनाचीहि कित्येक शकलें झालेलीं आहेत. भाषेच्या अनुरोधानें रशियाचे तुकडे पाडून त्या सर्व भागांना स्वतंत्र रिपब्लिकचे अधिकार देऊन भाषा स्वातंत्र्य पूर्णपणें अंमलांत आणावें व असल्या रिपब्लिकांची मोट बांधणारी एक लोकसभा पेट्रोग्राड येथें स्थापून तिचा कारभार तेवढा रशियन भाषेमध्यें चालावा, असें कांहींचें म्हणणें आहे, तर कांहींचें म्हणणें असें आहे कीं, धर्मपंथाप्रमाणें रशियाचे विभाग करून प्रत्येक विभाग स्वतंत्रच लोकसत्तात्मक राज्य बनावें. नवीन राज्यसत्तेसंबंधानें व तिच्या घटनेसंबंधाने असलीं नाना· प्रकारचीं मतें रशियांत सांप्रत वावरत आहेत. लष्कराकडे दृष्टि दिली तर काळ्या समुद्रांतील रशियाचें आरमार व गॅलिशियाच्या बाजूचें म्हणजे दक्षिणकडचें लष्कर हीच कायती वरील नाना प्रकारच्या मतांच्या बाधेपासून अलिप्त राहिलेलीं आहेत. सेनापति आलेक्झीप हे उत्तरेच्या बाजूचे सेनापति होते व जनरल ब्रुसेलॉफ हे दक्षिणेचे सेनापति होते. उत्तरेची सेना शिस्तीच्या लगामापासून मोकळी झाल्यावर नवी शिस्त अंमलांत आणण्यास सेनापति आलेक्झीप हे असमर्थ झाले. रणांगणावर कोठें तरी कांहीं तरी करून दाखविण्याची शक्ति त्यांच्या अंगीं राहिली नाहीं. कारण उत्तरेकडील व मध्यावरील सैन्यानें इतके नवे अंमलदार स्वतः निवडले कीं, आणि पूर्वीचे अंमलदार इतके काढून टाकले कीं, कोणत्या कामास कोण लायक आहे व कोणास हुकूम केला असतां कार्य सिद्धीस जाईल हें समजण्याची मुख्य सेनापति आलेक्झीप यांना पंचाईत पडूं लागली. त्यांनीं कोणाला व कसा हुकूम करावा? सर्वच लष्करी सृष्टी नवीन! पूर्वीच्या ओळखी देखील राहिल्या नाहींत. मुख्य सेनापति आलेक्झीप अशा रीतीनें पंगू झालेले पाहून त्यांना त्यांच्या जागेवरून दूर करण्यांत आले. आणि त्यांच्या जागीं सेनापति ब्रुसेलॉफ यांची नेमणूक करण्यांत आली. गॅलिशियाच्या बाजूच्या लष्करांत गेल्या सालीं सेनापति ब्रुसेलॉफ यांनीं मोठा

विजय संपादन करून दिलेला आहे. अर्थात् त्यांची दक्षिणेच्या लष्करांत मानमान्यता मोठी आहे व या लष्कराचे अंमलदार त्यांच्या अगदं भजनीं लागलेले आहेत. दक्षिणेकडचें लष्कर आपल्या हातचें आहे असें पाहून या लष्करांत जून महिन्यांत नवा दम सेनापति ब्रुसेलॉफ यांनीं उत्पन्न केला. आणि उत्तरेकडच्या व मध्यावरच्या लष्कराची तयारी होण्यापूर्वीच जून अखेरीस व जुलईच्या प्रारंभीं नव्या रशियाच्या नव्या चढाईस सुरवात झाली! दक्षिणेकडील लष्कराचा हा कित्ता मध्यावरील लष्करनें, उत्तरेकडच्या लष्करनें व फिनलंडच्या आखातांतील आरमारानें गिरवून रशियास धन्य करावें, अशी आग्रहाची विनंति उत्तरेच्या बाजला जुलैच्या पहिल्या आठवड्यांत करण्यांत आली आहे. उत्तरेची तयारी होण्यापूर्वी आपल्या हातांतील दक्षिणेचा बाण सेनापति ब्रुसेलॉफ यांनीं कां सोडला, असा या ठिकाणीं प्रश्न उद्भवतो. सदर प्रश्नास उत्तर देण्याकरितां रशियांतील तहाच्या वाटाघाटीकडे आपण वळलें पाहिजे. जर्मनींतील सोशालिस्ट पक्षाच्या मार्फत जर्मनीनें रशियाशीं तहाचें बोलणें सुरू केलें आहे. रशियाला नानाप्रकारच्या सवलती देऊन द्रव्याचीहि मदत करण्याचें जर्मनीनें आश्वासन दिलें व दोस्त सरकारांना सोडून स्वतंत्र तह करण्याविषयीं फार गळ घातली; पण रशियांतील सर्व पक्षांनीं या एकट्यापुरत्या तहाची फेटाळणी करून दिली. रशियन राज्यक्रांतीनंतर रशियांत जी नानाप्रकारचीं मतें पुढें आलीं त्या मतांमध्यें, राजानीं व बादशहांनीं चालविलेल्या सांप्रतच्या या महायुद्धाचा उघडपणें निषेध करून लढाई एकदम बंद पडली पाहिजे असा हट्ट धरून बसणारें एक मत होतें. या मताचा पगडा पेट्रोग्राड येथील सैनिकांच्या व कामकऱ्यांच्या कमिटीवर प्रारंभीं प्रारंभीं पडला व त्यामुळें रशियाच्या उत्तरेकडील सैन्यालाहि त्या मताची थोडीशी बाधा झाली; पण नवें रशियन सरकार दोस्त सरकारांच्या बाजूचें पूर्णपणें असल्यामुळें आणि जर्मनांशीं झुंजण्यास अनुकूल अशीं मतें ड्यूमासभेचीं राहिल्यामुळें जर्मनीचा रशियाला फोडण्याचा डाव फसला. तथापि गेल्या मे महिन्यांत कमिटीचे सभासद ज्यावेळीं रशियन प्रधानमंडळांत सामील झाले त्यावेळीं 'ना खंडणी ना मुलूख' या मंत्राला धरून सर्वांचा मिळून तह करण्याची खटपट करण्यास नवें रशियन सरकार उद्युक्त झालें. 'ना मुलूख ना खंडणी' हा मंत्र पेट्रोग्राड येथील कमिटीनें उच्चारल्याबरोबर आस्ट्रियानें त्याची 'री' ओढली व जर्मनीनें अस्पष्ट संमति दिली. इंग्लंड, फ्रान्स व इटली या तीन राष्ट्रांनीं सदर मंत्रांतील सामान्य तत्व

कबूल केलें खरें पण असल्या तत्त्वांचा बहाणा करून जर्मनी आपला अपजय कसा टाळीत आहे हें त्यांनीं स्पष्टपणें सर्व जगाच्या निदर्शनास आणून दिलें. रशियांत राज्यक्रांति होऊन लढण्यास रशिया असमर्थ झाला असतांहि आस्ट्रो–जर्मनांना या तीन राष्ट्रांनीं मिळून चांगलें मागें रेटलें असून त्या तिघांपैकीं कोणालाहि जर्मनीला उलट हात दाखवितां आला नाहीं. म्हणजे मनुष्यबळाच्या दृष्टीनें आज तुलना केली असतां जर्मनी, आस्ट्रिया, बल्गेरिया व टर्की या चौघांच्या वजनाइतकें वजन आज इंग्लंड, फ्रान्स व इटली या तिघाचें आहे. शिवाय इंग्लंडचें वजन वाढण्यास अद्याप पुष्कळ वाव आहे; पण आस्ट्रो–जर्मनांची वाढ पुरतेपणीं खुंटलेली आहे. अशा स्थितींत रशियानें थोडीशी पुन्हां हालचाल केली तर पुढील सालीं अमेरिकेची पूर्ण मदत येऊन पोंचल्यावर खरपूस मार खाऊन तहाची भिक्षा मागितल्याशिवाय जर्मनीला गत्यंतर राहणार नाहीं. आम्ही अमक्याला जिंकूं, तमक्याला जिंकूं अशी घमेंड जर्मनीच्या सेनापतींना आतां राहिलेली नाहीं. जर्मनीला जो मुलूख पाहिजे होता तो मुलूख जर्मनीनें गिळंकृत केला आहे व महायुद्धांतील जर्मनीचें साध्य आजच सिद्ध झालेलें आहे, ही गोष्ट खरी; पण गिळलेलीं रत्न पचविण्याचें सामर्थ्य जर्मनीच्या अंगांत नाहीं असें दोस्त सरकारांचें म्हणणें आहे; व यंदाच्या सालच्या लष्करी तयारीनें आपल्या मताची सत्यताहि दोस्त सरकारांनीं जगास पटविली आहे. दोस्त सरकारांच्या वाढत्या शक्तीला आळा घालण्याकरितां जर्मनीनें दोस्त सरकारांवर आपल्या पाणबुड्या बोटी सोडलेल्या आहेत. आणि जर्मनी आतां उघडपणें अशी प्रौढी मिरवूं लागला आहे कीं, पाणबुड्या बोटींच्या संहारामुळें इंग्लंडच्या अत्यंत हालअपेष्टा होतील व इंग्लंडासच दातीं तृण धरून तहाची याचना जर्मनीपाशीं करावी लागेल. या दर्पोक्तीचा जर आपण नीट विचार केला तर असें दिसून येईल कीं, गेल्या सालीं रुमानियन सैन्याला जर्मनीने टोला दिला तसा टोला यंदा कोणासहि देण्यास जर्मनीपाशीं शिल्लक सैन्यच नसून जिंकलेलें राखण्यापलिकडे जर्मनीला आज तरी दुसरें कांहीं एक करतां येण्यासारखें नाहीं. रशियाला टोला देण्याकरितां सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं ८–१० लाखांचा गठ्ठा तयार करून ठेविला होता खरा, पण मार्च–एप्रिल व मे या तीन महिन्यांतील अँग्लो–फ्रेंचांच्या चढाईनें सेनापति हिंडेनबुर्ग यांच्या गठ्ठयास पोकळ करून ठेविलें आहे व रशियास एका दृष्टीनें निर्धास्तहि केलें आहे. जर्मनीची भिस्त काय ती आतां

पाणबुडयांच्या संहारावर. मे महिन्यांत या पाणबुडयांनीं जितकीं जहाजें बुडविलीं, जवळ जवळ तितकींच जहाजें जूनमध्यें बुडविलीं. दर आठवडयास इंग्लंडचीं वीस–पंचवीस व इतरांचीं दहा–पंधरा जहाजें बुडविण्याचा क्रम यापुढेंहि असाच राहाणार असें गृहीत धरून चालण्यास हरकत नाहीं. पण इंग्लंडच्या मुत्सद्यांचें असें ठाम मत आहे कीं, हा पाणबुडयांचा संहार असाच चालला तरी अन्नान्नगत होऊन किंवा दारूगोळयाचा तुटवडा पडला म्हणून एक रतिभरहि कमी जोरानें लढण्याचा प्रसंग इंग्लंडवर केव्हांहि येणार नाहीं. रणमैदानावर जर्मनी कमकुवत ठरत चालला आहे आणि पुढील सालीं रशियाच्या व अमेरिकेच्या मदतीनें रणभूमीवर जर्मनीस आपण चोपूंच चोपूं असा पूर्ण भरंवसा अँग्लो–फ्रेंचांना वाटत आहे. जर्मनी कमकुवत झाला असें सिद्ध करणारी दुसरी एक गोष्ट जून महिन्यांत घडून आली. ग्रीसमध्यें अँग्लो–फ्रेंचांचें सैन्य उतरून ग्रीसचा राजा कॉन्स्टँटाइन याला त्याच्या थोरल्या मुलासह ग्रीसमधून बाहेर काढून लावण्यांत आलें व धाकटया मुलाला गादी देण्यांत येऊन सॅलिनोकाच्या बाजूला जमनीविरुद्ध लढणारे माजी मुख्यप्रधान व्हेनीझेलॉस यांच्या हातीं सर्व सत्ता जाऊन ग्रीसमधील नवें धान्य सॅलिनोकाच्या लष्कराला मिळालें, व सर्व ग्रीसचा एक नवा शत्रू जर्मनीस उत्पन्न झाला. आपला मित्र व नातेवाईक ग्रीसचा राजा कॉन्स्टँटाईन हा अशा रीतीनें पदच्युत होत असतां सॅलिनोकाच्या बाजूला जर्मनीनें बिलकूल हातपाय हालविले नाहींत. यावरून रणांगणावरील जर्मनीचा कमकुवतपणा सिद्ध होतो असें कांहींचें म्हणणें आहे. उलटपक्षीं असें प्रतिपादन करण्यांत येतें कीं, जर्मनी रशियाच्या कारस्थानांत गुंतला असून तहाचें बोलणें निष्फळ होणार असें ठरल्यास रशियावरच चढाई करून रशियांतील अव्यवस्था अधिक गोंधळाची करण्याचा त्याचा विचार आहे. जर्मनीचें हें लष्करी धोरण खरें असो वा खोटें असो, रशियानें दम धरून आपल्या सर्व शक्तींचा पूर्ण उपयोग केल्यास यंदा नाहीं तर नाहीं पण पुढील सालीं तरी अमेरिकेच्या मदतीनें जर्मनीस चारीमुंडे चीत मारूं असें दोस्त सरकारांना वाटत आहे. तेव्हां ' ना मुलूख, ना खंडणी ' अशा थाटाचा गळमुळीत तह करण्यास इंग्लंड बिलकूस तयार नाहीं. इंग्लंड व फ्रान्स यांचीं हीं मतें नव्या रशियन सरकारास व पेट्रोग्राड येथील कमिटीस पूर्णपणें समजावून सांगण्यांत आलीं. तथापि कमिटीचे तीन प्रमुख गृहस्थ जर्मनीबरोबर तहाची

वाटाघाट करण्याकरितां जून अखेरीस स्वीडनमध्यें स्टॉकहोम येथें गेले व जुलैच्या प्रारंभाला त्यांनीं जर्मनीच्या सोशियालिस्टांशीं तहाची वाटाघाटहि सुरू केली. स्टॉकहोम येथें वाटाघाट सुरू करून हें त्रिकूट इंग्लंड, फ्रान्स व इटली येथें जाऊन तेथील सरकारांशीं तहाचें खलबत करणार आहे. सर्व जुलै महिना ह्या तहाच्या वाटाघाटींत जाईल हें उघड आहे. या वाटाघाटींत कमिटीचें त्रिकूट व जर्मनी यांचें जर मेतकूट झालें आणि बेल्जम, सर्व्हिया, आल्साक, लॉरेन्स व जर्मन वसाहती यासंबंधानें सदर मेसकुटानें केलेली तडजोड जर अँग्लो–फ्रेंचांना पसंत पडली नाहीं तर कसें ? सदर त्रिकूट म्हणजे कांहीं रशियन सरकार नव्हे, पेट्रोग्राड येथील कमिटीचे ते प्रतिनिधी आहेत. या कमिटीच्या हातांत जरी खरी सत्ता सांप्रत असली तरी या कमिटीच्याविरुद्ध असलेला एक बलवान पक्ष रशियांत सांप्रत पुढें येत असून दोस्त सरकारांचें म्हणणें पूर्णपणें उचलून धरण्यास हा पक्ष एका पायावर तयार आहे. ह्या पक्षाचे अध्वर्यू सेनाध्यक्ष जनरल ब्रुसेलॉक हे असून ड्यूमासभेचा पाठिंबा या पक्षास आहे. ड्यूमासभा मोडण्याचा हुकूम जून अखेरीस पेट्रोग्राडच्या कमिटीनें केला व सप्टेंबरच्या ३० व्या तारखेस रशियाच्या नव्या लोकसभेची निवडणूक होऊन आक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यांत लोकसभा भरावी असें कमिटीनें जाहीर केलें. ड्यूमासभा मोडण्याचा कमिटीचा हुकूम ड्यूमासभेनें जुलई प्रारंभाला अमान्य केला व कमिटीचें त्रिकूट स्वीडनमध्यें तहाची वाटाघाट करावयास निघालें असतां सेनापति ब्रुसेलॉफ याच्या दक्षिणेच्या सेनेनें चढाईस सुरवात केली. अशा स्थितींत जुलई महिन्यांत तहाच्या वाटाघाटीस कोणचें स्वरूप प्राप्त होतें, त्रिकूटाचें व जर्मनीचें संगनमत कितपत होतें, दोस्त सरकारांचा व त्रिकुटाचा लढा कोठें पडतो, व या त्रिकुटाच्या पेट्रोग्राड येथील कमिटीचें महत्त्व कमी करण्यास जनरल ब्रुसेलॉफ यांची चढाई कितपत उपयोगी पडते, या गोष्टींकडे वाचकांनीं जुलै महिन्यांत लक्ष पोंचवावें हें सांगणें नकोच.

# महायुद्धाचा तिसऱ्या वर्षाचा जुलई--आगस्ट महिना

रशियांत राज्यक्रांति झाल्यापासून जून अखेरपर्यंतचे चार महिने विशेष काळजीचे गेले नाहींत, पण जुलै महिना फार काळजीचा गेला व हें काळजीचें ग्रहण आगस्ट--सप्टेंबर महिन्यांत तरी सुटते कीं नाहीं अशी चिंता आगस्ट प्रारंभाला लागून राहिली. रशियन राज्यक्रांतीनें रशियांतील लोकस्थिति तेवढी बदलली पण रणांगणाची स्थिति कांहीं बदलली नाहीं, असें प्रथम प्रथम वाटलें. कांहींना तर उलट अशी नवीन आशा वाटूं लागली कीं रशियांतील लोकमुखी राज्यसत्तेमुळें लष्करचा जोर दिढी दुपटीनें वाढल्यावांचून राहणार नाहीं; पण ही नवी आशा लवकरच फोल ठरली. कारण, रशियांतील नवें सरकार ड्यूमा सभेच्या मुत्सद्दी मंडळाच्या हातांत न रहातां सोशियालिस्ट पक्षाच्या कामकरी कमिटीच्या हातांत गेलें. या कमिटीनेंच राज्यक्रांति घडवून आणिली. ज्याचा तो स्वतंत्र, लढाई नको, कांहीं नको राज्यसत्तेप्रमाणें लष्करहि लोकमुखी झालें पाहिजे; व जमीनदारांच्या जमिनीची वाटणी सर्वांना सारख्या प्रमाणानें करून दिली पाहिजे अशा नानाप्रकारच्या सोशियालिस्ट मतांनीं चोहोंकडे गोंधळ माजविला. लष्करांतील दहा पंधरा लाख शेतकऱ्यांनीं लष्कर सोडून जमीनदारांना हांकून देऊन व कांहीं ठिकाणीं जमीनदारांचे खून करून जमिनी बळकाविल्या ! रेल्वेचे लहान लहान भाग स्वसत्ताक झाले. कांहीं कारखाने व उद्योगधंदे कामकऱ्यांच्या कब्जांत जाऊन पूर्वीचे मालक मालकीला मुकले. चार महिन्यांत महिना पंधरा दिवस टिकणारीं कित्येक लहानसहान रिपब्लिके जन्माला आलीं व लयाला गेली. फिनलंड आखातावरील आरमाराच्या ठाण्यांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें आणि खुद्द फिनलंडच्या पार्लमेंटनें स्वतःच स्वतःला बोलावून फिनलंडची अंतस्थ अखत्यारी जाहीर करून पेट्रोग्राड येथील नव्या रशियन सरकारास धाब्यावर बसविण्याचा उपक्रम केला. दक्षिणेकडील उक्रैन प्रांतानें म्हणजे कीव्हच्या प्रांतानें तीन हजार प्रतिनिधींची सभा बोलावून उक्रैन प्रांतास अंतस्थ अखत्यारी मिळाली पाहिजे असें जाहीर केलें व लष्करासंबंधाच्या बाबतींतहि स्वतःचें निराळें लष्कर ठेवून लढाई करणें व तह करणें यासंबंधानें उक्रैन प्रांताचें स्वतंत्र मत घेतलें पाहिजे असा हट्ट

धरला. या सर्व अंदाधुंदीचा व फाटाफुटीचा लष्करी दृष्टया अत्यंत वाईट परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं असें नव्या रशियन सरकारच्या तेव्हांच ध्यानांत आलें. आणि जून अखेरीस त्यांनीं असें ठरविलें कीं कोठें तरी लष्करी चढाईस प्रारंभ करून महायुद्धाकडे सर्व राष्ट्रांचें मन वेधल्याशिवाय बेबंदशाहीस आळा बसणार नाहीं. जनरल ब्रुसेलॉक यांना बोलावून आणिले व सैन्याचे मुख्य अधिपति त्यांना नेमण्यांत आले. गॅलिशिया व ब्युकोव्हिना या टापूंतील रशियन सैन्यानें चढाई करावी असें ठरून नव्या तोफा, दारूगोळा, विमानें व इंग्रजी लढाऊ मोटारगाडया ऊर्फ टँक्स यांचा मुबलक पुरवठा या सैन्यापाशीं देण्यांत आला. जुलई प्रारंभाला या नव्या चढाईस सुरवात झाली. टार्नपूलच्या दक्षिणेस स्टीर नदी ओलांडून रशियानें ब्रेझनीवर पहिल्या झटक्यासरशी हल्ला केला व आठ दहा हजार आस्ट्रियन सैन्याला कैद केलें. ब्रेझनीच्या बाजूचा हल्ला मुख्य हल्ला नव्हता. ब्युकोलिनांतून ग्यालिशियांत वर शिरावयाचें व हॅलिक्स, स्टॅनिला–स्टीक ह्या रोखानें लेंबर्गकडे जाऊन वाटेंत ब्रेझनीच्या सैन्यास मिळून नंतर उत्तरेकडील सैन्यानें लेंबर्गकडे व ब्युकोव्हिनांतील सैन्यानें पूर्व कार्पेथियन ओलांडून हंगारींत घुसावयाचें, असें लष्करी धोरण या नवीन रशियन चढाईनें स्वीकारलें होतें. जुलैच्या पहिल्या दोन आठवडयांत ह्या लष्करी धोरणास बरेंच यश आले. पहिल्या आठवडयांत ब्रेझनीजवळ गेलेल्या लष्करची गति कुंठित झाली खरी; पण ब्युकोव्हिनांतील सैन्याने हॅलिक्स स्टॅनिला घेऊन बरेच मोठे जय संपादन केले व वीस पंचवीस हजार आस्ट्रियन सैन्य कैद केलें. इतकेंच नव्हे, तर कार्पेथियन पर्वताच्या जंगलाच्या टापूंत किती एक मैल रशियन सैन्य पुढें सरसावलें. जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवडयांत लेंबर्ग घेण्यापेक्षां हंगारीमध्यें घुसणें हाच या चढाईचा मुख्य हेतु आहे, असें स्वच्छ दृष्टीस पडलें. लेंबर्गच्या रोखाची हालचाल ब्युकोव्हिनामधून हंगेरियावर करावयाच्या स्वारीची उत्तर बगल सुरक्षित ठेवण्याकरितांच होती. हंगेरींत घुसल्यावर रोमानियन सैन्यास उचल करण्यास ठीक पडेल व आस्ट्रियाहि 'ना खंडणी, ना मुलूख' या रशियन तत्त्वाप्रमाणें एकदम तह करण्यास स्वतःची कबुली देऊन व जर्मनीचीहि कबुली मिळवून देईन अशी आशा धरून या चढाईची उभारणी केली होती. आठ दहा दिवसांत तीस पस्तीस हजार सैन्य कैद करण्यांत येण्याबरोबर आस्ट्रियांत एकदम धांदल उडाली; व रोमानियानें

पुन्हां कंबर कसण्यास सुरुवात केली. चढाईच्या बुडाशीं असलेले राजकीय हेतु सफल होण्याच्या पंथाला लागले. आस्ट्रियामध्यें तहाची ओरड मोठमोठ्यानें ऐकूं येऊं लागली, व त्या ओरडीचा प्रतिध्वनि जर्मनींतहि उमटूं लागला. जर्मन पार्लमेंटमध्यें जर्मन सरकारनें आपले तहासंबंधाचे बेत स्पष्टपणें लोकांपुढें मांडावे अशी मागणी करण्यांत आली. व सोशियालिस्टपक्षानें 'ना खंडणी, ना मुलूख' या तत्त्वावर जर्मनीनेंहि तह केला पाहिजे अशा अर्थाचा ठराव उघडपणें पार्लमेंट सभेपुढें मांडला. तहवाले व लढवय्ये असे दोन पक्ष जर्मनींत दिसूं लागले व महायुद्धाच्या पूर्वीपासून जर्मनीचे मुख्य प्रधान असलेले बेथमन हालोवेग यांचाहि कल 'ना मुलूख, ना खंडणी' हें तत्त्व स्वीकारण्याकडे ढळूं लागला. लढवय्या पक्षानें मुख्य प्रधानाविरुद्ध काहूर मांजविलें. केसर बादशहाचा विश्वास डॉ. बेथमन हालोवेग यांजवर विशेष असल्यामुळें सोशियालिस्ट पक्ष जर्मनीमध्यें वरचढ होणार असें क्षणभर सर्वांना वाटलें, पण इतक्यांत लढवय्या पक्षाचे निमंत्रणावरून जर्मनीच्या युवराजाची स्वारी बर्लिन येथें दाखल झाली. सेनापति हिंडेनबुर्ग हेहि धावून आले. त्यांच्या बरोबर त्यांचे हस्तक सेनापति ल्यूडेनॉफ हेहि हजर झाले. या सर्व योद्धयांनीं रशियाच्या चढाईमुळें भिण्याचें कारण नाहीं, आम्ही थोडेच दिवसांत मोठे विजय मिळवून दाखवितों असें आश्वासन केसरला दिलें. मुख्यप्रधान बेथमन हालोवेग यांना आपल्या जागेचा राजीनामा देऊन घरीं बसावयास लाविलें. मुत्सद्देगिरींत आजपर्यंत पुढें न आलेले डॉ. मेकेलीस यांच्या अंगावर लढवय्या पक्षानें मुख्यप्रधानाचीं वस्त्रें घातलीं आणि पार्लमेंट सभेंतील निरनिराळया पुढाऱ्यांना बोलावून आणून खाजगीरीतीनें लष्करी गोष्टी त्यांना समजावून सांगून कांहीं दिवस पार्लमेंट सभा विश्रांति घेईल असा बंदोबस्त लढवय्या पक्षानें केला. जर्मन पार्लमेंट सभेला विश्रांति देण्यापूर्वी नवे मुख्यप्रधान डॉक्टर मेकेलीस यानीं रणांगणावर कोणालाहि हार न जाण्याविषयींची जर्मनीची दर्पोक्ति सभासदांना ऐकविली व तहासंबंधानें निर्णयात्मक कांहींच न बोलतां पार्लमेंट सभेची सुट्टी त्यांनीं जाहीर केली. जर्मनीची राजकीय परिस्थिति अशारीतीनें नाजुक झाली असतांना रशियाची चढाई जर्मनीस चांगली भोंवल्यावांचून राहाणार नाहीं असें सर्वांस वाटलें. पण कर्मधर्म संयोगानें जुलै महिन्याच्या तिसऱ्या आठवडयांत गॅलिशियाच्या रणभूमींत एकदम एक चमत्कार घडून आला. गॅलिशिया

व ब्युकोव्हिना या दोन ठिकाणीं रशियास अडविण्याकरितां सेनापति हिंडेनबुर्ग यानीं जुलैच्या प्रारंभापासूनच तयारी करून ठेविली असली पाहिजे हें उघड आहे; पण त्या तयारीस इतक्या थोड्या अवकाशांत एवढें मोठें फळ येईल असें जर्मन सेनापतींनाहि वाटलें नसलें पाहिजे. गॅलिशियाच्या ईशान्य कोंपऱ्यांत टार्नपूल व ब्रॉडी यांच्या दरम्यान रशियाचें अकरावें लष्कर लढत होतें. पहिल्या पंधरावड्यांत सरशीच्यावेळीं रशियन कामदारांचे अंदाजाहून अधिक बळी रणभूमीला पडले, पण असलें नुकसान सोसूनहि रशियन सैन्य पुढें पाऊल टाकीत होतें. या सैन्याचा टार्नपूल व ब्रॉडी यांच्या दरम्यान पहिला पराभव जर्मन सैन्यानें केला. यश मिळत होतें तोंपर्यंत सर्व कांहीं ठीक होतें; पण पहिला पराभव होण्याबरोबर सैन्यांतील सर्व शिस्त बिघडली. अकराव्या लष्करांतील कित्येक पथकें रणांगण सोडून एकदम मागें वळलीं. त्यानीं आपल्या कामदारांचे खून केले; सर्व अवजड तोफखाना शत्रूच्या हातीं लागला; व हलके सामानसुमान घेऊन सर्वांना पळतांभुई थोडी झाली. अकरावें लष्कर उधळलें त्याबरोबर बारावें लष्कर उधळलें व नवव्या दहाव्या लष्करालाहि बेबंदशाहीचा रोग जडला; आणि सर्व गॅलिशियामध्यें रशियाची पीछेहाट होऊन टार्नपूल पहिल्या पराभवापासून १।२ दिवसांतच जर्मनीच्या हातीं लागलें. गॅलिशियांतील रशियन फळींत पंधरा–वीस मैलांच्या तोंडावर भला मोठा भोसका पाडून जर्मन सेना आंत घुसूं लागली. त्याच सुमारास पेट्रोग्राड शहरांतहि लेनिन प्रभृति एकदम तह केलाच पाहिजे म्हणणाऱ्या कांहीं सोशियालिस्टांनीं थोड्याशा सैनिकांच्या मदतीनें नव्या रशियन सरकारचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. दोन तीन दिवस पेट्रोग्राड शहरांत बरीच मारामारी झाली. पण अखेरीस लेनिन प्रभृतींचा पराभव होऊन नव्या सरकारची सत्ता पेट्रोग्राड शहरांत पुन्हां प्रस्थापित झाली. लेनिन प्रभृति मंडळी जर्मनीचे हेर ठरून जर्मनीपासून लांच घेऊन पेट्रोग्राड येथें दंगे केले व लष्करांत फूट पाडून जर्मनीस घरांत शिरूं दिलें असा भक्कम पुरावा आगस्टचे प्रारंभाला रशियन सरकाराला सांपडला आहे. कसेंहि असो, जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत गॅलिशियामधील रशियाची फळी फुटावयाला व पेट्रोग्राड येथें दंगे व्हावयाला एकच गांठ पडली ही गोष्ट खरी आहे. विस्खळित लष्कर व डळमळीत सरकार, असल्या जोडीचा हा योग त्यावेळीं आला, व तो योग आगस्टचा पहिला आठवडा होऊन गेला तरी अंशतः कायम राहिला ही

रशियाच्या दुर्दैवाची गोष्ट आहे. पेट्रोग्राड येथील दंगे तत्काळ नाहींसे झाले खरे, पण नव्या सरकारचें डळमळलेलें आसन कांहीं केल्या जुलै महिन्यांत स्थिर होईना; पेट्रोग्राड येथें दंगे झाले त्यावेळीं लढाईखात्याचे प्रधान केरेन्स्की हे रणभूमीकडे फिरतीवर गेले होते. हे परत येण्याबरोबर निष्ठुरपणानें बंडखोरांना चिरडून टाकण्याचा प्रयत्न करण्यांत आला व त्यांत त्यांना चांगलें यश मिळालें, ही समाधानाची गोष्ट होय. लेनिन आदिकरून बंडवाल्यांना पकडण्यांत आले व आगस्टचे प्रारंभीं बंडफितुरीचा आरोप त्यांजवर ठेवण्यांत येऊन त्यांची उघडपणें चौकशी करण्याची व्यवस्थाहि लागली. पेट्रोग्राड येथील या दंग्यानें प्रधानमंडळाची रचना बरोबर नाहीं असें दृष्टोत्पत्तीस आलें त्यावेळीं प्रधानमंडळांत सोशियालिस्ट पक्षाचे सहा व बाकीचे इतर मताचे लोक होते. अर्थात त्यांचें आपापसांत पटेना. कोणी जमिनीची ताबडतोब वाटणी करून दिली पाहिजे असें म्हणत, कोणी ड्यूमा सभा बंद झाली पाहिजे असे म्हणत, तर कोणी फिनलण्ड वगैरे प्रांतांना आजच अखत्यारी दिली पाहिजे असें प्रतिपादन करीत. या शिवाय तहवाल्यांचा पक्ष प्रधानमण्डळांत होता. एखाद्या प्रधानमण्डळानें एखादी गोष्ट झाली पाहिजे असा हट्ट धरला आणि इतरांनीं त्यास संमति दिली नाहीं म्हणजे पेट्रोग्राड येथील कामकऱ्यांची म्हणा शेतकऱ्यांची म्हणा, किंवा लढवयांची म्हणा, कोणाची ना कोणाची तरी संस्था त्या प्रधानांचें मत उचलून धरी, आणि या संस्थेच्या कच्छपी असलेले लोक हत्यारबंद होऊन इतरांना धाकदपटशा दाखविण्याकरितां पेट्रोग्राडच्या रस्त्यांतून फिरूं लागत, आणि लगेच सरकार उलथून पडतें कीं काय, अशी सर्वांना भीति वाटे ! पेट्रोगाड शहरचें हें क्षुब्ध वातावरण व प्रधानमण्डळाची बिनजुटीची रचना, यामुळें नव्या सरकारचें जीवित फार संकटाचें झालें. ही स्थिति ओळखून प्रधानमण्डळापैकीं त्यावेळचे मुख्य प्रधान व त्यांचे दोनतीन अनुयायी यांनीं राजीनामा दिला व मि. केरेन्स्की यांजकडे मुख्य प्रधान, लढाई खात्याचे प्रधान व परराष्ट्रीय प्रधान ह्या तिघांचीं कामें आलीं. इतर कामावर सोशियालिस्ट मताचेच लोक नेमण्यांत येऊन प्रधानमंडळांत सोशियालिस्टपक्षाचें मताधिक्य झालें. प्रधानमंडळ अशा रीतीनें बऱ्याच अंशीं एकजिनसी झालें खरें, तरी असावी तितकी जूट प्रधानमंडळांत उत्पन्न होईना. कोणी म्हणत, पेट्रोगाड शहर सोडून मास्को शहरांत नव्या सरकारांनीं जावें. कोणी

म्हणत, मास्को येथें सर्व राजकीय संस्थांच्या प्रतिनिधींची कॉंग्रेस भरवून त्या कॉंग्रेसकडून पुढील कार्यक्रम आखून घ्यावा व निरनिराळया मतांची ही वजबजपुरी बंद पाडावी. मास्कोच्या कॉंग्रेसची कल्पना प्रधानमंडळाला रूचली, पण सर्व राजकीय संस्थांचा सामान्यतः विश्वास बसेल अशीच प्रधानमंडळाची रचना असल्याशिवाय कॉंग्रेसपुढें उभें रहाणें ठीक नव्हे असें प्रधानमंडळाला वाटलें. म्हणून मास्कोची कॉंग्रेस तहकूब करण्यांत आली, व जुलै अखेरीस प्रधानमंडळाची पुन्हां दुसरी रचना करण्याच्या उद्योगाला मि. केरेन्स्की हे लागले. पेट्रोग्राड येथें दंगे झाले त्यावेळीं तहवाल्यांचा सुळसुळाट होऊन गॅलिशियांतील कित्येक पथकांनीं पळ काढला. अशा फितुरी पळपुट्यांना जागच्याजागीं ठार मारावे व लष्करी आज्ञेचा भंग करणारांना देहांत शिक्षा देण्यांत यावी असला करडा अंमल मि. केरेन्स्की यांनीं सुरू केला ! पण या अंमलास विरोध करणारेहि कांहीं लोक सोशियालिस्टपक्षांत निघाले. सर्व सोशियाशिस्टपक्षाचा पूर्ण भरंवसाहि मि. केरेन्स्की यांजवर दिसेना. डयूमासभा व क्याडेट सैन्याची संख्या यांचा तर सोशियालिस्टपक्षावर बेभरंवसा. अशा फाटाफुटीच्या वेळीं आगस्ट प्रारंभाला ब्युकोव्हिना व गॅलिसिया येथें आस्ट्रो–जर्मनांची चढाई बरीच जोरावली; व दहाबारा दिवसांत साठसत्तर मैल आस्ट्रो–जर्मन्स पुढें चालून गेले. सेनापति ब्रुसेलॉफ यांच्या कतबगारीवरील रशियाचा विश्वास उडाला व त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला. गॅलिशियांत लढणाऱ्या अकराव्या लष्कराच्या सेनापतीचा खून पाठींत गोळी घालून करण्यांत आला. व उत्तरेकडचे सेनापति गोर्की हे नव्या सरकारच्या विरुद्ध आहेत व झारशीं गुप्त पत्रव्यवहार करीत आहेत, असें वाटल्यावरून त्यांना अटकेंत ठेवण्यांत आलें. विशेष नांवलौकिकाचा उरलेला नाहीं; सैन्याची शिस्त बिघडलेली; शत्रूनें मोठी चढाई सुरू केलेली; लोकांत नाना मतें व नाना पाखंडें वावरत असलेलीं; अशी स्थिति पाहून प्रधानमंडळ एकतंत्री असण्याची आवश्यकता मि. केरेन्स्की यांच्या ध्यानांत आली व त्यांनीं तसें करण्याचा प्रयत्न केला. पण कांहीं केल्या जमेना. तेव्हां त्यांनीं आगस्ट प्रारंभाला रशियांत पुढें होणाऱ्या विचित्र गोष्टीची जबाबदारी आपणास आपल्या माथ्यावर घेववत नाहीं असें प्रधानमंडळास कळविलें, व आपल्या जागेचा राजीनामा दिला. नंतर सर्व प्रधानमंडळ कामकरी कमिटीचें मंडळ, क्याडेट सैन्याचें मंडळ, डयूमासभेचें कौन्सिल व शेतक-

नगर वाचनालय सातारा


त्यांच्या कॉंग्रेसचे पुढारी यांची सभा भरली. रात्रभर वादविवाद झाला, व शेवटीं निर्णय लागला कीं, रशियाचा राज्यकारभार हांकण्यास मि. केरेन्स्की याशिवाय दुसरा कोणीहि लायक पुरुष नाहीं. लगेच सर्वांनीं आपापले राजीनामे मि. केरेन्स्कीं यांच्या हातांत ठेवले व त्यांच्या इच्छेस येईल त्याप्रमाणें त्यानीं एकजिनसी व एकतंत्री प्रधानमंडळ बनवावें अशी त्यांना विनंति करण्यांत आली. आगस्टच्या पहिल्या आठवड्यांत रशियांतील नवें लोकमुखी सरकार अशारीतीनें एकमुखी झाल्यावर मि. केरेन्स्की यानीं आपल्या प्रधानमंडळाची एकतंत्री रचना करून घेतली; व रशियांत बेबंदशाही पूर्णपणें माजते कीं काय म्हणून वाटत असलेलीं भीति अंशतः तरी दूर केली. मि. केरेन्स्की हे सोशियालिस्ट पक्षाचे असले तरी इतर पक्षाशीं तडजोडीनें कसें वागावें हें त्यांना पूर्णपणें माहीत आहे. रणभूमीवर टिकाव धरल्याशिवाय रशियांतील राज्यक्रांति टिकाऊ होणार नाहीं हें तत्त्व ते पूर्णपणें ओळखून आहेत. आणि बेबंदशाहीचें डोकें जोरानें ठेचावयास लागणारी करारी निश्चयाची शक्ति–बुद्धीची तरतरी त्यांच्या अगीं आहे. रशियाचे हे क्रॉमवेल होत, असें कांहींचें ह्मणणें आहे, तर कांहीं यांना नेपोलियनच्या पदवीला चढवितात. सर्व रशियाची व त्याबरोबरच सर्व दोस्त सरकारांची मदार आतां मि. केरेन्स्की यांजवरच आहे. एकदोन महिन्यांच्या अवधींत मि. केरेन्स्की यांचें कर्तृत्व सर्वांच्या प्रत्ययास येईल. व रशियासंबंधीं वाटत असलेली धाकधूक निरर्थक ठरेल, हें येथें सांगणें नकोच. रशियाच्या अंतस्थितीचा येथवर विचार झाला. जर्मनींच्या ज्या चढाईमुळें ही अंतस्थिति इतकी विकोपास गेली त्या चढाईकडे आतां वळूं.

## रशियावर जर्मनीची चढाई

रशियांत राज्यक्रांति झाल्यापासून जर्मनी रशियाच्या वाटेला गेला नव्हता, पण जुलै प्रारंभाला रशियानें गॅलिशियावर चढाई केल्यामुळें त्या चढाईचा प्रतिकार करण्याकरितां आस्ट्रो–जर्मनांचें सैन्य ब्युकोव्हिना व गॅलिशिया या बाजूला वळलें व कांहीं रशियन पथकांनीं एकाएकीं रणभूमि सोडल्यामुळें उलट चढाई करण्यास आस्ट्रो–जर्मनांना ठीक पडलें. टार्नपूलच्या पश्चिमेस पंचवीस तीस मैल व नीस्टर नदीच्या दक्षिणेस तीस चाळीस मैल रशियन सैन्य चाल करून गेलें होतें. आस्ट्रो-जर्मनांनीं उलट हल्ल्यांत टार्नपूलच्या पूर्वेस पंचवीस तीस मैल रशियनांना मागें हटविलें. सर्व गॅलिशियांतून मागें हटून रशियास कामेनेट–पोडोलिया प्रांतांत परत

जावें लागलें, व त्याहि प्रांतांत सरहद्दीवरील नदी बऱ्याच ठिकाणीं ओलांडून आस्ट्रो–जर्मनांचें सैन्य घुसलें. रशियाचा कामेनेट–पोडोलिया हा प्रांत व त्याच्या जवळचा गॅलिशियाचा भाग यांच्या दक्षिण सरहद्दीनें नीस्टर नदी वहात असून या नीस्टर नदीला सदर दोन प्रांतांत मिळून पंधरा वीस मैलांच्या अंतरावर दहाबारा नद्या उत्तरेकडून दक्षिणेकडे वहात येऊन मिळतात. पश्चिमेकडून पूर्वेकडे मागें परतणाऱ्या सैन्याला या नद्यांचा चांगला आश्रय मिळतो. या सर्व नद्यांचा उगम टार्नपूल व पोडोलिया प्रांतांच्या उत्तर भागांतून होतो. अर्थात् हा नद्यांचा मुलूख जर कब्जांत घ्यावयाचा असेल, तर त्यांच्या उगमा जवळचा प्रांत प्रथम ताब्यांत घेतला पाहिजे, आणि नंतर नदीच्या ओघानें खालीं उतरून शत्रूस पलीकडच्या नदीचा आसरा घ्यावयास लाविलें पाहिजे. टार्नपूलचा प्रांत आस्ट्रो–जर्मनांच्या हातीं पडतांच टार्नपूलच्या दक्षिणेकडील सर्व गॅलिशिया आठ दहा दिवसांत आस्ट्रो–जर्मनांना आक्रमितां आला. जुलै अखेरपर्यंत दररोज पांच सहा मैल या वेगानें आस्ट्रो–जर्मन्स साठसत्तर मैल चालून गेलें. आगस्ट आरंभाला टार्नपूलच्या पूर्वेस व वायव्येस पंचवीस तीस, मैलांवर रशियानें जर्मनीस अडवून धरिलें आहे. ही आडकाठी मोडून टार्नपूलपासून ओडेसापर्यंत जाणाऱ्या आगगाडीच्या रोखानें आस्ट्रो–जर्मन्स साठसत्तर मैल आंत घुसेपर्यंत, म्हणजे कीव्ह पासून कामेनेटस–पोडोलिया प्रांतांत येणाऱ्या आगगाडीचें जंक्शन स्टेशन गाठीपर्यंत. पोडोलिया प्रांतावर आस्ट्रो–जर्मनांचा शह बसणें शक्य नाहीं. गॅलिशियावर स्वारी करणाऱ्या रशियन सैन्याचा मुख्य जमाव सांप्रत पोडोलिया प्रांतांत आहे व तो जमाव मोडण्यास टार्नपूलपासून पोडोलिया प्रांतांतून ओडेसाकडे जाणाऱ्या आगगाडीनेंच आस्ट्रो–जर्मनांनीं पुढें सरकलें पाहिजे. आगस्ट प्रारंभाला आस्ट्रो–जर्मनांचा विशेष नेट टार्नपूलच्या पूर्वेस दिसत नसून ब्युकोव्हिना प्रांतांतून बेसारेबियामध्यें घुसण्याकडे अधिक कल दिसतो. जुलै अखेरीस व आगस्ट प्रारंभाला आस्ट्रो–जर्मनांचा विशेष नेट टार्नपूलच्या पूर्वेस दिसत नसून बुकोव्हिना प्रांतांतून बेसारेबियामध्यें घुसण्याकडे अधिक कल दिसतो. जुलै अखेरीस व आगस्ट प्रारंभाला सर्व ब्युकोव्हिना प्रांत आस्ट्रो–जर्मनांनीं घेतला असून झर्नोव्हिटस शहरहि आस्ट्रो–जर्मनांच्या हातीं आगस्टच्या चवथ्या पाचव्या तारखेला लागले. ब्युकोव्हिनांतील बरेंच रशियन सैन्य त्यानीं उत्तरेकडून दक्षिणकडे रोमानियाच्या मोल्डेव्हिया

प्रांतांत मागें रेटलें. झर्नोव्हिटस शहर सोडतांना रशियन सेनेला झर्नोव्हिटसच्या दक्षिणेंत प्रुथ नदी ओलांडून खालीं उतरावें लागलें. पूर्वेस बेसारेबिया प्रांतांत त्या सैन्यास जातां आलें नाहीं. ब्युकोव्हिनापासून काळ्या समुद्रापर्यंत बेसारेबिया प्रांत पसरलेला आहे. बेसारेबिया प्रांत व रोमानिया ह्यांच्यामध्यें प्रुथ नदी असून उत्तर वायव्य सरहद्दीला नीस्टर नदी आहे. ह्या बेसारेबिया प्रांतांत प्रुथ व नीस्टर ह्या दोन नद्यांमध्यें किरकोळ नद्यानाले कांहीं नाहींत; व चाल करून जाणाऱ्या सैन्यास वाटेंत नैसर्गिक अडथळा कोठेंहि नाहीं. बेसारेबियामध्यें साटसत्तर मैल आस्ट्रो–जर्मन सैन्य चाल करून गेलें तर कीव्हपासून पोडोलियामधून बेसारेबियामध्यें येणारी आगगाडी ते गांठतील व त्यांनीं तसें केल्यास रोमानियांतील व बेसारेबियांतील रूसो–रुमानियन सैन्य एकदम अलग पडेल. जुलै अखेरीला व आगस्टचे आरंभाला ब्युकोव्हिनांत विशेष जोर करून बेसारेबियामध्यें घुसण्याची आस्ट्रो–जर्मनांनीं जी घांई केली त्यांतील लष्करी धोरण रोमानियास अलग पाडण्याचे दिसतें. ब्युकोव्हिना व गॅलिशिया येथें या लढाया चालल्या असतात. मोल्डेव्हियामध्यें रुसो–रुमानियन सैन्य आस्ट्रो-जर्मनांवर हल्ला करूं लागलें, व आस्ट्रो–जर्मनांनीं त्यांना अंगावर येऊंहि दिलें. रोमानियाचें हें पुढें पडलेलें पाऊल बेसारेबियांतून आस्ट्रो–जर्मन जर रोमानियाच्या पिछाडीस उतरले तर रोमानियास अधिक जाचक झाल्यावांचून राहणार नाहीं. कारण झाशीच्या पिछाडीस जर आस्ट्रो–जर्मन सैन्य गेलें तर सर्व मोल्डेव्हिया तांतडीने सोडून दक्षिण बेसारेबियांत जाऊन ओडेसाचा रस्ता जलदीनें गांठण्याशिवाय रोमानियास गत्यंतरच राहणार नाहीं. अशा रीतीनें बेसारेबिया व रोमानिया येथील सैन्य ओडेसाकडे हांकण्याच्या हेतूनें आस्ट्रो–जर्मन्स बेसारेबियामध्यें घुसत आहेत. बेसारेबियांतील हें लष्करी धोरण साध्य व्हावें म्हणून टार्नपूलपासून ओडेसाकडे जाणाऱ्या आगगाडीच्या मार्गानेंहि आस्ट्रो–जर्मनांची जोराची चढाई होईल. कारण, त्या मार्गावर जोराचा नेट लाविला असतां बेसारेबियास विशेषशी कुमक येऊन पोंचणार नाहीं व बेसारेबियाच्या रोखानें आतां जलदीनें पुढें पडणारें पाऊल अधिक जोरानें पुढें पडेल. आगस्ट महिन्यांत पोडोलिया व्यापून बेसारेबिया निम्याहून अधिक घेऊन रूसो–रुमानियन सैन्याला जर ओडेसाकडे आस्ट्रो–जर्मनांनीं रेटलें नाहीं तर जुलै अखेरीस सुरू झालेली जर्मनीची चढाई वर्षदीड वर्षापूर्वीच्या सेनापति मॅकेन्सन साहेबांच्या

नगर वाचनालय, सातारा.
इति-
६८



रवाडीलकर कृ. पु.

चढाईच्या तोडीची न ठरतां किरकोळ स्वरूपाची ठरेल. पण आस्ट्रो–जर्मनांनी जर पोडोलिया प्रांत व्यापला आणि बेसारेबियाचा बराच भाग घेऊन रोमानियाला ओडेसाकडे रेटलें तर ही चढाई भयंकर स्वरूपाची ठरेल. कारण पुढें सप्टेंबर–आक्टोबर महिन्यांत ओडेसा हातचा जाऊन सार्नी, रोव्हनो, या टापूंतून व पोडोलियामधून कीव्हवर चाल करून जाण्यास आस्ट्रो–जर्मन्स चुकणार नाहींत. या ठिकाणीं असा प्रश्न उद्भवतो कीं, ज्या लष्करी धोरणाचें पर्यवसान कीव्ह ओडेसा घेऊन दक्षिणेकडील सर्व रशियन सैन्य गारद करून रशियास स्वतंत्र तह करावयास भाग पाडण्यांत होणारें आहे,असलें लष्करी धोरण स्वीकारण्यास लागणारें मनुष्यबळ आस्ट्रो–जर्मनांपाशीं आहे काय ? कोणीं म्हणतात आहे, कोणी ह्मणतात नाहीं. ज्या अर्थी सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं पांच तास वर्षें नांवाजलेले जर्मनीचे मुख्य प्रधान मि. बेथमन हालोवेग यांना राजीनामा द्यावयास भाग पाडलें, त्या अर्थी रशियास मोठा टोला देण्याची त्यांची तयारी असली पाहिजे, व गॅलिशियांत व ब्युकोव्हिनांत ऐती संधि मिळाल्यावर रशियास कायमचा लंगडा–लुला करण्यास ते कमी करणार नाहींं, असा काहींचा तर्क आहे. उलटपक्षी असें साधार प्रतिपादण्यांत येतें कीं, गेले चार पांच महिने फ्रान्स–बेल्जममध्यें जर्मनीचें मनुष्यबळ अतोनात खर्ची पडलेलें असल्यामुळें दीडदोन वर्षांपूर्वींची ताकद जर्मनींत आतां उरलेली नाहीं. जर्मनीनें जर रशियावर विशेष जोराची चढाई केली तर फ्रान्स–बेल्जममध्यें जर्मनी लंगडा पडलाच पाहिजे; फ्रान्स–बेल्जमकडील आपली बाजू जर जर्मनीनें सावरून धरिली तर रशियाच्या रणभूमींत तुटपुंजा जयाशिवाय जर्मनीला कांहींच लभ्यांश होणार नाहीं. बेल्जममध्यें जुलै अखेरीला व ऑगस्ट प्रारंभाला अँग्लो–फ्रेंचांनीं जर्मनीवर निकराचे हल्ले सुरू केले असून आजपर्यंत झालेल्या लढायांहून ही अधिक भयंकर लढाई लढण्यास सुरवात केली आहे; व बारा पंधरा मैलांच्या तोंडावर अर्धा मैल, मैलपर्यंत जर्मनीस मागें रेटलें आहे. पश्चिम सांभाळून पूर्वेस पुढें पाऊल टाकण्याइतकें मनुष्यबळ आस्ट्रो–जर्मनांपाशीं आहे किंवा कसें याचा निर्णय ऑगस्ट महिन्यांत लागणार असल्यामुळें ऑगस्टच्या संकटांतून रशिया कसा काय निभावतो या काळजीनें सर्वांना सांप्रत ग्रासलें आहे.

तिसरा भाग समाप्त

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत
क्र. ९९६
८८४५०
इति ६८
कि ९=४०